सत्यमेव जयते

# अमरावती महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2012-2013

उप संचालक,(मनपा लेप) विभाग - 3, स्थानिक निधी लेखापरिक्षा, औरंगाबाद

लेखा कोष भवन, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे अमरावती महानगरपालिका यांनी 2012-2013 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

# अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ....................................................................................................1

**कलम ९ अ खालील आक्षेप ....................................................................................................3**

1 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आरोग्य विभागातील औषधी खरेदीतील अनियमीततेबाबत ........................4

2 मुंबई महानगरपालिका अधिनियम -1949 (सुधारणा-2011) नियम 150 अ व नियम 267- अ अन्वये अतिरिक्त अनधिकृत बांधकामास कर आकारणी व वसुली न केल्याबाबत. ..............................................................5

5 महानगरपालिका क्षेत्रातीलमालमत्ताधारकाकडून महानगरपालिकेने अंशतः (PART PAYMENT) कर वसूल करून त्याप्रमाणात वसूल झालेल्याकराच्या प्रमाणात रोजगार हमी कर(उपकर) व शिक्षण कराची रक्कम शासनखाती न भरणेबाबत. ..............................................................................................7

7 महानगरपालिकेस प्राप्त सन 2011-12 च्या सर्व साधारण रस्ता दुरुस्ती अनुदानातील अनियमितता बाबत. .....8

8 मालटेकडी ते देविसदन भवन पर्यंत रस्ता डांबरीकरण कामातील अनियमितता बाबत. ....................................12

11 महानगरपालिका अमरावती येथे लेखे दुहेरी नोंद पद्धतीने न ठेवणे बाबत.....................................................15

12 सन 2012-13 या आर्थिक वर्षातील दैनंदिन कचरा उचलणेबाबत निविदेतील अनियमिततेबाबत.................16

14 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये खरेदी केलेल्या मोबाईल फायबर टॉयलेट व हाड्रोलिक ऑटोची नस्ती लेखापरीक्षणास न पुरविल्याबाबत..........................................................................................17

15 सन 2012-13 या आर्थिक वर्षामधील प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमातील आर्थिक अनियमिततेबाबत ....18

16 सन 2012-13 या आर्थिक वर्षातील सेप्टिक संडास टाक्याचे शूल्क वसुलीतील अनियमिततेबाबत ...............20

17 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये घनकचरा उचलणेबाबत मे. रक्षा कॉन्क्ट्रक्टर यांना अदा केलेल्या देयकातील अनियमिततेबाबत..........................................................................................22

18 स.न.2012-13 या वित्तीय वर्षात मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदी पेक्षा जास्त झालेल्या खर्चाबाबत.................23

20 पाणीपुरवठा योजनेचे अभिलेखे ,प्रमाणके,अनुषंगिक अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबद्दल .........26

21 माहे मार्च एप्रिल मे जून 2012 च्याजीपीएफ चालानची कपात केलेली रक्कम परत करणे कामातील अनियमितता. ..........................................................................................27

23 वार्ड क्र.05 येथील सन 2012-13 या आर्थिक वर्षातील सामान्य कराच्या वसुलीतील अनियमिततेबाबत. .....28

24 समर बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था् मर्या.अमरावती यांचे मोकाट श्वान पकडणे कामातील अनियमिततेबाबत. ..........................................................................................30

38 सुरक्षा रक्षकाच्या नियुक्तीमधील व रक्कम प्रदानामधील अनियमितता. ....................................................31

41 विमानाव्दारे केलेला नियमबाहय प्रवासाबाबत. ..........................................................................................38

43 शासन अनुदान मुंबईवरून आणण्याकरीता खाजगी वाहनाने केलेल्या नियमबाहय प्रवासाबाबत. ...................40

51 शासकिय पॉलिटेक्नीक कॉलेजमध्ये निवडणूक निकाल व्यवस्था बाबत केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत......41

77 रेल्वे पुल ते मालटेकडी,कॉग्रेस नगर रोड पर्यंत रस्ता डांबरीकरण (BT RENEWAL) कामातील अनियमितता बाबत. 43

81 अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रातील क्षेत्रविकास कार्यक्रम सन 2011-12 अंतर्गत लालखडी रोड वरील कब्रस्थानला संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितता बाबत. ....46
82 अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी घरकुल (रमाई आवास योजना) योजने बाबत. ....49
83 अंबानाला बांधकाम व बळकटीकरण प्रकल्प अंतर्गत 7365 ते 7535 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत. ....52
84 अंबानाला बांधकाम व बळकटीकरण प्रकल्प अंतर्गत (हनुमाननगर) 7100 ते 7195 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत. ....56
85 अंबानाला बांधकाम व बळकटीकरण प्रकल्प अंतर्गत 7875 ते 8045 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत. ....60
86 अंबानाला बांधकाम व बळकटीकरण प्रकल्प अंतर्गत 7705 ते 7875 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत. ....63
87 अंबानाला बांधकाम व बळकटीकरण प्रकल्प अंतर्गत 7535 ते 7705 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत. ....67
88 अंबानाला बांधकाम व बळकटीकरण प्रकल्प अंतर्गत 6500 ते 7100 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत. ....71
94 BOT अंतर्गत नवसारी जवाहर नगर येथे स्पोर्टिंग क्लब बांधणे कामातील अनियमितता बाबत. ....74
96 वार्ड क्र.15 वडाळी येथे पेव्हिंग ब्लॉक,कॉक्रीट रस्ता व नालीचे बांधकाम करणे. ....77
97 प्रभाग क्र.2 रहाटगाव येथे सार्वजनिक संडास बांधणे कामातील अनियमितता बाबत. ....79
99 आशियाना पोलीस क्लब ते एक्सप्रेस हायवेपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामातील अनियमितता बाबत. ....81
104 श्री.शिवदास लक्ष्मणराव देशमुख, श्री.प्रीतम वामनराव रामटेके व श्री.मनीष शालिग्राम हिरोळे अनुरेखक यांच्या सेवापुस्तकातील त्रुटींबाबत. ....84
106 भाजीबाजार संकूल, अमरावती येथील महानगरपालिकेच्या व्यापारी गाळे भाड्याने देण्यातील अनियमिततेबाबत. ....86
107 गाळे व संकुलाचे भाडे वसुलीतील अनियमिततेबाबत ....87
108 महानगरपालिकेचे भाडे तत्त्वावर किंवा लीजवर देण्यात आलेल्या व्यापारी संकूल व व्यापारी गाळ्याचे करारनामे न केल्याबाबत व व्यापारी गाळ्याचे भाडे अत्यल्प असल्याबाबत ....89
109 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील अनियमिततेबाबत. ....92
111 नगररचना विभागाने सन 2009-10 ते 2012-13 मध्ये बांधकाम परवाना दिलेल्या बांधकामांना बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र न दिल्याबद्दल. ....96
112 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये कार्यालयीन वापराकरिता लागणाऱ्या स्टेशनरी व संगणक साहित्य खरेदीतील अनियमिततेबाबत. ....97
113 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अग्निशामक विभागास लागणारे साहित्य खरेदीतील अनियमिततेबाबत. 99

114 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आरोग्य, शिक्षण,अग्निशामक व इतर विभागास लागणारे वेगवेगळ्या साहित्य खरेदीतील अनियमिततेबाबत. ....100
115 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये कार्यालयीन वापराकरिता लागणारे रजिस्टर,फॉर्म,पुस्तके व इतर साहित्याच्या छपाईतील अनियमिततेबाबत ....102
116 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आरोग्य (स्वच्छता)विभागास लागणारी जंतुनाशक औषधे खरेदीतील अनियमिततेबाबत. ....103
119 स.न.2012-13 च्या मंजूर अर्थसंकल्पाबाबत ....105
120 घसारा निधी मध्ये अंशदान जमा न करणे बाबत ....106
121 अधिकारी व कर्मचारी यांचेकडून तारण पत्र न घेणे व नोंदवही परिरक्षित नसनेबाबत. ....107
126 लेखा विभागातील रोख पुस्तकातील अनियमितता. ....108
128 स.न.2012-13 चे मत्ता-दायित्व,आर्थिक स्थिती व वार्षिक लेख्याबाबत अभिप्राय ....109
129 महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्याकरिता महसुली उत्पन्नाच्या 5% तरतूद खर्च करण्याबाबत. ..112
132 12 व्या वित्त आयोगाअंतर्गत अखर्चित निधीतून स्वच्छता विभागासाठी घेतलेल्या लोखंडी लिटरबिन्स खरेदीतील अनियमिततेबाबत. ....114
133 क्रीडा क्षेत्रासाठी 5% खर्च करणे व खासगी संस्थाना नियम बाह्यपणे अनुदान देणे बाबत ....116
138 लेखा परीक्षणात प्रमाणके सादर न करणेबाबत. ....117
139 डॉ.श्यामसुंदर सोनी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी व डॉ.अजय जाधव, सहायक वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवापुस्तकातील त्रुटींबाबत ....122
140 मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम-6 अन्वये आरोग्य व स्वच्छता विभागाने अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून न दिल्याबद्दल. ....123
141 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये दैनदिन साफसफाईच्या प्रभागनिहाय स्वच्छतेतील अनियमिततेबाबत. 125
142 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये उद्यान विभागास लागणारे लोखंडी ट्री गार्ड खरेदीतील अनियमिततेबाबत. ....132
143 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम 129 अन्वये सामान्य कराचे दर सुधारित न केल्याबाबत. ....134
144 श्री.एम. ए. खान स्वाथ्य निरीक्षक यांच्या सेवापुस्तकातील त्रुटींबाबत ....135

**कलम ९ ब खालील आक्षेप ....138**

3 वार्ड क्र.32 मधील बी.एस.एन.एल.चा मोबाईल टॉवर रेल्वेतस्टेशन एरीया यांनी शिक्षण व रोजगार हमी(उपकर) न भरल्याबाबत. ....139
4 वार्ड क्र.18 मधील सामान्य कराची वसुली करताना केलेल्या आर्थिक अनियमिततेबाबत. ....139
6 महानगरपालिका क्षेत्रातील औद्योगिक मालमत्ता धारकांनी सन 2005-06 पासून सामान्य कर न भरल्याबाबत. ....140

9 रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करणे,योजनेचे मार्गदर्शन करणे,निवड झालेल्या लाभार्थांचे प्रकरण तयार करणे,जुण्या कच्च्या घराचे व जागेचे मोजमाप करणे तसेच नवीन घराचा आराखडा तयार करणे इत्यादीसाठी प्रकल्प व्यवस्थापक (PMC) नेमणूक करणे बाबत.........141
22 कंत्राटी स्वास्थ निरिक्षक हयांचे माहे जानेवारी 2013 चे देयक रु.26040/- मंजुरी बाबत. .........144
26 वार्ड क्र.03 हमालपूरा येथील सन 2012-13 या आर्थिक वर्षातील सामान्या कराच्या वसुलीतील अनियमिततेबाबत.........145
34 नोंदवहीमध्ये पावत्या तारीखवार न लिहिल्याबाबत.........147
36 सामान्य प्रशासन विभागाने प्रदान केलेल्या ग्रेड वेतनातील अतिप्रदान वसूल करणेबाबत.........149
37 वर्ग 1 ते 5 मधील मुला-मुलींचे गणवेश खरेदी व वाटपातील नियमबाहय अनियमितता..........152
61 नविन परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजनेतील गंभीर अनियमिततेबाबत. .........159
62 चुकीची वेतननिश्चिती केल्याने झालेल्या जादा प्रदाना बाबत.........161
65 सन 2012 -2013 मध्ये संगणक व संगणक साहित्य खरेदीवर नियमबाहयपणे खर्च करणे बाबत..........163
67 संगणक देखभाल दुरुस्तीवर वर्षात नियमबाहय पणे रु.12,42,654/- खर्च करणे बाबत. .........166
69 सन 2012 -2013 मध्ये संगणक पेपर खरेदीवर नियमबाहयपणे रु. 3,86,700/- खर्च करणे बाबत..........166
70 सन 2012 -2013 मध्ये संगणक लेखा शिर्षातून नियमबाहय पणे स्वागत समारंभा करिता हार लावणे व इतर प्रकाश सुविधा पुरविणे तसेच इंटेरिअर वर्क या बाबीवर रु.10,28,139 /- खर्च करणेबाबत. .........169
78 प्रभाग क्र.21 सुशिलनगर येथे कॉंक्रीट रस्ता व पेव्हिंग ब्लॉक बसविणे कामातील अनियमितता बाबत. .....171
79 वार्ड क्र.10 राधानगर अंतर्गत श्री.यादव ते हनुमान मंदीर पर्यंत पी.सी.सी. नालीचे बांधकाम करणे कामातील अनियमितता बाबत. .........174
80 वार्ड क्र.07 पॅरेडाईज कॉलनी अंतर्गत छत्रसालनगर येथे रमाकांत पांडे ते भाऊराव इंगळे यांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामातील अनियमितता बाबत..........177
89 वार्ड क्र.31 मोरबाग,झापडीपुरा स्विपर कॉलनी येथे कॉंक्रीट नाली व रस्ता बनविणे कामातील अनियमितता बाबत. 179
90 वार्ड क्र.50 दरोगा प्लॉट येथे पेव्हिंग ब्लॉक,कॉंक्रीट नाली व रस्ता बनविणे कामातील अनियमितते बाबत. 182
95 मनपा हद्दीतील वार्ड क्र.37 संजय गांधी नगर नं.01 मध्ये कॉंक्रीट नाली,नालीचे बाजूचे कॉंक्रीटीकरण व विद्युत खांब/दिवे बसविणे कामातील अनियमितते बाबत. .........185
98 वार्ड क्र.23 जय सियाराम नगर ते मेन रोडपासून नाल्यापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामातील अनियमितता बाबत..........188
100 वार्ड क्र.66 डी.पी.रोड येथे खडीकरण करणे कामातील अनियमितता बाबत..........191
101 वार्ड क्र.1 स्वावलंबीनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे कामातील अनियमितता बाबत. .........194
102 वार्ड क्र.2 गुरुकृपा कॉलनी येथील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे कामातील अनियमितता बाबत. 196
103 वार्ड क्र.59 व 60 समर्थ हायस्कूल ते शिवाजी मार्केट रस्ता व नाली बंधने कामातील अनियमितता बाबत. 199
105 महानगरपालिकेच्या संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहाचे भाडे वसुलीतील अनियमिततेबाबत .........201

110 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये नगररचना विभागामध्ये व्यावसायिक इमारतीचे बांधकाम करताना निवासिक्षेत्र जादा दाखवून चुकविलेल्या विकास शुल्काबाबत आक्षेप. ....202
124 स्थानिक संस्था कर दर फरकातील वसुलीबाबत. ....204
130 नगररचना विभागाने बांधकाम परवाना देताना कामगार कल्याण उपकराची रक्कम वसूल न केल्याबाबत..206
131 महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने शासन अधिसूचना दि. 06 ऑगस्ट,2012 नुसार बांधकाम परवाना देताना स्थानिक संस्था कराची रक्कम वसूल न केल्याबाबत. ....208
137 बाजार व परवाना विभागाने वसूल केलेल्या इमारत भाड्यावर केंद्रीय सेवाकर वसूल न केल्याबाबत. ....210

**कलम ९ क खालील आक्षेप ....211**

**------------------- निरंक ------------------- ....212**

**कलम ९ ड खालील आक्षेप ....214**

10 महानगरपालिकेतील कार्यरत असलेल्या अधिकारी /कर्मचारी यांच्या पदांचा आकृतिबंध मंजूर नसले बाबत 215
13 मनपा दवाखाना यशोदानगर, हरिभाऊ वाठ व मोदी दवाखाना यांच्या अभिलेख्यातील अनियमिततेबाबत...215
19 म.न.पा.अमरावतीचा अस्थापना खर्च शासनाद्वारे विहित मर्यादेपेक्षा जास्त असनेबाबत ....217
25 अमरावती महानगरपालिका लेखा परीक्षण सन 2012-13 मध्ये पाळीव स्वानांवर किंवा इतर पाळीव जनावरासाठी अनुज्ञपती शुल्क न आकारल्यामुळे झालेले महापालिकेचे नुकसानीबाबत ....218
27 अग्निशमन सेवा बळकटीकरणाबाबत ....218
28 अग्निशमन विभागातर्फे आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 नुसार फायर ऑडीट करून न घेणे बाबत. ....220
29 आपत्कालीन व अतिवृष्टी काक्षाकरिता किर्लोस्कर जनरेटर,होंडा पंप,खरेदीबाबत. ....221
30 इंधन खरेदी साठानोंद्वही बाबत. ....222
31 बाजार व परवाना विभागाने पावती पुस्तक क्र. 188 वसुलीसाठी एका वर्षानंतर वापरल्याबाबत....223
32 पावती पुस्तक क्र. 805 मधील रक्कम रु. 3734 वसूल करणेबाबत ....224
33 लेखा परीक्षणासाठी पावती पुस्तक क्र. 181 उपलब्ध करून न दिल्याबाबत ....224
35 जमा रक्कम नोंदवहीतील पृष्ठांवर लाल व काळ्या शाईने तिरप्या रेषा ओढल्याबाबत ....225
39 कोर्ट केसेस बाबत अनियमितता. ....226
40 सन 2012-13 अखेर नियमबाहयरित्या अग्रिमाची रक्कम रूपये 2,22,45,380/- थकित असल्याबाबत. ...229
42 शासकिय कामानिमित्य करावा लागलेल्या प्रवासाकरीता घेतलेल्या प्रवास अग्रिमाचे समायोजन न केल्यामुळे झालेल्या नियमबाहय अनियमिततेबाबत. ....231
44 मनपाच्या पदाधिकारी/अधिकारी/कर्मचा-यांना भ्रमणध्वनी सेवा पुरविल्यामुळे झालेल्या नियमबाहय अनियमिततेबाबत. ....234
45 चहापान खर्चावर झालेल्या नियमबाहय खर्चाबाबत. ....235
46 शाळा इमारत भाडयाबाबत झालेल्या नियमबाहय अनियमिततेबाबत. ....238

47 गुंतवणूक नोंदवही बाबत अभिप्राय. ....240
48 मनपाने ठेवी नोंदवही न ठेवल्यामुळे कंत्राटदाराला प्रदान केलेल्या अनामत रक्कमाची तपासनी न करता आल्याबाबत. ....242
49 मतमोजनी करीता अधिकारी/कर्मचारी यांच्या भोजन, नास्ता, चहा पाणी यावर केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत. ....243
50 निवडणूक काळात भाडे तत्वावर आणलेल्या सामानावर केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत. ....245
52 अग्निशमन विभागातील मान्सून पूर्व तयारीकरिता घेतलेल्या अग्रीमाबाबत....246
53 श्री. नरेंद्र श्रीरामजी वानखडे, महिला व बालविकास अधिकारी यांच्या सेवापुस्तक व वेतननिश्चितीबाबत....247
54 श्री. ज्ञानेंद्र प्रल्हादराव मेश्राम,कार्यकारी अभियंता यांच्या सेवापुस्तकातील नोंदींतील त्रुटींबाबत ....249
55 जनसंपर्क विभागातील कामातील त्रुटींबाबत....250
56 श्री. योगेश नरेंद्रराव पिठे , सांख्यिकी अधिकारी अधिकारी यांच्या सेवापुस्तक व वेतननिश्चितीबाबत....251
57 जाहिरात कर वसुलीच्या रकमा वेळेवर वसूल न झाल्याबाबत व रकमा थकीत असल्याबाबत ....252
58 इतवारा बाजार मधील ओटेधारकांकडून भाडे वसूल न केल्याबद्दल ....253
59 अंबा माल व प्रवासी संघटना शहर बस सेवेतील अनियमितता ....254
60 टायरट्युब खरेदी मधील अनियमितता ....256
63 भविष्य निर्वाह निधी योजनेतील अनियमितते बाबत. ....257
64 स्थानांतरण व समायोजन नोंदीची नोंदवही न ठेवणे बाबत. ....259
66 संगणक विभागात जंगम मालमत्तेची नोंदवही न ठेवणे बाबत. ....260
68 सन 2003 ते 2010 या कालावधीतील निकामी संगणक निर्लेखित न करणे बाबत. ....261
71 संगणक साठा नोंदवहीतील नोंदी अपूर्ण असणे बाबत ....262
72 सामान्य रोखपुस्तकामधील दिनांक 31/03/2013 अखेरची शिल्लक व बँकखात्यामधील दिनांक 31/03/2013 अखेरची शिल्लक यांचा ताळमेळ न करणेबाबत. ....263
73 सन 2012-2013 मधील माहे मार्च 13 मध्ये आढळून आलेल्या रद्द धनादेशा बाबत. ....267
74 महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता,1971 चे नियमा प्रमाणे विहित नोंदवहया न ठेवणे बाबत. ....268
75 सामान्य रोखपुस्तकातील जमा बाजू व रोखपालचे रोखपुस्तकातील जमा बाजूच्या रकमेतील फरका बाबत तसेच रोखपालचे रोखपुस्तकातील इतर व्यवहारा बाबत. ....270
76 सामान्य रोखपुस्तकाच्या तपासणी अनुषंगाने आढळून आलेल्या इतर अनियमितता बाबत. ....271
91 वार्ड क्र.77 झिरी बडनेरा येथील नाली,रस्ता व संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत. ....273
92 एकूण सांडपाण्याच्या किमान 20% सांडपाण्याचे पुनर्रचक्रिकरण व पुनर्रवापर न करणे बाबत. ....276
93 महानगरपालिका हद्दीतील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (STRUCTURAL AUDIT) न करणे बाबत. ....277
117 वाहन सुटेभाग खरेदी व दुरुस्ती कामातील अनियमितता....279
118 इंधन खरेदी साठी ची देयके तपासणी साठी लॉगबुक उपलब्ध न करणेबाबत....281

122 मालमत्ता कर रक्कमा विहित मुदतीत वसूल न झाल्याने अदत्त रक्कमावर शास्तीची आकारणी केली नसलेबाबत....284
123 सिंकींग फंड मध्ये म.न.पा.द्वारे रक्कम जमा न करणेबाबत....285
125 स्थानिक संस्था कर विभागातील अनियमितता....286
127 वेतनातून अथवा देयकातून वजाती करण्यात आलेल्या विविध रकमा विहित खाती उशिराने भरणा करणेबाबत....286
134 विदयुत विभागाने सन 2012-13 मध्ये अदा केलेल्या वीज देयाकांमध्ये वीज वितरण कंपनीने अतिरिक्त आकार लावल्या बाबत....288
135 विदयुत विभागाने सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये वीज वितरण कंपनीची वीज देयके विहित मुदतीत अदा न केल्यामुळे वीज वितरण कंपनीने दंड आकारल्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत....290
136 विदयुत विभागाने सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये वीज वितरण कंपनीची मागील थकबाकी अदा न केल्यामुळे आकारण्यात येत असलेल्या व्याजामुळे महानगरपालिकेच्या होत असलेल्या आर्थिक नुकसानीबाबत....292
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र....295
परिच्छेदनिहाय अनुक्रमणिका....296

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | 51 | | | 49, 50 |
| आयुक्तालय | | | | |
| सामान्य प्रशासन | 38, 41, 104, 121 | 36 | | 10, 19, 44, 45, 53, 54, 56 |
| नगर सचिव | | | | |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 7, 8, 77, 81, 82, 83, 84, 85, 86, 87, 88, 94, 96, 97, 99 | 9, 78, 79, 80, 89, 90, 95, 98, 100, 101, 102, 103 | | 91 |
| शहर अभियंता आणि विद्‌युत विभाग | | | | 134, 135, 136 |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 20 | | | 92 |
| लेखा विभाग | 11, 18, 43, 119, 120, 126, 128, 138 | 61, 62 | | 40, 42, 47, 48, 63, 64, 72, 73, 74, 75, 76, 123, 127 |
| लेखापरीक्षण | | | | |
| नगर रचना | 111 | 110, 130, 131 | | 93 |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | | 124 | | 125 |
| कर निर्धारण व संकलन | 2, 5, 23, 143 | 3, 4, 6, 26 | | 122 |
| आरोग्य | 1, 15, 139, 140, 141, 144 | | | 13 |
| वाहन विभाग | | | | 30, 59, 60, 117, 118 |
| माहिती आणि जनसंपर्क | | | | 55 |
| विधी विभाग | | | | 39 |
| घन कचरा | 12, 14, 16, 17, | 22 | | |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| व्यवस्थापन प्रकल्प | 21 | | | |
| भांडार | 112, 113, 114, 115, 116, 132, 142 | | | |
| परवाना व मंडई विभाग | 106, 107, 108 | 34, 105, 137 | | 31, 32, 33, 35, 57, 58 |
| संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान | | 65, 67, 69, 70 | | 66, 68, 71 |
| शिक्षण विभाग किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक शिक्षण | | 37 | | 46 |
| नागरी समुदाय विकास प्रकल्प विभाग | 109 | | | |
| महिला व बालकल्याण विभाग | 129 | | | |
| क्रिडा विभाग | 133 | | | |
| अग्निशमन विभाग | | | | 27, 28, 29, 52 |
| पशु वध गृह | 24 | | | 25 |

DRAFT

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

## कलम ९ अ खालील आक्षेप

DRAFT

## *1 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आरोग्य विभागातील ऑषधी खरेदीतील अनियमीततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 08**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 5378260.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5378260.00/-

| |
|---|
| ***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये खरेदी केलेल्या ऑषधीबाबत उद्योग व उर्जा विभागाच्या दि. 02/01/1992 च्या शासन निर्णयाचे अनुपालन केलेले नाही.*** |

DRAFT

अमरावती शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करित असताना खालीलप्रमाणे अनियमितता आढ्ळून आलेल्या आहेत.

आरोग्य विभागाने या आर्थिक वर्षामध्ये एकूण 5378260/- रु. ची खरेदी केलेली आहे.

1.सदर खरेदीबाबत महानगरपालिकेने उद्योग व उर्जा विभाग, शासन निर्णय, दि. 02 जानेवारी, 1992 अन्वये व्यापक प्रसिद्धी दिली नसल्याने विभागास स्पर्धात्मक दराचा फ़ायदा मिळालेला नाही.

2.सदर खरेदीबाबत शासनाचा दरकरार उपलब्ध आहे किवा नाही? याची पडताळणी करणे आवश्यक असताना त्याबाबत कोणतीही नोद टिप्पणीमध्ये आढ्ळूण आलेली नाही. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णय दि. 02 जानेवारी 1992 चे पालन झालेले नाही.

3.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र. मा.त.स./प्र.क्र.24/नस्ती-2010/39 दि. 06/08/2010 नुसार 50.00 लक्षापेक्षा जादा किमतीच्या निविदासाठी ई-निविदा प्रकिया वापरणे अनिवार्य केले आहे. त्यानुसार विभागाने एकूण वार्षिक खरेदीबाबत अन्दाजपत्रक तयार करून ई- निविदा वापरणे आवश्यक होते. परन्तु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे शा.नि. दि.02/01/1992 चा व उपरोक्त शासन निर्णयाचे पालन झालेले नाही .

4.ऑषधाच्या गुणवत्तेबाबत तपासणी अहवाल घेतलेला दिसून येत नाही.त्यामुळे मागणी केलेल्या नमुन्यानुसार माल मिळाला किवा नाही याचा बोध होत नाही.

5.शासनाचा मूल्यवर्धित कर, उत्पन कर, स्थानिक सस्था कर, व इतर अनुषगिक कर भरल्याची खात्री नस्तीवरून पटत नाही.

6.ऩिविदा सुचनेमध्ये अतिशय महत्त्वाची अशी पॅन नम्बरबाबत मागणी केल्याबाबत आढ्ळून येत नाही. त्यामुळे भारतीय उत्पन कर अधिनियमाचे उल्लघन केले आहे.

7.महानगरपालिका अमरावतीच्या लेख्यानुसार सन 2012-13 या नोदीनुसार ऑषधी खरेदीसाठी सुधारीत वार्षिक तरतूद रू. 45.00 लक्ष असल्याचे दिसून येते. परन्तु सन 2012-13च्या लेख्यामध्ये नोद्विलेल्या खर्चानुसार ओषधी खरेदीवर एकूण रू. 5378260/- इतका खर्च करण्यात आल्याचे दिसून येते. एकूण वार्षिक तरतुदीपेक्षा रू.878260/- इतका खर्च जास्तीचा व मुम्बई प्रान्तिक अधिनियम 1949 (सुधारणा-2011) अन्वये महापालिकेची मन्जुरी नसताना केल्याचे दिसून येते.

8.ओषधी खर्चाची देयके अदा केलेली मूळ प्रमाणके रू.5378260/- ची लेखापरिक्षणास दर्शविण्यात आलेली नाहीत.

उपरोक्तबाबत आरोग्यविभागास अर्धसमास पत्र क्र.30दिनांक 21/08/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असताना विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 30)

## *2 मुंबई महानगरपालिका अधिनियम -1949 (सुधारणा-2011) नियम 150 अ व नियम 267- अ अन्वये अतिरिक्त1अनधिकृत बांधकामास कर आकारणी व वसुली न केल्याबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मुंबई महानगरपालिका अधिनियम -1949 (सुधारणा-2011) नियम 150 अ व नियम 267-अ अन्वये अतिरिक्त अनधिकृत बांधकामास कर आकारणी व वसुली केलेली नाही. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करीत असताना कर आकारणी व वसुली विभागाने मुंबई महानगरपालिका अधिनियम -1949 (सुधारणा-2011) नियम 150 (अ) व नियम 267- (अ) अन्व ये अतिरिक्त- अन)धिकृत बांधकामास कर आकारणी व वसुली केलेली नाही. खालील निवडक प्रस्तावाची तपासणी केली असता पुढीलप्रमाणे बाबी स्पष्ट होतात.

| अक्र | वार्ड क्र | मालमत्तार धारकाचे नाव | अतिरीक्तर व अनधिकृत बांधकाम क्षेत्रफळ | |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | 08 | श्रीमती पद्मा लक्ष्मी नारायण गांधी | 998 चौ.फुट | |
| 2 | 08 | सौ.रेखा ज्ञानेश्व रराव मोहोड | 207 चौ.फुट | |
| 3 | 08 | श्री गोपाल विठ्ठलराव वांगे | 264 चौ.फुट | |
| 4 | 21 | सौ मनिषा अमरलाल पंजवानी | 200 चौ.फुट | |
| 5 | 21 | परसराम आसुदोमल भगतानी | 200 चौ.फुट | |
| 6 | 56 | अरविंद अर्जुनराव तायडे<br>व<br>वैशाली अर्जुनराव तायडे | बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र नाही. | |
| 7 | 56 | कु.मेघमाला केशवप्रसाद चौबे | बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र नाही. | |
| 8 | 30 | भीमराव श्रावण जाधव | अनधिकृत बांधकाम | |
| 9 | 29 | परमेश्वर शंकरराव सोनोने | अनधिकृत बांधकाम | |
| 10 | 48 | विठ्ठलराव काशिनाथ मैडद | अनधिकृत बांधकाम | |
| 11 | 29 | विलास देवमन वानखेडे | अनधिकृत बांधकाम | |
| 12 | 16 | जुनेदखान मंजूर अहमेदखान | अनधिकृत बांधकाम | |
| 13 | 30 | उमेश भीमराव रायबोले | अनधिकृत बांधकाम | |
| 14 | 30 | लक्ष्मण हरी जोहरे | अनधिकृत | |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | बांधकाम | |
| 15 | 29 | शेख अस्लम शेख अयुब | अनधिकृत बांधकाम | |

सदर अनधिकृत बांधकामास नियम 267 अ अन्वूये दुप्पनट दराने व नियम 150 अ अन्वधये किमा‹ सहा वर्ष मागे जाऊन कर आकारणे आवश्य क असतांना विभागाने त्यापप्रमाणे कार्यवाही केली नाही. तसेच आपल्याग शहरामध्येक अशा प्रकारच्याक सर्व मालमत्तांची माहिती प्रत्येकक झोन निहाय विशेष आकारणी व वसुली विभागाने घेऊन त्याबाबत उपरोक्त नियमान्वये कारवाई करावी.
उपरोक्तबाबत कर आकारणी व वसुली विभागास अर्धसमास पत्र क्र.18दिनांक 28/07/2015 अन्वये अनुपालनास्त्व कळविले असताना विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 18)

### *5 महानगरपालिका क्षेत्रातीलमालमत्ता धारकाकडून महानगरपालिकेने अंशतः (Part Payment) कर वसूल करून त्या प्रमाणात वसूल झालेल्यान्कराच्या प्रमाणात रोजगार हमी कर(उपकर) व शिक्षण कराची रक्कम शासनखाती न भरणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***मालमत्ता धारकाकडून अंशतः (Part Payment) कर वसूल केलेले आहे. परंतु त्या प्रमाणात वसूल झालेल्या कराच्या प्रमाणात रक्कम शासनखाती भरलेली दिसून येत नाही.***

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करीत असतांना झोन नं.4 च्या सामान्य कराच्या वसुलीमध्ये खालील प्रमाणे आक्षेप आढळून आलेले आहेत.
1. दि.4/3/2013 रोजी खालील मालमत्ता धारकाकडून सामान्य कर वसूल करण्यात आलेला आहे.
वार्ड क्र.68/2 मधील औद्योगिक संस्था/मालमत्ता धारक

| अक्र | औद्योगिक | मालमत्ता | पावती | वसूल |
|---|---|---|---|---|

| | संस्थेचे नाव/ मालमत्ता धारकाचे नाव | क्रमांक | क्रमांक | केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री इंडस्ट्रीज | 1339 | 851749 | 2000/- |
| 2 | श्री इंजिनियरींग | 1341 | 851750 | 2000/- |
| 3 | श्रीजी इंडस्ट्रीज | 1340 | 851751 | 2000/- |
| 4 | श्री साईबर वर्क्स | 1359 | 851752 | 10000/- |
| 5 | बी जी मामर्डे | 1290 | 851753 | 1000/- |
| 6 | रिद्धी सिद्धी टायर | 1365 | 851754 | 2500/- |
| 7 | सिंघई इंडस्ट्रीज | 1298 | 889577 | 2000/- |

उपरोक्तe मालमत्तार धारकांनी सन 2012-13 या आर्थीक वर्षामध्यो देय असणा-या करापैकी अंशतः कराचा भरणा केलेला दिसून येतो.

2.महाराष्ट्रद शिक्षण व रोजगार हमी(उपकर) अधिनियम 1962 मधील तरतुदीनूसार महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षण व रोजगार हमी उपकराची वसुली संबंधीत महानगरपालिका करतात. शासन निर्णय महसुल व वन विभाग क्र.ईजीसी/1097/प्र.क्र.199/ल-5,दि.20/01/2003 अन्व ये शिक्षण व रोजगार हर्म उपकरापोटी वसूल केलेला एकूण रकमेच्यार 2% रक्ककम वजा (रिबेट) करून उर्वरीत रक्क/म शासनाकडे भरणा करणे आवश्यकक आहे. महानगरपालिकेने मालमत्ताक धारकाकडून अंशतः(Part Payment) कर वसूल केलेले आहे. परंतु त्याी प्रमाणात वसूल झालेल्या करा‍च्या प्रमाणात रक्क(म शासनखाती भरले दिसून येत नाही.

उपरोक्तबाबत कर आकारणी व वसुली विभागास अर्धसमास पत्र क्र.20दिनांक 28/07/2015 अन्वये अनुपालन सादर करण्यास कळविले असताना विभागाने अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 20)

## *7 महानगरपालिकेस प्राप्त सन 2011-12 च्या सर्व साधारण रस्ता दुरुस्ती अनुदानातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 20**

*लेखा शीर्ष : सर्व.सा.रस्ता दुरुस् शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 15258461.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 13923058.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1335403.00/-

***रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना अंदाजपत्रकीय दराने देणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार***



DRAFT

***निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही केलेली नाही. सदर अनुदानातील 10% रक्कम शहरातील वाहतूक व्यवस्था सुस्थितीत चालू ठेवण्यासाठी वापरणे अनिवार्य असतांना वाहतूक व्यवस्था सुस्थितीत चालू ठेवणे संबधि कामांचा समावेश त्यात करण्यात आलेला नाही. लेखासंहितेतील नियम 161 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता सदर कामांना घेण्यात आलेली नाही. निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे. शहर/कार्यकारी अभियंत्यांनी 10% पेक्षा कमी/जास्त प्राप्त दराबाबतचे समर्थन करणे आवश्यक आहे तसे समर्थन केलेले नाही. प्राप्त निधीचा विनियोग वेळीच न केल्याने व अखर्चित निधी वेळीच योग्यत्या मुदती ठेवीत सदर निधी न गुंतवल्यामुळे महानगरपालिकेचे रु.1302239 व्याजाचे नुकसान झाले आहे. पॅच वर्कची कामे करतांना शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.संकीर्ण 2011/प्र.क्र.467/रस्ते-1 दिनांक- 21.11.2011 मधील निर्देशांचे पालन केलेले नाही. कामाच्या देयकातून 0.25% स्थानिक संस्था कर वसूल केलेला नाही. चाचणी अहवालात अंदाजपत्रकात तरतूद केल्याप्रमाणे डांबराच्या ग्रेड (60/70) बाबत तपशील नमूद नसल्याने अंदाजपत्रका प्रमाणे व योग्य गुणवत्तेचे डांबर वापरल्याची खात्री पटली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार निविदेसोबत ठेकेदाराकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.***

अमरावती महानगरपालिकेस शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र.जेईएन 2011/प्र.क्र.147/नवि-16 दिनांक-15.09.2011 अन्वये सन 2011-12 च्या सर्व साधारण रस्ता अनुदानापोटी रु.14002566 एवढे अनुदान प्राप्त झाले होते. सदर अनुदानातून महानगरपालिकेने एकूण 85 कामे (रु.15258461) प्रस्तावित केली होती. प्राप्त अनुदानापेक्षा अधिक रु.1255895 च्या खर्चास स्थायी समिती ठराव दिनांक- 07.09.2012 अन्वये मान्यता देण्यात आली होती.एकूण 85 कामांपैकी 81 कामांची निविदा सूचना क्र.अमनपा/बांवि/काअ-1/निविदा/03/2012-13 दिनांक-10.09.2012 अन्वये दैनिक बातमीपत्र व साप्ताहिक उठाठेव या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा सूचनेनुसार कोरी निविदा मागणी अर्ज दिनांक-17.09.2012 पर्यंत त्यानंतर दिनांक-27.09.2012 रोजी कोरी निविदा विक्री व दिनांक-28.09.2012 रोजी दुपारी 04.00 वाजेपर्यंत भरलेल्या निविदा स्विकारण्यात आल्या. कोरी निविदा मागणी अर्ज दिनांक-17.09.2012 रोजी 657 अर्ज प्राप्त झाल्याने दिनांक-27.09.2012 च्या निविदा सूचना शुद्धीपत्रकान्वये दिनांक-04.10.2012 पर्यंत निविदा स्विकारण्यात आल्या. त्यानंतर प्राप्त निविदा उघडून साधारणत: माहे नोव्हेंबर 2012 मध्ये कामाचे आदेश देण्यात आले आहेत.

उपरोक्त कामाच्या काही निवडक संचिका तपासल्या असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.संकीर्ण 2011/प्र.क्र.74/नवि-16 दिनांक-18.07.2011 नुसार सदर अनुदानातील 10% रक्कम शहरातील वाहतूक व्यवस्था सुस्थितीत चालू ठेवण्यासाठी शहरातील चौक व रस्त्यांवर वाहतूक नियंत्रण व्यवस्था कार्यान्वित करणे, दिशा दर्शक फलक बसविणे, रस्त्यांवर दुभाजक टाकणे, रस्त्यांवरील लेन मार्किंग सुस्पष्ट व्हावी म्हणून विविध रंगा मध्ये पट्ट्या देणे इत्यादी बाबींसाठी खर्च करणे बंधनकारक आहे.

DRAFT

तथापि सदर निधीतून कामे प्रस्तावित करतांना मनपाने उपरोक्त बाबींवर खर्च केलेला नाही तसेच सदर कामांसाठी 10% निधी राखीव ठेवलेला नाही. त्यामुळे उपरोक्त शासन निर्देशाचे उल्लंघन झाले आहे.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

3. उपरोक्त लेखासंहितेतील नियम 161 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता सदर कामांना घेण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकाच्या शेवटी शहर अभियंता यांनी Technically Approve म्हणून स्वाक्षरी केली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

4. सदर अनुदानातून बहुतांश प्रत्येकी 02 लक्ष रक्कमेची कामे प्रस्तावित केली असल्यामुळे महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी-07/2006/ प्र.क्र.94/ इमारती-2, दि. 16/11/2006 नुसार रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना अंदाजपत्रकीय दराने देणे आवश्यक आहे. तथापि सदर प्रकरणी उपरोक्त शासन निर्देशाचे पालन झालेले नाही. जाहीर निविदा मागवून कामे देण्यात आलेली आहेत. त्यामुळे निविदा प्रसिध्दीवर अनावश्यक खर्च महानगरपालिकेस करावा लागला आहे.

5. सदर कामाची निविदा दिनांक-12.09.2012 रोजी दै.बातमीपत्र व साप्ताहिक उठाठेव या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही न केल्याने निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्याचे निदर्शनास आले त्यामुळे स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेस लाभ मिळालेला नाही.

6. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 202 नुसार टीप-2 नुसार निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे. वास्तविक पाहता प्रसिध्दी पासून निविदा विक्रीस ठेवणे अपेक्षित होते.विशिष्ट ठेकेदारांना कामे देण्यासाठी निविदा विक्रीसाठी व स्विकृतीसाठी पुरसा कालावधी देण्यात आलेला नसल्याचे यावरून स्पष्ट होते हि अतिशय गंभीर बाब आहे.

7. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 187 (ए) टीप 6 नुसार शहर/कार्यकारी अभियंत्यांनी 10% पेक्षा कमी/जास्त प्राप्त दराबाबतचे समर्थन करणे आवश्यक आहे तथापि नमुना दाखल तपासलेल्या वार्ड क्र.4 मधील रस्ता डांबरीकरण (28% कमी दराने) व वार्ड क्र.18 डॉ.डफळे पासून रस्ता डांबरीकरण (10% जास्त दराने) प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8. प्राप्त निधीचा विनियोग वेळीच न केल्याने शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.जिपनि 2009/प्र.क्र.5019/वित्त-3 दिनांक-10.06.2009 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 92

DRAFT

नुसार स्थायी समितीच्या मान्यतेने सदर निधी वेळीच मुदती ठेवीत गुंतवणे आवश्यक होते.तथापि वेळीच योग्यत्या मुदती ठेवीत सदर निधी न गुंतवल्यामुळे रु.9.3% दराने रु.1302239 व्याजाचे महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे.प्राप्त निधीचा वेळीच विनियोग न करणे तसेच अखर्चित निधी वेळीच योग्यत्या मुदती ठेवीत न गुंतविणे यावरून बांधकाम व लेखाविभागात विकास कामाबाबत समन्वय नसल्याचे निदर्शनास आले.

9. सदर अनुदानातून बहुतांश डांबरीरस्ते दुरुस्तीची (पॅच वर्क) कामे करण्यात आलेली आहेत. शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.संकीर्ण 2011/प्र.क्र.467/रस्ते-1 दिनांक- 21.11.2011 मधील मुद्दा 1 ड नुसार दुरुस्तीच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या खरेदी बाबतच्या चलनाची मूळ प्रत देयका सोबत सादर करणे आवश्यक आहे. सदर चलन संबधित रिफायनरी यांनीच दिले याबाबतची खात्री शहर/कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे. तथापि असे चलन संचिकेत आढळले नाही.

10. उपरोक्त शासन निर्देशातील मुद्दा क्र. 2 नुसार शहर/कार्यकारी अभियंता यांनी खड्यांच्या पृष्ठभागाच्या क्षेत्राची मोजमापे 100% तपासणे व तपासणी बाबतच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत करणे अनिवार्य आहे. तथापि शहर/कार्यकारी अभियंता यांनी अशी तपासणी केलेली नाही.

11. उपरोक्त शासन निर्देशातील मुद्दा क्र. 3 नुसार दुरुस्तीच्या कामांसाठी दोषनिवारण दायित्वाचा कालावधी 2 वर्षे इतका करण्यात आलेला असून कामाच्या निविदेमध्ये याचा समावेश करून काम करून घेण्याचे निर्देश असतांना महानगरपालिकेने कामाच्या निविदेत याचा समावेश केलेला नाही व दोषनिवारण दायित्वाचा कालावधी 2 वर्षे इतका गृहीत धरून पुढील योग्यती कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

12. उपरोक्त शासन निर्देशातील मुद्दा क्र. 4 अ नुसार रस्त्यावरील खड्डे भरण्यापूर्वी, खड्डे भरण्याचे काम चालू असतांना तसेच काम पूर्ण झाल्यावर प्रत्येक टप्प्याची छायाचित्रे काढण्यात यावीत व ती देयका सोबत सादर करणे आवश्यक असतांना सदर शासन निर्देशाचे पालन करण्यात आलेले नाही.

13. सदर अनुदानातून केलेल्या काही निवडक कामांच्या संचिका तपासल्या असता अंदाजपत्रका सोबत दर पृथ:करण व लीड चार्ट संलग्न केलेले नसल्याने प्रदान केलेल्या दराबाबत खात्री करता आली नाही.

14. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसुचना दिनांक-06.08.2012 व मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 च्या नियम 27 मधिल उपनियम 5 नुसार सदर कामाच्या देयकातून 0.25% स्थानिक संस्था कर वसूल करणे आवश्यक होते. अमरावती महापालिकेत दिनांक-01.07.2012 पासून स्थानिक संस्था कर लागू झाला असल्यामुळे व सदर निधीतील बहुतांश कामांचे आदेश नोव्हेंबर 2012 मध्ये दिलेले असल्यामुळे देयकातून स्थानिक संस्था कराची रक्कम वसूल करून महानगरपालिका निधीत भरणा करणे आवश्यक होते.

15. निविदेतील अटी/शर्तीनुसार निविदे सोबत ठेकेदारांनी VAT Clearance प्रमाणपत्र अद्यावत सादर करणे आवश्यक होते. तथापि काही निवडक संचिकेत असे अद्यावत प्रमाणपत्र निदर्शनास आले नाही. शासन अधिसुचना दिनांक-04.04.2012 नुसार अनोंदणीकृत ठेकेदारांकडून 5% कार्यकंत्राट कर वसूल करणे आवश्यक आहे.या बाबत विभागाने खात्री करावी व अनोंदणीकृत ठेकेदारांकडून 5% कार्यकंत्राट कर वसूल करावा.

DRAFT

16. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज 10/1009/सी.आर. 309/ख, दि.11.2.2010 नुसार रु.70.67 घनमीटर दराने देयकातून रॉयल्टी कपात करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. तथापि उदाहरणा दाखल तपासलेल्या पॉवर हाउस ते खंडेलवाल ले आउट डांबरीकरण कामाच्या देयकातुन 469.28 घन मीटरची रु.33164 रॉयल्टी कपात करण्यात न आल्याने सदर रक्कम संबधिताकडून वसुल करुन "0853 गौणखनीज" या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.तसेच उर्वरित इतर कामांच्या देयकांची तपासणी करून विभागाने रॉयल्टी कपात करून शासन खाती भरल्या बाबत खात्री करणे आवश्यक आहे.

17. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक आहे. SDBC चा चाचणी अहवाल घेण्यात आलेला आहे. चाचणी अहवालात अंदाजपत्रकात तरतूद केल्याप्रमाणे डांबराच्या ग्रेड (60/70) बाबत तपशील नमूद नसल्याने अंदाजपत्रका प्रमाणे व योग्य गुणवत्तेचे डांबर वापरल्याची खात्री पटली नाही.

18. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.तथापि काही निवडक कामांच्या मोजमाप पुस्तिका तपासल्या असता अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

19. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे त्याच त्या प्रभागात एकच प्रकारची कामे वेगवेगळ्या निधीतून पुन्हा पुन्हा केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

20. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 27 दिनांक- 21.08.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 27)

## *8 मालटेकडी ते देविसदन भवन पर्यंत रस्ता डांबरीकरण कामातील अनियमितता बाबत.*



DRAFT

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 11**

*लेखा शीर्ष :13 वा वित्त आयोग शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 8680324.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8678290.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2034.00/-

***प्रशासकीय मान्यता मिळण्याअगोदरच काम सुरु करण्यात आले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही केलेली नाही. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश असतांना कामाचे भाग पाडण्यात आले आहेत.रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई- निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य केले आहे. तथापि सदर प्रकरणी ई- निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 05 संविदा 2(2) नुसार विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने थेट काम देण्यात आलेले आहे. रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही. शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही.***

प्रशासकीय मान्यता - मा. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगर परिषद प्रशासन दिनांक- 02.12.2011

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-14.12.2011 कामाची मुदत -26.12.2011 पर्यंत

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 8529687 कामावर झालेला खर्च -रु. 8680324

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

2. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

3. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश आहेत. तथापि सदर प्रकरणी या निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे रेल्वे पूल -हमालपुरा ते मालटेकडी रु.85.29 लक्ष व मालटेकडी ते देविसदन भवन रु.85.29 लक्ष असे कामाचे पाडलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपरोक्त निर्देशानुसार कामाचे भाग पाडणे अनियमित आहे.

4. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंस/नस्ती2010/प्र.क्र.34/39दिनांक-06.08.2010 नुसार रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई-निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य केले आहे. तथापि सदर प्रकरणी ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 05 संविदा 2(2) नुसार विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने थेट काम देण्यात आलेले आहे.

5. सदर कामास मा.आयुक्त यांनी दिनांक-02.12.2011 रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.तथापि कार्यकारी अभियंता यांच्या दिनांक-25.11.2011 च्या टिपणीनुसार काम सुरु केल्याचे नमूद आहे. त्यामुळे प्रशासकीय मान्यता मिळण्यापूर्वीच काम सुरु करणे अनियमित आहे.

6. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/प्रक्र.171/08/नवि-20 दिनांक-02.03.2009 नुसार रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही.

7. महाराष्ट्र शासन नगर विभाग परिपत्रक क्र.जिईएन/1098/1357/प्र क्र166/98 मवी-24 दिनांक- 3.11.2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे तथापी शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही. त्यामुळे दुसऱ्या व अंतीम देयकातून 1% विम्याची रक्कम रु. 2034 देयकातून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना प्रो.राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नो.आणि रिसर्च या खाजगी संस्थेचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला आहे. तसेच चाचणी अहवालात अंदाजपत्रकात तरतूद केल्याप्रमाणे डांबराच्या ग्रेड (60/70) बाबत तपशील नमूद नसल्याने अंदाजपत्रका प्रमाणे व योग्य गुणवत्तेचे डांबर वापरल्याची खात्री पटली नाही.

9. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी कारवाई केल्याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास सदर केले नाहीत. त्यामुळे या बाबतची खात्री करता आली नाही.

10. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद

DRAFT

करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

11. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल. ठेकेदारासोबत करारनामा करण्यापूर्वी उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 28 दिनांक- 21.08.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 28)

## *11 महानगरपालिका अमरावती येथे लेखे दुहेरी नोंद पद्धतीने न ठेवणे बाबत*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***शासननिर्णय नगरविकास विभाग क्रमांक लेखास-102004/प्र.क्र.5/नावी31/दिनांक-06/07/2005 नुसार महापालिकेने लेखे दुहेरी नोंद पद्धतीने ठेवण्याचे आदेशित केले आहे , तथापि महानगरपालिका अमरावती येथे लेखे दुहेरी नोंद पद्धतीने ठेवलेले आढळून आलेले नाही*** |

शासननिर्णय नगरविकास विभाग क्रमांक लेखास-102004/प्र.क्र.5/नावी31/दिनांक-06/07/2005 नुसार महापालिकेने लेखे दुहेरी नोंद पद्धतीने(accrual based double entry system ) ठेवण्याचे आदेशित केले आहे.

इकडील अर्धसमास पत्र.क्र.86.दिनांक14/10/2015 नुसार National Municipal Accounting Manual (NMAM) नुसार उपार्जित व दुहेरी नोंद पद्धतीने ताळेबंद,इन्कम व एक्स्पेडीचर अकाउंट इत्यादी वित्तीय लेखे उपलब्ध करून देण्याबाबत मागणी केली असता सदरील लेखे उपलब्ध झाले नाही, त्यामुळे लेखापरीक्षणास तपासणी करून अभिप्राय देता आले नाही.

स.न.2012-13 चे लेखे दुहेरी नोंद लेखा पद्धतीने न ठेवता वार्षिक जमा व खर्चाच्या रक्कमाचे लेखाशीर्षनिहाय वर्गीकरण उपलब्ध करून देण्यात आले आहे त्यावरून स.न.2012-13 चे लेखापरीक्षण केले आहे.

नागरी प्रशासनात सुधारणा घडवून आणणे व स्थानिक स्वराज्य संस्थाना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे व त्यांची बाजारातील पत सुधारण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थाना शासनाने ज्या सुधारणा करणे बंधनकारक



DRAFT

केले आहे त्यातील अनिवार्य सुधारणामध्ये द्विनोंद पद्धतीने ठेवणे हि एक सुधारणा आहे ,परतू अमरावती महानगरपालिकेने अद्याप पावेतो शासननिर्णयानुसार कार्यवाही सुरु केले नाही.त्यामुळे शासननिर्णयानुसार योग्य ती फलश्रुती प्राप्त झालेली नाही ,

तरी शासनाचे निर्देशानुसार सत्वर दुहेरी नोंद लेख पद्धतीचा प्रत्यक्षात अमलबजावणी होणे आवश्यक आहे ,त्यानुसार अनुपालन दर्शवावे .

DATVKGM7601 (Ref No : 86)

## *12 सन 2012-13 या आर्थिक वर्षातील दैनंदिन कचरा उचलणेबाबत निविदेतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 46168200.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 46168200.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 6168200.00/-

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेने दैनंदिन कचरा उचलनेचे काम मे.पूजा कन्ट्रक्शन या संस्थेला देण्यात आले आहे.तीन वर्षाचा करार संपल्यावर कामाला एक वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. ठेकेदाराची बँक ग्यारंटी कंत्राट न संपताच परत केलेली आहे. सन 2012-13 च्या वार्षिक लेख्यानुसार मंजूर आर्थिक तरतुदीपेक्षा रु.61,68,200/- जास्त खर्च करण्यात आलेला आहे.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे स्वच्छता विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये दैनंदिन कचरा उचलण्यासाठीचे काम मे.पूजा कन्ट्रक्शन या संस्थेला देण्यात आले आहे व त्यावर एकूण रु. 4,61,68,200/- इतका खर्च केलेला आहे.त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1.शहर अभियंता यांनी निविदा नस्तीच्या पृष्ठ क्र.137 वर नमूद केलेले वाहतुकीचे दर सन 2007-08 च्या C.S.R.वरून ठरविण्यात आलेले आहेत. मात्र सदरील C.S.R. लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे दराबाबत खात्री करता आलेली नाही.सादर दराबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा अभिप्राय घेणे आवश्यक असताना विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2.कामाच्या अटी-शर्तीनुसार अट क्र. 36 नुसार कंत्राटदाराचे प्रथम देयकातून संपूर्ण कंत्राट रकमेचे प्रथम तीन वर्षाचे कालावधीसाठी 5% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून कपात कपात करण्यात येईल. तसेच प्रत्येक महिन्याचे



DRAFT

देयकातून महवारी कंत्राट रकमेच्या 5% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून कपात करण्यात येईल व ही सर्व रक्कम कंत्राट संपल्यावर परत करण्यात येईल त्यावर व्याज अनुज्ञेय राहणार नाही. काम समाधानकारक न केल्यास तसेच कंत्राट मध्येच सोडल्यास ती रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच कंत्राटाला मुदतवाढ दिल्यास परत वरीलप्रमाणे सुरक्षाठेव कपात करण्यात येईल.अशी तरतूद करण्यात आली होती.परंतु पृष्ठ क्र. 35 व 36 वरील टिप्पणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे 5% सुरक्षा ठेव देयकातून कपात न करता एकूण 36.00 लक्ष रु. ची बँक ग्यारंटी घेण्यात आलेली आहे.तीन वर्षाची मुदत संपल्यावर कामाला मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मात्र बँक ग्यारंटी ठेकेदारास परत देण्यात आलेली आहे.

3.निविदा अटी-शर्तीनुसार अट क्र. 08 व 36 अन्वये महानगरपालिकेने खरेदी केलेले दोन कॉम्पक्टर सदरील ठेकेदारास भाड्याने देण्यात आले होते. त्याचे भाडे वसुलीबाबत दस्तावेज लेखापरीक्षणास दर्शविलेले नाहीत.

4.सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये “दैनंदिन कचरा उचलणे’’ या कामासाठी सुधारित अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार एकूण रु 4.00 कोटी मंजूर करण्यात आले होते.परंतु सन 2012-13 च्या अंतिम वार्षिक लेख्यानुसार सदर कामावर एकूण खर्च रु. 4,61,68,200/- इतका करण्यात आलेला आहे.एकूण मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा हा खर्च रु. 61,68,200/- इतका जास्त असून त्याला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-1949 (सुधारणा-2011) अन्वये महानगरपालिकेच्या स्थायी समिती व सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली नाही. म्हणून सदरील खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत स्वच्छता विभागास अर्धसमास पत्र क्र. 60 दि.30/09/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 60)

## 14 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये खरेदी केलेल्या मोबाईल फायबर टाँयलेट व हाड्रोलिक ऑटोची नस्ती लेखापरीक्षणास न पुरविल्याबाबत

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालीकेच्या स्वच्छता विभागाने खरेदी केलेल्या मोबाईल फायबर टाँयलेट व हाड्रोलिक ऑटोची नस्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 (सुधारणा-2011) व मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम-1930 चे कलम 6 अन्वये लेखापरीक्षणास अभिलेखे पुरविले नाहीत.***

DRAFT

1.अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे स्वच्छता विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये खरेदी केलेल्या मोबाईल फायबर टॉयलेट व हाड्रोलिक ऑटो या नस्त्याची मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 अन्वये लेखापरीक्षणास अभिलेख्याची मागणी केली असता स्वच्छता विभागाने वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, अमरावती यांचे पत्र क्र. जा.क्र. अमनपा/(स्व.वि.)/370/ दि.15/09/2015 अन्वये 'लेखापरीक्षणासाठी मागणी केलेले दस्तऐवज हाड्रोऑटोची नस्ती व मोबाईल फायबर टॉयलेटची नस्ती मा.आयुक्त महोदय यांचे आदेशान्वये ,पोलीस निरीक्षक ,सिटी पोलीस स्टेशन, अमरावती येथे गुन्हा दाखल झाल्यामुळे सादर नस्ती पुढील तपासणीसाठी जमा आहेत. त्यामुळे सदर नस्त्या लेखापरीक्षणासाठी सादर करू शकत नाही.असे कळविले आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत स्वच्छता विभागास अर्धसमास पत्र क्र. 60 दि.30/09/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले आहे,त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DRAFT

DATGAGM8201 (Ref No : 60)

## *15 सन 2012-13 या आर्थिक वर्षामधील प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमातील आर्थिक अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 18**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालीकेच्या आरोग्य विभागाच्या प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमातील शहरी आरोग्य केंद्राने लेखे विषयक कामे करताना महाराष्ट्र शासनाच्या स्टेट हेल्थ सोसायटीच्या NRHM, Date 7th, March,2009 अन्वये Annexure-1 मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे अनुपालन केलेले नाही.*** |

1.अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे आरोग्य विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमातील आर्थिक लेख्यामध्ये आढळलेल्या उणीवाबाबत खालील अभिप्राय आहेत.

2.प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाचे लेखेविषयक कामे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने State Health Society

Maharashtra NRHM, Date: 7th Marth, 2009 अन्वये Annexure-1 मध्ये मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. परंतु विभागाने त्याचे अनुपालन केलेले नाही. त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

3.सर्वच शहरी आरोग्य केंद्रांनी बँकेच्या व्यवहाराबाबत स्वतंत्र रोखवही ठेवलेली नाही.

4.प्रत्येक आर्थिक वर्षाची स्वतंत्र रोखवही ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5.उपरोक्त नियमांचे पृष्ठ क्र.13 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार जमा आणि खर्चाची प्रत्येक नोंद सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली नाही.

6.खर्चाच्या प्रत्येक पावतीला प्रमाणक क्रमांक देण्यात नाही.

7.मनपा शहरी आरोग्य केंद्र बडनेरा यांनी रोखवहीमध्ये(petty cashbook) खाडाखोड करून त्यावर पांढरा रंग लावलेला आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहाराच्या नोंदी संशयास्पद वाटतात. खाडाखोड सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकित केलेली नाही.

8.मनपा शहरी आरोग्य केंद्र विलासनगर यांची दि.01/04/2012 रोजीची रोखावाहीची (petty cashbook) ची सुरुवातीची शिल्लक जुळत नाही. तसेच हत्तीपायरोग कार्यक्रमासाठी खर्च करण्यात आलेले रु.12900/- चे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत.

9.वनिता समाज शहरी आरोग्य केंद्र यांचे रोखपुस्तक (petty cashbook) ची प्रारंभिक शिल्लक जुळत नाही.

10.शहरी आरोग्य केंद्र वडाळी यांच्या रोखपुस्तकामध्ये (petty cashbook) दि.01/04/2012 रोजीची शिल्लक नोंदविलेली नाही.दि. 23/10/2012 रोजी बँकेतून रु. 1920/- आहरीत केले असून रोखवहीमध्ये मात्र दि.27/10/2012 रोजी खर्च टाकल्याचे दिसून येते. तसेच श्रीमती वनिता देवरे यांना दि.06/11/2012 रोजीच्या मासिक सभेचे मानधन रु.150/- दिल्याची नोंद आहे मात्र नोंद्वाहीमध्ये त्यांची स्वाक्षरी नाही.

11.मनपा शहरी आरोग्य केंद्र भाजीबाजार यांच्या रोखावाही (petty cashbook) व बँक पासबुक यांची शिल्लक जुळत नाही. लसीकरण मोहीम दि.11/04/2012 ते 20/04/2012 यामध्ये रु. 375/- घेतल्याबाबत श्रीमती ममता बिजवे यांची स्वाक्षरी दिसून येत नाही. पल्स पोलिओ लसीकरण मोहिम दुसरी फेरी एप्रिल-2012 चा रु.44485/- खर्च जुळत नाही.

12.संजीवनी शहरी आरोग्य केंद्र यांना जननी सुरक्षा योजनेचे रु. 3000/- परत मिळालेले आहेत.परंतु त्याची नोंद जमा बाजूला घेण्यात आलेली नाही. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.दि.13/02/2013 रोजी रु.600/- ,दि.27/02/2013 रोजी रु.1800/-,दि.06/03/2013 रोजी रु.600/- त्याबद्दल पुन्हा धनादेश वितरीत करण्यात आलेले आहेत.सदरचा खर्च दोनदा नोंदविण्यात आलेला आहे.रोखवही व बँक पासबुक यांची जुळवणी दि.01/04/2012 रोजी झाल्याचे दिसून येत नाही. Leadger book मध्ये खाडाखोड करून त्यावर पांढरा रंग

DRAFT

लावलेला आहे.

13.आयसोलेशन शहरी आरोग्य केंद्राच्या रोखवही व बँक पासबुक यांच्या जमा व खर्चाचा ताळमेळ बसत नाही.

14.जिल्हा स्त्री रुग्णालय क्र. 02 शहरी आरोग्य केंद्र यांची रोखवही व बँक पासबुक यांची जुळणी दि.01/04/2012 रोजी होत नाही.बँक पासबुकाप्रमाणे दि.01/04/2012 रोजी शिल्लक रु. 36426/- इतकी असून रोखवाहीमध्ये शिल्लक निरंक असल्याचे दिसून येते.रोखवहीमध्ये जमेची नोंद बँक पासबुकप्रमाणे घेण्यात आलेली नाही.किरकोळ रोखवही(petty cashbook) व Leadger book वेगवेगळे ठेवण्यात आलेले नाही. जमेची स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

15.यंग मुस्लीम सोशल असोसिएशन शहरी आरोग्य केंद्र यांच्या रोखवहीमध्ये पांढरा रंग लावलेला आहे.खर्चाची प्रत्येक नोंद सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकित केलेली नाही. रोखवहीमध्ये मासिक जमा व खर्चाचा गोषवारा काढलेला नाही. साहित्य खरेदी पावती क्र. 3163 दि.09/03/2013 रोजी एकूण रु.1230/- चा माल खरेदी केलेला आहे. परंतु मालाचे स्वरूप काय आहे. याचा बोध होत नाही. सदरील रक्कम वसूल करावी.

16.शहरी आरोग्य केंद्र दस्तूरनगर यांची रोखवही व बँक पासबुक यांची जुळवणी होत नाही. दि.01/04/2012 रोजी बँक पासबुकची शिल्लक रु.20331/- इतकी असून रोखवहीप्रमाणे शिल्लक रु.906/- इतकी असल्याचे दिसून येते. स्टेशनरी खरेदीचे रु.4805/- चे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेले नाहीत.

17.शहरी आरोग्य केंद्र हैदरपुरा यांची रोखवही व बँक पासबुकची दि.01/04/2012 ची शिल्लक जुळत नाही.

18.शहरी आरोग्य केंद्र बडनेरा यांचे रोखपुस्तक व बँकेचे पासबुक जुळत *नाही.* स्टेशनरी खर्चासाठी एकूण वार्षिक अनुदान प्राप्त रु.2000/- इतके असून खर्च रु.9600/- इतका आहे. रु. 7600/- वसूल करावेत.

उपरोक्त अनियमिततेबाबत आरोग्य विभागास अर्धसमास पत्र क्र. 29 दि.21/08/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 29)

## *16 सन 2012-13 या आर्थिक वर्षातील सेप्टिक संडास टाक्याचे शूल्क वसुलीतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 07**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालीकेच्या स्वच्छता विभागाने सेप्टिक संडास टाक्याचे शूल्क वसूल करताना पावती पुस्तक क्र.140 दोन आहेत. सदरील दोन्ही पावती पुस्तकांचा वापर करण्यात आलेला आहे.***

1.अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे स्वच्छता विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने एकूण नऊ (9) मूळ पावती पुस्तके वसुलीसाठी वापरलेली आहेत.त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. 1)138, 2)140, 3)143, 4)144, 5)145, 6)139, 7)140, 8)141, 9)142 त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता-1971 चे नियम (8) व (9) मधील उपनियम (1) ते (8) या सर्वसाधारण आर्थिक तत्त्वाचे अनुपालन विभागाने सेप्टिक संडासाचे शूल्क वसूल करताना केलेले नाही. सदर पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेली नाही.

3.दि.21/05/2012 ते दि. 02/07/2012 या कालावधीसाठी पावती पुस्तक क्र. 140 चा वापर वसुलीसाठी करण्यात आलेला आहे. तसेच दि.15/01/2013 ते 22/02/2013 या कालावाधीसाठीदेखील दुसरे पावती पुस्तक क्र.140 चा वापर करण्यात आलेला आहे. दोन्हीही पुस्तके समान क्रमांकांची आहेत.विभागामध्ये समान क्रमांकांची पावती पुस्तके कशी वितरीत करण्यात आली याचा बोध होत नाही. साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करून न दिल्यामुळे सदरील पावती पुस्तक नेमके कोणाकडून प्राप्त झाले याचा बोध होत नाही.त्यामुळे सदरील पावती पुस्तक संशयास्पद वाटते.

4.विभागाने सेप्टिक संडासाच्या पहिल्या ट्रीपसाठी प्रतिट्रीप रु.500/- व त्यानंतरच्या प्रत्येक ट्रीपसाठी रु.200/- इतके शूल्क आकारले आहे. शूल्क योग्य आहे का? याबाबत मनपाच्या सर्वसाधारण सभेचा/ स्थायी समितीचा ठराव अथवा शासन निर्णय, परिपत्रक किंवा इतर प्राधिकर लेखापरीक्षणास दर्शविलेला नाही. त्यामुळे शूल्क बरोबर वसूल केले किंवा नाही याबाबत अभिप्राय देता आलेला नाही.

5.पावती पुस्तक क्र.142 मधील पावत्या दि.28/03/2013 ते दि.08/05/2013 या कालावधीत वसुलीसाठी वापरल्या आहेत. दि.31/03/2013 रोजी आर्थिक वर्ष संपल्यानंतर सदरील पावत्या रद्द करून महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता-1971 चे नियम-9 (7) अन्वये कार्यवाही करणे अपेक्षित असताना विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6.वसुलीसाठी वापरलेले प्रत्येक पावती पुस्तक उपरोक्त लेखासंहितेन्वये प्रमाणित केलेले नाही.

7.सेप्टिक संडासातील गाळ वहन केल्याचे प्रत्येक पावतीप्रमाणे वाहतुकीचे वाहनाचे लॉगबुक व हिस्ट्रीशीट लेखापरीक्षणास दर्शविलेली नाही.त्यामुळे त्यावर अभिप्राय देता आलेला नाही.

DRAFT

उपरोक्त अनियमिततेबाबत स्वच्छता विभागास अर्धसमास पत्र क्र. 93 दि.19/10/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 93)

## *17 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये घनकचरा उचलणेबाबत मे. रक्षा कॉन्क्ट्रक्टर यांना अदा केलेल्या देयकातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 652543.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 652543.00/-

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालीकेच्या स्वच्छता विभागाने मार्च- 2013 मध्ये सन 2008-09 या आर्थिक वर्षामध्ये घनकचरा उचलणेबाबतचे थकीत देयक मे. रक्षा कॉन्क्ट्रक्टर यांना अदा केलेले आहे. देयक विलंबाने अदा करण्याचे कारण मात्र देयकात नमूद केलेले नाही. तसेच डीझेल दरवाढीपोटी एकूण रु.652543/- इतकी रक्कम अदा केलेली आहे.***

1.अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे स्वच्छता विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने सन 2008-09 या आर्थिक वर्षामध्ये मे. रक्षा कॉन्क्ट्रक्टर यांनी घनकचरा उचलल्याचे खालील देयके मार्च-2013 मध्ये अदा केलेले आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक व दिनांक | देयकाचा महिना | देयकाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1. | 11964, 30/03/2013 | मे-2008 | 1314768/- |
| 2. | 11966, 30/03/2013 | जून-2008 | 1268483/- |
| 3. | 11967, 30/03/2013 | एप्रिल-2008 | 1439629/- |
| 4. | 11968, 30/03/2013 | ऑगस्ट-2008 | 1011511/- |
| 5. | 11965, 30/03/2013 | जुलै-2008 | 1206521/- |

याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

2.उपरोक्त देयके तपासली असता हे काम सन-2008 मध्ये करण्यात आलेले आहे. मात्र देयकांची अदायगी मार्च-2013 मध्ये तब्बल पाच वर्षांनी करण्यात आलेली आहे.देयक विलंबाने अदा करण्याचे कारण मात्र देयकामध्ये नमूद केलेले नाही.

3.सदर देयकाबाबतची मे.रक्षा कॉन्क्ट्रक्टर यांची करारनामा व मूळ संचिका लेखापरीक्षणास दर्शविलेली नाही.त्यामुळे त्यावर अभिप्राय देता आलेला नाही.

4.कचरा वाहतुकीचा कंटेनर पूर्ण ट्रीप व अर्धी ट्रीप, ओपन ट्रक पूर्ण ट्रीप व अर्धी ट्रीप कशाच्या आधारे निश्चित केले आहेत याबाबतचे दस्तऐवज देयकासोबत जोडलेले नाहीत.

5.मे.रक्षा कॉन्क्ट्रक्टर यांना मे-2008, जून-2008, एप्रिल-2008, ऑगस्ट-2008, जुलै-2008 या महिन्याच्या देयकांमध्ये डिझेल दरात वाढ झाल्यामुळे अनुक्रमे रु.152283/-, रु.19375/-, रु.159649/-, रु.148043/- रु.173493/- अशी एकूण रु.652543/- इतकी वाढ देण्यात आलेली आहे.त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे मंजुरीचे आदेश अवलोकनास सादर केले नाहीत. तसेच संबंधिताच्या करारनाम्यात काय अट होती? करारनामा लेखापरीक्षणास दर्शविला नसल्यामुळे याचा बोध होत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत स्वच्छता विभागास अर्धसमास पत्र क्र. 59 दि.30/09/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 59)

## *18 स.न.2012-13 या वित्तीय वर्षात मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदी पेक्षा जास्त झालेल्या खर्चाबाबत*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 144981830.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 144981830.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 144981830.00/-

***महानगरपालिकेने मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसारच खर्च करणे आवश्यक असतांना किवा मंजूर तरतुदीमध्ये सक्षम प्रधिकरनाची मंजुरी घेणे आवश्यक असताना,असे न करता स.न. 2012-13 या वित्तीय वर्षात विनामंजुरी मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदी पेक्षा विविध लेखाशीर्षावर एकूण रु.144981830 अतिरिक्त खर्च***

DRAFT

***करण्याची अनियमितता झालेली आहे.***

कोणत्याही अर्थसंकल्पीय शिर्षात रक्कमा कमी जास्त करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम1949 कलम103 अन्वये नियमानुसार कारवाही करणे आवश्यक आहे.

म.न.पा.अमरावतीचा स.न.2012-13 या आर्थिक वर्षाचा सुधारित अर्थसंकल्प , स.न.2012-13जमा व खर्च प्रत्यक्ष रक्कमा विवरण प्रपत्र तपासले असता,मंजूर तरतुदीपेक्षा म.न.पा.ने खालील प्रमाणे विविध लेखाशिर्शावर एकूण रुपये.144981830 अतिरिक्त खर्च केल्याचे आढळून आले आहे. सदर बाबी संबंधाने संबधित विभागाचा ठराव,सक्षम प्राधिकरणाची मंजुरी,आढळून आली नाही, यावरून म.न.पा.ने स.न2012-2013 या वित्तीय वर्षात रु.144981830 विनामंजुरी मंजूर तरतुदीपेक्षा जास्त खर्च करण्याची गंभीर अनियमितता झालेली आहे, सदर बाबीवरून म.न.पा.मधील लेखा विभाग व इतर विभाग यांच्या मध्ये अंतर्गत ताळमेळ नसल्याचे व नियंत्रण अधिकार्याचे कुठलेही नियंत्रण नसल्याचे आढळून येत आहे .

| अ.क्र. | लेखा शीर्ष.क्र. | मंजूर तरतूद (रु) | झालेला खर्च (रु) | अतिरिक्त खर्च (रु) |
|---|---|---|---|---|
| 1 | 79 | 42507770 | 44518230 | 3010260 |
| 2 | 81 | 5255000 | 566290 | 41290 |
| 3 | 83 | 3000000 | 3820560 | 820560 |
| 4 | 86 | 20620000 | 21265000 | 645000 |
| 5 | 88 | 1700000 | 2747540 | 1047540 |
| 6 | 92 | 8500000 | 10316890 | 1816890 |
| 7 | 93 | 10000 | 40000 | 30000 |
| 8 | 94 | 2200000 | 2688680 | 488680 |
| 9 | 95 | 1500000 | 1914200 | 414200 |
| 10 | 96 | 4129470 | 4233530 | 104060 |
| 11 | 97 | 155000 | 179570 | 24510 |
| 12 | 99 | 450000 | 1539690 | 108690 |
| 13 | 100 | 24496640 | 25339730 | 843090 |
| 14 | 105 | 97094860 | 161239080 | 64144220 |
| 15 | 108 | 6500000 | 8083220 | 1583220 |
| 16 | 110 | 10288870 | 11087260 | 798480 |
| 17 | 112 | 1500000 | 1801630 | 301630 |
| 18 | 119 | 8529580 | 9027530 | 497950 |
| 19 | 123 | 9000000 | 99487620 | 9487620 |
| 20 | 124 | 700000 | 1132950 | 432950 |
| 21 | 126 | 150000 | 163730 | 13730 |
| 22 | 128 | 1781160 | 1902790 | 126130 |
| 23 | 134 | 47333880 | 50722250 | 3388370 |
| 24 | 135 | 2690310 | 2954690 | 264380 |
| 25 | 137 | 18587600 | 19662730 | 1075130 |
| 26 | 138 | 300000 | 320110 | 20110 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 27 | 139 | 00 | 146620 | 146620 |
| 28 | 140 | 59576620 | 61596990 | 2020370 |
| 29 | 147 | 50000000 | 67317440 | 17317440 |
| 30 | 148 | 1500000 | 1546080 | 46080 |
| 31 | 153 | 458340 | 477230 | 18890 |
| 32 | 156 | 40000000 | 4616820 | 6168200 |
| 33 | 157 | 17599800 | 18814970 | 1215170 |
| 34 | 158 | 146530 | 160910 | 14380 |
| 35 | 159 | 4500000 | 5378260 | 878260 |
| 36 | 167 | 3302240 | 3458880 | 15660 |
| 37 | 171 | 11000000 | 12495940 | 1495940 |
| 38 | 172 | 200000 | 520660 | 320660 |
| 39 | 175 | 2000000 | 2122650 | 122650 |
| 40 | 180 | 1231850 | 1507330 | 275480 |
| 41 | 182 | 3200000 | 3240790 | 40790 |
| 42 | 186 | 9509960 | 10611240 | 1101280 |
| 43 | 187 | 4253840 | 433690 | 83070 |
| 44 | 189 | 1133350 | 1184000 | 50650 |
| 45 | 192 | 10397430 | 10709940 | 312510 |
| 46 | 402 | 00 | 5815190 | 5815190 |
| 47 | 198 | 14600880 | 14996650 | 395770 |
| 48 | 202 | 1000000 | 1228680 | 228680 |
| 49 | 205 | 8840980 | 9294980 | 453800 |
| 50 | 206 | 150000 | 211510 | 61510 |
| 51 | 215 | 19843730 | 20531340 | 687610 |
| 52 | 216 | 800000 | 843310 | 43310 |
| 53 | 218 | 2200000 | 2373830 | 173830 |
| 54 | 235 | 112860290 | 114169680 | 1309390 |
| 55 | 237 | 75000000 | 78348250 | 3348250 |
| 56 | 243 | 4000000 | 4614650 | 614650 |
| 57 | 244 | 6500000 | 6815110 | 315110 |
| 58 | 253 | 895290 | 1000000 | 104710 |
| 59 | 261 | 7000000 | 8180360 | 1180360 |
| 60 | 262 | 100000 | 4500000 | 3500000 |
| 61 | 263 | 1500000 | 1661150 | 161150 |
| 62 | 278 | 4000000 | 5706290 | 1706290 |
| 63 | 286 | 2000000 | 2131410 | 131410 |
| 64 | 288 | 3000000 | 3736150 | 736150 |
| 65 | 289 | 23700000 | 24400890 | 700890 |
| | एकूण ...... | ........ | .......... | 144981830 |
| | | | | |

DRAFT

सदर प्रकरणी अर्ध समास पत्र क्र. 82 दि.16/11/2015 नुसार विभागास अनुपालनास्त्व कळविले असता अनुपालन अप्राप्त आहे त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला

DATVKGM7601 (Ref No : 82)

## *20 पाणीपुरवठा योजनेचे अभिलेखे ,प्रमाणके,अनुषंगिक अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबद्दल*

**पाणी पुरवठा**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा मनपानिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 6641760.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 6641760.00/-

***अभिलेख्या अभावी एकूण रक्कम रु.6641760/-च्या खर्चाची खात्री होऊ शकली नाही.***

DRAFT

अमरावती महानगर पालिके अंतर्गत सन 2012-13 चे लेखा परीक्षण कालावधीत अर्धसमास पत्र,क्र.43 दि 16/09/2015, 46/दि.21/09/ 2015 व अर्ध समास पत्र.क्र.55/दि.28/09/2015 व दि.14/10/2015 रोजी मा.आयुक्त महानगर पालिका अमरावती यांना अर्धशासकीय पत्र देऊन व प्रत्यक्ष संबंधित कार्यकारी अभियंता (प्र) यांची 4-5 वेळेस भेट घेऊन देखील अभिलेखे/प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत.

लेखा परीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे.त्याशिवाय लेखा परीक्षणाचा उद्देश सफल झाला असे म्हणता येणार नाही.महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम 1930 मधील कलम 6(3) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परीक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखे संबंधी आवशक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित महानगरपालिकेस कळविली जाते.त्या नंतर प्रत्यक्ष लेखापारीक्षण सुरु झाल्यावर अधिनियमांचे कलम 6 (1) नुसार योग्य वाटतील अशा लेख्याचा संदर्भात संबंधित अधिकारी याना अभिलेख्याची मागणी कळविली जाते,त्या नंतर सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो.तरी सुद्धा लेखा परीक्षणास अभिलेखे उपलब्ध केली जात नाहीत.संबंधित अधिकारी यांना अभिलेखे

उपलब्ध करणेसाठी आवशक तेवढ्या संधी उपलब्ध करून देखील योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही.सदर बाब निश्चितच गंभीर स्वरुपाची आहे.खालील बाबीवरील खर्चाची अभिलेखे लेखा परीक्षंणास अप्राप्त आहेत.
1.पाणी पुरवठा विभागाने टँकरद्वारा व बोअरवेल द्वारा जमा होणारे उत्पन्न अनुक्रमे रु.90880 व 62020 या बाबत अभिलेखे.
2.तसेच पाणीपुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती व तत्सम साहित्य खरेदी / खर्च रु,4978430/-.
3.विहरीची दुरुस्ती व विहरीतील गाळ काढणे यासाठी अनुक्रमे रु.295560 व 185920 खर्च केला असून विहीर दुरुस्तीची मापन पुस्तिका,देयके उपलब्ध होऊ शकली नाही
4.पाणी टंचाई योजना (मनपानिधी) अंतर्गत रु.1028950 खर्च केला असून या बाबत अनुपालन/अभिलेखे प्राप्त होऊ शकले नाही. उपरोक्त अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरील खर्च विहित पद्धतीने झाला आहे काय ,याची खात्री होऊ शकली नाही.

वरील बाबत विभागाकडून कोणतेही अनुपालन प्राप्त नाही.त्यामुळे सदरील आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DRAFT

DATPDMM6101 (Ref No : 43)

## *21 माहे मार्च एप्रिल मे जून 2012 च्या इपीएफ चालानची कपात केलेली रक्कम परत करणे कामातील अनियमितता.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष :00 मनपानिधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 40000.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 1393.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 38607.00/-

***1. रु.38607/- देय असतांना रु.40000 कसे अदा करण्यात आले.2. रु.40000/- प्राप्त संबंधीत संस्थेची पोचपावती पहावयास मिळाली नाही.3. इपीएफ चे मुळ चालान लेखापरिक्षणात दर्शविण्यात आली नाहीत.4. कामाचे आदेश दर्शविण्यात आले नाहीत. त्यामुळे देयकाच्या रकमेची खात्री करता येत नाही***

अमरावती स्वच्छता विभागा अंतर्गत वार्डातील/प्रभागातील साफसफाईचे काम करण्याकरीता बेरोजगारांची महाविरी सफाई कामगार महिला नागरीक सेवा संस्था मर्या. बडनेरा यांना कंत्राट देण्यात आले होते.
सदरहु संस्थाचे प्राप्त पत्रान्वये त्यांचे जूने वार्ड क्र.80(जयस्तंभ चौक) चे कंत्राट ऑगस्ट 2012 रोजी संपुष्टात आले असल्याने त्यांचे देयकातून कपात करण्यात आलेली ईपीएफ चालानची रक्कम परत करण्यात आलेली आहे, असे देयकावरून दिसून येते.

1) माहे 3/2012 चे चालान रु. 9822/-

2) माहे 4/2012 चे चालान रु.9360/-

3) माहे 5/2012 चे चालान रु.9757/-

4) माहे 6/2012 चे चालान रु.9668/-

एकुण रु.38007

प्रमाणक क्र.11608/दि.21.3.2013 रु.40000/-

सदरील प्रमाणकाद्वारे 40000/- संबंधीत संस्थेस जमा करण्यात आले आहेत.

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1.रु.38607/- देय असतांना रु.40000 अदा करण्यात आले.

2. रु.40000/- प्राप्त झाल्याची संबंधीत संस्थेची पोचपावती पहावयास मिळाली नाही.

3. इपीएफ चे मुळ चालान लेखापरिक्षणात दर्शविण्यात आली नाहीत.

4.कामाचे आदेश दर्शविण्यात आले नाहीत.त्यामुळे देयकाच्या रक्कमेची खात्री करता येत नाही.

5. रु.38607/- चे देयक असतांना रु.40000/- अदा करण्यात आले तरी रु.1393/- वसुल करावेत.

उपरोक्त बाबत अनुपालन दर्शविण्यात आले नाही. त्यामुळे परिच्छेद नोंदविन्यात येत आहे.

DATPDMM6101 (Ref No : 47)

## *23 वार्ड क्र.05 येथील सन 2012-13 या आर्थिक वर्षातील सामान्य कराच्या वसुलीतील अनियमिततेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 13**

*लेखा शीर्ष : मनपा निधि*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 90720.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 90720.00/-

***2012-13 या आर्थिक वर्षातील सामान्य कराच्यां वसुलीतील अनियमिततेबाबत.***

अमरावती महानगरपालिका सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात मालमत्ता कर व इतर कर वसुलीच्या लेख्यांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे त्रृटी निदर्शनास आल्या आहेत.

1.मालमत्ता कर नोंदवहया प्रमाणित केलेल्या नाहीत. महाराष्ट्रा नगरपालिका लेखासंहिता 1971

DRAFT

मधील नियम 8 नूसार लेखापुस्तके,नोंदपुस्तके, मजबुत बांधणीची,त्यातील पाने क्रमांकीत व मनपाच्या सामायिक मोहराने शिक्कामोर्तब केलेली असावीत. एकुण पानांची संख्या, पुस्तकांच्या शेवटच्या पानावर प्रत्यक्ष मोजणीनूसार लिखीत स्वरुपात अधिका-याने प्रमाणित करावी. तथापि तशी कार्यवाही झालेली नाही.

2.कर आकारणी नोंदवहीतील वर्ष कर,आकारणीबाबत घेतलेल्या नोंदी,सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेल्या नाहीत.

3.दरवर्षी कर आकारणी करीत असतांना मागील थकबाकी रक्कम नोंदवहीत आकारणीची नोंद घेण्यात आलेली नाही. सदरील नोंद संगणकावरील अभिलेख्यात असल्याचे समजते.

4.कर आकारणी व त्यानूसार केलेली वसुली यांची नोंद घेतांना नोंद घेणा-या कर्मचा-याने तसेच सदर नोंदी पडताळणी करुन वार्ड अधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे.

5 कराची सन 2012-13 ची मागणी नोंदवहीत नोंदविलेनंतर थकीत रक्कमेसह लेखासंहिता नियम 07 नूसार मागणी देयके करदात्यांना पाठविल्याबाबत मागणी नोंदवहीत नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे वेळीच करदात्यांकडे कराची मागणी केल्याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

6.थकीत करदात्यांना आकारणी केलेली नोटीस फी,वारंट फी, तसेच दंड रकमांची नमुना क्र.51 मध्ये स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तसेच सदर रक्कमांची वसुली व थकबाकींचा स्वतंत्र तपशील ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे खात्री करता आलेली नाही.

7. मुदतपुर्व कर भरण्यासाठी दिलेली सुट तसेच कराच्या थकबाकीबाबत केलेली दंडात्मक आकारणी याबाबत मागणी नोंदवहीत परिपुर्ण नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

8.वार्ड क्र.66 मध्ये पावती क्र.835794 मध्ये रु.2580/- भरणा करणे आवश्यक असतांना रु.2569/- भरणा करण्यात आला आहे. चालान क्र.36 पुस्तक क्र.355 मध्ये् रु. 11/- दि.7/7/2015 ला भरणा करण्यात आला आहे. तरी वार्ड अधिका-याकडून वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक आहे.

9.वार्ड क्र.36 (श्री भुपेंद्र प्रयाग) यांनी खालील पावतीपुस्तके लेखापरिक्षणास दर्शविलेली नाहीत.

| अक्र | पावतीपुस्तके क्र. | शेरा |
|---|---|---|
| 1 | 7987 | संबंधीताशी विचारणा केली असता पावतीपुस्तके झोन क्र.2 ला आहेत. त्यामुळे चालान बुक क्र.231,चालान क्र.86 ते 100 व चालान बुक क्र.059 मधील चालान क्र.01 ते 05 तपासणी केली परंतु पावतीपुस्तकाशिवाय चालानची रक्कम बरोबर असल्याची खात्री करता आली नाही. |
| 2 | 8342 | |
| 3 | 8729 | |
| 4 | 8740 | |
| 5 | 8730 | |
| 6 | 8758 | |

10. विवाह नोंदणीची प्रकरणे सन 2012-13 मध्ये या विभागात करण्यात आली नसलयाचे सांगण्यात आले.

11. वार्ड क्र.12,13,15,16,38,42,44 ची वसुली 50 टक्केपेक्षा कमी असल्याचे मागणी वसुलीचा गोषवारा यावरुन दिसून आले. 12. तसेच मोबाईल टॉवर यांचे स्तरावर थकीत व चालु मागणी प्रलंबित असल्याकचे खालील विवरणपत्रावरून दिसून येते.

| अक्र | वार्ड क्र. | टॉवरचे नाव | थकीत मागणी | चालु मागणी | एकुण मागणी | शिल्लक वसुली |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 14 | टॉवर व्हीजन इंडीया प्रा.लि | | 42336 | 42336 | 42336 |
| 2 | 35 | बी एस एन एल | 24160 | 36288 | 60448 | 60448 |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 35 | भारती सेल्युलर एअरटेल | 14256 | 14256 | 28512 | 28512 |
| 4 | 37 | रिलायंस टॉवर | | 21168 | 21168 | 21168 |
| 5 | 44 | टाटा टॉवर अंबागेट | | 48384 | 48384 | 48384 |
| 6 | 66 | जीटीएल टॉवर | 72576 | 36288 | 108864 | 108864 |
| 7 | 66 | जीटीएल टॉवर | 54162 | 54162 | 108324 | 108324 |
| 8 | 66 | जीटीएल टॉवर | | 90720 | 90720 | 90720 |

तरी वरील वसुली करुन लेखापरिक्षणास दर्शवावी 13. करांची वाढ/घट नोंदवही नमुना नं.46 ठेवण्यात आलेली नसल्याने सन 2012-13 या वित्तीय वर्षात करदात्यांच्या संख्येंत वाढ/घट यांची पडताळणी लेखापरिक्षणास करता आली नाही.

उपरोक्त अभिप्रायाचे अनुपालन अर्ध समास पत्र क्र 21 दि.28.07.2015 अन्वये लेखा परिक्षणात सादर करन्यात आले नाहि.त्यामुळे परिछेद नोदविन्यात येत आहे.

DATPDMM6101 (Ref No : 21)

## *24 समर बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था मर्या.अमरावती यांचे मोकाट श्वान पकडणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष : मनपा निधी मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 968680.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 968680.00/-

***मोकाट श्वान पकडणे कामातील अनियमीतता***

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट श्वान व जनावरांना पकडून कोंडवाडयात ठेवणे तथा आवश्यतकतेनूसार त्यांचे संगोपन,पोषण,सुरक्षा इत्यादी घेणे याबाबतचे कंत्राट समर बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था मर्या.अमरावती यांना माहे सप्टेंबर 2011 ते सप्टेंबर 2012 या कालावधीसाठी देण्यात आले होते. सन 2012-13 या आर्थिक वर्षात खालील काही निवडक प्रमाणकाद्वारे खर्च नोंदविण्यात आला असल्याचे दिसून येते. 1)प्रमाणकक्र.1182/दि.16/5/2012रु.74100/- माहे 4/2012 2)प्रमाणक क्र.2167/दि.20/6/2012 रु.66000/- माहे 5/2012 3)प्रमाणक क्र.2679/दि.12/7/2012रु.49500/- माहे 6/2012 4)प्रमाणक क्र.4214/दि.5/9/2012 रु.93150/- माहे 8/2012 5) प्रमाणक 6123/दि.20/10/2012 रु. 89850/- माहे 9/2012 एकूण 372600 मा.आयुक्त अमरावती यांचे दि.9/9/2011 रोजीचे आदेशानूसार व स्थायी समिती ठराव क्र.135,दि.22/9/2011 अन्वये समर बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था मर्या.अमरावती यांना महापालिका क्षेत्रातील मोकाट श्वान व जनावरांना पकडून कोंडवाडयात ठेवणे तथा आवश्यकतेनूसार त्यांचे संगोपन, पोषण सुरक्षा इ.घेणे याबाबतचे कंत्राट देण्यात आले होते. कामाचा दर

1) रु.300 /- प्रति मोठे जनावर (गाय,म्हैस,बैल, सांड) 2) रु.200/- प्रति मध्यम जनावर (कालवड,गो-हा,गधा,खेचर) 3) रु.150/- प्रति लहान जनावर (शेळी, मेंढी, कुत्रे) करारनामा - दि. 28/9/2011 ठराव क्र.135/दि.22/9/2011 उपरोक्त प्रमाणकाद्वारे झालेल्या खर्चावर खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

1.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 493 परि.क्र.4 नूसार ठराव करुन पाळीव कुत्रयांचे अनुज्ञप्ती शुल्क आकारणी करणेबाबत ठरविणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

2.प्राणी छळ प्रतिबंधक कायदा 1960 चे कलम 38 चे तरतुदीनूसार व सांस्कृतिक मंत्रालय यांनी दि.24.1.2001 रोजी दिलेल्या अधिसूचनेनूसार प्राणी जन्मदर नियंत्रण (कुत्री) नियम 2001 अन्वये कुत्रयांचे वर्गीकरण, मॉनिटरींग कमीटीची रचना, कार्यपध्द्ती निश्चित करण्यात आली आहे.त्यानूसार महापालिका क्षेत्रात आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली मनपाचा आरोग्य अधिकारी,पशुवैद्यकीय अधिकारी, प्राणी छळ नियंत्रण जिल्हा समितीचा प्रतिनिधी व प्राणी कल्याण संदर्भात काम करणाऱ्या संस्थाचे दोन प्रतिनिधी अशी समितीची रचना करण्याचे आदेश आहेत. तथापि अशा प्रकारची समिती गठीत केली नसल्याचे दिसून येते.

3.वरील सुचनेच्या् नियम 5 अन्वये सदर समितीद्वारे सर्व्हेक्षण करुन कुत्रे पकडणे, वाहून नेणे, निवारा बनविणे व त्यांचे लसीकरण व निर्बीजीकरण करणे व पिसाळलेल्या कुत्र्यांचे शास्त्रोक्त् पद्धतीने मारुन त्यांची विल्हेवाट लावण्याचे काम करेल. परंतु अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाहि.

4.दिनांक 24.12.2001 च्या अधिसूचनेतील नियम 7 च्या तरतुदीनुसार मॉनिटरिंग कमीटीचा सर्वे डॉग कंट्रोल सेल कडे आलेल्या तक्रारीची नोंदवही स्थानिक प्रतिनिधी व प्राणी कल्याण मंडळाच्या प्रतिनिधी समवेत पकडलेली कुत्री/स्वान ,निर्बीजीकरण केलेले व त्याच वार्डात सोडलेले स्वान,आजारी असणारे व पिसाळलेले स्वान यांची तारीख,महिना व वर्ष निहाय नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

5.पशु गणनानुसार स्वानाची संख्या किती,किती कुत्र्याचा/स्वनांचा सर्वे केला, हि माहिती उपलब्ध नसताना

5 वार्डातील एकूण अंदाजित कुत्र्याची संख्या 10,000 गृहीत कशी धरली,तर हि आकडेवारी फसवी असल्याचे जाणवते त्यामुळे रु.968680 एवढा खर्च निश्चितच जास्त वाटतो.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.56/दि.29.09.2015 अन्वये दिलेल्या पत्रा बाबत कोणतेही अनुपालन प्राप्त नाही.त्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATPDMM6101 (Ref No : 40)

## *38 सुरक्षा रक्षकाच्या नियुक्तीमधील व रक्कम प्रदानामधील अनियमितता.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 24**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 8083465.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8083465.00/-

DRAFT

वसूलपात्र रक्कम रु. 6114203.00/-

***सुरक्षा रक्षक निविदा किंवा ई- निविदा मार्फत पुरविण्यात आले नाही. कंत्राटदार जुने दरानुसार काम करण्यास तयार असतांना त्यांना जादा दराने रूपये 21222153/- चे प्रदान केले. प्रतीमाह प्रमाणे सुरक्षा रक्षकांना वेतन प्रदान करतांना महिण्या व्यतिरिक्त 4 दिवसाचे जादा 711180/- प्रदान करण्यात आले. कंत्राटदाराकडुन कंत्राटमुल्याच्या 10% रूपये 10,92,669/- अनामत जमा केली नाही. EPF, ESIC व Central Excise Tax ची कंत्राटदाराने भरायची रक्कम रूपये 13,80,606/- सदर संस्थेत जमा केली नाही. सेवाकराची रूपये 7,92,770/- रक्कम कपात केली नाही. कमी जमा केलेले मुद्रांक शुल्क रूपये 12400/- शासन शिर्षात जमा करावी. सुरक्षा रक्षक एका दिवशी 2 पाळीत काम केल्याचे दिसुन येते. सुरक्षा रक्षकाचे नियुक्ती आदेश, त्यांचे कागदपत्रे, फोटो, व्हिजीट बुक व सुरक्षा रक्षकांना धनादेश प्रदान केल्याचा धनादेशाची किंवा बँकेच्या पासबुकची झेरॉक्स नस्तीसोबत हजेरी रजिष्टर व उपस्थिती प्रमाणपत्र जोडले नाही. पाटील व खानझोडे यांचे देयकातुन 2% आयकर कपात केला नाही. कंत्राटदाराने 83 सुरक्षा रक्षकाची नोंदणी राज्य विमा निगममध्ये केली नाही. सुरक्षा रक्षकावर केलेला खर्च रूपये 6114203/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.***

सन 2011-12 मध्ये मनपा अमरावतीच्या संपत्तीचे संरक्षण करण्याकरीता मे. जगदंबा स्वयंरोजगार नागरीक सेवा सहकारी संस्था, अमरावती यांना सुरक्षा रक्षक पुरविण्याकरीता कंत्राटची मुदत दिनांक 15 मार्च 2012 ला संपुष्टात आली. कंत्राटदाराने जुन्याच दराने सुरक्षा रक्षक पुरविण्यास तयार असल्यामुळे पुन्हा निविदा न देता त्यांनाच दिनांक 1 ऑगष्ट 2012 ते 31 जुलै 2013 या कालावधी करीता सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबत स्थायी समिती सभा ठराव दिनांक 7-9-2012 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानुसार मनपाचे पुरवठा आदेश क्रमांक 1982 दिनांक 4-10-2012 नुसार एकुण 133 सुरक्षा रक्षकांना प्रती माह/प्रती सुरक्षा रक्षक रूपये 8726/- प्रमाणे मे. जगदंबा यांना कार्यारंभ आदेश देण्यात आला. या संधर्भाने अर्धसमास पत्र क्रमांक 37 दिनांक 10-09-2015 अन्वये विचारणा केली असता अनुपालन अप्राप्त आहे. त्यामुळे यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक भांखस 1088/(2512)/उदयोग-6 दिनांक 2.1.1992 व दिनांक 16.7.1993 अन्वये रूपये 50,000 पेक्षा जास्त रकमेच्या व्यवहाराकरीता राजपत्रात किंवा वर्तमानपत्रात जाहिरात देवुन निविदा मागविणे बंधनकारक आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:मातंसं/नस्ती 2010/प्र.क्र. 34/39 दिनांक 6 ऑगष्ट 2010 अन्वये शासनामार्फत विकासात्मक कामे /सेवा यावर प्रचंड असा खर्च होत असतो हे करतांना निविदा प्रकीयेचा अवलंब केला जातो. ही प्रक्रीया क्लिष्ट, वेळ खाउ व खर्चीक आहे. त्यामुळे निविदा प्रक्रीयेचे महत्व लक्षात घेवुन शासनाच्या प्रत्येक विभागात निविदा प्रकियेसाठी 50 लाख व त्यापेक्षा अधिक निविदा दर असलेल्या बाबीकरीता दिनांक 1 डिसेंबर 2010 पासुन ई-निविदा कार्यप्रणाली वापरणे अनिवार्य करण्यात येत आहे. असे शासनाचे आदेश असतांना निविदा किंवा ई-निविदा मागविण्यात आली नाही. हि गंभीर नियमबाहय बाब ठरते. निविदा न मागविल्यामुळे मनपाला स्पर्धात्मक दराचा फायदा

DRAFT

झाला नाही.

2. मे. जगदंबा स्वयंरोजगार नागरीक सेवा सहकारी संस्था यांचे दिनांक 4-7-2012 चे पत्रानुसार- “आम्ही जून्या दरामध्ये काम करण्यास आमची संस्था तयार आहे. त्यामुळे आम्ही जुन्याच दराने कंत्राट चालविण्यास तयार आहे व मला ते परवडत असल्याने माझी कोणतीही हरकत नाही. त्यामुळे नविन निविदा न काढता जून्याच कंत्राटाला मुदतवाढ दिल्यास आपल्या तिजोरीवर जास्तीचा आर्थिक भर पडनार नाही.’’ असे लिहुन दिल्यामुळे मनपा स्थायी समिती सभा ठराव दिनांक 7-9-2012 अन्वये मान्यता देण्यात आली. सन 2011-12 मध्ये स्थायी समिती ठराव क्रमांक 7 दिनांक 22-3-2011 नुसार सर्व शासकिय अंशदान धरुन प्रत्येकी सुरक्षा रक्षकाचे वेतन रूपये 6066.66 असे असतांना सन 2012-13 मध्ये सुरक्षा रक्षकांना प्रती माह रूपये 8726/- प्रदान करण्यात आले. त्यामुळे सुरक्षा रक्षकांना प्रती माह रूपये 2659.34/- जादा प्रदान करण्यात आले. सन 2012-13 मध्ये केलेल्या करारानुसार एकुण 133 सुरक्षा रक्षकांना रूपये (2659.34x133x6)= 2122153/- अतिरीक्त प्रदान करण्यात आले. सदर जादा प्रदान केलेले रूपये 2122153/- वसुलपात्र ठरते.

3. सुरक्षा रक्षकांना प्रती माह प्रदान करण्यात आलेले रूपये 8726/- चा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1. मुळ पगार | 4700.00 |
| 2. विशेष भत्ता | 1004.40 |
| | **5704.40** |
| 3. अधिक सुरक्षा रक्षकाचे 1 दिवसाचे वेतन रू. 219/- तर 4 दिवसाचे * | **878.00*** |
| | **6582.40** |
| 4. EPF(13.61%) | 895.86 |
| 5. ESIC(4.75%) | 312.66 |
| | **7790.92** |
| 6. Central Excise Tax(12%) | 935.00 |
| | **8726.00** |

महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 28 सप्टे 2010 चे अनुषंगाने किमान वेतन अधिनियम 1948 नुसार सुरक्षा रक्षकाचे वेतन व विशेष भत्ता “ड” वर्ग महानगरपालिका परिमंडळ-2 नुसार मुळ किमान वेतन **दरमहा** 4700/- अकुशल कामगारांना देय राहील. तसेच कामगार उपआयुक्त(ग्रा.वि.) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम 1948 कामगार आयुक्त मुंबई यांचे पत्र क्र. ग्रा.वि./किवेअ/विम/2012-1 कार्या-10 दिनांक 3-2-2012 अन्वये अनूसुचीत उदयोगातील कामगारा करीता विशेष भत्याचे दर अ.क्र. 48 नुसार 1004.40 राहतील असे असतांना वरील अ.क्र. 3 प्रमाणे सुरक्षा रक्षकांना दरमहा व्यतिरीक्त 4 दिवसाचे अधिक रूपये 878/- प्रदान करण्यात आले. जादा दर्शविलेले रूपये 878/- बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 37 दिनांक 10-9-2015 अन्वये शासन निर्णय/आदेश सादर करण्याबाबत विचारणा केली असता कोणतेही निर्णय व समर्थनिय खुलासा करण्यात आला नाही. त्यामुळे 135 सुरक्षा रक्षकांना प्रती माह 878/- वर्षात जादा प्रदान केलेली रक्कम रूपये (878X135X6)= 711180/-वसुलपात्र ठरते.

DRAFT

4. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 169(4) नुसार कंत्राटाच्या योग्य परिपूर्तीसाठी प्रत्येक कंत्राटदाराकडून सर्वच बाबतील जमानत/तारण रक्कम घेण्यात आली पाहिजे ती कंत्राटदारास दयावयाच्या देयकामधून 10 टक्के वजावटीच्या रकमेइतकी असली पाहिजे. असे असतांना कंत्राटची रूपये 1,39,26,696/- (8726x133x12) रक्कमेच्या 10 टक्के रक्कम रूपये 13,92,669/- एवढी जमानत/तारण वसुली करून बँकेच्या फिक्स्ड डिपॉझीट मध्ये ठेवणे आवश्यक असतांना कंत्राटदाराकडुन प्रत्यक्षात रूपये 3,00,000/- वसुल केली. कमी जमानत रूपये 10,92,669/- वसुल केल्यामुळे महानगरपालीकेला प्राप्त होणा-या व्याजापासुन वंचीत राहावे लागले. त्यामुळे कंत्राटदाराकडुन कमी तारणाची रक्कम रूपये 10,92,669/- वसुल करून मनपा निधीत जमा करावी.

5. सुरक्षा रक्षकांना वेतनामध्ये ESIC(4.75%) व Central Excise Tax(12%) प्रदान केली. करारनाम्यातील अट क्रमांक 24 व 25 नुसार सदर रक्कम संबंधीत विभागामध्ये भरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील असे असतांना सन 2012-13 मध्ये प्रमाणक क्रमांक 1358, 3071, 3507, 2693, 4880, 4886, 5696, 6287, 8121, 9286, 10767, 10768 नुसार कंत्राटदारास रूपये 79,11,877/- प्रदान केले. परंतु सदर देयकातुन ESIC(4.75%) व Central Excise Tax(12%) असे एकुण 16.75% ची रक्कम रूपये (7911877x16.75%=) 13,25,229/- सदर संस्थेत जमा केले नाही.

तसेच करारनाम्यातील अट क्रमांक 23 नुसार EPF(13.61%) कर्मचारी भविष्य निर्वाह निधीत जमा करणे आवश्यक असतांना प्र. क्र. 8121, 9286 दिनांक 15-12-2012 व 17-1-2013 नुसार प्रदान केलेल्या एकुण 23,21,116/- रक्कमेवर EPF13.61% प्रमाणे 3,15,903/- निधीत जमा करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात दिनांक 20-11-2013ला म्हणजेच 10 महिने उशिराने DD क्रमांक 048487 व 48488 नुसार भारतीय स्टेट बँकेत रूपये 2,60,526/- जमा करण्यात आले. EPF ची रक्कम कर्मचारी भविष्य निर्वाह निधीत रूपये 55,377/- कमी जमा केली. परंतु कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडुन रक्मम प्राप्तीची पावती उपलब्द केली नाही.

तरी EPF, ESIC व Central Excise Tax ची रक्कम रूपये 13,80,606/- कंत्राटदाराकडुन तात्काळ व्याजासह वसुल करून जमा करावी.

6. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक शासाउ10.06/प्र.क्र.1/06/सा.उ. दिनांक 20 जानेवारी 2006 अन्वये केंद्र सरकारच्या कर विषयक अधिनियमाव्दारे विविध सेवावर कर आकारणी करण्यात येते. त्याअनुषंगाने सदर अधिनियमातील तरतुदीनुसार विशिष्ट सेवाबाबत सेवाकर सेवा देणा-या संस्थाकडुन आग्रह धरणे आवश्यक आहे. यासंदर्भात राज्य शासकिय विभाग मंडळे यांनी अशा प्रकारच्या सेवा घेतांना किंवा करार करतांना कार्यवाही करणे बंधनकारक आहे. सेवाकर पात्र असलेल्या एकुण 81 सेवामधील अ.क्र. 62 Security Agency's Services ला सेवाकर 10% व सेवाकराच्या 2% दराने शैक्षणिक उपकर असा एकुण 10.02% सेवा कर वसुल करणे आवश्यक असतांना देयकातुन सेवाकर

वसुल केला नाही. सन 2012-13 मध्ये सुरक्षा रक्षकांना प्रदान केलेली एकुण रक्कम रूपये 79,11,877/- च्या 10.02 टक्के रूपये 7,92,770/- सेवा कर वसुलीची कार्यवाही करावी.

7. महानगर पालिका अमरावती व श्री जगदंबा स्वयंरोजगार नागरीक सेवा सहकारी संस्था अमरावती तर्फे अध्यक्ष श्री विजय दादाराव शिंदे यांच्यात रूपये 500 च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा झाला. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 34 व महसुल व वन विभागाचे अ.शा.प.क्र. मुद्रांक-2009/2707/प्र.क्र.326/म-1 दिनांक 9-10-2019 व ग्रा.वि.व ज.सं. विभाग शासन परिपत्रक क्र. झेडपीए 2009/प्रत्रक्र.514/वित्त-9 दिनांक 20-11-2009 अन्वये जेव्हा कंत्राटात मांडलेली रक्कम किंवा 10 लाख रुपयापेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत मुद्रांक शुल्क रूपये 100 व जेव्हा दहा लाख रूपयापेक्षा अधिक असेल त्या बाबतीत दहा लाख रूपयापेक्षा अधिक प्रत्येकी एक लक्ष रूपयासाठी 100 रूपये राहील. सदर कामाचा सन 2012-13 मध्ये (8726X133X12)=13926696/- चा करारनामा झाला. रूपये ( 13926696-1000000=) 12926696/- वरील प्रत्येक लाखा रु.100 प्रमाणे रु.12900च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे आवश्यक असताना रु 500 च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा केलेला आहे. करीता कंत्राटदाराकडुन रूपये 12900-500=12400वसुल करून शासनशिर्षात जमा करावी.

8. प्रमाणक क्रमांक 3507 दिनांक 14-8-2012 रूपये 2,31,300/- च्या प्रमाणकाची तपासनी केली असता अ.क्र.1 मध्ये नुरनगर येथे मो. रफिक मो. शफी व मो. साजीद मो.शफी यांनी दिनांक 19-5-2012 ते 19-6-2012 या एक महिण्याचे अंशदान कपात करून रूपये 12133/- चे प्रदान केले. प्रत्यक्षात एका सुरक्षा रक्षकांना एका महिण्यात रूपये 6066.66 प्रदान करणे आवश्यक असतांना त्यांना दुप्पट प्रदान केले. महाराष्ट्र किमान वेतन अधिनियम 1963 व उदयोग व कामगार विभागयांचे दि. 4-4-1964 चे पत्रातील प्रकरण 4 मधील नियम 24 नुसार सर्वसाधारण कामाच्या दिवसामधील कामाच्या तासाची संख्या 9 तासापेक्षा अधिक काम करण्यास परवानगी देता कामा नये तसेच नियम 26 नुसार कामगाराने कोणत्याही दिवशी 9 तासाहुन अधिक तास काम केल्यास सामान्य वेतन दराच्या दुप्पट दराने वेतन मिळण्याचा हक्क असेल असे असतांना मो. रफिक मो. शफी व मो. साजीद मो.शफी यांनी एका दिवशी 2 पाळीत काम केल्याचे दिसुन येते. वरील बाब पाहता प्रत्यक्षात मो. रफिक व मो. साजीद मो.शफी सुरक्षा रक्षकांवर निरीक्षण करणा-या कर्मचारी तपासनी न करता सदर सुरक्षा रक्षकाच्या उपस्थिती प्रमाणपत्रावर स्वाक्षरी केल्याचे दिसुन येते. यावरुन सुरक्षा रक्षक प्रत्यक्षात काम न करता त्यांचे नावे रक्कम वसुल केल्याचे दिसुन येते.या बाबत सत्यता पटवावी.

9. व्हि. डि. पाटील व एन. बी. खानझोडे यांना प्रदान केलेल्या रकमेतुन आयकर कपात केलेला नाही. शासन निर्णय क्रमांकः आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र-5 दिनांक 22 फेब्रुवारी 2008 नुसार आयकर अधिनियम कलम 194 सी नुसार आयकर कपातीचा दर 2% व त्यावर 3% उपकर असे एकुण रूपये 2425/- कपात करणे आवश्यक असतांना देयकातुन आयकर कपात केला नाही.

10. प्रमाणक क्रमांक 3507 दिनांक 14-8-2012 मध्ये रूपये 2,31,300/- ची तपासनी केली असता कार्यादेश पत्र दिनांक 4-10-2012 मध्ये निवड केलेल्या 133 सुरक्षा रक्षकाशिवाय एकुण 14 अतिरीक्त सुरक्षा रक्षकांनी माहे एप्रिल ते जुलै पर्यंत 9 ठिकाणी काम केल्याचे दिसते. परंतु नस्तीसोबत सुरक्षा

DRAFT

रक्षकाची निवड केल्याचा कार्यालयीन आदेश, त्यांचे कागदपत्रे, फोटो, व्हिजीट बुक व सुरक्षा रक्षकांना धनादेश प्रदान केल्याचा धनादेशाची किंवा बँकेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत जोडलेली नसल्यामुळे सदर प्रमाणकातील सुरक्षा रक्षक श्री. मो. शफी, लंगोटे, नंदेश्वर, गंधे, हुसैन, खान, शे. प्यारु, कोथरे पाटमासे, अरुळकर, मसराम, खान, गणविर व झोंबाडे यांची नियुक्ती नियमबाहय केल्याचे दिसुन येते.

11. प्रमाणक क्र. 1358 दिनांक 19-5-2012 रूपये 6,82,038/- ची तपासनी केली असता खालील सुरक्षा रक्षक नियोजित ठिकाणी उपस्थित असल्याबाबतचे विभागाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असतांना जोडण्यात आले नाही. त्यामुळे सदर सुरक्षा रक्षक प्रत्यक्षात कामावर उपस्थित असल्याचे हजेरी रजिष्टरची साक्षांकित प्रत तसेच उपस्थिती प्रमाणपत्राशिवाय खात्री पटत नाही. त्यामुळे खालील 15 सुरक्षा रक्षकांनी काम केल्याचे दिसुन येत नाही.

सुरक्षा रक्षकाची नावे, कामाचे ठिकाण व अ.क्र.- अनुक्रमे 14. अहेफाज मो आझम, मनपाझोन नं.1, 22. रमेश शेवळे, विरोधी पक्ष नेंता, 27. दत्ता चोटे, महिला व बालकल्याण, 28. विरेंद्र डोंगरे, महिला बाल कल्याण, 34. प्रविण चौधरी, स्पर्धा परिक्षा कार्यालय, 38. मो. आबीद युनूस, कत्तलखाना, 39. शालीकराम तुमसरे, महेंद्र कॉलनी, 54. संतोष बसमनेल, मसानगंज हिंदी स्कुल, 55. अमृत पांचगे, पशु उदयान आकोली, 63. शौकर अली सैयद, शाळा नं.2 अलिमनगर, 64. अजय पुसतकर,आझाद हिंद मंडळ शाळा, 65. दादाराव पिंपळकर झोन नं.3 हमालपुरा, 69. राजेश जोंधळे, झोन नं. 1, 75. निखील मारोडकर, जी आय डी, व 114. सुंदर पटेल, संस्कृती भवन.

12. श्री. व्हि. डि. पाटील व एन. बी. खानझोडे या सुरक्षा रक्षकांचा नियुक्ती आदेश नस्तीसोबत जोडण्यात आली नाही.

13. मे. जगदंबा स्वयंरोजगार नागरीक सेवा सहकारी संस्था यांचे मनपामध्ये एकुण 133 सुरक्षा रक्षक कार्यरत आहे. कर्मचारी राज्य विमा अधिनियम 1948 चे कलम 2(12)1(5) नुसार संस्थेमध्ये कार्यरत कामगाराचे पंजीकरण करणे आवश्यक असतांना कर्मचारी राज्य विमा निगम गणेशपेठ यांचे पत्र क्र. No.Inst/23000057530001001/2010/1202 दिनांक 15-3-2010 अन्वये मे. जगदंबा स्वयंरोजगार नागरीक सेवा सहकारी संस्था यांच्या कर्मचा-याची संख्या 50 चे पंजीकरण केल्याचे नमुद आहे. परंतु शिल्लक 83 सुरक्षारक्षकाची नोंदणी राज्य विमा निगममध्ये केली नाही. सदर सुरक्षा रक्षकाची ESIC ची 4.75% रक्कम जमा केली जात नसल्याचे दिसुन येते.

14. महाराष्ट्र किमान वेतन अधिनियम 1963 मधील नियम 27 अन्वये प्रतेक नियोक्ता एक हजेरी पत्रक व वेतन नोंदवही नमुना 2 मध्ये ठेवील ज्यात प्रत्येक व्यक्तीचे ठोक वेतन, वेतनातुन केलेल्या वजाती, प्रत्येक कामगारास देय असलेला किमान वेतन दर, प्रत्यक्ष देण्यात आलेले वेतन व वेतन दिल्याचा दिनांक, जादा वेळ काम केलेल्या कामाची तासाची संख्या इत्यादीचा उल्लेख असलेले नोंद वही ठेवण्यात आलेली नाही.

15. वरील अधिनियम 1963 चे नियम 21(1)(एक)(अ) अन्वये कामासंबंधी वेतन कालावधी एक

DRAFT

महिन्यापेक्षा अधिक असता कामा नये. कामावर लावलेल्या कामगाराचे वेतन हे ज्या कालावधीच्या संबंधात वेतन देय असेल त्या कालावधीच्या शेवटच्या दिवसानंतर सातवा दिवस संपण्यापुर्वी देण्यात येईल असे असतांना प्रत्यक्षात सुरक्षा रक्षकांना वेतन 4-5 महिण्यानंतर देण्यात येत असल्याचे प्रमाणकावरून दिसुन येते. यावरून शासनाच्या नियमाची अवहेलना होत असल्याचे आढळुन आले.

16. करारनाम्याची तपासनी केली असता करारनाम्यावर दिनांक नमुद केला नाही. करारनाम्यात सुरक्षा रक्षक किती पुरविण्यात येतील याचा आकडा टाकण्यात आला नाही. करारनाम्यामध्ये सुरक्षा रक्षक पूरविण्याकरीता स्थानिक तथा प्रादेशिक वृतपत्रातून जाहिरात प्रशिघ्द करून निविदा आमंत्रित केल्या होत्या असे नमुद आहे. परंतु प्रत्यक्षात निविदा न मागविता कंत्राटाला मुदतवाढ दिलेली आहे.

17. करारनाम्यातील अट क्रमांक 5 नुसार एखादा सुरक्षा रक्षक रजेवर किंवा गैरहजर राहील्यास त्याची पर्यायी व्यवस्था कंत्राटदारास विना विलंब करावी लागेल अन्यथा प्रति रक्षक रूपये 100 इतका दंड आकारण्यात येईल. परंतु प्रमाणकासोबत सुरक्षा रक्षकाचे हजेरी शिट जोडली नसल्यामुळे प्रत्यक्षात किती सुरक्षा रक्षक गैरहजर/रजेवर होते याची तपासनी करता आली नाही. परंतु प्रत्येक महिण्यात प्रमाणकामध्ये सर्वच सुरक्षा रक्षक वर्षभर गैरहहजर राहात नसल्याचे दिसुन येते. 133 सुरक्षा कर्मचा-यापैकी एकही कर्मचारी वर्षभरात एकही दिवस गैरहजर राहत नसल्यामुळे यावरुन अनुपस्थित असलेल्या सुरक्षा रक्षकाची उपस्थिती दर्शवुन उपस्थिती पत्र सादर केल्याचे आढळुन येते. उपस्थिती प्रमाणपत्रावर सुरक्षा रक्षक ज्या ठिकाणी कार्यरत होते त्यांची स्वाक्षरी घेण्यात आली परंतु सदर स्वाक्षरी कुणाची आहे त्याचे नाव, पदनाम व शिक्का नसल्यामुळे प्रमाणपत्रावर प्राधिकृत व्यक्तीनेच प्रमाणित करून स्वाक्षरी केल्याची तपासनी करता आली नाही.

18. करारनाम्यातील अट क्रमांक 34 नुसार सुरक्षा रक्षकाची कर्तव्य ठिकाणी व्हिजीट बुक ठेवणे आवश्यक राहील. तसेच हजेरीबुक विभाग प्रमुखाकडुन प्रमाणित करून घेता येईल असे असतांना लेखापरीक्षणास हजेरी बुक सादर केले नाही.

19. अट क्र. 19 नुसार कंत्राटदारास नेमावयाच्या प्रतेक सुरक्षा रक्षकाची वैयक्तिक माहितीसह दोन फोटो कार्यालयात सादर करावे असे असतांना अर्धसमास पत्र दिनांक 10-9-2015 व्दारे माहिती मागितली असता सामान्य प्रशासन विभागाने सुरक्षा रक्षकाची वैयक्तिक माहिती व 2 फोटो लेखा परीक्षणास सादर केले नाही.

20. करारनाम्यातील अट क्रमांक 26 नुसार सन 2011-12 चे कंत्राटदाने आयकर भरल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना ते लेखापरीक्षणास सादर केले नाही.

21. करारनाम्यातील अट क्रमांक 27 नुसार सुरक्षा संस्थेला सुरक्षा रक्षक नियुक्त केल्यानंतर शासकिय अंशदाने भरल्याची सत्यप्रत प्रत्येक 3 महिण्यात सामान्य प्रशासन विभागाला सादर करणे आवश्यक असतांना तसे करण्यात आले नाही.

22. महाराष्ट्र किमान वेतन अधिनियम 1963 मधील नियम 27 अन्वये प्रतेक नियोक्ता एक



DRAFT

हजेरीपत्रक व वेतन नोंदवही नमुना 2 मध्ये ठेवील ज्यात प्रत्येक व्यक्तीचे ठोक वेतन, वेतनातुन केलेल्या वजाती, प्रत्येक कामगारास देय असलेला किमान वेतन दर, प्रत्यक्ष देण्यात आलेले वेतन व वेतन दिल्याचा दिनांक, जादा वेळ काम केलेल्या कामाची तासाची संख्या इत्यादीचा उल्लेख असलेले नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

23. वरील अधिनियम 1963 चे नियम 21(1)(एक)(अ) अन्वये कामासंबंधी वेतन कालावधी एक महिन्यापेक्षा अधिक असता कामा नये. कामावर लावलेल्या कामगाराचे वेतन हे ज्या कालावधीच्या संबंधात वेतन देय असेल त्या कालावधीच्या शेवटच्या दिवसानंतर सातवा दिवस संपण्यापुर्वी देण्यात येईल असे असतांना प्रत्यक्षात सुरक्षा रक्षकांना वेतन 4-5 महिण्यानंतर देण्यात येत असल्याचे प्रमाणकावरून दिसुन येते. यावरून शासनाच्या नियमाची अवहेलना होत असल्याचे आढळुन आले.

वरील अनियमिततेमुळे सन 2012-13 मध्ये सुरक्षा रक्षकावर केलेला खर्च रूपये 80,83,465/- आक्षेपाधिन व रूपये 6114203/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 37)

## *41 विमानाव्दारे केलेला नियमबाहय प्रवासाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 17872.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 16406.00/-

***मुबई नागरी सेवा नियम खंड 2 परिशिष्ट 42-ए विभाग एक व शासन निर्ण क्रमांक-प्रवास-1010/प्र.क्र./ सेवा-5 दिनांक 3-3-2010 मधील परिच्छेद 12 अन्वये अशासकीय सदस्यांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही तसेच सचिवापेक्षा कमी दर्जाच्या अधिकार-यांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही. असे असतांना विमानाने केलेला प्रवास रूपये 16,406/- वसुलपात्र ठरतो.***

सन 2012-13 मधील प्रमाणकाची तपासनी केली असता खालील अधिकारी यांनी प्रशासकिय सभेकरीता तसेच निधी मिळविण्याकरीता मुंबई ला विमानाने प्रवास केला.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 5515 | 5-10-2012 | 5485 | मा. उपायुक्त(सा.) प्रशासकिय सभेसाठी दिनंक 3-10-2012 ला नागपूर ते मुंबई AJ628 या विमानाने प्रवास. टिकीट 5485/- |
| 4959 | 18-9-2012 | 7082 | श्री चेतन पवार, सभापती स्थायी समिती, यांनी उपमुख्यमंत्री यांचेकडे निधी मिळण्याबाबत चर्चा करण्याकरीता दिनांक 18-5- |

DRAFT

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 2012 ला Indigo Air line F.No. 6E136 या विमानाने मुंबई ते नागपूर प्रवास केला. विमान टिकीट रू. 6577/- |
| 4954 | 18-9-2012 | 5305 | श्री चेतन पवार, सभापती स्थायी समिती, यांनी दिनांक 1-6-2012 ला Indigo Air line F.No. 6E404 या विमानाने मुंबई ते नागपूर प्रवास केला. विमान टिकीट रू. 4344/- |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय आहे.

1. मुंबई नागरी सेवा नियम 1959 मधील नियम 417-ब आणि 490 तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा-5 मंत्रालय मुंबई दिनांक 3 मार्च 2010 अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक-प्रवास-101/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 23 जुन 2010 अन्वये सचिवापेक्षा कमी दर्जाच्या अधिकार-यांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही. सचिव व सचिव दर्जाच्या अधिका-यांना फक्त् इकॉनॉमी क्लॉसनेच विमान प्रवास अनुज्ञेय राहील. असे शासनाचे स्पष्ट निर्देश असतांना उपायुक्त(सा) यांनी केलेला विमान प्रवास अनुज्ञेय नाही.

2. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा-5 मंत्रालय मुंबई दिनांक 3 मार्च 2010 अन्वये न्यायालयीन तसेच विधीमंडळ कामकाजासाठी इतर कोणत्याही साधनाने/मार्गाने वेळेत पोहोचणे शक्य नसल्यास अशा प्रसंगी संबंधीत प्रशासनिक विभागाच्या सचिवाच्या लेखी पूर्वपरवानगीने विमान प्रवास करता येईल परंतु देयकाची तपासनी केली असता उपायुक्त यांनी प्रशासकिय सभेकरीता व सभापती यांनी उपमुख्यमंत्री यांना निधी प्राप्ती करीता भेटण्याकरीता विमान प्रवास केल्याचे दिसून येते. तसेच केलेला विमान प्रवासकरीता प्रशासनिक विभागाच्या सचिवाच्या पूर्वपरवानगीने विमान प्रवास केलेला नाही.

3. वरील शासन निर्णय दिनांक 3मार्च 2010 नुसार अपवादात्मक परिस्थितीत परत येणे तातडीचे असेल तर प्रशासनिक विभागाच्या लेखी पुर्व परवानगीनेच विमान प्रवास करता येईल असे असतांना श्री चेतन पवार सभापती हे दिनांक 1-6-2012 ला शासनाची परवाणगी न घेता परतीचा विमान प्रवास केला. ही नियमबाहय बाब आहे.

4. मुबई नागरी सेवा नियम खंड 2 परिशिष्ट 42-ए विभाग एक व शासन निर्ण क्रमांक-प्रवास-1010/प्र.क्र./सेवा-5 दिनांक 3-3-2010 मधील परिच्छेद 12 अन्वये अशासकीय सदस्यांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही असे शासनाचे स्पष्ट निर्देश असतांना स्थायी समितीचे सभापती श्री चेतन पवार यांनी विमानाने केलेला प्रवास नियमबाहय ठरतो.

वरील प्रमाणे शासनाच्या आदेशाची अवहेलना करून विमान प्रवास केल्याचे दिसून येते. त्यामुळे नियमबाहयरित्या विमानाने केलेला प्रवास रूपये 16,406/- वसुलपात्र ठरतो.

DATSSKM6702 (Ref No : 135)

DRAFT

## *43 शासन अनुदान मुंबईवरून आणण्याकरीता खाजगी वाहनाने केलेल्या नियमबाहय प्रवासाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 02**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 18276.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 18276.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 12946.00/-

***वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 3-3-2010 श्री ताजी यांना व्दितीय वर्ग शयनयानाने प्रवास अनुज्ञेय आहे. तसेच सार्वजनिक वाहनातून रस्ता मार्गाने प्रवास केल्यास सार्वजनिक बसचे प्रवास भाडे अनुज्ञेय आहे. तसेच भाडयाच्या वाहनातून केलेल्या प्रवासासाठी पदाच्या ग्रेड वेतन नुसार किलोमीटर भत्ता अनुज्ञेय असतांना त्यांना खाजगी वाहनातून प्रवास केल्यामुळे फरकाची रक्कम रूपये 12,946/- वसुलपात्र ठरते.***

DRAFT

प्रमाणक क्रमांक 3825 दिनांक 24-8-2012 रूपये 18276

वरील प्रमाणकाची तपासनी केली असता श्री के.एस. ताजी, मुख्य लेखापाल यांनी दिनांक 7-8-2012 ते 9-8-2012 या कालावधीत मेघा ट्रॅव्हल्स यांचे बिल क्रमांक 564 दिनांक 10-8-2012 नुसार वाहन क्रमांक MH-27 AR-2426 अमरावती ते मुंबई असा 1523 कि.मी. प्रवास केला. यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 3-3-2010 मधील अ.क्र. 4.2 नुसार रेल्वेने प्रवास करतांना ज्यांचे ग्रेड वेतन 4400/- पेक्षा कमी असेल त्यांना व्दितीय वर्ग शयनयानाने प्रवास अनुज्ञेय आहे. अ.क्र. 4.3 नुसार सार्वजनिक वाहनातून रस्ता मार्गाने प्रवास केल्यास सार्वजनिक बसचे प्रवास भाडे अनुज्ञेय आहे. तसेच मुंबई नागरी सेवा नियम 1959 मधील नियम 414 (1) आणि (2) तसेच वरील दिनांक 3-3-2010 मधील अ.क्र.5 अन्वये भाडयाच्या वाहनातून केलेल्या प्रवासासाठी पदाच्या ग्रेड वेतन नुसार किलोमीटर भत्ता अनुज्ञेय राहील. त्यानुसार श्री ताजी यांचे ग्रेड वेतन 4400 पेक्षा कमी असल्याने त्यांना मोटारकार/जिप अनुज्ञेय नसतांना त्यांना मोटारसायकल/ऑटोरीक्षा यांचे दर रूपये 3.50 प्रती कि.मी. प्रमाणे अनुज्ञेय राहील. त्यानुसार श्री ताजी हे मुंबईला गेल्यानुसार जाने व येणे याकरीता 1523 कि.मी. प्रवास केला त्यानुसार त्यांना रूपये 5330 रूपये अनुज्ञेय राहील. किंवा तसेच मुंबई येथील अनुज्ञेय दैनिक भत्ता रूपये 225 प्रतीदिवस प्रमाणे 2 दिवसाचे 450 व रेल्वे अथवा बसचे भाडेची रक्कम अनुज्ञेय राहील. किलोमीटर भत्ता व दैनिक

भत्ता(टिकीटसह) यापैकी जास्त असेल ती रक्कम अनुज्ञेय असल्यामुळे श्री ताजी यांना रूपये 5330 प्रदान करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात त्यांना रूपये 18276/- प्रदान केले. जादा प्रदान केलेले रक्कम रूपये 12,946/- वसुलीची कार्यवाही करावी.

2. श्री ताजी यांनी प्रवास भत्ता टिपणीमध्ये नमुद केल्याप्रमाणे शासनाने मागीतलेली माहिती तात्काळ घेवून जाणे आवश्यक असल्यामुळे प्रवास केला. परंतु शासनाची अशी कोणती माहीती होती केव्हापर्यंत पोहोचणे आवश्यक होते याचा उल्लेख केला नाही. याबाबत शासनाचे कोणतेही पत्र तसेच महानगरपालीकेचे आदेश नस्तीसोबत जोडण्यात आले नाही.

त्यामुळे सदर केलेला प्रवास नियमबाहय असल्यामुळे लेखापरीक्षणास सदर खर्च रूपये 18,276/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. तसेच रक्कम रूपये 12946/- वसुलपात्र ठरते.

DATSSKM6702 (Ref No : 136)

## *51 शासकिय पॉलिटेक्नीक कॉलेजमध्ये निवडणूक निकाल व्यवस्था बाबत केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत.*

**निवडणूक**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 1147076.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1147076.00/-

***उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय दिनांक 2.1.1992 अन्वये रूपये 50,000 पेक्षा जास्त रकमेच्या व्यवहाराकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देवुन निविदा न मागविता खरेदी करण्यात आली. अंदाजपत्रकापेक्षा जादा केलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी घेतली नसल्यामुळे केलेला खर्च रूपये 2,90,369/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. लेखापरीक्षणास मोजमाप पुस्तक, कामाचे अंदाजपत्रक/ प्राकलन, कार्यादेश व नस्ती उपलब्ध करण्यात आली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 169(4) नुसार कंत्राटदाराकडून जमानत/ तारण कंत्राटमुल्याच्या 10 टक्के वजावटीच्या रकमेइतकी वसूल न करता देयकातून 3 टक्के रक्कम कपात केली.***

प्रमाणक क्रमांक 61 दिनांक 9/4/2012 रूपये 11,47,076/-

सन 2012-13 मध्ये मनपा अमरावतीच्या निवडणूकी नंतर शासकिय पॉलिटेक्नीक कॉलेजमध्ये दिनांक 17/02/2012 ला निकाल जाहिर करण्याकरीता प्र.क्र. 61 दिनांक 9/4/2012 अन्वये श्री गणेश



DRAFT

बहाळे यांना बल्ली, जीआय सिट, फर्निचर, टेबल, खुर्ची कापड, सतरंजी, पाण्याची टँक, बादली बोर्ड, लाकडाचे पार्टेशन, इत्यादी भाडयाने पुरविण्याकरीता रूपये 11,47,076/- चे प्रदान करण्यात आले. यावर खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

1. उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक भांखस 1088/(2512)/उदयोग-6 दिनांक 2.1.1992 व दिनांक 16.7.1993 अन्वये रूपये 50,000 पेक्षा जास्त रकमेच्या व्यवहारा करीता वर्तमानपत्रात जाहिरात देवुन निविदा मागविणे बंधनकारक आहे. निवडणूक कार्यक्रम दोन महिण्यापूर्वीच जाहिर झालेला असतांना निवडणूकीच्या कामाकरीता वेळेवर दरपत्रक मागविल्या मुळे स्पर्धात्मक दराचा मनपाला फायदा झालेला नाही. निविदाशिवाय केलेला खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2. देयकासोबत कामपुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नमुना 132 मध्ये अंदाज केल्याप्रमाणे व प्रत्यक्ष पार पाडल्याप्रमाणे केलेला खर्च यामधील फरकाचा तक्ता तपासला असता अंदाजपत्रकात मध्ये नमुद केलेल्या बाबीवर प्रत्यक्षात जादा खर्च करण्यात आला. अंदाजपत्रकापेक्षा जादा केलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी घेतली नसल्यामुळे केलेला खर्च रूपये 2,90,369/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंदाजाचे उपशिर्ष | अंदाजपत्रका प्रमाणे | प्रत्यक्ष | जादा | दर | फरकाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | P/R G.I. Sheet Partition | 315 | 528.40 | 213.40 | 952.20 | 203199.48 |
| 4b | Pvc Chair | 800 | 1100 | 300 | 32 | 9600 |
| 4c | Satrangi | 200 | 305 | 105 | 150 | 15750 |
| 4g | A/F Cautionery Board | 100 | 150 | 50 | 200 | 10000 |
| 5. | P/F Kanat cloth Partition | 715 | 1751.40 | 1436.40 | 50 | 51820 |
| | | 2104.8 | 1384.2 | 290369.48 | | 290369.48 |

DRAFT

3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 169(4) नुसार कंत्राटाच्या योग्य परिपूर्तीसाठी प्रत्येक कंत्राटदाराकडून सर्वच बाबतील जमानत/तारण रक्कम घेण्यात आली पाहिजे ती कंत्राटदारास दयावयाच्या देयकामधून 10 टक्के वजावटीच्या रकमेइतकी असली पाहिजे. असे असतांना कंत्राटदार श्री श्री गणेश बहाळे यांचे बिलातून 10 टक्के रक्कम रुपये 114708/- कपात न करता 3 टक्के रक्कम रुपये 34412/- देयकातून कपात केली. सदर नियमबाहय बाब आहे.

4. अर्धसमास पत्र क्रमांक 172 दिनांक 3/12/2015 अन्वये मोजमाप पुस्तक क्रमांक 079, कामाचे अंदाजपत्रक/प्राकलन, कार्यादेश व नस्ती उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे केलेल्या खर्चाची योग्यप्रकारे तपासणी करता आली नाही. त्यामुळे केलेला खर्च रूपये 11,47,076/- आक्षेपाधीन

ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास पत्र क्रमांक 172 दिनांक 3/12/2012 अन्वये अभिलेख व अनुपालन उपलब्ध करण्याबाबत कळविले असता अनुपालन सादर केले नाही त्यामुळे सदर परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 172)

## *77 रेल्वे पुल ते मालटेकडी,कॉग्रेस नगर रोड पर्यंत रस्ता डांबरीकरण (BT Renewal) कामातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 15**

*लेखा शीर्ष :13 वा वित्त आयोग शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 8525768.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8475768.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 50000.00/-

***तेराव्या वित्त आयोगातून विकास कामे प्रस्तावित करतांना सर्वसाधारण सभेच्या ठरावान्वये संबधित कामाची शिफारस करणे आवश्यक आहे तथापि मोघम/ढोबळ स्वरुपात ठराव घेण्यात आलेला आहे. प्रशासकीय मान्यता मिळण्याअगोदरच काम सुरु करण्यात आले आहे. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश असतांना कामाचे भाग पाडण्यात आले आहेत.रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई-निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य केले आहे. तथापि सदर प्रकरणी ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 05 संविदा 2(2) नुसार विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने थेट काम देण्यात आलेले आहे. सदर निधीतून "सुवर्ण जयंती पथ" म्हणून शहरातील एक प्रमुख रस्ता एकात्मिक पध्दतीने विकसित करण्याचे निर्देश असतांना रस्ता एकात्मिक पध्दतीने विकसित केलेला नाही तसेच सदर कामाच्या मोजमाप पुस्तिकेचे अवलोकन केले असता सदर रस्त्याचे पॅचवर्क केल्याबाबतच्या नोंदी त्यात आढळल्या. रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही. अंदाजपत्रकात समावेश नसतांना रु.324297 अतिरिक्त बाबीवर खर्च नोंदवला आहे. सदर बाबीचे अतिरिक्त काम करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेणे आवश्यक होते. कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना खाजगी संस्थेचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला आहे.सदर अहवालात डांबराच्या ग्रेड (60/70) बाबत तपशील नमूद केलेला नाही.***

DRAFT

प्रशासकीय मान्यता - मा. आयुक्त टिपणी दिनांक- 02.12.2011 रु. 8529687

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-14.12.2011 कामाची मुदत -26.12.2011 पर्यंत

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 8529687 कामावर झालेला खर्च -रु. 8525768

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.तेविआ2010/प्र.क्र.131/2010/नवि-4 दिनांक-25.10.2010 मधील मुद्दा क्र.02(ब)(02) नुसार तेराव्या वित्त आयोगातून विकास कामे प्रस्तावित करतांना सर्वसाधारण सभेच्या ठरावान्वये संबधित कामाची शिफारस करणे आवश्यक आहे.तथापि सर्वसाधारण सभेच्या ठरावाचे (क्र.106 दि.20.10.2011) अवलोकन केले असता शहरातील दस्तुरनगर,कंवरनगर ते राजापेठ पासून बडनेरा रोड पर्यंत व हमालपुरा,जोगळेकर प्लॉट,रुख्मिणीनगर,लघुवेतन कॉलनी, आदिवासी कॉलनी,कॉग्रेस नगर या वस्त्यांना जोडणारा मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे कामास प्राधान्यक्रम देण्यात यावे असा मोघम/ढोबळ ठराव घेण्यात आल्याचे निदर्शनास आले. विशिष्ठ कामासंबधी ठराव घेणे आवश्यक होते.

2. उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्र.5(iii) नुसार सदर निधीतून "सुवर्ण जयंती पथ" म्हणून शहरातील एक प्रमुख रस्ता एकात्मिक पध्दतीने विकसित करण्याचे निर्देश आहेत. तथापि सदर रस्ता एकात्मिक पध्दतीने विकसित केलेला नाही तसेच सदर कामाच्या मोजमाप पुस्तिकेचे अवलोकन केले असता सदर रस्त्याचे पॅचवर्क केल्याबाबतच्या नोंदी त्यात आढळल्या. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयातील निर्देशांचे पालन झालेले नाही.

3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

4. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

5. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश आहेत. तथापि सदर प्रकरणी या निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे रेल्वे पूल -हमालपुरा ते मालटेकडी रु.85.29 लक्ष व मालटेकडी ते देविसदन भवन रु.85.29 लक्ष असे कामाचे भाग पाडलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपरोक्त निर्देशानुसार कामाचे भाग पाडणे अनियमित आहे.

6. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंस/नस्ती2010/प्र.क्र.34/39दिनांक-06.08.2010 नुसार रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई-निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य केले आहे. तथापि सदर प्रकरणी ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 05

DRAFT

संविदा 2(2) नुसार विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने थेट काम देण्यात आलेले आहे.

7. सदर कामास मा.आयुक्त यांनी दिनांक-02.12.2011 रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे व कामाचे आदेश दिनांक-14.12.2011 रोजी देण्यात आलेले आहेत.तथापि मोजमाप पुस्तिकेतील (क्र.174) नोंदी नुसार खोदकाम,BBM व 3% BM या बाबींचे परिमाण अनुक्रमे दि.26.11.2011, 28.11.2011 व 01.12.2011 रोजी नोंदविल्याचे नमूद आहे त्यामुळे प्रशासकीय मान्यता व कामाचे आदेश देण्यापूर्वीच काम सुरु केल्याचे या वरून स्पष्ट होते. प्रशासकीय मान्यता व ठेकेदाराशी कामासंबधी करारनामा करणे पूर्वीच काम सुरु करणे अनियमित आहे.

8. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/प्रक्र.171/08/नवि-20 दिनांक-02.03.2009 नुसार रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही.

9. शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.संकीर्ण-2007/प्र.क्र.257/रस्ते-1 दिनांक-21.01.2008 नुसार डांबरीकरणाच्या बाबीची किंमत रु.75 लक्ष पेक्षा जास्त असेल त्या कामासाठी डांबरीकरणा संबधी यंत्र सामग्री (हॉट मिक्स/ड्रम मिक्स प्लांट,सेन्सर पेव्हर फिनिशर,मेकॅनिकल ॲस्फाल्ट स्प्रेअर,व्हायब्रेटरी रोलर इत्यादी) ठेकेदाराच्या मालकीची असणे अनिवार्य आहे.तथापि अशा प्रकारची यंत्र सामग्री ठेकेदाराच्या मालकीची असल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

10. Providing & Applying Thermo plastic व Flat oil paint या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश नसतांना यावर रु.324297 एवढा खर्च नोंदवला आहे. सदर बाबीचे अतिरिक्त काम करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेणे आवश्यक होते.

11. सदर कामाच्या देयकाची एकूण रक्कम रु.8525768 एवढी येते रु.788734 वजाजाता रु. 7737034 एवढी रक्कम ठेकेदारास प्रदान करणे आवश्यक असतांना रु.7787034 म्हणजे रु.50000 ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे.सदर रक्कम वसूल करून 13 वा वित्त आयोग निधीत जमा करणे आवश्यक आहे.

12. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना प्रो.राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नो.आणि रिसर्च या खाजगी संस्थेचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला आहे. तसेच चाचणी अहवालात अंदाजपत्रकात तरतूद केल्याप्रमाणे डांबराच्या ग्रेड (60/70) बाबत तपशील नमूद नसल्याने अंदाजपत्रका प्रमाणे व योग्य गुणवत्तेचे डांबर वापरल्याची खात्री पटली नाही.

13. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी कारवाई केल्याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास सदर केले नाहीत. त्यामुळे या बाबतची खात्री करता आली नाही.

14. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे.

DRAFT

तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

15. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 72 दिनांक- 08.10.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 72)

## *81 अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रातील क्षेत्रविकास कार्यक्रम सन 2011-12 अंतर्गत लालखडी रोड वरील कब्रस्थानला संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 14**

*लेखा शीर्ष :अल्पसंख्यांक विकास शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3155046.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2915127.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 239919.00/-

***अल्पसंख्यांक समाजाचा सामुहिक लाभ होईल अशी सार्वजनिक हिताचीच कामे करण्यासाठी अनुदानाचा विनियोग करण्याचे निर्देश असतांना सदर समाजाची मुलभूत,निकडीची व सार्वजनिक हिताची तसेच अल्पसंख्यांक संकेंद्रित भाग इत्यादी बाबीचा कामे प्रस्तावित करतांना विचार करण्यात आलेला नाही.सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रशासकीय मान्यते अगोदरच जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 05 संविदा 2(2) नुसार विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने थेट काम देण्यात आलेले आहे.कब्रस्थानाच्या काही भागास संरक्षण भिंत बांधल्याने कामाचा/योजनेचा मूळ उद्देश सफल झालेला नाही. देयकातून 0.25% स्थानिक संस्था कर वसूल केलेला नाही. ठेकेदारास अंदाजपत्रकीय दराने थेट काम दिलेले असल्यामुळे व ठेकेदाराच्या अर्जानुसार तोही अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्यामुळे शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.सीएटी***

***06/04/148/इमारती-2 दिनांक-16.05.2005 नुसार भाववाढ अनुज्ञेय ठरत नाही. बी-1 निविदा फॉर्म सोबत ठेकेदाराने VAT नोंदणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही. M-20 व्यतिरिक्त इतर साहित्याचा चाचणी अहवाल संचिकेत आढळला नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - (मूळ) मा. जिल्हाधिकारी अमरावती दिनांक-13.09.2012 रु.3157135

सुधारित अनुपलब्ध

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-06.03.2013 कामाची मुदत -180 दिवस

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 40 लक्ष कामावर झालेला खर्च -रु. 3155046

राज्य शासनाने सन 2008-09 पासून राज्यातील अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्राकरिता कार्यान्वित केलेला क्षेत्रविकास कार्यक्रम सन 2010-11 या वर्षात राबविण्यास दिनांक-10.08.2010 च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. या योजनेंतर्गत अल्पसंख्यांक संकेंद्रित भागात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, विकास कामांचा प्रस्ताव तयार करतांना अल्पसंख्यांक समाजाच्या मुलभूत व निकडीच्या गरजा लक्षात घेऊन तसेच या योजनेतून अल्पसंख्यांक समाजाचा सामुहिक लाभ होईल अशी सार्वजनिक हिताचीच कामे करण्यासाठी अनुदानाचा विनियोग करण्याचे निर्देश उपरोक्त शासन निर्णयान्वये दिले आहेत. सदर शासन निर्णयान्वये “ड” वर्ग महानगरपालिकेस प्रति वर्ष रु. 20 लक्ष अनुदान अनुज्ञेय असून अमरावती महानगरपालिकेस रु. 40 लक्ष सन 2012-13 अखेर प्राप्त असून लेखापरीक्षणाचे वेळी उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभाग क्र.अविवि-2010/प्र.क्र.105/का.7 दिनांक-10.08.2010 नुसार या योजनेंतर्गत अल्पसंख्यांक संकेंद्रित भागात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, विकास कामांचा प्रस्ताव तयार करतांना अल्पसंख्यांक समाजाच्या मुलभूत व निकडीच्या गरजा लक्षात घेऊन तसेच या योजनेतून अल्पसंख्यांक समाजाचा सामुहिक लाभ होईल अशी सार्वजनिक हिताचीच कामे करण्यासाठी अनुदानाचा विनियोग करण्याचे निर्देश असतांना सदर समाजाची मुलभूत,निकडीची व सार्वजनिक हिताची तसेच अल्पसंख्यांक संकेंद्रित भाग इत्यादी बाबीचा कामे प्रस्तावित करतांना विचार करण्यात आलेला नाही.

2. उपरोक्त शासन निर्णया नुसार अनुदान मंजूर करण्यात आल्या नंतर संबधित महानगरपालिकांनी प्रस्तावात नमूद केलेली कामे 03 महिण्याच्या आत पूर्ण करणे आवश्यक आहे. तथापि महापालिकेने प्रस्तावित काम पूर्ण करण्यास 180 दिवसांची मुदत दिली आहे.त्यामुळे शासन निर्देशाचे पालन झालेले नाही.

3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली



DRAFT

नाही. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

4. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 05 संविदा 2(2) नुसार विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने थेट काम देण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचे स्वरूप लक्षात घेता उपरोक्त अधिनियमातील कलमान्वये जाहीर निविदा मागविणे आवश्यक होते.सदर कामास मा.जिल्हाधिकारी अमरावती यांनी दिनांक-13.09.2012 रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे तथापि सदर माण्यतेपुर्वीच दिनांक-17.04.2012 रोजीच सदर कामाच्या (प्रथम वेळ) निविदा दै.जनमाध्यम या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. प्रशासकीय माण्यतेपुर्वी निविदा प्रसिध्द करणे ही अतिशय गंभीर बाब आहे.

5. संचिकेत संलग्न कामाच्या स्थळ नकाशानुसार कब्रस्थानाच्या काही भागासच संरक्षण भिंत प्रस्तावित करण्यात आलेली आहे.संपूर्ण कब्रस्थानास संरक्षण भिंत प्रस्तावित करणे आवश्यक होते. त्यामुळे कामाचा/योजनेचा मूळ उद्देश सफल झालेला नाही.

6. या योजनेअंतर्गत अनुदान मिळण्यासाठी संबधित महानगरपालिकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात हाती घ्यावयाच्या विकास कामांचे सविस्तर प्रस्ताव संबधित महापालिकेच्या ठरावासह मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनास सादर करावयाचे आहेत. तथापि महापालिकेच्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.79 दिनांक-20.01.2011 चे अवलोकन केले असता कब्रस्थानाची व अंत्यविधीच्या जागेची दुरुस्तीस प्राधान्यक्रम देणे बाबत ठराव घेण्यात आला आहे. महापालिकेने अल्पसंख्यांक बहुल क्षेत्राचे सर्वेक्षण करून निकड/गरज/मुलभूत सुविधा लक्षात घेऊन त्यानुसार विशिष्ट क्षेत्रातील विकास कामे प्रस्तावित करणे अभिप्रेत होते. तथापि असे न करता ढोबळ/मोघम स्वरुपात ठराव घेण्यात आलेला आहे.

7. सदर कामात एकूण 528.22 घ.मी.एवढे खोदकाम केले आहे.खोदकामातून निघालेले साहित्य त्याच ठिकाणी वापरल्यामुळे तेवढ्या घ.मी.ची रु.70.65 प्र.घ.मी.दराने रु.37319 एवढी रॉयल्टी देयकात समाविष्ठ करून ठेकेदारास अदा केली आहे. तथापि तेवढेच परिमाणाचे (528.22 घ.मी.) साहित्य वाहून टाकण्यापोटी रु.147 दराने रु.77648 ठेकेदारास प्रदान करण्यात आलेले आहे. खोदकामातील साहित्य त्याच ठिकाणी वापरल्यामुळे सदर साहित्य वाहून दुसरीकडे नेण्याचा प्रश्नच उद्भभवत नाही त्यामुळे साहित्य वाहून टाकण्यापोटी केलेली अदाई रु. 77648 संबधित ठेकेदाराकडून वसूल करून ह्या शासन खाती भरणा करावेत.

8. सदर कामाच्या तिसऱ्या व अंतीम देयका बरोबर रु.155739 एवढे भाववाढ फरकाचे देयक अदा केले आहे. ठेकेदारास अंदाजपत्रकीय दराने थेट काम दिलेले असल्यामुळे व ठेकेदाराच्या अर्जानुसार तोही अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्यामुळे शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.सीएटी 06/04/148/इमारती-2 दिनांक-16.05.2005 नुसार भाववाढ अनुज्ञेय ठरत नाही. त्यामुळे सदर रक्कमही संबधित ठेकेदाराकडून वसूल करून ह्या शासन खाती भरणा करावी.

9. बी-1 निविदा फॉर्म सोबत ठेकेदाराने VAT नोंदणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही. शासन अधिसुचना दिनांक-04.04.2012 नुसार अनोंदणीकृत ठेकेदारांकडून 5% कार्यकंत्राट कर वसूल करणे आवश्यक आहे.या बाबत

विभागाने खात्री करावी व ठेकेदार अनोंदणीकृत असल्यास 5% कार्यकंत्राट कर वसूल करावा.

10. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसुचना दिनांक-06.08.2012 व मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 च्या नियम 27 मधिल उपनियम 5 नुसार सदर कामाच्या देयकातून 0.25% स्थानिक संस्था कर वसूल करणे आवश्यक आहे. तथापि पहिल्या धावत्या देयकातून रु.2234 व दुसऱ्या धावत्या देयकातून रु.4298 स्थानिक संस्था कर वसूल केलेला नाही तो संबधिताकडून वसूल करून महानगरपालिका निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

11. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना M-20 व्यतिरिक्त इतर साहित्याचा चाचणी अहवाल संचिकेत आढळला नाही.

12. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी कारवाई केल्याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास सादर केले नाहीत. त्यामुळे या बाबतची खात्री करता आली नाही.

13. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

14. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 98 दिनांक- 27.10.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 98)

## *82 अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी घरकुल (रमाई आवास योजना) योजने बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 8**

DRAFT

*लेखा शीर्ष : रमाई आवास योजना   शासन निधी निधी*

*अनियमितता कलम  : 9अ*

गुंतलेली रक्कम  रु. 55035290.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 55035290.00/-

***कोणत्याही परीस्थितीत घरकुल योजने अंतर्गत लाभार्थ्यास एकाच योजनेचा लाभ देण्यात यावा असे शासनाचे स्पष्ट निर्देश असतांना याकडे मनपाने दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले.अमरावती शहरात यापूर्वी म्हाडा मार्फत लोक आवास योजना (सन-2000 मध्ये) व वाल्मिकी आंबेडकर आवास योजना (सन-2003 मध्ये) राबविण्यात आल्या आहेत. रमाई आवास योजनेचा लाभ देतांना उपरोक्त दोन्ही योजनेचा लाभ संबधित लाभार्थ्यांना न दिल्या बाबत विभागाने शहानिशा केलेली दिसून येत नाही.त्यामुळे इतर घरकुल योजनेतूनही या लाभार्थ्यांनी लाभ घेतल्याची शक्यता नाकारता येत नाही. या घरकुल योजनेंतर्गत बांधावयाच्या घरामध्ये शौचालय व निर्धूर चूल या सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश असतांना त्या उपलब्ध करून दिल्याचे अभिलेख्या वरून निदर्शनास आले नाही. सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या मागास प्रवर्गातील व्यक्तींना सदनिकांचा ताबा मिळविण्यासाठी जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे तथापि लेखापरीक्षण दिनांका पावेतो ताब्यात देण्यात आलेल्या मागास प्रवर्गातील व्यक्तींकडून जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.***

DRAFT

सन 2012-2013 मधील योजनेचा तपशील खालील प्रमाणे आहे

| अ.क्र. | बाब/तपशील | रक्कम/संख्या |
|---|---|---|
| 1 | दिनांक-31.03.2013 अखेर मनपास प्राप्त अनुदान | 1367.4 लक्ष |
| 2 | दिनांक-31.03.2013 अखेर खर्च | 1325.70लक्ष |
| 3 | महानगरपालिकेस ठरवून दिलेले घरकुलाचे उद्दिष्ठ | 713 |
| 4 | दिनांक -31.03.2013 अखेर मंजूर लाभार्थी संख्या | 716 |
| 5 | दिनांक -31.03.2013 अखेर प्रत्यक्षात काम सुरु केलेल्या घरकुलांची संख्या | 708 |
| 6 | घरकुलासाठी प्रत्यक्षात अनुदान प्रदान केलेल्या लाभार्थींची संख्या | 708 |
| 7 | दिनांक -31.03.2013 अखेर पूर्ण घरकुलांची संख्या | निरंक |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

1. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-2009/प्रक्र 159/मावक -2 दिनांक-

09.03.2010 मधील मुद्दा क्र.8 नुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी 5000 घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. तथापि महानगरपालिकेने दिनांक- 31.03.2013 अखेर फक्त 708 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिलेला आहे.उपरोक्त शासन निर्णयान्वये लाभार्थ्यांना योजनेची माहिती देणे या व इतर बाबीचे प्रबोधन करण्यास मेळावे,भिंतीपत्रके व वृत्तपत्रात सविस्तर बातमी देण्यास जिल्हा माहिती अधिकाऱ्यास प्राधिकृत केले आहे. तथापि योजनेच्या प्रसिध्दी व प्रबोधनासाठी मनपाने संबधीताकडे पाठपुरावा केल्याचे निदर्शनास आले नाही.

2. शासन पुरकपत्र सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-2009/प्रक्र 159/मावक -2 दिनांक-06.08.2010 नुसार दारिद्र्य रेषेखालील अर्जदारांना पहिल्या हप्त्यात व दारिद्र्य रेषेवरील पात्र लाभार्थ्यांना दुसऱ्या टप्यात लाभ देण्याच्या तसेच शासन पुरकपत्र सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-2009/प्रक्र 159/मावक -2 दिनांक-29.09.2011 नुसार अनुसूचित व नवबौध्द प्रवर्गासाठी नागरीभागात घरकुल योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील पुरेसे लाभार्थी उपलब्ध होत नसल्याने दारिद्र्य रेषेवरील लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्याचे निर्देश असतांना अशा लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही.

3. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-2009/प्रक्र 159/मावक -2 दिनांक-09.03.2010 नुसार आय.एस.एच.डी.पी.अंतर्गत गृह निर्माण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनेंतर्गत निवड झालेले लाभार्थी वगळून,आदिवासी विभागाची घरकुल योजना, ग्रामविकास विभागाची इंदिरा आवास योजना, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची घरकुल योजना तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने मागास वर्गीय गृह निर्माण संस्थांना जमीन खरेदी अनुदान आणि बांधकाम अनुदान किंवा यापैकी एक अदा केलेले असल्यास त्या मागासवर्गीय गृह निर्माण संस्थांमधील सभासदांपैकी ज्या सभासदाने या घरकुल योजनेसाठी अर्ज केले असतील ते लाभार्थी सादर योजनेसाठी अपात्र समजावेत. तथापि मनपाने मंजूर केलेल्या 716 लाभार्थ्यांची निवड करतांना या बाबत शहानिशा केल्याचे दिसून येत नाही. कोणत्याही परीस्थितीत घरकुल योजने अंतर्गत लाभार्थ्यास एकाच योजनेचा लाभ देण्यात यावा असे शासनाचे स्पष्ट निर्देश असतांना याकडे मनपाने दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले.अमरावती शहरात यापूर्वी म्हाडा मार्फत लोक आवास योजना (सन-2000 मध्ये) व वाल्मिकी आंबेडकर आवास योजना (सन-2003 मध्ये) राबविण्यात आल्या आहेत. रमाई आवास योजनेचा लाभ देतांना उपरोक्त दोन्ही योजनेचा लाभ संबधित लाभार्थ्यांना न दिल्या बाबत विभागाने शहानिशा केलेली दिसून येत नाही.त्यामुळे इतर घरकुल योजनेतूनही या लाभार्थ्यांनी लाभ घेतल्याची शक्यता नाकारता येत नाही.

DRAFT

4. महापालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी बहुतांश संचिका ह्या विधवा महिलांना लाभ दिल्या बाबत लेखापरीक्षण पथकास सादर करण्यात आल्या. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-2009/प्रक्र 159/मावक -2 दिनांक-09.03.2010 मधील मुद्दा क्र.9 नुसार लाभार्थी निवडतांना प्राधान्यक्रम निश्चित करून देण्यात आलेला आहे.सदर प्राधान्यक्रमानुसार लाभार्थ्यांना लाभ दिलेला दिसून येत नाही.तसेच घरात कोणीही कमवत नाही अशा विधवा महिलांना लाभ देण्याचे निर्देश असतांना विभागाने लाभार्थी निवड करतांना घरात कोणीही कमवत नाही या बाबत कोणतीही शहानिशा/खात्री केलेली दिसून येत नाही.

5. शासन पुरकपत्र सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-2011/प्रक्र 35/मावक -2 दिनांक-14.03.2011 नुसार या घरकुल योजनेंतर्गत बांधावयाच्या घरामध्ये शौचालय व निर्धूर चूल या सुविधा उपलब्ध

करून देण्याचे निर्देश असतांना त्या उपलब्ध करून दिल्याचे अभिलेख्या वरून निदर्शनास आले नाही.

6. शासन पुरकपत्र सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी-10/2010/प्रक्र356/मावक -5 दिनांक-12.08.2010 नुसार सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या मागास प्रवर्गातील व्यक्तींना सदनिकांचा ताबा मिळविण्यासाठी जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे तथापि लेखापरीक्षण दिनांका पावेतो ताब्यात देण्यात आलेल्या मागास प्रवर्गातील व्यक्तींकडून जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

7. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-2009/प्रक्र 159/मावक -2 दिनांक-09.03.2010 मधील मुद्दा क्र.19 नुसार घराचा ताबा घेताना आणि सक्षम प्राधिकाऱ्यांनी पूर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर अंतीम 10% अनुदान लाभार्थ्यांना वितरीत करावयाचे आहे.तथापि लेखापरीक्षण दिनांकापावेतो ताबा देण्यात आलेल्या घरकुलांबाबत पूर्णत्वाचा दाखला संचिकेत निदर्शनास आला नाही.

8. शासन पुरकपत्र सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-2011/प्रक्र 35/मावक -2 दिनांक-14.03.2011 नुसार शिल्लक निधीबाबत संचालक समाज कल्याण पुणे यांना कळविणे आवश्यक आहे. संचालकांनी शिल्लक निधी इतर जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांसाठी वळता करावयाचा आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 99 दिनांक- 27.10.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATVKGM7601 (Ref No : 99)

## *83 अंबानाला बांधकाम व बळकटीकरण प्रकल्प अंतर्गत 7365 ते 7535 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 11**

*लेखा शीर्ष : अंबानाला व उपनाले बा शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 10443228.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 10404972.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 38256.00/-

***महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश असतांना कामाचे भाग पाडण्यात आलेले आहेत. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई- निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य असतांना सदर प्रकरणी ई- निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही***

***केलेली नाही. निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दोन दिवसांनी निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे.रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही. खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे रॉयल्टी देण्याबाबत शासनाचे कुठलेही निर्देश नसतांना रॉयल्टी खर्च दर्शवून नंतर देयकातून कपात करणेत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - मा. आयुक्त टिपणी दिनांक-16.05.2011 रु.8953744

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-09.09.2011 कामाची मुदत -06 महिने

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 8953744 कामावर झालेला खर्च -रु. 10443228

अमरावती शहरातील अंबानाला व त्याचे उपनाले हे शहराच्या मध्य भागातून वाहत असल्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात शहरात पावसाचे/पुराचे पाणी लगतच्या वस्त्यांमध्ये शिरते. सदर नाल्याचे व उपनाल्याचे पाणी शहरात व लगतच्या वस्त्यांमध्ये शिरू नये त्या अनुशंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अंबानाला व उपनाल्यांचे बांधकाम व बळकटीकरण करण्याच्या रु. 1271 लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या योजनेस शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-23.11.1995 च्या निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. सुधारित दरसूची प्रमाणे व उर्वरित कामांच्या अंदाजपत्रकांच्या आधारे शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-02.04.2009 नुसार सदर कामाच्या एकूण 2318.61 लक्ष इतक्या एकत्रित अंदाजपत्रकीय खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार सन 2009-10 मध्ये रु.400 लक्ष व शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-31.03.2011 नुसार रु.450 लक्ष असा एकूण रु.850 लक्ष एवढा निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. नाल्याच्या बांधकामाची लांबी,कामाची निकड व ठेकेदारांची क्षमता/कुवत लक्षात घेऊन कामाचे एकूण 05 भाग पाडण्यात आले आहेत.

सदर 05 भागांपैकी 7365 ते 7535 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश आहेत. तथापि सदर प्रकरणी या निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे सदर कामाचे एकूण पाच भाग पाडलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपरोक्त निर्देशानुसार कामाचे भाग पाडणे अनियमित आहे.

DRAFT

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

3. उपरोक्त लेखासंहितेतील नियम 161 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता सदर कामांना घेण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकाच्या शेवटी शहर अभियंता यांनी Technically Approveम्हणून स्वाक्षरी केली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

4. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंस/नस्ती2010/प्र.क्र.34/39दिनांक-06.08.2010 नुसार रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई-निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य केले आहे. तथापि सदर प्रकरणी ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.

4. सदर कामाची निविदा दिनांक-05.06.2011 रोजी दै.जनमाध्यम व साप्ताहिक पांचजन्य या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही न केल्याने स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेस लाभ मिळालेला नाही.

5. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 202 नुसार टीप-2 नुसार निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस (दि.05.07.2011) देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दोन दिवसांनी (दि.07.07.2011) निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे. वास्तविक पाहता निविदा प्रसिध्दी पासून विक्रीस व स्विकृती ठेवणे अपेक्षित होते, निविदा विक्रीसाठी व स्विकृतीसाठी पुरेसा कालावधी देण्यात आलेला नसल्याचे यावरून स्पष्ट होते हि अतिशय गंभीर बाब आहे.

6. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/प्रक्र.171/08/नवि-20 दिनांक-02.03.2009 नुसार रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही.

7. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज 10/1009/सी.आर. 309/ख, दि. 11.2.2010 नुसार कामावरील वापरण्यात आलेल्या गौणखनिजावर शासनाने विहित केलेल्या दराने (रु.70.67 प्रती घन मीटर) रॉयल्टी सदर कामावर खर्च दर्शवुन कपातीव्दारे शासनास भरणा करावयाची आहे. अथवा ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केला असल्यास भरणा केलेल्या पावत्या/चलनची खात्री विभागाने करणे आवश्यक आहे.तथापि ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.या बाबत विभागाने खात्री करावी अन्यथा खालील तपशिला प्रमाणे रु. 38256 एवढी रॉयल्टी संबधित



DRAFT

ठेकेदाराकडून वसूल करून “0853 गौणखनीज” या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | बाब | परिमाण | प्र.घ.मीटर रेतीचे परिमाण | रॉयल्टीसाठी एकूण परिमाण | रॉयल्टीचा दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1:3:6 कॉक्रीट | 142.45 | 0.45 | 64.10 | 70.67 | 38256 |
| 2 | 1:2:4 कॉक्रीट | 256.24 | 0.45 | 115.308 | | |
| 3 | कॉक्रीट भिंत | 632.28 | 0.45 | 284.526 | | |
| 4 | 15-23 mm सोलिंग | 77.40 | 1.00 | 77.40 | | |
| | एकूण | | | 541.334 | | 38256 |

8. खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे तेवढ्या परिमाणाची रॉयल्टीची रक्कम देयकात अंतर्भूत करून नंतर तेवढीच रक्कम देयकातून रॉयल्टीपोटी वजा करण्यात आलेली आहे.तसेच खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे वाहतुकीपोटी वेगळ्या दराने ठेकेदारास अदाई करण्यात आलेली आहे.खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे रॉयल्टी देण्याबाबत शासनाचे कुठलेही निर्देश नसतांना रॉयल्टी खर्च दर्शवून नंतर देयकातून कपात करणे नियमबाह्य आहे.

9. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

10. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

11. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.



DRAFT

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 160 दिनांक- 03.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 160)

## *84 अंबानाला बांधकाम व बळकटीकरण प्रकल्प अंतर्गत (हनुमाननगर) 7100 ते 7195 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 14**

*लेखा शीर्ष : अंबानाला व उपनाले बा शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 5843481.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5812379.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 31102.00/-

***महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश असतांना कामाचे भाग पाडण्यात आलेले आहेत. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई- निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य असतांना सदर प्रकरणी ई- निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही केलेली नाही. निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दोन दिवसांनी निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे.रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही. भाववाढ फरकाच्या देयकातून कामगार कल्याण उपकर व विम्याची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे रॉयल्टी देण्याबाबत शासनाचे कुठलेही निर्देश नसतांना रॉयल्टी खर्च दर्शवून नंतर देयकातून कपात करणेत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता – संचिकेत अनुपलब्ध

तांत्रिक मान्यता - शहर अभियंता क्र.निरंक दि.निरंक दर सूची- सन- 2010-11



DRAFT

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-30.03.2012 कामाची मुदत -240 दिवस

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 5028022 कामावर झालेला खर्च -रु. 5843481

अमरावती शहरातील अंबानाला व त्याचे उपनाले हे शहराच्या मध्य भागातून वाहत असल्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात शहरात पावसाचे/पुराचे पाणी लगतच्या वस्त्यांमध्ये शिरते. सदर नाल्याचे व उपनाल्याचे पाणी शहरात व लगतच्या वस्त्यांमध्ये शिरू नये त्या अनुशंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अंबानाला व उपनाल्यांचे बांधकाम व बळकटीकरण करण्याच्या रु. 1271 लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या योजनेस शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-23.11.1995 च्या निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. सुधारित दरसूची प्रमाणे व उर्वरित कामांच्या अंदाजपत्रकांच्या आधारे शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-02.04.2009 नुसार सदर कामाच्या एकूण 2318.61 लक्ष इतक्या एकत्रित अंदाजपत्रकीय खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार सन 2009-10 मध्ये रु.400 लक्ष व शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-31.03.2011 नुसार रु.450 लक्ष असा एकूण रु.850 लक्ष एवढा निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. नाल्याच्या बांधकामाची लांबी,कामाची निकड व ठेकेदारांची क्षमता/कुवत लक्षात घेऊन कामाचे एकूण 05 भाग पाडण्यात आले आहेत.

सदर 05 भागांपैकी 7100 ते 7195 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश आहेत. तथापि सदर प्रकरणी या निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे सदर कामाचे एकूण पाच भाग पाडलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपरोक्त निर्देशानुसार कामाचे भाग पाडणे अनियमित आहे.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

3. उपरोक्त लेखासंहितेतील नियम 161 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता सदर कामांना घेण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकाच्या शेवटी शहर अभियंता यांनी Technically Approveम्हणून स्वाक्षरी केली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

4. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंस/नस्ती2010/प्र.क्र.34/39दिनांक-06.08.2010 नुसार रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई-निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य केले आहे. तथापि सदर प्रकरणी ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.

DRAFT

5. सदर कामाची निविदा (दुसरी वेळ) दिनांक-17.02.2011 रोजी दै.प्रतिदिन अखबार या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही न केल्याने स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेस लाभ मिळालेला नाही.

6. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 202 नुसार टीप-2 नुसार निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस (दि.22.02.2011) देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दोन दिवसांनी (दि.24.02.2011) निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे. वास्तविक पाहता निविदा प्रसिध्दी पासून विक्रीस व स्विकृती ठेवणे अपेक्षित होते. निविदा विक्रीसाठी व स्विकृतीसाठी पुरेसा कालावधी देण्यात आलेला नसल्याचे यावरून स्पष्ट होते हि अतिशय गंभीर बाब आहे.

7. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/प्रक्र.171/08/नवि-20 दिनांक-02.03.2009 नुसार रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही.

8. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज 10/1009/सी.आर. 309/ख, दि.11.2.2010 नुसार कामावरील वापरण्यात आलेल्या गौणखनिजावर शासनाने विहित केलेल्या दराने (रु.70.67 प्रती घनमीटर) रॉयल्टी सदर कामावर खर्च दर्शवुन कपातीव्दारे शासनास भरणा करावयाची आहे. अथवा ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केला असल्यास भरणा केलेल्या पावत्या/चलनची खात्री विभागाने करणे आवश्यक आहे.तथापि ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.या बाबत विभागाने खात्री करावी अन्यथा खालील तपशिला प्रमाणे रु. 17226 एवढी रॉयल्टी संबधित ठेकेदाराकडून वसूल करून “0853 गौणखनीज” या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

DRAFT

| अ.क्र. | बाब | परिमाण | प्र.घ.मीटर रेतीचे परिमाण | रॉयल्टीसाठी एकूण परिमाण | रॉयल्टीचा दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1:3:6 कॉक्रीट | 96.479 | 0.45 | 43.42 | 70.67 | 17226 |
| 2 | 1:2:4 कॉक्रीट | 175.5 | 0.45 | 78.975 | | |
| 3 | कॉक्रीट भिंत | 269.708 | 0.45 | 121.368 | | |
| | एकूण | | | 243.763 | | 17226 |

9. खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे तेवढ्या परिमाणाची रॉयल्टीची रक्कम देयकात अंतर्भूत करून नंतर तेवढीच रक्कम देयकातून रॉयल्टीपोटी वजा करण्यात आलेली आहे.तसेच खोदकामातील साहित्य वाहून

टाकल्यामुळे वाहतुकीपोटी वेगळ्या दराने ठेकेदारास अदाई करण्यात आलेली आहे.खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे रॉयल्टी देण्याबाबत शासनाचे कुठलेही निर्देश नसतांना रॉयल्टी खर्च दर्शवून नंतर देयकातून कपात करणे नियमबाहय आहे.

10. भाववाढ फरकाच्या रु. 693773 देयकातून प्रत्येकी 1% प्रमाणे कामगार कल्याण उपकर व विम्याची रक्कम रु.13876 वसूल करण्यात आलेली नाही. ती संबधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

11. सदर कामाच्या मोजमाप पुस्तिकेत (क्र.173) मोठ्याप्रमाणावर खाडाखोडी करण्यात आलेल्या आहेत. सदर खाडाखोडी सक्षम प्रधिकाऱ्याने स्वाक्षांकित केलेल्या नाहीत.

12. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

13. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

14. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 161 दिनांक- 03.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 161)

DRAFT

## *85 अंबानाला बांधकाम व बळकटीकरण प्रकल्प अंतर्गत 7875 ते 8045 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 14**

*लेखा शीर्ष : अंबानाला व उपनाले बा शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 10932565.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 10890952.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 41613.00/-

***महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश असतांना कामाचे भाग पाडण्यात आलेले आहेत. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई- निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य असतांना सदर प्रकरणी ई- निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही केलेली नाही. निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दोन दिवसांनी निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे.रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही. भाववाढ फरकाच्या देयकातून कामगार कल्याण उपकर व विम्याची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे रॉयल्टी देण्याबाबत शासनाचे कुठलेही निर्देश नसतांना रॉयल्टी खर्च दर्शवून नंतर देयकातून कपात करणेत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

DRAFT

प्रशासकीय मान्यता - मा. आयुक्त टिपणी दिनांक-16.05.2011 रु.8997226

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-09.09.2011 कामाची मुदत -06 महिने

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 8997226 कामावर झालेला खर्च -रु. 10932565

अमरावती शहरातील अंबानाला व त्याचे उपनाले हे शहराच्या मध्य भागातून वाहत असल्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात शहरात पावसाचे/पुराचे पाणी लगतच्या वस्त्यांमध्ये शिरते. सदर नाल्याचे व उपनाल्याचे पाणी

शहरात व लगतच्या वस्त्यांमध्ये शिरू नये त्या अनुशंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अंबानाला व उपनाल्यांचे बांधकाम व बळकटीकरण करण्याच्या रु. 1271 लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या योजनेस शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-23.11.1995 च्या निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. सुधारित दरसूची प्रमाणे व उर्वरित कामांच्या अंदाजपत्रकांच्या आधारे शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-02.04.2009 नुसार सदर कामाच्या एकूण 2318.61 लक्ष इतक्या एकत्रित अंदाजपत्रकीय खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार सन 2009-10 मध्ये रु.400 लक्ष व शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-31.03.2011 नुसार रु.450 लक्ष असा एकूण रु.850 लक्ष एवढा निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. नाल्याच्या बांधकामाची लांबी,कामाची निकड व ठेकेदारांची क्षमता/कुवत लक्षात घेऊन कामाचे एकूण 05 भाग पाडण्यात आले आहेत.

सदर 05 भागांपैकी 7875 ते 8045 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश आहेत. तथापि सदर प्रकरणी या निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे सदर कामाचे एकूण पाच भाग पाडलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपरोक्त निर्देशानुसार कामाचे भाग पाडणे अनियमित आहे.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

3. उपरोक्त लेखासंहितेतील नियम 161 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता सदर कामांना घेण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकाच्या शेवटी शहर अभियंता यांनी Technically Approveम्हणून स्वाक्षरी केली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

4. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंस/नस्ती2010/प्र.क्र.34/39दिनांक-06.08.2010 नुसार रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई-निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य केले आहे. तथापि सदर प्रकरणी ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.

5. सदर कामाची निविदा दिनांक-05.06.2011 रोजी दै.जनमाध्यम व साप्ताहिक पांचजन्य या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही न केल्याने स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेस लाभ मिळालेला नाही.



DRAFT

6. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 202 नुसार टीप-2 नुसार निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस (दि.05.07.2011) देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दोन दिवसांनी (दि.07.07.2011) निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे. वास्तविक पाहता निविदा प्रसिध्दी पासून विक्रीस व स्विकृती ठेवणे अपेक्षित होते. निविदा विक्रीसाठी व स्विकृतीसाठी पुरेसा कालावधी देण्यात आलेला नसल्याचे यावरून स्पष्ट होते हि अतिशय गंभीर बाब आहे.

7. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/प्रक्र.171/08/नवि-20 दिनांक-02.03.2009 नुसार रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही.

8. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज 10/1009/सी.आर. 309/ख, दि.11.2.2010 नुसार कामावरील वापरण्यात आलेल्या गौणखनिजावर शासनाने विहित केलेल्या दराने (रु.70.67 प्रती घनमीटर) रॉयल्टी सदर कामावर खर्च दर्शवुन कपातीव्दारे शासनास भरणा करावयाची आहे. अथवा ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केला असल्यास भरणा केलेल्या पावत्या/चलनची खात्री विभागाने करणे आवश्यक आहे.तथापि ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.या बाबत विभागाने खात्री करावी अन्यथा खालील तपशिला प्रमाणे रु. 30222 एवढी रॉयल्टी संबधित ठेकेदाराकडून वसूल करून “0853 गौणखनीज” या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | बाब | परिमाण | प्र.घ.मीटर रेतीचे परिमाण | रॉयल्टीसाठी एकूण परिमाण | रॉयल्टीचा दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1:3:6 कॉक्रीट | 138.04 | 0.45 | 62.118 | 70.67 | 30222 |
| 2 | 1:2:4 कॉक्रीट | 254.52 | 0.45 | 114.534 | | |
| 3 | कॉक्रीट भिंत | 557.78 | 0.45 | 251.001 | | |
| | एकूण | | | 427.653 | | 30222 |

9. खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे तेवढ्या परिमाणाची रॉयल्टीची रक्कम देयकात अंतर्भूत करून नंतर तेवढीच रक्कम देयकातून रॉयल्टीपोटी वजा करण्यात आलेली आहे.तसेच खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे वाहतुकीपोटी वेगळ्या दराने ठेकेदारास अदाई करण्यात आलेली आहे.खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे रॉयल्टी देण्याबाबत शासनाचे कुठलेही निर्देश नसतांना रॉयल्टी खर्च दर्शवून नंतर देयकातून कपात करणे नियमबाह्य आहे.

10. भाववाढ फरकाच्या रु. 400773 देयकातून तसेच तिसऱ्या व अंतीम देयकातून (रु.738344) 1% प्रमाणे

DRAFT

विम्याची रक्कम अनुक्रमे रु.4008 व रु.7383 वसूल करण्यात आलेली नाही. ती संबधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

11. सदर कामात माती/कठीण मुरूम खोदकाम,1:2:4: व खोदकामातील साहित्य वाहून टाकणे या बाबीवर अंदाजपत्रकापेक्षा रु.3508468 एवढा जादा खर्च करण्यात आला आहे.तथापि अंदाजपत्रकापेक्षा अतिरिक्त खर्चास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

12. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सदर न केल्याने लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही केल्याबाबत खात्री करता आली नाही.

13. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

14. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 162 दिनांक- 03.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 162)

## *86 अंबानाला बांधकाम व बळकटीकरण प्रकल्प अंतर्गत 7705 ते 7875 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 13**



DRAFT

*लेखा शीर्ष : अंबानाला व उपनाले बा शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 10958499.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 10881600.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 76899.00/-

***महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश असतांना कामाचे भाग पाडण्यात आलेले आहेत. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई- निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य असतांना सदर प्रकरणी ई- निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही केलेली नाही. निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दोन दिवसांनी निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे. रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही. खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे रॉयल्टी देण्याबाबत शासनाचे कुठलेही निर्देश नसतांना रॉयल्टी खर्च दर्शवून नंतर देयकातून कपात करणेत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

DRAFT

प्रशासकीय मान्यता - मा. आयुक्त टिपणी दिनांक-16.05.2011 रु.8148154

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-09.09.2011 कामाची मुदत -06 महिने

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 8148154 कामावर झालेला खर्च -रु. 10958499

अमरावती शहरातील अंबानाला व त्याचे उपनाले हे शहराच्या मध्य भागातून वाहत असल्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात शहरात पावसाचे/पुराचे पाणी लगतच्या वस्त्यांमध्ये शिरते. सदर नाल्याचे व उपनाल्याचे पाणी शहरात व लगतच्या वस्त्यांमध्ये शिरू नये त्या अनुशंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अंबानाला व उपनाल्यांचे बांधकाम व बळकटीकरण करण्याच्या रु. 1271 लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या योजनेस शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-23.11.1995 च्या निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. सुधारित दरसूची प्रमाणे व उर्वरित कामांच्या अंदाजपत्रकांच्या आधारे शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-02.04.2009 नुसार सदर कामाच्या एकूण 2318.61 लक्ष इतक्या एकत्रित अंदाजपत्रकीय खर्चास

सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार सन 2009-10 मध्ये रु.400 लक्ष व शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-31.03.2011 नुसार रु.450 लक्ष असा एकूण रु.850 लक्ष एवढा निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. नाल्याच्या बांधकामाची लांबी,कामाची निकड व ठेकेदारांची क्षमता/कुवत लक्षात घेऊन कामाचे एकूण 05 भाग पाडण्यात आले आहेत.

सदर 05 भागांपैकी 7705 ते 7875 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश आहेत. तथापि सदर प्रकरणी या निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे सदर कामाचे एकूण पाच भाग पाडलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपरोक्त निर्देशानुसार कामाचे भाग पाडणे अनियमित आहे.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

3. उपरोक्त लेखासंहितेतील नियम 161 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता सदर कामांना घेण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकाच्या शेवटी शहर अभियंता यांनी Technically Approveम्हणून स्वाक्षरी केली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

4. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंस/नस्ती2010/प्र.क्र.34/39दिनांक-06.08.2010 नुसार रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई-निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य केले आहे. तथापि सदर प्रकरणी ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.

5. सदर कामाची निविदा दिनांक-05.06.2011 रोजी दै.जनमाध्यम व साप्ताहिक पांचजन्य या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही न केल्याने स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेस लाभ मिळालेला नाही.

6. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 202 नुसार टीप-2 नुसार निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस (दि.22.02.2011) देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दोन दिवसांनी (दि.24.02.2011) निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे. वास्तविक पाहता निविदा प्रसिध्दी पासून विक्रीस व स्विकृती ठेवणे अपेक्षित होते. निविदा विक्रीसाठी व स्विकृतीसाठी पुरेसा कालावधी

DRAFT

देण्यात आलेला नसल्याचे यावरून स्पष्ट होते हि अतिशय गंभीर बाब आहे.

6. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/प्रक्र.171/08/नवि-20 दिनांक-02.03.2009 नुसार रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही.

7. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज 10/1009/सी.आर. 309/ख, दि.11.2.2010 नुसार कामावरील वापरण्यात आलेल्या गौणखनिजावर शासनाने विहित केलेल्या दराने (रु.70.67 प्रती घनमीटर) रॉयल्टी सदर कामावर खर्च दर्शवुन कपातीव्दारे शासनास भरणा करावयाची आहे. अथवा ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केला असल्यास भरणा केलेल्या पावत्या/चलनची खात्री विभागाने करणे आवश्यक आहे.तथापि ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.या बाबत विभागाने खात्री करावी अन्यथा खालील तपशिला प्रमाणे रु. 50930 एवढी रॉयल्टी संबधित ठेकेदाराकडून वसूल करून “0853 गौणखनीज” या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | बाब | परिमाण | प्र.घ.मीटर रेतीचे परिमाण | रॉयल्टीसाठी एकूण परिमाण | रॉयल्टीचा दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1:3:6 कॉक्रीट | 150.58 | 0.45 | 67.76 | 70.67 | 50930 |
| 2 | 1:2:4 कॉक्रीट | 271.02 | 0.45 | 121.959 | | |
| 3 | कॉक्रीट भिंत | 664.09 | 0.45 | 298.84 | | |
| 4 | 15-23 mm सोलिंग | 232.20 | 1.00 | 232.20 | | |
| | एकूण | | | 720.759 | | 50930 |

8. खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे तेवढ्या परिमाणाची रॉयल्टीची रक्कम देयकात अंतर्भूत करून नंतर तेवढीच रक्कम देयकातून रॉयल्टीपोटी वजा करण्यात आलेली आहे.तसेच खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे वाहतुकीपोटी वेगळ्या दराने ठेकेदारास अदाई करण्यात आलेली आहे.खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे रॉयल्टी देण्याबाबत शासनाचे कुठलेही निर्देश नसतांना रॉयल्टी खर्च दर्शवून नंतर देयकातून कपात करणे नियमबाहय आहे.

9. बाब क्र.03 कठीण मुरूम खोदकाम या बाबीचे दर दरपृथ:करणा नुसार रु.152.25 प्र.घ.मीटर असतांना प्रत्यक्ष प्रदान रु.246.75 प्र.घ.मीटर दराने करण्यात आले आहे.त्या मुळे 274.80 घ.मी.चे रु.94.50 दराने रु.25969 ठेकेदारास जादा अदाई झाली आहे.सदर रक्कम संबधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवशयक आहे.

DRAFT

10. अंदाजपत्रकानुसार दोन्ही बाजूने प्रत्येकी 170 मीटर लांब या प्रमाणे 340 मीटर लांब संरक्षण भिंत प्रस्तावित होती.तथापि प्रत्यक्षात 550 मीटर लांब भिंत बांधल्याचे मोजमाप पुस्तिकेवरून निदर्शनास आले.

11. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

12. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

13. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 163 दिनांक- 03.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 163)

## *87 अंबानाला बांधकाम व बळकटीकरण प्रकल्प अंतर्गत 7535 ते 7705 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 11**

*लेखा शीर्ष : अंबानाला व उपनाले बा शासन निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 9929396.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9895839.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 33557.00/-



DRAFT

***महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश असतांना कामाचे भाग पाडण्यात आलेले आहेत. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई- निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य असतांना सदर प्रकरणी ई- निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही केलेली नाही. निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दोन दिवसांनी निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे.रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही. खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे रॉयल्टी देण्याबाबत शासनाचे कुठलेही निर्देश नसतांना रॉयल्टी खर्च दर्शवून नंतर देयकातून कपात करणेत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - मा. आयुक्त टिपणी दिनांक-16.05.2011 रु.9084419

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-25.08.2011 कामाची मुदत -06 महिने

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 9084419 कामावर झालेला खर्च -रु. 9929396

अमरावती शहरातील अंबानाला व त्याचे उपनाले हे शहराच्या मध्य भागातून वाहत असल्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात शहरात पावसाचे/पुराचे पाणी लगतच्या वस्त्यांमध्ये शिरते. सदर नाल्याचे व उपनाल्याचे पाणी शहरात व लगतच्या वस्त्यांमध्ये शिरू नये त्या अनुशंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अंबानाला व उपनाल्यांचे बांधकाम व बळकटीकरण करण्याच्या रु. 1271 लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या योजनेस शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-23.11.1995 च्या निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. सुधारित दरसूची प्रमाणे व उर्वरित कामांच्या अंदाजपत्रकांच्या आधारे शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-02.04.2009 नुसार सदर कामाच्या एकूण 2318.61 लक्ष इतक्या एकत्रित अंदाजपत्रकीय खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार सन 2009-10 मध्ये रु.400 लक्ष व शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-31.03.2011 नुसार रु.450 लक्ष असा एकूण रु.850 लक्ष एवढा निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. नाल्याच्या बांधकामाची लांबी,कामाची निकड व ठेकेदारांची क्षमता/कुवत लक्षात घेऊन कामाचे एकूण 05 भाग पाडण्यात आले आहेत.

सदर 05 भागांपैकी 7535 ते 7705 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामाची संचिका तपासली असता त्यात



DRAFT

खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश आहेत. तथापि सदर प्रकरणी या निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे सदर कामाचे एकूण पाच भाग पाडलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपरोक्त निर्देशानुसार कामाचे भाग पाडणे अनियमित आहे.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

3. उपरोक्त लेखासंहितेतील नियम 161 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता सदर कामांना घेण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकाच्या शेवटी शहर अभियंता यांनी Technically Approveम्हणून स्वाक्षरी केली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

4. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंस/नस्ती2010/प्र.क्र.34/39दिनांक-06.08.2010 नुसार रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई-निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य केले आहे. तथापि सदर प्रकरणी ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.

5. सदर कामाची निविदा दिनांक-05.06.2011 रोजी दै.जनमाध्यम व साप्ताहिक पांचजन्य या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही न केल्याने स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेस लाभ मिळालेला नाही.

6. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 202 नुसार टीप-2 नुसार निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस (दि.22.02.2011) देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दोन दिवसांनी (दि.24.02.2011) निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे. वास्तविक पाहता निविदा प्रसिध्दी पासून विक्रीस व स्विकृती ठेवणे अपेक्षित होते. निविदा विक्रीसाठी व स्विकृतीसाठी पुरेसा कालावधी देण्यात आलेला नसल्याचे यावरून स्पष्ट होते हि अतिशय गंभीर बाब आहे.

6. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/प्रक्र.171/08/नवि-20 दिनांक-02.03.2009 नुसार रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही.

7. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज 10/1009/सी.आर. 309/ख, दि.11.2.2010 नुसार



DRAFT

कामावरील वापरण्यात आलेल्या गौणखनिजावर शासनाने विहित केलेल्या दराने (रु.70.67 प्रती घनमीटर) रॉयल्टी सदर कामावर खर्च दर्शवुन कपातीव्दारे शासनास भरणा करावयाची आहे. अथवा ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केला असल्यास भरणा केलेल्या पावत्या/चलनची खात्री विभागाने करणे आवश्यक आहे.तथापि ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.या बाबत विभागाने खात्री करावी अन्यथा खालील तपशिला प्रमाणे रु. 33557 एवढी रॉयल्टी संबधित ठेकेदाराकडून वसूल करून "0853 गौणखनीज" या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | बाब | परिमाण | प्र.घ.मीटर रेतीचे परिमाण | रॉयल्टीसाठी एकूण परिमाण | रॉयल्टीचा दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1:3:6 कॉक्रीट | 151.68 | 0.45 | 68.256 | 70.67 | 33557 |
| 2 | 1:2:4 कॉक्रीट | 260.11 | 0.45 | 117.049 | | |
| 3 | कॉक्रीट भिंत | 643.40 | 0.45 | 289.530 | | |
| | एकूण | | | 474.835 | | 33557 |

8. खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे तेवढ्या परिमाणाची रॉयल्टीची रक्कम देयकात अंतर्भूत करून नंतर तेवढीच रक्कम देयकातून रॉयल्टीपोटी वजा करण्यात आलेली आहे.तसेच खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे वाहतुकीपोटी वेगळ्या दराने ठेकेदारास अदाई करण्यात आलेली आहे.खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे रॉयल्टी देण्याबाबत शासनाचे कुठलेही निर्देश नसतांना रॉयल्टी खर्च दर्शवून नंतर देयकातून कपात करणे नियमबाहय आहे.

9. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि सदर कामाची मोजमाप पुस्तिका (क्र.10 व 13) लेखापरीक्षणात सादर न करण्यात आल्याने उपरोक्त बाबींची खात्री करता आली नाही.

10. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून किंवा सदर निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

11. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा

DRAFT

महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 164 दिनांक- 03.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 164)

## *88 अंबानाला बांधकाम व बळकटीकरण प्रकल्प अंतर्गत 6500 ते 7100 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 13**

*लेखा शीर्ष :अंबानाला व उपनाले बा शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 28700384.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 24329780.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 4370604.00/-

***महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश असतांना कामाचे भाग पाडण्यात आलेले आहेत. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई- निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य असतांना सदर प्रकरणी ई- निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही केलेली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 187 (ए) टीप 6 (तीन) नुसार शहर/कार्यकारी अभियंत्यांनी कमी प्राप्त दराबाबतचे (22% कमी) समर्थन करणे आवश्यक असतांना सदर प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. विहित मुदतीत काम पूर्ण न केल्याने ठेकेदारावर कुठलीही दंडात्मक कार्यवाही न करता उलट कामास कुठलीही मुदतवाढ न देता ठेकेदारास भाववाढ फरकाची अदाई करण्यात आलेली आहे.विहित मुदतीत काम पूर्ण न केल्याने व सक्षम प्राधिकाऱ्याने कामास मुदतवाढ न दिल्याने भाववाढ फरकाची अदाई नियमबाह्य ठरते. सदर कामाच्या खोदकामातून मोठ्या प्रमाणावर माती,मऊ/कठीण मुरूम निघालेला असतांना व अंदाजपत्रकानुसार खोदकामातील माती, मऊ/कठीण मुरूम त्याच ठिकाणी वापरणे आवश्यक असतांना 4527.90 घ.मी.कठीण मुरूम पुरविणे/पसरविणे या बाबीपोटी रु.260.16 प्र.घ.मी. दराने रु.1177978 ठेकेदारास अदा करण्यात आलेले आहेत.अंदाजपत्रकानुसार खोदकामातील***

***साहित्य त्याच ठिकाणी वापरणे अनिवार्य असल्यामुळे सदर अदाई नियमबाह्य ठरते.रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही. खोदकामातील साहित्य वाहून टाकल्यामुळे रॉयल्टी देण्याबाबत शासनाचे कुठलेही निर्देश नसतांना रॉयल्टी खर्च दर्शवून नंतर देयकातून कपात करणेत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - मा. आयुक्त टिपणी दिनांक- 03.04.2010 रु.28700384

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-20.01.2011 कामाची मुदत -12 महिने

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 28700384

अमरावती शहरातील अंबानाला व त्याचे उपनाले हे शहराच्या मध्य भागातून वाहत असल्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात शहरात पावसाचे/पुराचे पाणी लगतच्या वस्त्यांमध्ये शिरते. सदर नाल्याचे व उपनाल्याचे पाणी शहरात व लगतच्या वस्त्यांमध्ये शिरू नये त्या अनुशंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अंबानाला व उपनाल्यांचे बांधकाम व बळकटीकरण करण्याच्या रु. 1271 लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या योजनेस शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-23.11.1995 च्या निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. सुधारित दरसूची प्रमाणे व उर्वरित कामांच्या अंदाजपत्रकांच्या आधारे शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-02.04.2009 नुसार सदर कामाच्या एकूण 2318.61 लक्ष इतक्या एकत्रित अंदाजपत्रकीय खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार सन 2009-10 मध्ये रु.400 लक्ष व शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक-31.03.2011 नुसार रु.450 लक्ष असा एकूण रु.850 लक्ष एवढा निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. नाल्याच्या बांधकामाची लांबी,कामाची निकड व ठेकेदारांची क्षमता/कुवत लक्षात घेऊन कामाचे एकूण 05 भाग पाडण्यात आले आहेत.

सदर 05 भागांपैकी 6500 ते 7100 मीटर पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 229 नुसार एकाच कामाचे भाग न पाडण्याचे निर्देश आहेत. तथापि सदर प्रकरणी या निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे सदर कामाचे एकूण पाच भाग पाडलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपरोक्त निर्देशानुसार कामाचे भाग पाडणे अनियमित आहे.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या

DRAFT

बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

3. उपरोक्त लेखासंहितेतील नियम 161 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता सदर कामांना घेण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकाच्या शेवटी शहर अभियंता यांनी Technically Approveम्हणून स्वाक्षरी केली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

4. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंस/नस्ती2010/प्र.क्र.34/39दिनांक-06.08.2010 नुसार रु.50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई-निविदा प्रणाली वापरणे अनिवार्य केले आहे. तथापि सदर प्रकरणी ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.

5. सदर कामाची निविदा दिनांक-30.06.2010 रोजी दै.लोकमत नागपूर,दै.आम.मंडल व साप्ताहिक पांचजन्य या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही न केल्याने स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेस लाभ मिळालेला नाही.

6. सदर कामाच्या एकूण 06 निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी श्री.आर.एच.खंडेलवाल यांची निविदा केवळ VATप्रमाणपत्र नसल्यामुळे उघडण्यात आली नाही.सदर ठेकेदार महापालिकेचा नियमित ठेकेदार असल्यामुळे व संबधित ठेकेदाराने महापालिकेची मोठ्याप्रमाणावर विकास कामे केलेली असल्यामुळे केवळ किरकोळ बाबीपोटी संबधिताची निविदा न उघडणे संयुक्तिक वाटत नाही. संबधिताचे निविदा दर इतर न्यूनतम दरापेक्षाही (22% कमी) कमी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर निविदा न उघडणे शंषयास्पद वाटते.

7. सदर कामाची न्यूनतम 22% कमी दाराची निविदा प्राप्त झाली होवून ती स्विकारण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 187 (ए) टीप 6 (तीन) नुसार शहर/कार्यकारी अभियंत्यांनी कमी प्राप्त दराबाबतचे (22% कमी) समर्थन करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/प्रक्र.171/08/नवि-20 दिनांक-02.03.2009 नुसार रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही.

9. सदर कामाचे आदेश दिनांक-20.01.2011 रोजी देण्यात आले होते व कामाची मुदत 12 महिने होती.त्यानुसार सदर काम दिनांक-19.01.2012 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते.तथापि कार्यकारी अभियंता यांच्या दिनांक-02.06.2011 च्या ठेकेदारास उद्देशून लिहिलेल्या पत्रानुसार सदर दिनांका पर्यंत ठेकेदाराने कामच सुरु न केल्याचे

DRAFT

निदर्शनास आले.तसेच विहित मुदतीत काम पूर्ण न केल्याने ठेकेदारावर कुठलीही दंडात्मक कार्यवाही न करता उलट कामास कुठलीही मुदतवाढ न देता ठेकेदारास माहे-04/2012 ते 06/2012 व 07/2012 या कालावधीची अनुक्रमे रु.2301248 व रु. 891378 अशी एकूण रु.3192626 भाववाढ फरकाची अदाई करण्यात आलेली आहे.विहित मुदतीत काम पूर्ण न केल्याने व सक्षम प्राधिकाऱ्याने कामास मुदतवाढ न दिल्याने भाववाढ फरकाची अदाई नियमबाह्य ठरते.

10. सदर कामाच्या खोदकामातून मोठ्या प्रमाणावर माती,मऊ/कठीण मुरूम निघालेला असतांना अंदाजपत्रकानुसार खोदकामातील माती 80% व मऊ/कठीण मुरूम 50% त्याच ठिकाणी वापरणे आवश्यक असतांना 4527.90 घ.मी.कठीण मुरूम पुरविणे/पसरविणे या बाबीपोटी रु.260.16 प्र.घ.मी. दराने रु.1177978 ठेकेदारास अदा करण्यात आलेले आहेत.अंदाजपत्रकानुसार खोदकामातील साहित्य त्याच ठिकाणी वापरणे अनिवार्य असल्यामुळे सदर अदाई नियमबाह्य ठरते.

11. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून किंवा सदर निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

12. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 165 दिनांक- 03.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 165)

## *94 BOT अंतर्गत नवसारी जवाहर नगर येथे स्पोर्टिंग क्लब बांधणे कामातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 09**

*अनियमितता कलम : 9अ*

***मंजूर प्रयोजना व्यतिरिक्त ईतर प्रयोजनासाठी जागा वापरावयाची असल्यास मा. जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.तथापि पूर्व परवानगी घेण्यात आलेली नाही.सदर कामाच्या एकूण तीन ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.तथापि तीनही विकासकांना BOT प्रकल्पाचा अनुभव नसल्याचे संचिकेतील अभिलेख्यावरून निदर्शनास आले.त्यामुळे निविदेतील अटी/ शर्तींचे पालन झालेले नाही. One time premium 100 लक्ष घेणे व भाडेवाढ दर पाच वर्षांनी 20% करणे आवशयक होते. तथापि One time premium 10 लक्ष व भाडेवाढ दर पाच वर्षांनी 10% मान्य करण्यात आलेली आहे. संपूर्ण प्रकल्प कालावधीचा तसेच दोष दायित्वाचा विमा उतरविणे आवश्यक असतांना तसा विमा उतरविणेत आलेला नाही. 10% Performance Security रु.61.85 लक्ष FDR स्वरुपात घेणे आवश्यक असतांना ती बँक गॅरंटीच्या स्वरुपात घेण्यात आलेली आहे. प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे जेणे करून मनपास वार्षिक भाडे व मालमत्ता करापासून मिळणारे उत्पन्न विहित कालावधीत प्राप्त होऊ शकेल.***

अमरावती महापालिकेच्या शहर सुधार समितीच्या ठराव क्र.39 दिनांक-17.04.2010 व सर्वसाधारण सभा दिनांक-20.04.2010 च्या ठरावानुसार BOT अंतर्गत नवसारी जवाहर नगर येथे स्पोर्टिंग क्लब विकासकामार्फत बांधनेस मान्यता देण्यात आली होती.मा.जिल्हाधिकारी यांचे आदेश दिनांक-03.06.2011 नुसार 16708 स्क्वे.मीटर खेळासाठीची राखीव खुली जागा महापालिकेस हस्तांतरित करण्यात आली होती.सदर जागा विकसित करण्यासाठी खाजगी विकासकाकडून ई-निविदा मागवून सर्वाधिक फायद्याची एस.नविन बिल्डर & श्री.अष्टविनायक कं. यांची निविदा स्थायी समिती ठराव क्र.78 अन्वये मंजूर करून संबधितास कामाचे आदेश देण्यात आले आहेत. कामाची मुदत 30 महिने असून लेखापरीक्षण दिनांका पावेतो प्रकल्प अपूर्ण आहे.सदर प्रकल्पाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. मा.जिल्हाधिकारी यांचे आदेश क्र.कक्ष-2/अका:नझुल/कावि-1014/2011 दिनांक-03.06.2011 मधिल अट क्र. 3 नुसार मंजूर प्रयोजना व्यतिरिक्त ईतर प्रयोजनासाठी जागा वापरावयाची असल्यास मा. जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.महापालिकेमार्फत तसा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आलेला आहे.तथापि अद्याप पावेतो त्यास मान्यता देण्यात आलेली नाही. मा.जिल्हाधिकारी यांची मान्यता नसतांना प्रकल्पाच्या इमारतीस नगर रचना विभागाने बांधकाम परवानगी दिली असून प्रकल्पाचे कामही सुरु करण्यात आलेले आहे.

2. सदर कामाच्या एकूण तीन ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.तथापि तीनही विकासकांना BOT प्रकल्पाचा अनुभव नसल्याचे संचिकेतील अभिलेख्यावरून निदर्शनास आले.त्यामुळे निविदेतील अटी/शर्तींचे पालन झालेले नाही.

3. विभागाच्या दिनांक-17.02.2014 च्या टिपणी नुसार विकासकांनी निविदा पूर्व बैठकीत प्रकल्पाच्या काही मुद्यांवर लेखी स्वरुपात सूचना मांडल्याचे नमूद आहे त्या खालील प्रमाणे.

DRAFT

अ. One time premium 100 लक्ष ऐवजी 10 लक्ष करणे

ब. कामाचा कालावधी दोन वर्षावरून तीन वर्ष करावा

क. सर्व प्रकारच्या NOC मनपाने द्याव्यात

ड. दर वर्षी ऐवजी दर पाच वर्षांनी 20% ऐवजी 10% भाडेवाढ करणे

ई. निविदा सादर करण्याचा कालावधी वाढविणे

वरील ब,क व ई मान्य करण्यास तसेच अ व ड बाबत निर्णयास्तव संचिका मा.आयुकांकडे सादर करण्यात आली होती.तथापि मा.आयुक्तांनी ब,क व ई मान्य करून अ व ड बाबत निर्णय न घेतल्याने त्याच प्रमाणे सदर बाब स्थायी समिती समोर निर्णयास्तव न ठेवल्याने One time premium 100 लक्ष घेणे व भाडेवाढ दर वर्षांनी 20% करणे आवशयक होते. तसेच विकासकांनी लेखी केलेल्या सूचनांचे अवलोकन केले असता त्यात One time premium 10 लक्ष करणे बाबत कुठेही नमूद नाही. फक्त One time premium 100 लक्ष भरणे कठीण असल्याचे नमूद आहे. त्यामुळे One time premium चे हप्ते पाडून रक्कम भरण्यास विकासकास मुभा देणे आवश्यक होते.तथापि अशी कार्यवाही न केल्यामुळे महापालिकेचे One time premium मध्ये रु.90 लक्षचे व प्रति पाच वर्ष भाडेवाढ रु.2.13 लक्षचे नुकसान झाले आहे.

4. विकासकास बांधकाम परवानासाठीचा विकास भार व LBT माफ करण्यात आलेला आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती पाहता सदर निर्णय महापालिकेच्या हिताचा नाही.

5. निविदेतील अट क्र.2.7.15 व करारनाम्यातील अट क्र.9 नुसार संपूर्ण प्रकल्प कालावधीचा तसेच दोष दायित्वाचा विमा उतरविणे आवश्यक असतांना तसा विमा उतरविणेत आलेला नाही.

6. वार्षिक भाड्याची रक्कम मनपास केंव्हा जमा करण्यात यावी व सदर रक्कम विलंबाने जमा केल्यास दंडात्मक कार्यवाही बाबत करारनाम्यात काहीही तरतूद करण्यात आलेली नाही.

7. सदर जागेचे एकूण क्षेत्रफळ 16708 चौ.मीटर होते व त्यापैकी 7519.037 चौ.मीटर क्षेत्रावर बांधकाम करणेस मान्यता दिली आहे.खेळासाठी राखीव जागेवर किती चौ.मीटर बांधकाम अनुज्ञेय आहे या बाबत अभिलेखे (DCR मधिल तरतूद) लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुज्ञेय चौ.मीटर एवढेच बांधकाम करण्यास परवानगी दिली किंवा कसे या बाबत खात्री करता आली नाही.

8. विकासकास प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 30 महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला असल्याने प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे जेणे करून मनपास वार्षिक भाडे व मालमत्ता करापासून मिळणारे उत्पन्न विहित कालावधीत प्राप्त होऊ शकेल.

9.करारनाम्यातील अट क्र.2.7.16 नुसार 10% Performance Security रु.61.85 लक्ष FDR स्वरुपात घेणे

DRAFT

आवश्यक असतांना ती बँक गॅरंटीच्या स्वरुपात घेण्यात आलेली आहे.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 152 दिनांक- 03.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATVKGM7601 (Ref No : 152)

### *96 वार्ड क्र.15 वडाळी येथे पेव्हिंग ब्लॉक,कॉक्रीट रस्ता व नालीचे बांधकाम करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 08**

*लेखा शीर्ष :दलित वस्ती शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 294246.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 294246.00/-

***तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.विघयो-102000/1592/प्र. क्र.189/नवि-4 दिनांक-05.03.2002 मधिल मुद्दा क्र.7(अ) व (इ) नुसार सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही.रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा प्रसिध्द करून/मागवून काम देण्यात आलेले आहे. खोदकामातून निघालेले साहित्य वाहून टाकणे पोटी ठेकेदारास रॉयल्टीची अदाई केली आहे व तेवढ्याच परिमाणाची पुन्हा सदर साहित्य वाहून टाकणे पोटी स्वतंत्र अदाई करण्यात आलेली आहे. कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना पेव्हर ब्लॉक व्यतिरिक्त इतर साहित्याचा असा अहवाल घेण्यात आलेला नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - संचिकेत अनुपलब्ध

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-25.10.2011 कामाची मुदत - 60 दिवस

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 292367 कामावर झालेला खर्च -रु. 294246



DRAFT

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. विभागाच्या दिनांक-03.03.2011 च्या टिपणी नुसार सर्वसाधारण सभा ठराव क्र.80 दिनांक-20.01.2011 नुसार रु.869225 एवढ्या अंदाजपत्रकीय रक्कमेचे काम प्रस्तावित करण्यात आले होते.विभागाच्या दिनांक-05.07.2011 च्या टिपणी नुसार सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचा दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत कमी निधी प्राप्त झाल्याने रु.292367 चे सुधारित अंदाजपत्रक तयार करून सदर काम प्रस्तावित करण्यात आले आहे.तथापि शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.विघयो-102000/1592/प्र.क्र.189/नवि-4 दिनांक-05.03.2002 मधिल मुद्दा क्र.7(अ) व (इ) नुसार सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही. तसेच मूळ कामाचे अंदाजपत्रक रद्द करून निधी उपलब्धते नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे त्यामुळे लेखासंहितेतील उपरोक्त तरतुदीनुसार कार्यवाही न केल्यास पुष्ठी मिळते.

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-07/2006/प्र.क्र.94/इमारती-2 दिनांक-16.11.2006 नुसार रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा प्रसिध्द करून/मागवून काम देण्यात आलेले आहे. त्यामुळे उपरोक्त शासन आदेशाचे पालन झालेले नाही.

4. सदर कामात एकूण 57.17 घ.मी.एवढे खोदकाम केलेले आहे व तेवढेच घ.मी.साहित्य त्याच ठिकाणी वापरल्याबाबत रु.70.64 प्रती घ.मी.दराने रु.4038 एवढी रॉयल्टी ठेकेदारास अदा करण्यात आलेली आहे.तथापि तेवढेच घ.मी.साहित्य वाहून टाकणे पोटी रु.142.80 दराने रु.8164 ठेकेदारास अदा करण्यात आलेले आहेत.खोदकामातील साहित्य त्याच ठिकाणी वापरल्यामुळे सदर अदाई अनुज्ञेय ठरत नाही.

5. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना पेव्हर ब्लॉक व्यतिरिक्त इतर साहित्याचा असा अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे अंदाजपत्रकानुसार योग्य गुणवत्तेचे साहित्य वापरल्याची खात्री पटली नाही.

6. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

DRAFT

7. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून किंवा सदर निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

8. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 176 दिनांक- 05.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 176)

## *97 प्रभाग क्र.2 रहाटगाव येथे सार्वजनिक संडास बांधणे कामातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 09**

*लेखा शीर्ष : दलित वस्ती शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 812262.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 812262.00/-

***शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.विघयो-102000/1592/प्र. क्र.189/नवि-4 दिनांक-05.03.2002 मधिल मुद्दा क्र.7(अ) व (इ) नुसार सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही.तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही केलेली नाही. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा प्रसिध्द करून/ मागवून काम देण्यात आलेले आहे. सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही. कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना M-15 व्यतिरिक्त इतर साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***



DRAFT

प्रशासकीय मान्यता - संचिकेत अनुपलब्ध

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2008-09

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-31.12.2009 कामाची मुदत - 120 दिवस

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 871960 कामावर झालेला खर्च -रु. 812262

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. सन 2006-07 च्या जिल्हा दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करून सदर काम प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि प्रस्तावित कामाच्या जागेवर जुने बांधकाम असल्यामुळे कामास विलंब झाला आहे. त्यामुळे सन 2008-09 च्या जिल्हा दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करून काम प्रस्तावित करण्यात आले आहे.तथापि शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.विघयो-102000/1592/ प्र.क्र.189/नवि-4 दिनांक-05.03.2002 मधिल मुद्दा क्र.7(अ) व (इ) नुसार सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही. जुने संडास पाडून नविन (2 युनिट) संडास त्या ठिकाणी बांधावयाचे प्रस्तावित होते तथापि जुने संडास पाडून जागा सुस्थितीत करणे बाबतची बाब (Item) व दरवाजाच्या फ्रेमची बाब अंदाजपत्रकात अंतर्भूत नसल्याचे विभागाच्या दिनांक-28.06.2008 व 17.06.2010 च्या अहवालावरून दिसते त्यामुळे लेखासंहितेतील उपरोक्त तरतुदीनुसार कार्यवाही न केल्यास पुष्ठी मिळते.

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-07/2006/प्र.क्र.94/इमारती-2 दिनांक-16.11.2006 नुसार रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा प्रसिध्द करून/मागवून काम देण्यात आलेले आहे. त्यामुळे उपरोक्त शासन आदेशाचे पालन झालेले नाही.

4. सदर कामाचे मूळ अंदाजपत्रक रु.869911 एवढ्या रक्कमेचे होते.जाहीर निविदाद्वारे श्री.कन्हैया गुप्ता यांचे 13.2% कमी न्यूनतम दर प्राप्त झाले होते.तथापि प्रस्तावित कामाच्या स्थळावर जुने बांधकाम असल्याने ते काढण्यास विलंब झाला आहे पर्यायाने कामास मोठा विलंब होऊन सुधारित दराने पुनश्च निविदा मागवून अंदाजपत्रकीय दराने काम देण्यात आलेले आहे. जुने बांधकाम वेळीच काढून काम सुरु केले असते तर मनपाचा रु.57179 एवढ्या रक्कमेचा फायदा झाला असता व तेवढे मनपाचे दायित्व कमी झाले असते.

5. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005

DRAFT

नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना M-15 व्यतिरिक्त इतर साहित्याचा असा अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे अंदाजपत्रकानुसार योग्य गुणवत्तेचे साहित्य वापरल्याची खात्री पटली नाही.

6. सदर कामाचे दर पृथ:करण संचिकेत संलग्न केलेले नसल्यामुळे ठेकेदारास प्रदान केलेल्या दराबाबत खात्री करता आली नाही.

7. सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे नोंदविलेली बाबनिहाय मोजमापे व प्रत्यक्ष अदाई या बाबतची खात्री करता आली नाही.

8. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून किंवा सदर निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

9. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 177 दिनांक- 05.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 177)

## *99 आशियाना पोलीस क्लब ते एक्सप्रेस हायवेपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 11**

*लेखा शीर्ष : रस्ता डांबरीकरण व सु मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 1198298.00 /-

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिकाऱ्याचा अहवाल नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना***

DRAFT

***तत्कालीन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 05 संविदा 2(2) नुसार विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने थेट काम देण्यात आलेले आहे. देयक मंजुरीबाबत मुख्य लेखा अधिकारी,मुख्य लेखापरीक्षक, उपायुक्त व मा.आयुक्त यांच्या स्वाक्षऱ्या नसतांना देयकाची अदाई करण्यात आलेली आहे.कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना साहित्याचा चाचणी अहवाल न घेताच अंतिम अदाई करणेत आली आहे. ठेकेदार नोंदणीकृत असल्याबाबत नोंदणी प्रमाणपत्र व ठेकेदाराचे VAT नोंदणी प्रमाणपत्र संचिकेत निदर्शनास आले नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - मा. आयुक्त मनपा अमरावती टिपणी दिनांक- निरंक रु.1231546

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - शहर अभियंता दिनांक- 05.12.2011 कामाची मुदत - 30 दिवस

अंदाजपत्रकीय रक्कम- रु.1145624 कामावर झालेला खर्च -रु. 1198298

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी रस्ता डांबरीकरण व सुधारणा लाखाशिर्षातर्गत उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-07/2006/प्र.क्र.94/इमारती-2 दिनांक-16.11.2006 नुसार रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना तत्कालीन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 05 संविदा 2(2) नुसार विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने थेट काम देण्यात आलेले आहे. त्यामुळे उपरोक्त शासन निर्देशाचे पालन झालेले नाही.

3. विभागाने सदर कामाचे प्रथम व अंतिम रु.1198298 एवढ्या रक्कमेचे देयक मंजुरीस्तव सादर केले होते.तथापि देयक मंजुरीबाबत मुख्य लेखा अधिकारी,मुख्य लेखापरीक्षक, उपायुक्त व मा.आयुक्त यांच्या स्वाक्षऱ्या नसतांना देयकाची अदाई करण्यात आलेली आहे. विहित कार्यपद्धतीचा अवलंब न करताच देयकाची अदाई करणे हि अतिशय गंभीर बाब आहे. या बाबत नगर विकास विभागाकडे विशेष लक्ष्य वेधण्यात येते.

4. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005

DRAFT

नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.त्यामुळे अंदाजपत्रकानुसार योग्य गुणवत्तेचे डांबर/साहित्य वापरल्याची खात्री पटली नाही.साहित्याचा चाचणी अहवाल न घेताच अंतिम अदाई करणे हि अतिशय गंभीर व आक्षेपार्ह बाब आहे.

5. दर पृथकरण व क्वारिचार्ट संचिकेत संलग्न करण्यात आलेला नाही. त्यामुळे जिल्हा दरसूचीतील दर व अंदाजपत्रक/प्रत्यक्ष प्रदान दर बरोबर असल्या बाबत खात्री करता आली नाही.

6. ठेकेदार नोंदणीकृत असल्याबाबत सार्वजनिक बांधकाम/महानगरपालिकेचे नोंदणी प्रमाणपत्र संचिकेत आढळले नाही.

7. ठेकेदाराचे VAT नोंदणी प्रमाणपत्र संचिकेत निदर्शनास आले नाही. शासन अधिसूचना दिनांक-04.04.2012 नुसार अनोंदणीकृत ठेकेदाराकडून 5% कार्यकंत्राट कर (VAT) वसूल करणे आवश्यक आहे. ठेकेदार नोंदणीकृत असल्याबाबत विभागाने खात्री करावी अन्यथा उर्वरित कार्यकंत्राट कर वसूल करून शासन खाती भरणा करावा.

8. ठेकेदारास कामाचे आदेश दिनांक-05.12.2011 रोजी देण्यात आले आहेत. तथापि करारनाम्यापोटीचे मुद्रांक शुल्क दिनांक-14.12.2011 रोजी भरले आहे.या वरून स्पष्ट होते कि, ठेकेदरासोबत करारनामा करण्यापूर्वीच कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत.

9. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

10. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

11. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 179 दिनांक- 05.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DRAFT

## *104 श्री.शिवदास लक्ष्मणराव देशमुख, श्री.प्रीतम वामनराव रामटेके व श्री.मनीष शालिग्राम हिरोळे अनुरेखक यांच्या सेवापुस्तकातील त्रुटींबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 08**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***श्री.शिवदास लक्ष्मणराव देशमुख, श्री.प्रीतम वामनराव रामटेके व श्री.मनीष शालिग्राम हिरोळे अनुरेखक यांच्या सेवापुस्ताकांची तपासणी केली असता मूळ अभिलेख्यावरून जन्मतारखेची पडताळणी केलेली नाही.सेवाप्रवेशाचेवेळी वैद्यकीय व चारित्र्य तपासणी केलेली नाही.मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण अथवा सुट मिळाल्याबाबत नोंद केलेली नाही, रजा लेखा प्रमाणित केलेला नाही. चुकीची वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे सामान्य प्रशासन विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना अनुरेखक या पदावर कार्यरत असणाऱ्या खालील कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1)श्री.शिवदास लक्ष्मणराव देशमुख , अनुरेखक

2)श्री.प्रीतम वामनराव रामटेके , अनुरेखक

3)श्री.मनीष शालिग्राम हिरोळे , अनुरेखक

उपरोक्त सर्वच कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकात खाली नमूद केलेल्या 01 ते 06 आक्षेप आढळून आलेले आहेत.

1.महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 चे नियम -38 अन्वये मूळ अभिलेख्यावरून जन्मतारखेची पडताळणी केलेली नाही.

2. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 अन्वये सेवाप्रवेशाचेवेळी शारीरिकदृष्टया सक्षम असल्याबाबतची वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी केल्याची नोंद सेवापुस्तकात आढळून आलेली नाही.

3. मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण अथवा सूटबाबत नोंद सेवापुस्तकात आढळून आलेली नाही.

4. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 अन्वये रजा लेख्यामध्ये जमा व खर्च झालेल्या रजेची प्रत्येक नोंद सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली नाही.

5. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 अन्वये सेवाप्रवेशापासून अद्यापपर्यंत वेतन देयाकांवरून सेवापडताळणी केलेली नाही.

6.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39, दि.19 मार्च, 2003, तसेच महाराष्ट्र शासन,माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंस-2012/प्र.क्र.277/39, दि.04 फेब्रुवारी,2013 नुसार संगणकाचे ज्ञान किंवा संगणक अर्हता (MS-CIT) प्राप्त केल्याची नोंद सेवापुस्तकांमध्ये दिसून आलेली नाही.

7.श्री.प्रीतम रामटेके यांना मा.आयुक्त, मनपा, अमरावती यांचे आदेश क्र.अमनपा/आयुक्त/साप्रवि/50/04 दि.25/02/2004 नुसार 'अनुरेखक' या पदावर 3050-75-4590 या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यात आलेली आहे. परंतु महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टीपीव्ही-1605/244/प्र.क्र.10/ 05/नवि-27 मंत्रालय,मुंबई-32 दि.19/03/2005 अन्वये सदरील पदासाठी पाचव्या वेतन आयोगामध्ये 3200-85-4900 अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. तसेच 07 वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर 4000-100-6000 अशी वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. तसेच पाचव्या वेतन आयोगाचे शासन परिपत्रक क्र. वेपूर-1298/प्र.क्र.16/98/सेवा-10 मंत्रालय मुंबई-400 032 दि. 05 जानेवारी,1999 अन्वयेदेखील सदरील पदास उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे 3200-85-4900 अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. परंतु संबंधिताच्या सेवापुस्तकाची तपासणी केली असता विभागाने शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच सहाव्या वेतन आयोगामध्येदेखील शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

8.श्री.शिवदास देशमुख व श्री.मनीष हिरोळे ,अनुरेखक यांना मा.आयुक्त, मनपा, अमरावती यांचे आदेश क्र.अमनपा/उपआ/साप्रवि/3861/05 दि.01/02/2005 नुसार 'अनुरेखक' या पदावर 3050-75-4590 या वेतनश्रेणीमध्ये नियुक्ती देण्यात आलेली आहे. परंतु महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टीपीव्ही-1605/244/प्र.क्र.10/05/नवि-27 मंत्रालय,मुंबई-32 दि.19/03/2005 अन्वये सदरील पदासाठी पाचव्या वेतन आयोगामध्ये 3200-85-4900 अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. तसेच 07 वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर 4000-100-6000 अशी वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. तसेच पाचव्या वेतन आयोगाचे शासन परिपत्रक क्र. वेपूर-1298/प्र.क्र.16/98/सेवा-10 मंत्रालय मुंबई-400 032 दि. 05 जानेवारी,1999 अन्वयेदेखील सदरील पदास उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे 3200-85-4900 अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. परंतु संबंधितांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता विभागाने शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच सहाव्या वेतन आयोगामध्येदेखील शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत सामान्य प्रशासन विभागास अर्धसमास पत्र क्र. 159 दि.03/12/2015 अन्वये



DRAFT

अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 159)

## *106 भाजीबाजार संकूल, अमरावती येथील महानगरपालिकेच्या व्यापारी गाळे भाड्याने देण्यातील अनियमिततेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***भाजीबाजार संकूल येथील महानगरपालिकेचे व्यापारी गाळे अतिशय अल्प भाड्याने देण्यात आलेले आहेत.तसेच गाळेधारकांबरोबर केलेल्या करारनाम्यावर महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षरी नसल्यामुळे करारनामे वैध ठरत नाहीत. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (5) नुसार महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्ता हस्तांतरासंबंधी मोबदला अधिमूल्य भाडे किंवा अन्य मोबदला चालू बाजार किमतीपेक्षा कमी असल्याचे दिसून येते.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे बाजार व परवाना विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने भाजीबाजार संकूलयेथील अमरावती शहर महानगरपालिकेच्या 25 वर्षाच्या लीजवर देण्यात आलेल्या व्यापारी वीस (20) गाळ्याबाबत खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1.सदरील व्यापारी संकुलाबाबत सन 2008 मध्ये करारनामे करण्यात आलेले आहेत. करारनामे दि.01/12/2006 पासून 25 वर्षाच्या लीजवर देण्यात आलेले आहेत. व्यापारी गाळे ताब्यात दिल्यानंतर तब्बल दोन वर्षांनी करारनामे करण्यात आलेले आहेत.

2. सन 2008 मध्ये करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार त्या दुकानांचे चालू वर्षाचे भाडे दुकानाच्या आकाराप्रमाणे 6.22 चौ.मी. चे मोठे दुकान प्रतिमाह भाडे रु.342/- व लहान दुकानाचे भाडे रु.258/- प्रतिमाह निश्चित करण्यात आलेले आहे. परंतु या भाडे निश्चितीचा आधार काय ? याचा बोध संचीकेवरून होत नाही. महानगरपालिकेने बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडून तपासणी करून प्रत्येक गाळ्याचे किमान मासिक भाडे निश्चित करणे अपेक्षित होते, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही न करता गाळे लीजवर देण्याबाबत कोणत्याही वर्तमानपत्रात जाहिरात न देता जाहीर सूचना किंवा प्रकटीकरण न करता जुने पट्टी देणाऱ्या गाळेधारकांना अतिशय अल्प दरांच्या भाड्याने गाळे वाटप करण्यात आलेले आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचे खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे.त्याबाबत योग्य ती जबाबदारी निश्चित

करून कार्यवाही करण्यात यावी.सदरील करारनामा रद्द करून नव्याने निविदा काढून गाळे वाटप करण्यात यावे.
3.करारनाम्यातील अति व शर्तीनुसार अट क्र.14 अन्वये प्रत्येक गाळ्याचे मासिक भाडे दर तीन वर्षांनी 01,एप्रिल रोजी मागील भाड्याचे रकमेवर 5% वाढ करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.परंतु त्याची अंमलबजावणी केल्याचे संचीकेवरून दिसून येत नाही.
4.संचिकेच्या टिप्पणी पृष्ठ क्र.01 वरील नोंदीनुसार दि.30/11/2006 रोजी मोठ्या दुकानाचे मासिक भाडे रु.336/- प्रतिमाह व छोट्या दुकानाचे मासिक भाडे रु.246/- असल्याची नोंद आहे. नवीन करारनामे करताना मासिक भाडे प्रतिमाह मोठे दुकान रु.342/- व छोटे दुकान रु.258/- ठरविण्यात आलेले आहे.म्हणजेच त्यामध्ये अनुक्रमे रु.16/- व रु.12/- प्रतिमाह वाढ करण्यात आलेली आहे.त्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम-79 (5) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेची स्थावर मालमत्ता हस्तांतरासंबंधी मोबदला अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये, या तरतुदीचा भंग झाल्याचे निदर्शनास येते.
5.सदरील करारनाम्यावर महानगरपालिका उपायुक्त यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत त्यामुळे ते करारनामे वैध ठरत नाहीत.त्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम 69 व 73 चा भंग झाल्याचे स्पष्ट होते.
उपरोक्त अनियमिततेबाबत बाजार व परवाना विभागास अर्धसमास पत्र क्र.117 दि.31/10/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 117)

## *107 गाळे व संकुलाचे भाडे वसुलीतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 08**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेच्या बाजार व परवाना विभागाने गाळे व संकुलाचे भाडे वसुलीसाठी वापरलेले छापील पावती पुस्तके महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता- 1971 अन्वये प्रमाणित केलेली नाहीत तसेच न वापरलेल्या पावत्या दि.31/03/2013 अखेर रद्द केलेल्या नाहीत.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे बाजार व परवाना विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

DRAFT

1.मा.आयुक्त यांनी बाजार व परवाना अधीक्षक यांना महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 (सुधारणा-2011)चे कलम-69 अन्वये लायसन्स आणि परवाने देण्याबाबत कलम 386(1)व(2)चे अधिकार प्रदान केले होते का? याबाबत दस्ताऐवज लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेले नाहीत.

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता-1971 चे नियम 9 (1) अन्वये पावती पुस्तक क्र.161 ची साठा नोंदवहीमध्ये नोंद दिसून आली नाही.

3.उपरोक्त लेखासंहिता नियम 9 अन्वये दैनिक वसुली नोंदवही सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली नाही.

4.उपरोक्त लेखासंहिता नियम 9 (8) नुसार भरणा रजिस्टरमध्ये नोंदी क्रमाने आणि सुव्यवस्थितपणे करण्यात आलेल्या नाहीत.उदा. पृष्ठ क्र.37 वरील दि.27/12/2012 ते पृष्ठ क्र.66 दि.11/02/2013 वरील नोंदी.

5.विभागाने वेगवेगळ्या प्रकारची दैनिक वसुली केलेली आहे.उदा. गाळे भाडे,सामान्य कर,सिनेमा कर इ.परंतु प्रत्येक विषयासाठी वेगळे भरणा रजिस्टर तयार केलेले नाही. अनेक विषयांची वसुली एकाच नोंदवहीमध्ये नोंदवण्यात आलेली आहे.

6.उपरोक्त लेखासंहिता नियम 9 (7) अन्वये चालू वर्षी अंशतः वापरलेली पावती पुस्तके वर्षाखेरीस सक्षम प्राधिकाऱ्याने उर्वरित पावत्या रद्दबातल करून तसा शेरा लिहिणे आवश्यक आहे.परंतु पावती पुस्तक क्र.810 चे पावती क्र.02 ते 100, पावती पुस्तक क्र.956 चे पावती क्र. 086 ते 100, पावती पुस्तक क्र. 958 चे पावती क्र. 037 ते 100, मालमत्ता सामान्य कर वसुलीचे पावती पुस्तक क्र.7575 चे पावती क्र. 757468 ते 757500 दि 31/03/2013 अखेर दैनिक वसुलीसाठी वापरण्यात आलेल्या नाहीत. सदरील पावत्या सक्षम प्राधिकाऱ्याने रद्द केलेल्या नाहीत.त्यामुळे त्यांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

7.उपरोक्त लेखासंहिता नियम 9 (2) अन्वये दैनिक वसुलीची सर्वच छापील पावती पुस्तके सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली नाहीत.

8.पावती पुस्तक क्र. 245 चे पावती क्र. 024 ते 053 ची नोंद नवीन भरणा रजिस्टर चे पृष्ठ क्र. 09 ते 13 वर घेण्यात आलेली आहे. त्याच दैनिक भरणा रजिस्टरमध्ये पृष्ठ क्र. 02 ते 08 वर पावती पुस्तक क्र. 958 चे पावती क्र. 01 ते 05 ची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच पावती पुस्तक क्र. 958 ची पावती क्र. 26 ते 36 ची नोंद याच दैनिक भरणा रजिस्टरमध्ये पृष्ठ क्र. 14 वर घेण्यात आलेली आहे. परंतु पावती पुस्तक क्र. 958 ची पावती क्र. 06 ते 25 या पावत्याची नोंद इतर दैनिक भरणा रजिस्टरमध्ये करण्यात आलेली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, दैनिक नोंदीबाबत सुव्यवस्थितपणा व नीटनेटकेपणा नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत बाजार व परवाना विभागास अर्धसमास पत्र क्र.118 दि.31/10/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.



DRAFT

## *108 महानगरपालिकेचे भाडे तत्त्वावर किंवा लीजवर देण्यात आलेल्या व्यापारी संकूल व व्यापारी गाळ्याचे करारनामे न केल्याबाबत व व्यापारी गाळ्याचे भाडे अत्यल्प असल्याबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महानगरपालिकेच्या मालकीची असलेली व्यापारी गाळे व संकुले वेळोवेळी लीजवर किंवा भाडे पट्ट्याने देण्यात आलेली आहेत.परंतु अनेक गाळ्याचे व संकुलाचे करारनामे करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदरील मालमत्तेच्या मालकी हक्कांबाबत वाद निर्माण होऊ शकतो.तसेच गाळ्याचे भाडे अत्यल्प ठरवल्यामुळे महानगरपालिकेचे खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे बाजार व परवाना विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने वेळोवेळी महानगरपालिकेचे गाळे व संकुले भाड्याने किंवा लीजवर दिलेले आहेत.परंतु खालील गाळे व संकुलाच्या संचिकेच्या तपासणी केली असता त्याचे करारनामे केले नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच व्यापारी गाळ्याचे भाडे अत्यल्प ठरविल्यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे.

1.महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 (सुधारणा-2011)चे कलम-69 अन्वये मा.आयुक्त, महानगरपालिका यांना स्वत:चे काही विशिष्ट अधिकार इतर कनिष्ठ अधिकाऱ्यांना प्रदान करण्याची तरतूद आहे. तसेच कलम 73 अन्वये महानगरपालिकेच्यावतीने संविदा करण्याचा अधिकार आहे.परंतु त्याचा वापर करारनामे करण्याबाबत करण्यात आलेला नाही.

2. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम-79 (5) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेची स्थावर मालमत्ता हस्तांतरासंबंधी मोबदला अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये, परंतु व्यापारी गाळे भाड्याच्या संचिकांचे अवलोकन केले असता गाळे चालू बाजार किमतीपेक्षा कमी दराने वाटप केल्याचे स्पष्ट होते.म्हणून उपरोक्त तरतुदीचा भंग झाल्याचे निदर्शनास येते.

3.

| अ.क्र. | संकुलाचे नाव | प्लॉट क्र./ शिट क्र. | एकूण दुकानांची संख्या | करारनामे केलेली दुकाने | करारनामे न केलेली दुकाने | मासिक/ वार्षिक/प्र. चौ.फु. भाडे |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | चपराशीपुरा संकूल, | -- | 53 | निरंक | 53 | (14 दुकाने |



DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अमरावती | | | | | रिक्त)रु.4 प्र.चौ.फु. |
| 2. | महात्मा फुले संकूल, अमरावती | 290/81 डी | 62 | निरंक | 62 | (13 दुकाने रिक्त)रु.4 प्रा.चौ.फु. |
| 3. | राजापेठ संकूल,अमरावती | 72/75 बी/67 डी | 80 | 60 | 20 | रु.3,4,5व 6 प्र.चौ.फु. |
| 4. | दस्तुरनगर संकूल, अमरावती | 60 | 05 | निरंक | 05 | रु,5 प्र.चौ.फु. |
| 5. | प्रशासकीय इमारत संकूल, अमरावती | 1/67 सी | 06 | 03 | 03 | रु.6 प्र.चौ. फु. |
| 6. | संत गाडगेबाबा संकूल,अमरावती | -- | 34 | 08 | 26 | रु.8 प्र.चौ.फु. |
| 7. | आरटीओ ऑफिससमोरील संकूल, कॅम्प अमरावती | 19 | 12 | 04 | 08 | रु.4 प्र.चौ.फु. |
| 8. | विलासनगर संकूल,अमरावती | 11/58 | 57 | निरंक | 57 | प्रतिमाह रु.300/- रु.250/-व रु.200/- |
| 9. | वडाळी संकूल, अमरावती | 3/81 | 22 | निरंक | 22 | रु.315/- प्रतिमाह |
| 10. | आदर्श नेहरूनगर संकूल,अमरावती | 6/22 | 05 | निरंक | 05 | रु.300/- प्रतिमाह |
| 11. | महात्मा गांधी संकूल,नवी वस्ती,बडनेरा | 1/16 ए | 51 | निरंक | 51 | रु.572/- व रु.360/- प्रतिमाह |
| 12. | जयहिंद मैदान संकूल, नवी वस्ती, बडनेरा | --- | 25 | निरंक | 25 | रु.600/- प्रतिमाह |
| 13. | सावता मैदान | 12/1 11 सी | 10 | निरंक | 10 | रु.300/- |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संकूल,जुनी वस्ती बडनेरा | | | | | प्रतिमाह |
| 14. | राहुलनगर संकूल जुनी वस्ती बडनेरा | 151/1 23 ए | 06 | निरंक | 06 | रु.100/- प्रतिमाह |
| 15. | वसंतराव नाईक मागासवर्गीय संकूल, नवी वस्ती, बडनेरा | --- | 10 | निरंक | 10 | रु.80/- प्रतिमाह |
| 16. | महात्मा फुले संकूल, नवी वस्ती, बडनेरा | --- | 10 | निरंक | 10 | रु.80/- प्रतिमाह |
| 17. | मौलाना आझाद संकूल, नवी वस्ती बडनेरा | --- | 57 | निरंक | 57 | रु.360/- प्रतिमाह |
| 18. | बीफ मार्केट, छाया नगर | --- | 38 | निरंक | 38 | रु.400/- प्रतिमाह |
| 19. | कोंडेश्वर संकूल, मध्य. जकात नाका,अमरावती | --- | 10 | निरंक | 10 | रु.332/- प्रतिमाह |
| 20. | ट्रान्सपोर्टनगर ग्यारेजेस, वलगाव रोड | --- | 152 | 35 | 117 | रु.2700/- प्रतिवर्ष |
| 21. | ट्रान्सपोर्टनगर मेक्यानिकल्स, वलगाव रोड | --- | 184 | 25 | 159 | रु.1296/- प्रतिवर्ष |
| 22. | दूरदर्शन केंद्र, अमरावती | --- | 01 | निरंक | 01 | माहिती उपलब्ध नाही. |
| 23. | प्री. फेब्रीकेटर्स दुकाने | --- | 50 | निरंक | 50 | माहिती उपलब्ध नाही. |
| 24. | इतवारा बाजार, अमरावती | ---- | 1164 | निरंक | 1164 | माहिती उपलब्ध नाही. |

DRAFT

4.उपरोक्त माहितीचे विश्लेषण केले असता व्यापारी गाळे/संकुले अतिशय अल्प दराने वाटप करण्यात आलेले आहेत.त्यामुळे महानगरपालिकेचे अतिशय मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नसून अशाप्रकारे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे.तसेच करारनामे न केल्यामुळे मालमत्तेच्या हक्काविषयी वाद निर्माण होऊ शकतो. त्यामुळे करारनामे करणे आवश्यक आहे. उपरोक्त अनियमिततेबाबत बाजार व परवाना विभागास अर्धसमास पत्र क्र.119 दि.31/10/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 119)

## *109 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील अनियमिततेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 26**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेच्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार विभागाने शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानाबाबत स्वतंत्र नोंदवही ठेवलेली नाही. योजनेचे स्वतंत्र कॅशबुक न ठेवता महानगरपालिकेच्या सामान्य रोखवहीमध्ये व्यवहार नोंदविले आहेत.वैयक्तिक कर्ज व बचतगटाला फिरता निधी वाटप करताना शासनाच्या New Guidelines Year 2009-10 मध्ये नमूद केलेल्या सूचनांचे अनुपालन केलेले नाही.***

DRAFT

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने वाटप केलेल्या वैयक्तिक कर्ज वाटप अनुदान व फिरता निधी वाटपामध्ये खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत. तसेच विभागाने महाराष्ट्र शासनाने योजनेबाबत ठरवून दिलेल्या New Guidelines Year 2009-10मध्ये नमूद लेखाविषयक व योजनेच्या अंमलबजावणीविषयक मार्गदर्शक सूचनांचे अनुपालन केलेले नाही.

1.दि.31/03/2012 अखेरपर्यंत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे बँक खाते देना बँक, शाखा अमरावती येथे होते.दि.31/03/2012 अखेर सदरील खात्यामध्ये रु.6,70,50,912/- इतकी रक्कम शिल्लक असल्याचे बँक पासबूकावरून दिसून येते. दि.31/03/2012 पर्यंत वितरीत केलेले परंतु रोखीकृत न झालेल्या धनादेशाची यादी लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेली नाही.त्यामुळे दि.31/03/2012 अखेर शिल्लक रक्कम किती? याचा बोध होत नाही.

2.विभागाने सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये रद्द करून पुनर्वितरीत केलेल्या धनादेशाबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेले नाहीत.

3.शासनाने सन 2012-13 मध्ये योजनेसाठी देण्यात आलेल्या अनुदानाबाबत जमेची स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

4.योजनेबाबत स्वतंत्र रोखवही(cashbook) ठेवलेले नाही. महानगरपालिकेच्या सामान्य रोखवहीमध्ये नोंदी ठेवण्यात आलेल्या आहेत.

5.सन 2012-13 मध्ये कोणकोणत्या बचत गटाला फिरता निधी व बँकेने दिलेल्या कर्जावर दिलेले अनुदान वाटप केल्याबाबतची नोंदवही लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेली नाही.

6.सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा शिवाजीनगर, अमरावती यांनी कर्ज मंजूर केलेल्या पत्रावर दिनांक नमूद केलेला नाही.तसेच पत्रामध्ये खाडाखोड करण्यात आलेली आहे. सदर पत्रामध्ये खालील नावे नमूद आहेत.

| अ.क्र. | बचत गट / लाभार्थ्याचे नाव | कर्ज मंजूर रक्कम रु. |
|---|---|---|
| 1. | गोविन्द्प्रभू महिला बचत गट | 100000/- |
| 2. | शिल्प महिला बचत गट | 100000/- |
| 3. | चेतना महिला बचत गट | 100000/- |
| 4. | रमाबाई आंबेडकर महिला बचत गट | 100000/- |
| 5. | करुणा महिला बचत गट | 100000/- |
| 6. | श्री.गणेश रामराव पटके | 25000/- |

उपरोक्त नमूद पत्रावर जावक क्रमांक व तारीख नमूद नाही.तसेच पत्रावर काळ्या शाईने खाडाखोड करून उपरीलेखन केलेले आहे.सदर पत्राच्या सत्यतेबाबत खात्री पटवून देण्यात यावी.

7. उपरोक्त नमूद श्री.गणेश पटके यांना वैयक्तिक कर्जावर दिलेल्या अनुदानाबाबत त्यांचे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.त्यामुळे संबंधित अनुसूचित जातीचे लाभधारक आहेत याची खात्री करता आली नाही.

8.कॅनरा बँक, अमरावती शाखेने दि.30/03/2012 रोजी दिलेल्या पत्रानुसार खालील बचत गटाला कर्ज मंजूर करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | बचत गटाचे नाव | कर्ज मंजुरी रक्कम रु. |
|---|---|---|
| 1. | विघ्नेश्वर महिला बचत गट, सातुर्णा | 100000/- |
| 2. | एकता महिला बचत गट, सबनीस प्लॉट | 100000/- |
| 3. | गणेशकृपा महिला बचत गट, सातुर्णा | 200000/- |
| 4. | सावली महिला बचत गट, सरोज कॉलनी | 100000/- |
| 5. | साई महिला बचत गट, कल्याणनगर | 100000/- |
| 6. | महालक्ष्मी महिला बचत गट,कैलासनगर | 100000/- |

उपरोक्त बचत गटाला त्यांच्यासमोर नमूद केल्याप्रमाणे कर्ज वितरीत करण्यात आलेले आहे.परंतु सदरील

DRAFT

बचत गटाच्या बँक पासबुकाची तपासणी केली असता गट नियमितपणे चालू असल्याची खात्री पटत नाही.उदा. साईमहिला बचत गट यांनी दि.19/10/2010 नंतर नियमितपणे वर्गणी भरल्याचे बँक पासबुकवरून दिसून येत नाही.

9.श्री.विजय हिम्मतराव आठवले यांना लोडिंग ऑटो घेण्यासाठी देना बँकेकडून रु.200000/- कर्ज मंजूर केले होते.योजनेतून संबंधिताना रु.50000/- इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. लाभधारक हे अनुसूचित जातीचे असल्याचे नमूद केले आहे.परंतु त्यांचे जातीचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडलेले नाही.

10.श्री.नंदुजी साबुजी वानखडे यांना बँक ऑफ महाराष्ट्र,शाखा राजापेठ,अमरावती यांनी इलेक्ट्रिक प्लास्टिक गुडस च्या व्यवसायासाठी रु.200000/- चे कर्ज मंजूर करण्यात आले होते. संबंधिताना योजनेतून रु.50000/- इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. लाभधारक हे अनुसूचित जातीचे असल्याचे नमूद केले आहे. परंतु संबंधिताचा जातीचा दाखला प्रस्तावासोबत जोडलेला नाही.

11.प्रेरणा महिला बचत गट, बारीपुरा, बडनेरा यांना बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा बडनेरा शाखेमार्फत रु.18000/- इतका फिरता निधी वितरीत करण्यात आलेला आहे.संचिकेची तपासणी केली असता डिसेंबर-2010 नंतर नियमित वर्गणी भरलेली नाही. हे बँक पासबुकवरून स्पष्ट होते. बचत गट चालू असल्याची खात्री पटवून देण्यात यावी.

12.श्री.अजय मोतीराम वाळसे यांना किराणा मालाच्या दुकानासाठी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा अमरावती यांनी रु.17500/- चे वैयक्तिक कर्ज मंजूर केले असून संबंधितास 25% दराने रु.4375/- अनुदान देणे आवश्यक असताना विभागाने संबंधितास रु.6250/- इतके अनुदान वितरीत केले आहे.रु.1875/- अनुदान जादा वितरीत झाले असल्याची शंका आहे. खात्री करण्यात यावी.तसेच संबंधित लाभधारक हे अनुसुचीत जातीचे असल्याचे नमूद आहे.परंतु त्यांचे जातीचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडलेले नाही.

13.स्वामी समर्थ महिला बचत गट,रहाटगाव यांना बँक ऑफ इंडिया शाखा अमरावती यांनी रु.300000/- कर्ज मंजूर केलेले असून विभागाने रु.105000/-(35%)अनुदान दिलेले आहे.प्रस्तावाची तपासणी केली असता बचत गटातील सदस्यांनी 08/06/2010 रोजी सभासद वर्गणी भरलेली असून तद्नंतर तब्बल सात महिन्यानंतर दि.20/01/2011 रोजी वर्गणी भरली आहे. तसेच दि.15/09/2011 रोजी वर्गणी भरली व त्यानंतर तीन महिन्यानंतर दि.16/12/2011रोजी वर्गणी भरलेली आहे असे बँक पासबुकवरून दिसून येते.यावरून असे स्पष्ट होते कि,बचतगट चालू असल्याची खात्री करून देण्यात यावी.

14.शेख हरून शेख अनिस व अफजल खान साहेब खान यांना स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा अमरावती यांनी प्रत्येकी रु.28,500/- प्रमाणे वैयक्तिक कर्ज मंजूर केले होते विभागाने प्रत्येकी रु.7500/-(25%)प्रमाणे अनुदान वितरीत केलेले आहे.तरी अनुदान रु.7125/- प्रमाणे वितरीत करणे अपेक्षित होते.तरी 375*2= 750/-जादा प्रदान झाले आहेत खात्री करावी.

15.श्रीमती रेखा संजय रामटेके यांना स्टेट बँक इंडिया शाखा दस्तूरनगर यांनी रु.30000/- इतके वैयक्तिक कर्ज मंजूर केले असून सदरील लाभधारक ह्या अनुसूचित जातीच्या असून यांचे जातीचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडलेले नाही.

DRAFT

16.श्री.मुकुंदराव अवचीतराव देशमुख यांना फेब्रीकेशन व्यवसायासाठी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद,अमरावती यांनी रु.140000/-चे वैयक्तीक कर्ज मंजूर केले असून विभागाने बँक्स रु.50000/- अनुदान वितरीत केले आहे.25%रु.35000/-अनुदान वितरीत करणे आवश्यक असताना रु.15000/-जादा प्रदान झाले आहेत खात्री करण्यात यावी.

17.श्री.बन्सीलाल शिवमुरतलाल गुप्ता यांना होलसेल किराणा दुकानासाठी इंडीयन ओवरसीज बँक,दस्तूरनगर यांनी रु.140000/-इतके कर्ज मंजूर केले असून विभागाने रु.50000/-अनुदान वितरीत केले आहे.25%प्रमाणे रु.35000/-अनुदान वितरीत करणे आवश्यक असताना रु.15000/-जादा प्रदान झाले आहेत खात्री करण्यात यावी.

18.श्री.संतोष राजू कलाने यांना बँकेने रु.30000/- वैयक्तिक कर्ज मंजूर केले असून सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया यांनी रु.7500/- धनादेश परत दिला आहे.बँकेचे कर्ज मंजुरीचे पत्र लेखापरीक्षणास दर्शवावे.

19.श्री.दादाराव लक्ष्मणराव शिंतोळे यांना वाहन खरेदीसाठी विजया बँक शाखा जुना कॉटन मार्केट,अमरावती यांनी रु.175000/- चे वैयक्तिक कर्ज दिले असून विभागाने बँकला रु.43750/- अनुदान वितरीत केले आहे(25%) परंतु लाभधारकाच्या दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र क्र.26727 यादीतील क्र.2/191/26727 मध्ये श्री.दादाराव लक्ष्मण शिंतोडे असे नाव असल्याचे दिसून येते तसेच ड्रायव्हिंग लायसन्सवर देखील श्री.दादाराव लक्ष्मण शिंतोळे असे नाव दिसून येते.दोन्ही नावे एकच आहेत याबाबत खात्री पटवून देण्यात यावे.

20.श्रीमती बेबी विष्णू अंभोरे यांना व्यवसायासाठी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा अमरावती यांनी रु.50000/- चे कर्ज मंजूर केलेले आहे. लाभधारक अनुसूचित जातीचे असून संबंधीतांचे जातीचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले नाही.

| अ.क्र. | नाव | कर्ज | अनुदान |
|---|---|---|---|
| 1 | श्री.सय्यद हसन सै.छोटू | 50000/- | 12500/- |
| 2 | श्री.अलीऊर रेहमान हाफिज मो.इक्बाल | 50000/- | 12500/- |
| 3 | श्री.असीम जब्बारखान | 50000/- | 12500/- |
| 4 | श्री.बुश्रा अंजुम शे.इस्माईल | 50000/- | 12500/- |
| 5 | श्री.अमिनाखान पठाण | 50000/- | 12500/- |
| 6 | श्री.मोहन किसन खडसे | 50000/- | 12500/- |
| 7 | श्रीमती चंदा राकेश सोनटक्के | 50000/- | 12500/- |
| | एकूण | 350000/- | 87500/- |

उपरोक्त लाभधारकांना स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शाम चौक, अमरावती यांनी उपरोक्तप्रमाणे कर्ज मंजूर केलेले आहे.तसेच तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अनुदान वितरीत केले आहे.परंतु बँकेने कर्ज मंजूर केलेले पत्र लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेले नाही.

22.काजल महिला बचतगट यांना रु.10000/- इतका फिरता निधी मार्च-2013 मध्ये वितरीत करण्यात आलेला आहे. परंतु बचत गटाचे बँक ऑफ इंडिया, शाखा अमरावती येथील बँक पासबुकची तपासणी केली असता बचत गटाचे खाते दि.11/02/2011 रोजी उघडले असून एप्रिल,जून,सप्टेंबर,डिसेंबर-2011, जानेवारी-2012 ते नोव्हेंबर-2012 अशी एकूण 11 महिने बचत गटाची वर्गणी जमा केली नसल्याचे दिसून येते. बचत गट चालू

असल्याबाबत खात्री पटवून देण्यात यावी.

23.आधार महिला बचतगट विलासनगर यांना सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा नवीन कॉटन मार्केट,अमरावती यांनी रु.150000/- इतके कर्ज मंजूर केले असून विभागाने 35% दराने रु.52500/- अनुदान वितरीत केले आहे.गटाच्या बँक पासबुकाची तपासणी केली असता गटाने जून-2012 पासून वर्गणी भरली नाही. गट चालू असल्याबाबत खात्री पटवून देण्यात यावी.

24.नारीशक्ती महिला बचतगट, रमाबाई आंबेडकरनगर या गटाला सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा नवीन कॉटन मार्केट, अमरावती यांनी रु.150000/- इतके कर्ज दिले असून विभागाने 35% दराने रु. 52500/- इतके अनुदान वितरीत केले आहे. परंतु बँक पास्स्बूक्ची तपासणी केली असता वर्गणी नियमित जमा केलेली नाही. बचतगट चालू असल्याची खात्री पटवून देण्यात यावी.

25.दि.31/03/2013 रोजी बँक पासबुकनुसार शिल्लक रु.9,14,23,955/- असल्याचे दिसून येते. इतक्या मोठ्या प्रमाणात निधी शिल्लक असणे लोकहितास्तव योग्य नाही.तसेच सोबत दि.31/03/2013 रोजीची अरोखीकृत धनादेशाची यादी सोबत जोडलेली नाही.

26.दरमहा बँकेतील शिल्लक रकमेचा रोखवहीशी ताळमेळ घेवून महिनाखेर अरोखीकृत धनादेशाची यादी सोबत जोडलेली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना विभागास अर्धसमास पत्र क्र.143 दि.23/11/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 143)

## *111 नगररचना विभागाने सन 2009-10 ते 2012-13 मध्ये बांधकाम परवाना दिलेल्या बांधकामांना बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र न दिल्याबद्दल.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***अमरावती शहर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने सन 2009-10 ते 2012-13 या चार वर्षामध्ये एकूण 7942 बांधकाम परवाने देण्यात आलेले आहेत.परंतु या चार वर्षामध्ये एकूण फक्त 18 बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रे देण्यात आलेले आहेत. तसेच ज्यांनी बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.त्यांना तीन वर्षाच्या कालावधीनंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम -1949 चे कलम 150 अ व कलम 267 अन्वये मालमत्ता कर वसुलीबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.***



DRAFT

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे नगररचना विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना खालील आक्षेप आढळून आलेले आहेत.

1.नगररचना विभागाने Building Byelaws And Development Control Rules For Muncipal Corporation of THE City of Amarawati- 1986 चे उपनियम (5) व (6) अन्वये सन 2009-10 ते 2012-13 मध्ये खालीलप्रमाणे बांधकाम परवाने व बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रे देण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | परवाने देण्यात आलेले वर्ष | बांधकाम परवान्याची संख्या | बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आलेली संख्या |
|---|---|---|---|
| 1. | 2009-10 | 1903 | 09 |
| 2. | 2010-11 | 2219 | 03 |
| 3. | 2011-12 | 1955 | 03 |
| 4. | 2012-13 | 1865 | 03 |
| | एकूण = | 7942 | 18 |

2.उपरोक्त Development Control Rules- 1986 चे नियम 7.6 अन्वये चार वर्षात अतिशय नगण्य प्रमाणात बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रे देण्यात आलेले आहेत.

3.उपरोक्त विकास नियमान्वये बांधकाम परवाना हा परवान्याच्या तारखेपासून 03 (तीन) वर्षे वैध ठरतो. जर संबंधितानी विहित कालावधीत बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतले नाही तर महाराष्ट्र महानगरपालिका -1949 चे कलम 150 अ व कलम 267 अन्वये संबंधित मालमत्ता धारकांकडून कर वसूल करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे विभागाने कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यासाठी विभागाने कोणतेही विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येत नाहीत. त्याचप्रमाणे यापूर्वी देण्यात आलेल्या सर्व बांधकाम परवान्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त अनियमिततेबाबत नगररचना विभागास अर्धसमास पत्र क्र. 133 दि.09/11/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATVKGM7601 (Ref No : 133)

## *112 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये कार्यालयीन वापराकरिता लागणाऱ्या स्टेशनरी व संगणक साहित्य खरेदीतील अनियमिततेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2200910.00 /-

| |
|---|
| ***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेच्या भांडार विभागाने वेगवेगळ्या*** |

DRAFT

***विभागासाठी लागणारी स्टेशनरी व संगणक साहित्य खरेदी केले असून निविदा सूचनेची जाहिरात स्थानिक पातळीवरून प्रसिध्द होणाऱ्या वर्तमान पत्रामध्ये दिल्यामुळे जाहिरातीचा योग्य असा प्रचार, प्रसार झालेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला नाही. तसेच विभागाने निविदेचे दर स्वीकारतेवेळी बाजार भावाची खात्री केलेली नाही. निविदा प्रसिध्द केल्यानंतर किमान 21 दिवस निविदा भरण्यासाठी देणे आवश्यक असताना ते दिलेले नाहीत. सदरील साहित्य खरेदी करताना त्याबाबत शासनाचे दरकरार उपलब्ध आहेत किंवा नाहीत याबाबत खात्री केलेली नाही.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे भांडार विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने सर्व विभागासाठी वर्षभर लागणारे स्टेशनरी व संगणक साहित्य खरेदीमध्ये खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1.भांडार विभागाने महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयास मिळून लागणारी वार्षिक स्टेशनरीची किंमत अंदाजे रु.6,85,500/- इतकी असल्याचे संचिकेचे पृष्ठ क्र.05 वर नमूद केलेले आहे व त्या खर्चास मा. आयुक्त, मनपा अमरावती यांची मान्यता घेतलेली आहे. मात्र महानगरपालिकेच्या वार्षिक लेख्यामध्ये सदरील बाबीवर एकूण रू. 22,00,910/- इतकी रक्कम खर्च झालेली आहे. सदरील रकमेस सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेतलेली दिसून येत नाही. तसेच प्रत्येक विभागासाठी लागणारा अंदाजे वार्षिक खर्च टिप्पणीमध्ये नमूद केलेला नाही.त्यामुळे विभागनिहाय एकूण खर्च किती ? याचा बोध होत नाही.

2.सदर खरेदीबाबतची निविदा सूचना 'अमरावती मेल' या स्थानिक वर्तमानपत्रातून दि.17/01/2013 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.त्यामध्ये खालील निविदाधाकांनी भाग घेतलेला आहे.

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| 1. | एम.एस.आय.डी.सी. | अमरावती |
| 2. | अलिशा मार्केटिंग | अमरावती |
| 3. | सोमाणी रुलिंग & बाईंडींग | अमरावती |
| 4. | वनश्री मार्केटिंग | अमरावती |
| 5. | ओम इलेक्ट्रिकल & जनरल स्टोअर्स | अमरावती |

यावरून असे सिद्ध होते की,स्थानिक पातळीवरून प्रसिध्द होणाऱ्या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिल्यामुळे निविदा सूचनेचा योग्य असा प्रचार,प्रसार झालेला नाही.त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला नाही.यामुळे महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस/1088/(2512)/उद्योग-6, मंत्रालय, मुंबई-32 दि.02, जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 चा भंग झालेला आहे.

3.उपरोक्त निविदा सूचनेमध्ये कोरी निविदा फॉर्म विक्रीचा कालावधी दि.17/01/2013 ते दि.21/01/2013 असा एकूण फक्त 05 (पाच) दिवस दिल्याचे दिसून येते. तसेच निविदा स्वीकृतीची तारीख दि.17/01/2013 ते

DRAFT

दि.28/01/2013 अशी एकूण बारा दिवस असल्याचे दिसून येते. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयात नमूद असलेली किमान तीन आठवड्याची मुदत देण्याबाबतच्या अटीचा भंग झालेला आहे.त्यामुळेदेखील निविदेस अल्प प्रतिसाद मिळालेला आहे.

4. उपरोक्त शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सदरील साहित्य खरेदी करताना वस्तूच्या किंमतीबाबत शासनाचा दरकरार उपलब्ध आहे किंवा नाही? याची खात्री केल्याबाबत कोणताही अभिप्राय टिप्पणीमध्ये नमूद केलेला नाही. याचाच अर्थ असा की, विभागाने शासनाच्या दरकराराची खात्री केलेली नाही.

5.उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागाने सदरील साहित्याचे निविदा धारकाने निविदेमध्ये नमूद केलेले दर व प्रत्यक्ष बाजारातील दर याबाबत खात्री केलेली नाही. याबाबत कोणताही तपशील टिप्पणीमध्ये नमूद केलेला नाही.त्यामुळे निविदा धारकाने दिलेले वस्तूचे दर बाजारभावाप्रमाणे योग्य असल्याची खात्री पटत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत नगररचना विभागास अर्धसमास पत्र क्र. 132 दि.09/11/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 132)

### *113 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अग्निशामक विभागास लागणारे साहित्य खरेदीतील अनियमिततेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 189600.00 /-

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेच्या भांडार विभागाने अग्निशामक विभागासाठी वेगवेगळे साहित्य खरेदी करताना त्रयस्थ संस्थेकडून वस्तूची गुणवत्ता तपासणी करून घेतलेली नाही. विभागाची मागणी नस्तीसोबत जोडलेली नाही. वस्तू खरेदीच्या निविदा स्वीकारताना प्रत्यक्ष बाजारभावाची खात्री केलेली नाही.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे भांडार विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने अग्निशामक साहित्य खरेदीमध्ये खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1.अग्निशमन विभागासाठी सन 2012-13 मध्ये 1) AFFF फोम -250 लिटर 2)Machanical फोम -250 लिटर 3) 24 जोडी मेल –फिमेल कपलिंग इ. साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे. परंतु

अग्निशमन विभागाने सदरील साहित्याची मागणी केल्याचे दस्तऐवज नस्तीसोबत जोडलेले नाहीत.त्यामुळे

विभागाने साहित्याची मागणी केल्याची खात्री पटत नाही.

2.सदरील खरेदीचा आदेश श्रीराम Agro एजन्सी, मोर्शी यांचे दर कमी असल्यामुळे त्यांना देण्यात आलेला आहे. परंतु त्यांच्यासोबत करारनाम्याच्या दिनांकापासून वर्षभर साहित्य पुरवठा करण्याच्या करारनाम्यावर तारीख नमूद केलेली नाही. त्यामुळे करारनामा कधी केला? याचा बोध होत नाही.

3. श्रीराम Agro एजन्सी, मोर्शी यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशावर तारीख नमूद नाही. त्यामुळे आदेश केव्हा दिला व मालाच पुरवठा केव्हा करण्यात आला? याचा बोध होत नाही. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस/1088/(2512)/उद्योग-6, मंत्रालय, मुंबई-32 दि.02, जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 8.6 अन्वये माल पुरवठा केल्याच्या डिलिवरी चालान सोबत जोडलेल्या नाहीत.

4. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस/1088/(2512)/उद्योग-6 मंत्रालय, मुंबई-32 दि.02, जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.8.4 अन्वये वस्तूच्या गुणवत्ता तपासणीबाबत त्रयस्थ संस्थेचा अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे मागणी केलेल्या गुणवत्तेप्रमाणे वस्तूंचा पुरवठा केल्याची खात्री पटत नाही.

5. उपरोक्त शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सदरील साहित्य खरेदी करताना वस्तूच्या किंमतीबाबत शासनाचा दरकरार उपलब्ध आहे किंवा नाही? याची खात्री केल्याबाबत कोणताही अभिप्राय टिप्पणीमध्ये नमूद केलेला नाही. याचाच अर्थ असा की, विभागाने शासनाच्या दरकराराची खात्री केलेली नाही.

6.उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागाने सदरील साहित्याचे निविदा धारकाने निविदेमध्ये नमूद केलेले दर व प्रत्यक्ष बाजारातील दर याबाबत खात्री केलेली नाही. याबाबत कोणताही तपशील टिप्पणीमध्ये नमूद केलेला नाही.त्यामुळे निविदा धारकाने दिलेले वस्तूचे दर बाजारभावाप्रमाणे योग्य असल्याची खात्री पटत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत नगररचना विभागास अर्धसमास पत्र क्र. 131 दि.09/11/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 131)

DRAFT

## *114 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आरोग्य, शिक्षण,अग्निशामक व इतर विभागास लागणारे वेगवेगळ्या साहित्य खरेदीतील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 886060.00 /-

| |
|---|
| ***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेच्या भांडार विभागाने आरोग्य,*** |

***शिक्षण,अग्निशमन व इतर विभागासाठी लागणारे वेगवेगळे साहित्य खरेदी करताना निविदेची जाहिरात स्थानिक पातळीवरून प्रसिध्द होणाऱ्या वर्तमानपत्रातून दिल्यामुळे निविदेस योग्य प्रचार व प्रसार मिळालेला नाही. त्रयस्थ संस्थेकडून वस्तूची गुणवत्ता तपासणी करून घेतलेली नाही. आरोग्य विभाग वगळता इतर विभागाने वस्तूची मागणी केल्याचे दस्तऐवज नस्तीसोबत जोडलेले नाहीत. वस्तू खरेदीच्या निविदा स्वीकारताना प्रत्यक्ष बाजारभावाची खात्री केलेली नाही.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे भांडार विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने आरोग्य, शिक्षण, अग्निशमन व इतर विभागास लागणाऱ्या साहित्य खरेदीमध्ये खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1.भांडार विभागाने सदरील खरेदीबाबत दि.06/11/2012 रोजी अमरावती येथून प्रसिध्द होणारे सांध्य. दैनिक 'इनसाइट' या वर्तमानपत्रामध्ये अल्प मुदतीची निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु सदरील दैनिक हे स्थानिक पातळीवरून प्रसिध्द होणारे व कमी खपाचे असल्यामुळे निविदेचा योग्य तो प्रचार व प्रसार झालेला नसून महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस/1088/(2512)/उद्योग-6 मंत्रालय, मुंबई-32 दि.02, जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.10.8 चा भंग झालेला आहे.

2.संचिकेत नमूद केल्याप्रमाणे आरोग्य विभाग वगळता इतर विभागाने साहित्याची मागणी केलेली दिसून येत नाही. मागणीपत्र नसताना साहित्याची खरेदी केलेली आहे.

4. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस/1088/(2512)/उद्योग-6 मंत्रालय, मुंबई-32 दि.02, जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.8.4 अन्वये वस्तूच्या गुणवत्ता तपासणीबाबत त्रयस्थ संस्थेचा अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे मागणी केलेल्या गुणवत्तेप्रमाणे वस्तूंचा पुरवठा केल्याची खात्री पटत नाही.

5. उपरोक्त शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सदरील साहित्य खरेदी करताना वस्तूच्या किंमतीबाबत शासनाचा दरकरार उपलब्ध आहे किंवा नाही? याची खात्री केल्याबाबत कोणताही अभिप्राय टिप्पणीमध्ये नमूद केलेला नाही. याचाच अर्थ असा की, विभागाने शासनाच्या दरकराराची खात्री केलेली नाही.

6.उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागाने सदरील साहित्याचे निविदा धारकाने निविदेमध्ये नमूद केलेले दर व प्रत्यक्ष बाजारातील दर याबाबत खात्री केलेली नाही. याबाबत कोणताही तपशील टिप्पणीमध्ये नमूद केलेला नाही.त्यामुळे निविदा धारकाने दिलेले वस्तूचे दर बाजारभावाप्रमाणे योग्य असल्याची खात्री पटत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत नगररचना विभागास अर्धसमास पत्र क्र. 130 दि.09/11/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 130)

DRAFT

## *115 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये कार्यालयीन वापराकरिता लागणारे रजिस्टर,फॉर्म,पुस्तके व इतर साहित्याच्या छपाईतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1304130.00 /-

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेच्या भांडार विभागाने कार्यालयीन वापराकरिता लागणाऱ्या रजिस्टर,फॉर्म, पुस्तके व इतर साहित्याची छपाई करण्यासाठी स्थानिक पातळीवरून प्रसिध्द होणाऱ्या वर्तमानपत्रामध्ये निविदा सूचना दिल्यामुळे निविदेचा योग्य असा प्रचार,प्रसार झालेला नाही.त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला नाही. सदर साहित्य शासकीय मुद्रणालयातून छपाई करून मिळते किंवा नाही? याबाबत खात्री केलेली नाही. निविदेचे दर स्वीकारताना प्रत्यक्ष बाजारभावाची खात्री कलेली नाही.***

DRAFT

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे भांडार विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने वेगवेगळ्या विभागासाठी रजिस्टर, फॉर्म, पुस्तके व इतर साहित्य रू.1304130/- किंमतीची छपाई करून घेतलेली आहे. त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1.भांडार विभागाने सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये रू.1304130/- चे नमुने व इतर साहित्य छपाईसाठी दोन वेळेस वर्तमानपत्रामध्ये निविदा सूचना प्रसिध्द केली होती. परंतु त्याला पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे तिसऱ्यांदा निविदा प्रकिया राबविल्याचे संचिकेतील पृष्ठ क्र.04,05,व 06 वर नमूद केले आहे. परंतु टिप्पणीमध्ये वर्तमानपत्राचे नाव व इतर मजकूर नमूद केलेला नाही. तसेच वर्तमानपत्राच्या प्रती संचिकेस जोडलेल्या नाहीत.

2.भांडार विभागाने नमुने छपाईबाबत दि.07/10/2012 रोजी अमरावती येथून प्रसिध्द होणारे 'अमरावती मेल ' या वर्तमानपत्रामध्ये निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु सदरील वर्तमानपत्र हे स्थानिक पातळीवरून प्रसिध्द होणारे व कमी खपाचे असल्यामुळे निविदेचा योग्य तो प्रचार व प्रसार झालेला नसून महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस/1088/(2512)/उद्योग-6 मंत्रालय, मुंबई-32 दि.02, जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.10.8 चा भंग झालेला आहे.सदरील छपाईचे काम वार्षिक दरकरार करून खालील मुद्रणालयास देण्यात आले होते.

| अ. क्र. | मुद्रणालयाचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| 1. | सोमाणी रुलिंग & बाईंडींग | अमरावती |

| | | |
|---|---|---|
| 2. | सुवर्ण मुद्रणालय | अमरावती |
| 3. | सुबोध मुद्रण | अमरावती |

उपरोक्त मुद्रणालयाने निविदा प्रकीयेमध्ये भाग घेतला होता. सदरील सर्व छापखाने अमरावती शहरातील आहेत.यावरून असे सिद्ध होते की,निविदेचा प्रचार, प्रसार मर्यादित झालेला आहे.

3.सदरील छपाईबाबत उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्र.3 मधील तरतुदीनुसार शासकीय मुद्रणालयामध्ये सदरील साहित्य छापून मिळते किंवा नाही? याची खात्री विभागाने केलेली नाही. हे संचिकेवरून स्पष्ट होते.

4.उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागाने सदरील साहित्याचे निविदा धारकाने निविदेमध्ये नमूद केलेले दर व प्रत्यक्ष बाजारातील दर याबाबत खात्री केलेली नाही. याबाबत कोणताही तपशील टिप्पणीमध्ये नमूद केलेला नाही.त्यामुळे निविदा धारकाने दिलेले वस्तूचे दर बाजार दरापेक्षा कमी असल्याची खात्री पटत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत नगररचना विभागास अर्धसमास पत्र क्र. 128 दि.09/11/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 128)

## *116 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आरोग्य (स्वच्छता)विभागास लागणारी जंतुनाशक औषधे खरेदीतील अनियमिततेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 09**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3240790.00 /-

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेच्या भांडार विभागाने स्वच्छता विभागासाठी जंतुनाशक औषधे खरेदी करताना निविदेची जाहिरात स्थानिक पातळीवरून प्रसिध्द होणाऱ्या वर्तमानपत्रात दिल्यामुळे निविदेचा योग्य प्रचार, प्रसार झालेला नाही.त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला नाही. स्थायी समितीने रू20 लक्षच्या खरेदीस मान्यता दिलेली असून विभागाने रू3240790/- इतक्या रकमेच्या जंतुनाशक औषधांची खरेदी केलेली आहे. निविदा स्वीकारताना प्रत्यक्ष बाजारभावाची खात्री केलेली नाही. वस्तूच्या गुणवत्तेची तपासणी त्रयस्थ संस्थेकडून करण्यात आलेली नाही.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे भांडार विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने स्वच्छता विभागासाठी खरेदी केलेल्या जंतुनाशक औषधे खरेदीमध्ये खालील अनियमितता



DRAFT

आढळून आलेल्या आहेत.

1.भांडार विभागाने जंतुनाशक औषधे खरेदीबाबत दि.08/06/2012 रोजी अमरावती येथून प्रसिध्द होणारे सांध्य. 'दैनिक प्रदर्शन' या वर्तमानपत्रामध्ये निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु सदरील वर्तमानपत्र हे स्थानिक पातळीवरून प्रसिध्द होणारे व कमी खपाचे असल्यामुळे निविदेचा योग्य तो प्रचार व प्रसार झालेला नसून महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस/1088/(2512)/उद्योग-6 मंत्रालय, मुंबई-32 दि.02, जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.10.8 चा भंग झालेला आहे.

2.जाहिरातीमध्ये प्रसिध्द केल्याप्रमाणे निविदा फॉर्म विक्रीचा कालावधी दि.15/06/2012 असा एकच दिवस ठेवण्यात आलेला आहे व निविदा स्वीकारण्याचा कालावधी दि.15/06/2012 ते दि.21/06/2012 असा एकूण 07 दिवस विहित करण्यात आला होता.त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेला निविदा भरण्याचा किमान तीन आठवड्याचा कालावधी देण्यात आलेला नाही. त्यामुळेदेखील महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला नाही.

3.औषधी मागणी यादी विहित नमुन्यात व सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली नसून त्यावर विभाग प्रमुखाचा शिक्का व स्वाक्षरी नाही.

4.स्वच्छता विभागाने सन 2012-13 या आर्थिक वर्षासाठी रु.20.00 लक्षच्या जंतुनाशक औषधी खरेदीस दि.03/08/2012 रोजी संपन्न झालेल्या स्थायी सभेत मंजुरी घेऊन पुरवठाधारकांशी करारनामे करण्यास मंजुरात घेतलेली आहे.परंतु सदरील बाबीवर एकूण वार्षिक खर्च रु.3240790/- इतका करण्यात आलेला आहे. हे महानगरपालिकेच्या सन 2012-13 च्या मंजूर झालेल्या वार्षिक लेख्यावरून दिसून येते. विभागाने रु.1240790/- ह्या रकमेस स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता न घेताच खर्च केलेला आहे.

5.सदरील औषधी खरेदीसाठी 1) रमेश ॲग्रोकेम कार्पोरेशन 2)डॉल्फिन सेल्स कार्पोरेशन 3) श्रीराम ॲग्रो एजन्सीज,मोर्शी यांच्या कमी दराच्या वस्तुनुसार करारनामे करण्यात आलेले आहेत. परंतु यांपैकी डॉल्फिन सेल्स कार्पोरेशनचा जंतुनाशके विक्रीचा परवाना मुदतबाह्य झाल्याचे उपलब्ध दस्तऐवजावरून दिसून येते. सदर परवान्याची तारीख दि.22/05/2010 ते दि.21/05/2012 पर्यंतच वैध होती.विभागाने निविदा प्रसिध्द केलेल्या दि.08/06/2012 रोजी सदर परवाना अवैध ठरतो. विभागाने त्याबाबत योग्य ती खात्री केलेली नाही.

6. उपरोक्त शासन निर्णयाचे परिच्छेद 8.4 अन्वये खरेदी केलेल्या औषधाची गुणवत्ता तपासणी त्रयस्थ संस्थेकडून करण्यात आलेली नाही.

7.उपरोक्त शासन निर्णयामधील परिच्छेद 8.6 अन्वये मागणी केलेल्या औषधीचा पुरवठा पुरवठादार संस्थेने विहित वेळेत केल्याबद्दलच्या डिलिव्हरी चलान संचिकेसोबत जोडलेल्या नाहीत.

8. उपरोक्त शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सदरील साहित्य खरेदी करताना वस्तूच्या किंमतीबाबत शासनाचा दरकरार उपलब्ध आहे किंवा नाही? याची खात्री केल्याबाबत कोणताही अभिप्राय टिप्पणीमध्ये नमूद केलेला नाही. याचाच अर्थ असा की, विभागाने शासनाच्या दरकराराची खात्री केलेली नाही.

9.उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागाने सदरील साहित्याचे निविदा धारकाने निविदेमध्ये

DRAFT

नमूद केलेले दर व प्रत्यक्ष बाजारातील दर याबाबत खात्री केलेली नाही. याबाबत कोणताही तपशील टिप्पणीमध्ये नमूद केलेला नाही.त्यामुळे निविदा धारकाने वस्तूचे दर बाजारभावाप्रमाणे योग्य असल्याची खात्री पटत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत नगररचना विभागास अर्धसमास पत्र क्र. 127 दि.09/11/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 127)

## *119 स.न.2012-13 च्या मंजूर अर्थसंकल्पाबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : लेखा 00 निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***म.न.पा.अमरावतीद्वारे स.न.2012-13 करिता तयार करण्यात आलेले अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक वस्तुस्थितीवर आधारित नसल्याचे आढळून आले आहे.***

अमरावती म.न.पा.चे स.न.2012 -2013 याआर्थिक वर्षाचे मूळ अंदाजपत्रक व स.न.2011-2012 या वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95,96 (अ.ब.क.)100 ,101 प्रमाणे तयार करून प्रशासकीय ठराव क्र.2 दि.28/03/2012 अन्व्ये मंजूर करण्यात आलेले आहे. तसेच 2012-13 या आर्थिक वर्षाचे सुधारित व स.न.2013-14 या आर्थिक वर्षाचे मूळ अंदाजपत्रक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95,96 (अ.ब.क.)100 ,101 प्रमाणे तयार करून प्रशासकीय ठराव क्र.2 दि19./03/2012 अन्व्ये मंजूर करण्यात आलेले आहे

अमरावती म.न.पा.चे स.न.2012-2013 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षनामधे सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले मूळ व सुधारित अर्थ संकल्प अवलोकन केले असता स.न.2012 -2013 मधील अर्थसंकल्पीय जमा व खर्च खालील प्रमाणे आढळून आले आहे

**स.न.2012 -2013प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाज (महसुली जमा)**

(रक्कम रु.कोटी मध्ये )

| अ.क्र. | मूळ अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष जमा |
|---|---|---|---|
| 1 | 260.70 | 176.32 | 114.39 |

**स.न.2012 -2013प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाज (भांडवली जमा)**

(रक्कम रु.कोटी मध्ये )

| अ.क्र. | मूळ अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष जमा |
|---|---|---|---|
| 1 | 186.06 | 207.61 | 135.59 |

**स.न.2012 -2013प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाज (महसुली खर्च)**

(रक्कम रु.कोटी मध्ये )

| अ.क्र. | मूळ अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 262.06 | 145.47 | 129.00 |

**स.न.2012 -2013प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाज (भांडवली खर्च)**

(रक्कम रु.कोटी मध्ये )

| अ.क्र. | मूळ अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 135.60 | 178.21 | 57.61 |

उपरोक्त तपशील पाहता , अर्थसंकल्प विभागाने व संबधित प्राधिकरणाने अपेक्षित जमा व त्यावर आधारित खर्च याबाबत वास्तविकता व अचूकता यांचीं पडताळणी करून अंदाजपत्रक तयार करण्याची योग्य ती दक्षता घेतलेली नाही.यामुळे अर्थसंकलपात अपेक्षित जमा व खर्च रक्कम यांचे आकडेवारीत मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचे दिसून येते .वास्तविकता महाराष्ट्र नगर पालिका लेखासाहिता 1971 चे नियम 26 नुसार व स्थायी निर्देश ,परिपत्रक क्र.-न.पु.सु.00/प्र24/200/1 दि.13/10/2000 नुसार जमा व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यपद्धती विशद केलेली आहे त्यानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही .

तरी अर्थसंकल्पबाबत म.न.पा.ने शासन निर्देशानुसार विहित केल्या कार्यपद्धतीचा अवलंब करून वास्तवावर आधारित अर्थसंकल्प तयार करून मंजूर तरतुदीच्या मर्यादेतच खर्च करणे आवश्यक आहे उपरोक्त अभिप्रायानुसार अनुपालन दर्शविण्यात यावे .

DATVKGM7601 (Ref No : 82)

## *120 घसारा निधी मध्ये अंशदान जमा न करणे बाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***म.न.पा.द्वारे घसारा निधी निर्माण करण्यात आला आहे परंतु त्याबाबत कोणतेही धोरण /नियमावली निश्चित नसून अंशदानाची रक्कम जमा केलेली नाही.***

अमरावती म.न.पा.चे स.न.2012-13 अंदाजपत्रक,स.न.2012-13 चे जमा व खर्च प्रत्यक्ष रकमा विवरण प्रपत्र पडताळणी केली असता (फ)संकीर्ण या सदराखाली घसारा निधी लेखाशीर्ष क्र.259 अंतर्गत रु.200000/-ची तरतूद केल्याचे आढळून येत आहे,परंतु प्रत्यक्ष खर्च निरंक असल्याचे आढळून येत आहे.
याबाबत अभिप्राय खालील प्रमाणे आहेत .
1)महानगरपालिकेने त्यांच्या चल-अचल मालमत्तेचे नुतनीकरण करणे इ. उद्देशाने सदरील निधीची सस्थापना केलेली असली तरी स.न.2012-13 या आर्थिक वर्षात कोणतेही अंशदान जमा केले नाही.सदर बाबी संधर्भाने म.न.पा.ने लेखा शीर्ष क्र.259 मध्ये रु.200000/-ची तरतूद केल्याचे आढळून येत आहे परंतु घसारा निधी अंतर्गत खात्यामध्ये गुंतवणूक निरंक आहे सदरील बाब वित्तीय औचित्याला अनुसरून नाही.
2)महानगरपालिकेने तात्पुरती अर्थसंकल्पीय तरतूद करताना अंशदान रक्कम जमा करण्यासाठी क नियमावली निश्चित करून सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेणे आवश्यक आहे, परंतु कोणतीही नियमावली निश्चित न करता मोघम पणे तरतूद केल्याचे व व ती तरतूद त्याच प्रयोजनावर खर्च न करता नियमबाह्यपणे इतरत्र वळविल्याची अनियमितता झाली आहे .
3) उपलब्ध अभिलेखावरून स.न.2007-08पासून सदरील निधी मध्ये अंशदान जमा केले नसल्याचे आढळून येत आहे
4)घसारा निधी रोखवही परिरक्षित करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कारवाही झालेली नाही.
सबब ,घसारा निधी निर्माण करण्याचा कोणताही उद्देश /फलश्रुती आर्थिक वर्षाआखेर झालेली नाही यावर सत्वर उचित कारवाही होणे अपेक्षित आहे

DATVKGM7601 (Ref No : 108)

## *121 अधिकारी व कर्मचारी यांचेकडून तारण पत्र न घेणे व नोंदवही परिरक्षित नसनेबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***नियमानुसार आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांचेकडून तारणपत्र व दरवर्षी त्यांचे जामीनदार हयात व***

DRAFT

***लायक असल्याचे दाखले प्राप्त नसणे,तसेच सदर तारण पत्र व दाखले यांची नोंद विहित नमुन्यातील नोंदवही परिरक्षित न केल्याने ,तशा नोंदी न घेण्याची अनियमितता झालेली आहे.***

स.न.2012-13 करिता अभिलेखे पडताळणी केली असता म.न.पा.ने त्यांच्या आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी /कर्मचारी यांचेकडून तारण पत्र घेतल्याचे आढळून आले नाही, महाराष्ट्र नगर परिषद लेख सहिता 1971 चे कलम 138 नुसार कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचेकडून तारण पत्र घेणे आवश्यक आहे मात्र नियामोचीत कारवाही झालेली नाही तसेच उपरोक्त नियमानुसार नमुना क्रमांक 106 मध्ये संबधित अधिकारी व कर्मचारी यांचेकडून प्राप्त करून घ्यावयाच्या तारण पत्राची नोंद घेणे आवश्यक आहे.मात्र म.न.पा.ने तारणपत्रेच प्राप्त करून घेतली नसल्याने नोंदवही परिरक्षित केलेली नाही सदर बाब नियमबाह्य आहे.

महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दिनांक- 16 जुलै 1992 चे भाग 1 (अ)नुसार तारण पत्र देण्यास लायक असलेल्या अधिकारी किवा कर्मचारी याचेकडून दरवर्षी दिनांक 31 डिसेंबर पूर्वी ते व त्यांचे जामीनदार हे लायक व हयात असल्याचे असल्याचे दाखले प्राप्त करून घेणे आवश्यक आहे ,तथापि म.न.पा.ने नियमोचीत कार्यवाही केलेली नाही.

तरी उपरोक्त निर्देशानुसार आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांचेकडून तारण पत्रे प्राप्त करून घेऊन विहित नमुन्यातील नोंदवहीत योग्य त्या नोंदी घेवून दरवर्षी दिनांक 31 डिसेंबर पूर्वी हे अधिकारी व कर्मचारी व त्यांचे जामीनदार लायक व हयात असल्याचे दाखले प्राप्त करून अनुपालन कमी दर्शवावे व तारण पत्रे वेळीच घेण्यात येतील याची योग्य दक्षता घेण्यात यावी.

DATVKGM7601 (Ref No : 173)

### *126 लेखा विभागातील रोख पुस्तकातील अनियमितता.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष :00 शासन/मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***अमरावती महानगरपालिकेत रोख पुस्तकात जमा बाजूस सुरुवातीची शिल्लक, त्या दिवसातील जमा व एकूण जमा तसेच खर्च बाजूस मागिल एकूण खर्च,दिवसातील एकूण शिल्लक व एकूण खर्च अशा समतोलीत रोख पुस्तक रोज बंद करणे आवशक आहे.परंतु संपूर्ण वर्षात असे कुठेच दिसून येत नाही.त्यामुळे एकूण जमा व एकूण खर्च व शिल्लक समजून येत नाही.वर्ष अखेरीस देखील असे करण्यात आले नाही त्यामुळे वर्ष अखेर आर्थिक स्थिती समजून येत नाही.बँक स्क्रोल व रोख पुस्तक यांचा ताळमेळ घेतल्याचे दिसून येत नाही.***

DRAFT

अमरावती महानगर पालिकेचे सन 2012-13 चे लेखा परीक्षणात लेखा शाखेतील रोख पुस्तकाचे तपासणी वेळी अनियमितता निदर्शनास आल्या त्या खालीलप्रमाणे

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा सहिता 1971 मधील नियम 51(1)नुसार प्रत्येक महिन्याच्या शेवटी सर्वसाधारण रोखवहीत जमा व खर्च रक्कमाची जुळवणी करून तशी नोंद रोखवहीत नोंदवून

1.रोख पुस्तक अत्यंत त्रोटक स्वरुपात लिहिण्यात येते त्यामुळे भविष्यात एखाद्या बाबीचा उलगडा होणे कठीण होऊ शकते.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा सहिता 1971 मधील नियम 51(1)नुसार रोख पुस्तकात जमा बाजूस सुरुवातीची शिल्लक, त्या दिवसातील जमा व एकूण जमा तसेच खर्च बाजूस मागिल एकूण खर्च,दिवसातील एकूण शिल्लक व एकूण खर्च अशा समतोलीत करून रोख पुस्तक रोज बंद करणे आवशक आहे.परंतु संपूर्ण वर्षात असे कुठेच दिसून येत नाही.त्यामुळे एकूण जमा व एकूण खर्च व शिल्लक समजून येत नाही. तसेच रोख पुस्तक समतोलीत करून प्राधिकृत अधिकार्याने स्वाक्षांकित करणे आवश्यक आहे परंतु सदरील बाबीकडे दुर्लक्ष्य झाले आहे हि अतिशय गंभीर बाब आहे. मुख्य लेखाधिकारी यांच्या रोखवहीत दोन्ही बाजूस रोज स्वाक्षरी असणे आवशक आहे.पण असे दिसून आले नाही

3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा सहिता 1971 मधील नियम 51(3)नुसार रोख पुस्तकात महिनाअखेरीस जमा खर्च जुळणी करणे आवश्यक आहे परंतु त्याप्रमाणे कोणतीही कारवाही झालेली नाही. नाही त्यामुळे वर्ष अखेर आर्थिक स्थिती समजून येत नाही.

4.बँक स्क्रोल व रोख पुस्तक यांचा ताळमेळ घेतल्याचे दिसून येत नाही.

5..मार्च अखेरची जमा बेरीज न दर्शविता वर्ष अखेर ची शिल्लक जमा दर्शविली आहे.

उपरोक्त प्रमाणे लेखाविभागाद्वारे परिरक्षित केलेली रोखवही नियमाप्रमाणे नोंदवली जात नाही ,यावर विभाग प्रमुखाचे नियंत्रण नसणे हि गंभीर बाब असून याकडे प्रशासनाचे लक्ष्य वेधण्यात येत आहे.

DATVKGM7601 (Ref No : 86)

## *128 स.न.2012-13 चे मत्ता-दायित्व,आर्थिक स्थिती व वार्षिक लेख्याबाबत अभिप्राय*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 00**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मत्तेपेक्षा दायीत्वाचे मोठ्या प्रमाणावर अधिक्य असणे, उत्पन्न व खर्च बाबतीत योग्य नियोजन नसणे,आर्थिक स्थिती समाधान कारक नसणे, निरंतर वाढते दायित्व असणे.***

DRAFT

महानगरपालिका अमरावती चे स.न. 2012-13 या आर्थिक वर्षाचे उपलब्ध करून दिलेले अहवालासोबत जोडलेले विवरण पत्र 1 ते 8 ची पडताळणी केली असता खालील बाबी आढळून आल्या आहेत,विवरण पत्र क्र.1(क)-महानगरपालिकेचे लेखापरीक्षण वर्ष अखेर मत्ता व दायित्व विवरणपत्र नुसार ....

एकूण मत्ता---------------------------------------------------------------------797085093/- रुपये

एकूण दायित्व--- ----------------------------------------------------------------2380078332/- रुपये

दायित्वाचे मत्तेपेक्षा अधिक्य...-----------------------------------------------1582993239/- रुपये

उपरोक्त विवरनानुसार महानगरपालिकेच्या मत्तेपेक्षा दायित्व प्रचंड मोठ्या प्रमाणावर अधिक असल्याचे दिसून येत आहे हि अतिशय गंभीर बाब आहे. ठेवी विवरण पत्र क्र.६ ब नुसार म.न.पा.कडे लेखापरीक्षण वर्ष अखेर एकूण 167.21 लक्ष्य रुपयेच्या अनामत रक्कमा/ठेवी जमा असल्याने दायीत्वामध्ये तेवढ्या रक्कमेची भर पडणार आहे.

महानगरपालिकेने पुरविलेल्या विवरणपत्र क्र 1(क)नुसार खालील प्रमाणे अटळ दयीत्वे असल्याचे दिसून येते

| अ.क्र. | दायित्व प्रकार | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | कार्यालय/शिक्षक वेतन | 69314353 |
| 2 | सेवानिवृत्ती उपदान | 5412012 |
| 3 | सेवानिवृत्ती विक्री | 24491967 |
| 4 | दैनदिन साफसफाई | 12500000 |
| 5 | पाणीपुरवठा देयके | 14000000 |
| 6 | विद्युत देयके | 26000000 |
| 7 | पेट्रोल डीझेल | 100000 |
| 8 | उद्यान निगा राखणे | 200000 |
| 9 | पुरवठा /ठेकेदार देयके | 167500000 |
| 10 | इतर किरकोळ देयके | 9500000 |
| 11 | नवाथे पूल | 3000000 |
| 12 | कर्मचारी निवृत्ती वेतन अंशदान | 25000000 |
| 13 | सहावा वेतन /महागाई भत्ता थकबाकी | 260000000 |
| 14 | भूसंपादन | 81500000 |
| 15 | पाणी पुरवठा निर्भय योजना | 475000000 |
| 16 | पाणी पुरवठा टप्पा क्र.2 | 286600000 |
| 17 | अकोली वळण भूसंपादन U.I.D.स.S.M. | 200000000 |
| 18 | U.I.D.S.S.M.T. | 340500000 |
| 19 | नागरोत्थान समभाग | 304800000 |

DRAFT

| | | |
|---|---|---|
| 20 | नागरी स्वच्छता आराखडा समभाग | 50000000 |
| 21 | इ.टी.पी.समभाग | 8500000 |
| 22 | विदर्भ वैधानिक विकास मंडळ. | 14100000 |
| | | |

उपरोक्त दायीत्वांचा निपटारा करणेसाठी महानगरपालिकेकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने सदरची देणी फेडण्याची क्षमता दिसून येत नाही.वास्तविकता प्रत्येक आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रकात उपरोक्त दायीत्वाकरिता तरतूद करून निधी उपलब्ध केलेला असताना दायित्व कमी होण्या ऐवजी वाढतच असल्याचे दिसून येत आहे.याचा अर्थ महानगरपालिका तरतुदीचा निधी इतरत्र वळवून अटळ दायित्व प्रलंबित ठेवत आहे यामुळेच दिवसेंदिवस दायित्व प्रचंड वाढत आहे.त्याचा परिणाम महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवर होत आहे. शासकीय कर्ज,वित्तीय संस्थाचे कर्ज,थकीत विद्युत देयके इ.कडून दंडनीय व्याजाची आकारणी होऊन सध्याच्या दायीत्वापेक्षा भविष्यात जादाचे दायित्व वाढ होणार आहे,या बाबीकडे विशेष लक्ष्य वेधण्यात येत आहे.शासनाच्या वसुलीची रक्कम शासनाकडे वेळीच देण्याचे उत्तरदायित्वाचे महानगरपालिकेकडून पालन होत नसल्याने दायीत्वात नाहक वाढ होत आहे.

ठेकेदार/पुरवठादार यांची प्रलंबित देयके त्यांनी आदेशानुसार कामे विहित मुदतीत न केल्याने किवा उपलब्ध निधी ज्या प्रयोजनासाठी होता तो त्याच प्रयोजनासाठी वापरला गेला किवा कसे इत्यादी महत्वपूर्ण बाबी तपासणे गरजेचे आहे ,निधी उपलब्द्ध असताना अशी दयीत्वे निर्माण होणार नाही या बाबत वित्तीय नियोजन काटेकोरपणे होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी खालील उपाययोजना अत्यंत तातडीने करण्याची आवश्यकता आहे

1)प्रशासकीय खर्च कमी करणे,आस्थापना खर्चात काटकसर करणे

2)मालमत्ता कराची स.न.2012-13 अखेर रुपये 247996443/-थकीत असून ती वसूल होणे आवश्यक आहे.

3)महानगरपालिका आकारणी करू शकते असे सर्व कर आकारणी करून वसूल करणे,त्यासाठी करदात्या नागरिकांचा असंतोष होऊ नये म्हणून दिल्या जाणाऱ्या सर्व सुविधांचा दर्जा समाधानकारक होईल या दृष्टीने प्रशासनात कार्यक्षमता व व्यावसायिकता निर्माण करणे.

4)अनुत्पादक खर्चात काटकसर करणे.

5)महानगरपालिकेने घेतलेले कर्ज व त्यावरील व्याज यांचे नियमित हप्ते फेडणे आवश्यक आहे,जेणेकरून कर्जावरील व्याज व दंडनीय व्याज यांचे नुकसान टाळता येईल .

6)भांडवली स्वरूपाच्या विकास योजना राबविण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या विविध नागरी विकास कार्यक्रमामध्ये पुरेपूर सहभाग घेणे.

7)मालमत्ता कर आकारणी करताना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 267(अ)नुसार अवैध बांधकामावर मालमत्ता कराची दुप्पट एवढी शास्ती आकारण्यात यावी.



DRAFT

8)मालमत्ता कराची आकारणी भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केल्यानंतर त्वरित करणे आवश्यक असून भोगवटा प्रमाणपत्राच्या दिनांकापासून करणे आवश्यक आहे.
9)स्थानिक संस्था कराअंतर्गत व्यापाऱ्यांनी भरणा केलेल्या करांचे विहित मुदतीत निर्धारण करून वसुली करणे.
10)वाहनाचा वापर व प्रवास काटकसरीने करावा.
11)म.न.पा.च्या मालमत्तेपासून मिळणाऱ्या उत्पन्नाकडे लक्ष्य देणे आवश्यक आहे.यामध्ये कारनामे करून मत्ता भाड्याने देणे,करारनामे विहित मुदतीनंतर नुतनीकरण करून भाडे वाढ करण्याची अट करारनाम्यात असावी व त्यानुसार कारवाही होणे आवश्यक आहे.
12)निरुपयोगी साहित्य किमान किंमत ठरवून जाहीर लिलावाद्वारे विक्री करणे .
13)अंदाजपत्रकातील तरतुदी व कायदेशीर बाबीचे पालन होणे आवश्यक आहे.
14)अग्रीम रक्कमाद्वारे प्रदान रक्कमा संबाधीताकडून सत्वर समायोजन/वसुली करून ,अग्रिम रक्कमा प्रदान होणार नाही या बाबत योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे.
15)महानगरपालिकेकडून मक्ता पद्धतीने देण्यात येणाऱ्या कामाचा आढावा घेवून यात मनुष्यबळ पुरविणे यासारखी नियमबाह्य बाब टाळणे आवश्यक असून उपलब्ध कर्मचारी वर्ग व प्रत्यक्ष गरज यांचा वास्तवादी ताळमेळ घेवून खर्च करणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमूद केलेल्या बाबी पाहता महानगरपालिकेची आर्थिक स्थिती समाधानकारक असल्याचे लेखापरीक्षणात नमूद करता येत नाही.याबाबत सकारात्मक उपाययोजना करून आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी विविध उपाययोजना कराव्यात तसेच महानगरपालिकेचे दायित्व मत्ते पेक्षा जास्त राहणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

वार्षिक लेखे

शासननिर्णय नगरविकास विभाग क्रमांक लेखास-102004/प्र.क्र.5/नावी31/दिनांक-06/07/2005 नुसार महापालिकेने लेखे दुहेरी नोंद पद्धतीने(accrual based double entry system ) ठेवण्याचे आदेशित केले आहे. इकडील अर्धसमास पत्र.क्र.86.दिनांक14/10/2015 नुसार National Municipal Accounting Manual (NMAM) नुसार उपार्जित व दुहेरी नोंद पद्धतीने ताळेबंद,इन्कम व एक्स्पेडीचर अकाउंट इत्यादी वित्तीय लेखे उपलब्ध करून देण्याबाबत मागणी केली असता सदरील लेखे उपलब्ध झाले नाही, त्यामुळे लेखापरीक्षणास तपासणी करून अभिप्राय देता आले नाही.

DATVKGM7601 (Ref No : 82)

## *129 महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्याकरिता महसुली उत्पन्नाच्या 5% तरतूद खर्च करण्याबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***अमरावती शहर महानगरपालिकेच्या महिला व बालविकास विभागास शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या एकूण महसुली उत्पन्नापैकी बांधील खर्च वगळता 5% तरतूद महिला व बालविकासात्मक योजनांवर खर्च केलेली नाही.***

अमरावती शहर महानगरपालिकेच्या महिला व बालविकास विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1.महानगरपालिका क्षेत्रामध्ये महिला व बालकल्याणाच्या विविध योजना राबविण्यासाठी महिला व बालकल्याण समिती गठीत करण्यात येते. शासन निर्णय क्र.जिईम1793/1198/नवि-14 मंत्रालय, मुंबई दि.14/07/1992 नुसार एकूण वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रकमेच्या 5% रक्कम राखून ठेवून समितीच्या मागणीनुसार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. महिला व बालकल्याण विभागाने मागील पाच वर्षामध्ये केलेल्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | केलेली तरतूद | झालेला खर्च | कमी केलेला खर्च | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2008-09 | 1195000/- | 211000 | 984000 | |
| 2 | 2009-10 | 4000000/- | 3892242 | 107758 | |
| 3 | 2010-11 | 5000000/- | 3415905 | 1684095 | |
| 4 | 2011-12 | 5100000/- | 1724444 | 3375556 | |
| 5 | 2012-13 | 7000000/- | 4620365 | 2339635 | |

2.शासन निर्णय नगरविकास विभाग क्रमांक संकीर्ण/2005/प्र.क्र.255/05/नवि-20 मंत्रालय,मुंबई दि.8/11/2010 नुसार महिला व बालकल्याणाच्या राखीव असलेल्या 5 % तरतुदीतून सदरच्या शासन निर्णयातील 15 बाबींवर खर्च करणे आवश्यक असतांना असा खर्च केलेला दिसून येत नाही. महिला व बालकल्याण स्वयंरोजगार प्रशिक्षण व इतर कार्यक्रम यासाठी सन 2012-13 मध्ये उपरोक्त शासन निर्देशाप्रमाणे तरतूद केलेली दिसून येत नाही. तसेच वरील शासन निर्णयानुसार मुलींना /महिलांना महिलांसाठी समुपदेशक केंद्र चालविणे, हेल्पलाईन चालविणे, विधी केंद्र चालविणे, मुलींसाठी शाळेमध्ये क्रिडा स्पर्धा आयोजन करणे इत्यादी प्रकारच्या योजना हाती घेतलेल्या नाहीत. महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी राखीव 5% निधीतून खर्च करणे आवश्यक आहे. परंतु याची योग्य अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते.शासन निर्णयाप्रमाणे बांधील खर्चाची वजाती करून 5%निधी सदरील याजनेवर खर्च करणे आवश्यक असून

DRAFT

अनुशेष राहणार नाही याची काळजी म.न.पा.ने घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत सामान्य प्रशासन विभागास अर्धसमास पत्र क्र.187 दि.08/12/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 187)

## *132 12 व्या वित्त आयोगाअंतर्गत अखर्चित निधीतून स्वच्छता विभागासाठी घेतलेल्या लोखंडी लिटरबिन्स खरेदीतील अनियमिततेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 07**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 4992169.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4992169.00/-

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेच्या भांडार विभागाने 12 व्या वित्त आयोगाच्या अखर्चित निधीतून स्वच्छता विभागासाठी शहरामध्ये ठिकठिकाणी लावण्यासाठी लोखंडी लिटरबिन्स खरेदी केलेले आहेत. सदर अखर्चित निधी बाराव्या वित्त आयोगाचा कालावधी संपल्यानंतर शासनाच्या परवानगीशिवाय खर्च करण्यात आलेला आहे. तसेच विभागाने ई- निविदा प्रणालीचा वापर केलेला नाही. प्राप्त वस्तूच्या गुणवत्तेची तपासणी केलेली नाही. वस्तूबाबत शासनाचा दरकरार उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत खात्री केलेली नाही. वस्तू लाघुउद्योगाकडून पुरविल्या जातील किंवा नाही याची खात्री केलेली नाही.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे भांडार विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना स्वच्छता विभागासाठी 12 व्या वित्त आयोगाच्या अखर्चित निधीतून घेतलेल्या लोखंडीबिन्स खरेदीमध्ये खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1.महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या दि.21/04/2012 रोजी पार पडलेल्या प्रस्ताव क्र.07 नुसार 12 व्या वित्त आयोगाच्या शिल्लक रकमेच्या विनियोगाबाबत चर्चा करून निर्णय घेणेबाबत प्रस्ताव स्थायी समितीसमोर मांडण्यात आला व ठराव क्र.07 अन्वये समितीच्या सदस्यांनीकेलेल्या सूचनेनुसारशहरातील साफसफाईचे काम चांगल्याप्रकारे करण्यासाठी रु.50.00 लक्ष पर्यंतचे लिटरबिन्स खरेदी करण्यास व प्रमुख चौकाचौकात फायबरचे मुत्रीघर तयार करण्याकरिता रु.1.00 कोटीपर्यंत आणि उर्वरित तरतुदीमधून आरोग्य विभागाकरिता लागणारे इतर



DRAFT

साहित्य खरेदी करण्याकरिता सदर तरतुदीचा विनियोग करावा. असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आलेला आहे. व उपरोक्त सभेत पारित करण्यात आलेला ठराव दि.04/05/2012 रोजीच्या स्थायी समिती सभेत कायम करण्यात आलेला आहे.

2.उपरोक्त सर्व बाबींचे व 12 व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या अखर्चित निधीच्या संचिकेचे अवलोकन केले असता नास्तीचे पृष्ठ क्र.N-1 वर नमूद केल्याप्रमाणे दि.31/03/2012 अखेर रु.22200000/-इतका निधी शिल्लक असल्याचे स्पष्ट होते.12व्या केंद्रीय वित्त आयोगाचा कालावधी दि.01/04/2005 ते दि.31/03/2010 असा पाच वर्षाचा असल्याचे दिसून येते.महानगरपालिकेने दि.21/04/2012 रोजी अखर्चित निधी खर्च करण्याचे नियोजन केले आहे. वित्त आयोगाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर तब्बल दोन वर्षानंतर निधी खर्च करण्याचे नियोजन केल्याचे संचीकेवरून दिसून येते.दि.31/03/2010 रोजी वित्त आयोगाचा कालावधी संपल्यानंतर निधी खर्च करण्यास शासनाची परवानगी होती काय ?याबाबतचे दस्तऐवज लेखापारीक्षणास दर्शविण्यात आलेले नाहीत.तसेच खर्च केलेली रक्कम शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणेच खर्च केली आहे काय ?याबाबतचे दस्तऐवज लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेले नाहीत.

3.महानगरपालिकेने दि.08/05/2012 रोजी जा.क्र./अमनपा/स्ववि/93/2012 अन्वये केंद्रीय 12 व्या आयोगातील उर्वरित निधीचा विनियोग करण्याबाबत,नगरपालिका प्रशासन संचालनालय,वरळी,मुंबई,महाराष्ट्र शासन यांना अखर्चित निधी खर्च करण्यास परवानगी मागितलेली असून सदर परवानगी शासन स्तरावर प्रलंबित असतानादेखील त्यापूर्वीच दि.21/04/2012 रोजी स्थायी समितीने रकमेच्या विनियोगाबाबत नियोजन केले आहे. असे संचीकेवरून स्पष्ट होते.तसेच अखर्चित निधी खर्च करण्यास शासनाचा निर्णय प्रलंबित असतानाच निधी खर्च करण्यात आलेला आहे.या विरोधाभासाबाबत विभागाने कोणतेही अनुपालन दर्शविलेले नाही.

4.12 व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या अखर्चित निधीतून रु.50.00 लक्ष पर्यतचे लोखंडी लिटरबिन्स खरेदी करण्यासाठी अमरावती येथून प्रसिद्ध होणारे सांध्य दैनिक “इनसाईट” या वर्तमानपत्रामध्ये दि.10/08/2012 रोजी व अमरावती येथून प्रसिद्ध होणारे साप्ता.”लोकभूषण” या वर्तमानपत्रातून दि.15/08/2012 रोजी जाहिरात देण्यात आली होती सदरील दोन्हीही वर्तमानपत्रे स्थानिक पातळीवरून प्रसिद्ध होणारी असल्यामुळे महाराष्ट्र शासन,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस/1088/(2512)उद्योग-6 मंत्रालय,मुंबई दि.02/01/1992 मधील 10.8 अन्वये जाहिरातीचा योग्य असा प्रचार व प्रसार झालेला नाही त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला नाही.

5.प्राप्त झालेल्या मालाची गुणवत्ता महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस/1088/(2512)/उद्योग-6 मंत्रालय, मुंबई-32 दि.02, जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.8.4 अन्वये खरेदी केलेल्या वस्तू जर भारतीय मानक संस्थेने (BIS)

DRAFT

प्रमाणित केलेल्या नसतील तर वस्तूच्या गुणवत्तेबाबत 100% तपासणी त्रयस्थ संस्थेकडून करून घेणे आवश्यक आहे. तसा तपासणी अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे मागणी केलेल्या गुणवत्तेप्रमाणे वस्तूंचा पुरवठा केल्याची खात्री पटत नाही.

5.उपरोक्त शासन निर्णयान्वये सदरील वस्तूंबाबत शासनाचा दरकरार उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत खात्री करण्यात आलेली नाही. तसेच सदर वस्तू लघुउद्योग महामंडळाकडून पुरवठा होतील किंवा नाही याबाबत खात्री करण्यात आलेली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत भांडार विभागास अर्धसमास पत्र क्र.1 85 दि. 07/12/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DRAFT

DATGAGM8201 (Ref No : 185)

## *133 क्रीडा क्षेत्रासाठी 5% खर्च करणे व खासगी संस्थाना नियम बाह्यपणे अनुदान देणे बाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 1200000.00/-

***नगरविकास विभाग परिपत्रक क्र.जीईएन-1098/प्र.क्र.21/98/नवि-24 मंत्रालय, मुंबई दि.09/03/1998 अन्वये महानगरपालिकांनी आपल्या वार्षिक खर्चापैकी किमान 5 टक्के खर्च क्रिडाक्षेत्रासाठी करावे असे बंधन आहे. अमरावती शहर महानगरपालिकेने क्रिडाक्षेत्रासाठी विविध लेखा शिर्षामधून विहित केलेला खर्च केलेला नाही.तसेच नियमबाह्यपणे खासगी संस्थाना अनुदान वाटप केले आहे.***

1.अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे क्रीडा विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना नगरविकास विभाग परिपत्रक क्र.जीईएन-1098/प्र.क्र.21/98/नवि-24 मंत्रालय,मुंबई दि.09/03/1998 अन्वये महानगरपालिकांनी आपल्या वार्षिक खर्चापैकी किमान 5 टक्के खर्च क्रिडाक्षेत्रासाठी करावे असे बंधन आहे. अमरावती शहर महानगरपालिकेने क्रिडाक्षेत्रासाठी विविध लेखा शिर्षामधुन केलेल्या खर्चाची सन 2012-13 ची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | लेखा शिर्ष | तरतुद रक्कम (रूपये) | झालेला खर्च (रूपये) |
|---|---|---|---|
| 1 | आकस्मिक खर्च-254 | 50000/- | निरंक |
| 2 | महापौर क्रीडा चषक-255 | 10,00,000/- | निरंक |
| 3 | क्रीडा साहित्य-256 | 1,00,000/- | 30980/- |
| 4 | क्रीडारत्न पुरस्कार-257 | 2,00,000/- | 1,14.000/- |
| 5 | सार्वजनिक संस्थांना अनुदान(संस्कृती व क्रीडा)-258 | 30,00,000/- | 12,00,000/- |
| | एकूण | 43,50,000/- | 13,44,980/- |

2.उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे खर्च सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आस्थापना खर्च वगळता क्रीडा क्षेत्रावर करण्यात आलेला आहे.केलेल्या तरतुदीपेक्षा हा खर्च रु.30,05.020/- इतका कमी आहे. महानगरपालिकेचा सन 2012-13 महसुली खर्च रु.123.00 कोटीपेक्षा जास्त आहे.त्याप्रमाणात सदरील खर्च खूपच कमी आहे.तसेच केलेल्या खर्चामध्ये रु 1200000/-सार्वजनिक संस्थांना अनुदान वाटपासाठी केल्याचे दिसून येत आहे,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मध्ये या प्रकारच्या अनुदान संबधित तरतूद नसतांना अनुदान देण्याची अनियमितता झालेली आहे.उपरोक्त अनियमिततेबाबत क्रीडा विभागास अर्धसमास पत्र क्र.153 दि.03/12/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 153)

### *138 लेखा परीक्षणात प्रमाणके सादर न करणेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग शासननिधी/मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***अमरावती महानगरपालिकेने प्रमाणके लेखा परीक्षणात उपलब्ध करून देण्यात आली नाहीत.*** |

| अ.क्र. | प्रमानक क्र./ पासून - पर्यंत दि. | संख्या |
|---|---|---|
| 1. | 10732 ते | 01 |
| 2. | 10735 ते 10744 | 10 |



DRAFT

| | | |
|---|---|---|
| 3. | 10749 ते 10754 | 05 |
| 4. | 10756 - 1010763 | 08 |
| 5. | 10766 - | 01 |
| 6. | 10772 -10773 | 02 |
| 7. | 10776 -10777 | 02 |
| 8. | 10781 -10782 | 02 |
| 9. | 10787 | 01 |
| 10. | 10804 - 10841 | 38 |
| 11. | 10843 -10858 | 16 |
| 12. | 10864 - 10890 | 27 |
| 13 | 10892 - 10946 | 55 |
| 14 | 10954 - 10958 | 05 |
| 15. | 10979 - 10981 | 03 |
| 16. | 10985 - | 01 |
| 17. | 10997 | 01 |
| 18. | 10006 -10008 | 03 |
| 19. | 11038 - | 01 |
| 20. | 11048 | 01 |
| 21. | 11053 -11071 | 18 |
| 22. | 11078 -11082 | 05 |
| 23. | 11021 | 01 |
| 24. | 11152 - 11154 | 03 |
| 25. | 11171 -11172 | 02 |
| 26. | 11181 -11184 | 04 |
| 27 | 11191 - | 01 |
| 28 | 11213 | 01 |
| 29 | 11230 - 11235 | 06 |
| 30 | 11250 - | 02 |
| 31 | 11257 - 11269 | 13 |
| 31 | 11283 - 11285 | 03 |
| 32 | 11294 - | 01 |
| 33 | 11304 | 01 |



DRAFT

| | | |
|---|---|---|
| 34 | 11338 -11339 | 02 |
| 35 | 11345 | 01 |
| 36 | 11347 | 01 |
| 37 | 11378 - 11381 | 04 |
| 38 | 11406 - 11410 | 05 |
| 39 | 11440 - 11473 | 24 |
| 40 | 11492 - 11496 | 05 |
| 41 | 11505 - 11517 | 13 |
| 42 | 11528 - 11530 | 03 |
| 43 | 11534 - 11542 | 09 |
| 44 | 11551 | 01 |
| 45 | 11570 - 11571 | 02 |
| 46 | 11574 | 01 |
| 47 | 11576 - 11577 | 02 |
| 48 | 11583 | 01 |
| 49 | 11584 - 11587 | 03 |
| 50 | 11593 | 01 |
| 51 | 11595 | 01 |
| 52 | 11605 -11606 | 02 |
| 53 | 11608 | 01 |
| 54 | 11611 | 01 |
| 55 | 11625 | 01 |
| 56 | 11635 | 01 |
| 57 | 11646 | 01 |
| 58 | 11648 - 11650 | 03 |
| 59 | 11668 - 11671 | 04 |
| 60 | 11686 | 01 |
| 61 | 11724 | 01 |
| 62 | 11727 | 01 |
| 63 | 11731- 11734 | 04 |
| 64 | 11741 | 01 |
| 65 | 11744 - 11752 | 09 |

DRAFT

| | | |
|---|---|---|
| 66 | 11754 | 01 |
| 67 | 11791 | 01 |
| 68 | 11795 -11796 | 02 |
| 69 | 11798 | 01 |
| 70 | 11815 - 11816 | 02 |
| 71 | 11818 - 11841 | 24 |
| 72 | 11848 | 01 |
| 73 | 11851 - 11852 | 02 |
| 74 | 11858 - 11883 | 26 |
| 75 | 11890 - 11892 | 03 |
| 76 | 11894 - 11896 | 03 |
| 77 | 11913 | 01 |
| 78 | 11928 | 01 |
| 79 | 11930 - 11931 | 02 |
| 80 | 11933 - 11938 | 06 |
| 81 | 11947 - 11953 | 07 |
| 82 | 11955 | 01 |
| 83 | 11962 | 01 |
| 84 | 11986 | 01 |
| 85 | 11988 | 01 |
| 86 | 11990 - 11991 | 02 |
| 87 | 11994 - 11996 | 03 |
| 88 | 12001 - 12002 | 02 |
| 89 | 12007 - 12009 | 03 |
| 90 | 12013 | 01 |
| 91 | 12015 | 01 |
| 92 | 12033 | 01 |
| 93 | 12038 - 12039 | 02 |
| 94 | 12042 A | 01 |
| 95 | 12045 | 01 |
| 96 | 12057 - 12064 | 07 |
| 97 | 12071 | 01 |

DRAFT

| | | |
|---|---|---|
| 98 | 12074 | 01 |
| 99 | 12087 - 12089 | 03 |
| 100 | 12094 | 01 |

| | | |
|---|---|---|
| 101 | 12104 -12105 | 02 |
| 102 | 12108 - 12113 | 06 |
| 103 | 12115 | 01 |
| 104 | 12117 - 12120 | 04 |
| 105 | 12122 | 01 |
| 106 | 12125 | 01 |
| 107 | 12138 | 01 |
| 108 | 12144 | 01 |
| 109 | 12146 | 01 |
| 110 | 12151 | 01 |
| 111 | 12153 - 12156 | 04 |
| 112 | 12170 | 01 |
| 113 | 12190 - 1212199 | 10 |
| 114 | 12203 - 12204 | 02 |
| 115 | 12225 - | 01 |
| 116 | 12227 | 01 |
| 117 | 12229 | 01 |
| 118 | 12238 | 01 |
| 119 | 12240 | 01 |
| 120 | 12248 | 01 |
| 121 | 12251 | 01 |
| 122 | 12253 - 12254 | 02 |
| 123 | 12258 - 12262 | 05 |
| | | |
| | एकूण | 476 |
| | | |
| | | |

DRAFT

म.न.पा.अमरावतीचे स.न.2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कामासाठी या वर्षातील शासन निधी व म.न.पा.निधी अंतर्गत खर्चाची प्रमाणके रेखांकन व लेखापरीक्षणसाठी अर्ध समासपत्र क्र.16 - दि.26/06/2015 व 17 दि 28/07/2015 अन्वये मागणी करण्यात आली होती त्या अनुशंघाने विभागाने पुरविलेल्या प्रमानाकामध्ये उपरोक्त प्रमाणे एकूण 476 प्रमाणके आढळून आली नाही त्या संधर्भाने परत इकडील अर्धसमास पत्र क्र.17 दि.28/07/2015 नुसार अप्राप्त प्रमाणकांची यादी देयून ती पुरविण्यास्तव कळविले होते परंतु त्या संदर्भाने कारवाही झालेली नाही हि अतिशय गंभीर बाब आहे लेखा शाखेने याकडे दुर्लक्ष्य केलेले आहे त्यामुळे सदर प्रमानका संधर्भाने झालेल्या खर्चाचे लेखापरीक्षण होऊ शकले नाही.

या बाबत लेखा परीक्षणात अर्धसमास पत्र क्र.17/ दि.28/07/2015 देऊन देखील कोणतेही अनुपालन प्राप्त नाही त्यामुळे परीच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPDMM6101 (Ref No : 17)

## *139 डॉ.श्यामसुंदर सोनी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी व डॉ.अजय जाधव, सहायक वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवापुस्तकातील त्रुटींबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 07**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***अमरावती शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या डॉ.श्यामसुंदर सोनी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी व डॉ.अजय जाधव, सहायक वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवापुस्तकातील नोंदी तपासल्या असता त्यांच्या जन्मतारखांची पडताळणी मूळ अभिलेख्यावरून केल्याची नोंद नाही.सेवाप्रवेशाचेवेळी वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी केलेली नाही. मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण अथवा सूटबाबत नोंद सेवापुस्तकात घेतलेली नाही.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे आरोग्य विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना डॉ.श्यामसुंदर सोनी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी व डॉ.अजय जाधव, सहायक वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवापुस्तकामध्ये खालील त्रुटी आढळून आलेले आहेत.

1)डॉ. श्यामसुंदर सोनी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी

DRAFT

2)डॉ.अजय जाधव, सहायक वैद्यकीय अधिकारी

1. डॉ.अजय जाधव यांची म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम -1981चे नियम-38 अन्वये जन्मतारखेची पडताळणी मूळ दस्तऐवजावरून करून ती सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली नाही.

2.डॉ.श्यामसुंदर सोनी व डॉ.अजय जाधव यांच्या म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम-1981 अन्वये सेवाप्रवेशाचेवेळी शारीरिकदृष्टया सक्षम असल्याचे वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र व जिल्हा पोलीस अधिक्षकाचे चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही व तशी नोंद सेवापुस्तकामध्ये आढळून आलेली नाही.

3.डॉ.अजय जाधव यांच्या सेवापुस्तकातील नोंदीनुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण अथवा सूटबाबत नोंद सेवापुस्तकात दिसून येत नाही.डॉ.सोनी यांनी शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मराठी व हिंदी घेऊन उत्तीर्ण केलेली आहे परंतु सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने सूट घेऊन सेवापुस्तकात नोंद घेतलेली नाही.

4.डॉ.अजय जाधव यांच्या सेवापुस्तकात महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39, दि.19/03/2003 नुसार योग्य ती संगणक अर्हता प्राप्त केल्याची किंवा MS-CIT परीक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात आढळून आलेली नाही.

5.डॉ.अजय जाधव यांच्या सेवापुस्तकात म.ना.से.(रजा) नियम-1981 अन्वये अर्जित व अर्धवेतनी रजेच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.तसेच रजेची प्रत्येक नोंद सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली नाही.

6.डॉ.अजय जाधव यांची म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) 1981 अन्वये दि.31/01/2002 नंतर वेतन देयकांच्या मूळ प्रतीवरून सेवा पडताळणी केलेली नाही.

7.डॉ.अजय जाधव यांची सहाव्या वेतन आयोगाची वेतननिश्चितीची पडताळणी सक्षम अधिकाऱ्याने केलेली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत आरोग्य विभागास अर्धसमास पत्र क्र.122 दि.03/11/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 122)

## *140 मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम-6 अन्वये आरोग्य व स्वच्छता विभागाने अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून न दिल्याबद्दल.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 12**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*



DRAFT

***अमरावती शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने क्षयरोग नियंत्रण विभागाचे सन 2012-13 चे अभिलेखे व स्वच्छता विभागाने त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या वेगवेगळ्या संवर्गाची सेवापुस्तके मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम-6 अन्वये लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिले नसल्यामुळे त्याबाबत अभिप्राय देता आले नाहीत.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे आरोग्य व स्वच्छता विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम-6 अन्वये विभागाने खालील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेले नाहीत.

आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली असलेले क्षयरोग नियंत्रण विभागाचे खालील अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत.

1.सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे योजनेचे बँकेचे पासबुक व रोखपुस्तक.

2.सन 2012-13 ची योजनेची खर्चाची प्रमाणके व संचिका.

3.सन 2012-13 या आर्थिक वर्षाच्या अनुदान प्राप्तीच्या नोंदवहया.

4.सन 2012-13 या वर्षाचा बँकेचा स्क्रोल.

5.खरेदी केलेल्या वस्तूची साठा नोंदवही.

6.31/03/2013 अखेर न वटलेल्या धनादेशाची यादी.

स्वच्छता विभागाने खालील संवर्गाची सेवापुस्तके व वैयक्तिक संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेल्या नाहीत.

7.स्वास्थ्य अधीक्षक यांची सेवापुस्तके व वैयक्तिक संचिका.

8.प्रमुख स्वास्थ्य निरीक्षक यांची सेवापुस्तके व वैयक्तिक संचिका.

9.जेष्ठ स्वास्थ्य निरीक्षक यांची सेवापुस्तके व वैयक्तिक संचिका.

10.स्वास्थ्य निरीक्षक यांची सेवापुस्तके व वैयक्तिक संचिका.

11. वरिष्ठ लिपिक यांची सेवापुस्तके व वैयक्तिक संचिका.

DRAFT

12. कनिष्ठ लिपिक यांची सेवापुस्तके व वैयक्तिक संचिका.

उपरोक्त अनियमिततेबाबत आरोग्य व स्वच्छता विभागास अर्धसमास पत्र क्र.80 दि.14/10/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला

DATGAGM8201 (Ref No : 80)

## *141 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये दैनदिन साफसफाईच्या प्रभागनिहाय स्वच्छतेतील अनियमिततेबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 17**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 61740980.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 61740980.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1181877.00/-

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने प्रभागनिहाय कंत्राटे दिली होती. महानगरपालिकेचे एकूण 43 प्रभाग आहेत.सर्व प्रभागाची साफसफाईची निविदा प्रक्रिया विभागाने राबिविली होती. विभागाने मंजूर आर्थिक तरतुदीपेक्षा रु.1,17,40,980/- इतका खर्च जास्त केलेला आहे. प्रभागातील कंत्राटदाराने करारनाम्याच्या अटी-शर्तीप्रमाणे कामे केलेली नाहीत. दैनंदिन साफसफाईचे अहवाल व्यवस्थित नाहीत.विभागाने सुट्टीच्या दिवशी बदली कामगार लावून महानगरपालिकेच्या दायीत्वामध्ये रु.1,52,57,760/- इतकी वार्षिक वाढ केलेली आहे. करारनाम्याच्या अट क्र.45 अन्वये कामगाराचे दरमहिन्याचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेतून करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. अट क्र.39 अन्वये कामगाराचे इ.पी.एफ./इ.एस.आय.सी. शूल्क भरल्याच्या पावत्या देयकासोबत न जोडताच देयके अदा केलेली आहेत.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012- वर्षाचे आर्थिक या 13स्वच्छता विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना प्रभागनिहाय साफसफाईमध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1.महानगरपालिकेत सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये दैनदिन साफसफाई या लेखाशिर्षामधून रु.6,17,40,980/- इतका खर्च दैनदिन साफसफाईवर केलेला आहे हे वार्षिकलेख्यावरून दिसुन येते. परंतु सदरील लेखाशिर्षावर सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये सुधारित अर्थसंकल्पीय तरतूद रु.5.00 कोटी असल्याचे सन 2012-13 चा वार्षिक लेखा व अर्थसंकल्पपुस्तिका यावरून दिसून येते.विभागाने मंजूर अर्थसंकल्पीय

तरतुदीपेक्षा रु.1,17,40,980/- इतका जास्तीचा खर्च केलेला आहे.सदरील खर्चाला महानगरपालिकेच्या स्थायी समिती व सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतलेली दिसून येत नाही. 2.संचिकेच्या पृष्ठ क्र. 21 ते 24 वर नमूद करण्यात आलेले प्रभागनिहाय खर्चाचे विवरण कशाच्या आधारे केले? याबाबत शासन निर्णय,परिपत्रक लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेले नाहीत. याचाच अर्थ असा की, सदरील खर्च मोघमपणे परीगणित केलेला आहे.

3.यापूर्वी साफसफाईसाठी अर्धवेळ कामगार लावून कामे केली जात होती.सन 2012-13 या आर्थिक वर्षापासून पूर्णवेळ कामगार लावून साफसफाईचे कामे देण्यात आलेली आहेत. त्याबाबत महानगरपालिकेने मंजूर केलेला ठराव लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेला नाही. तसेच कामगाराच्या वेतन दराबाबतचा शासन निर्णय,परिपत्रक किंवा कायदा लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेला नाही.

4.प्रभाग क्र.01 ते 43 च्या प्राप्त झालेल्या निविदा संचिका व अनुषंगिक दस्तऐवज लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेले नाहीत.

5.सदरील कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आलेल्या वर्तमान पत्राच्या प्रती लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेल्या नाहीत.त्यामुळे त्यावर अभिप्राय देता आलेला नाही.

6.प्रभाग क्र.10 व 27 करिता फेरनिविदा प्रक्रिया राबविण्यात आलेल्या वर्तमान पत्राच्या प्रती संचिकेत जोडलेल्या नाहीत.त्यामुळे त्यावर अभिप्राय देता आलेला नाही.

7.संचिकेच्या पृष्ठ क्र.76 व 78 वर नमूद केल्याप्रमाणे सर्वच ठेकेदाराचे तुलनात्मक तक्ते संचिकेत जोडलेले नाहीत.

8.संचिकेच्या पृष्ठ क्र.80 व 81 वर नमूद केल्याप्रमाणे सुधारित दराबाबतचे प्रस्ताव लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेले नाहीत.

9. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस/1088/(2512)/उद्योग-6 मंत्रालय, मुंबई-32 दि.02, जानेवारी 1992 अन्वये वाटाघाटी व निविदा प्रक्रिया कार्यवाही केलेली नाही.

10. अर्धवेळ कामगार लावून निविदा प्रक्रिया राबविण्याची व साफसफाईची कामे देण्याची आवश्यकता असताना विभागाने पूर्णवेळ सफाई कामगार लावून कामे देण्याची निविदा प्रक्रिया राबवून कामे वाटप केलेली आहेत.त्यामुळे महानगरपालिकेच्या दायीत्वामध्ये वाढ झालेली आहे.तसेच पूर्णवेळ कामगाराच्या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी बदली कामगार लावलेले असून दायीत्वामध्ये आणखी वाढ केलेली आहे. काम घेतलेल्या संस्थेने पूर्ण कामगार कामावर आणले किंवा नाही हे तपासण्याची कोणतीही प्रभावी यंत्रणा महानगरपालिकेकडे नाही.महानगरपालिका अमरावती अंतर्गत एकूण 43 प्रभाग आहेत. त्यापैकी प्रभाग क्र.25 मध्ये एकूण 45 कामगार कार्यरत होते. प्रभाग क्र. 42 व 11 मध्ये प्रत्येकी 40 कामगार कार्यरत होते. प्रभाग क्र.12 मध्ये एकूण 35 कामगार कार्यरत होते. उर्वरित 39 प्रभागामध्ये प्रत्येकी 30 कामगार कार्यरत होते.म्हणजेच कामगाराच्या

बदली सुट्टीच्या दिवशी एका महिन्याला किमान 4 (चार) साप्ताहिक सुट्ट्या गृहीत धरल्या तरीएका महिन्याचे सार्व प्रभागाचे मिळून एकूण 5320 इतके कामगार होतात.प्रती कामगार प्रतिदिन किमान मजुरी रु.202/- इतकी आहे.त्यावरील इ.पी.एफ.13.61% व इ.एस.आय.सी.4.75% इतके आहे. असा मिळून एकूण खर्च रु.37+202=239/- प्रति कामगार प्रतिदिन खर्च आहे.याप्रमाणे 5320*239=12,71,480/- इतका खर्च दरमहा वाढलेला आहे. याप्रमाणे 12,71,480*12= 1,52,57,760/- इतका खर्च अतिरिक्त करण्यात आलेला आहे. हा खर्च टाळता येण्यासारखा होता. विभागाने कोणताही काटकसरीचा विचार न करता खर्चामध्ये विनाकारण वाढ केलेली आहे.

11.प्रभाग क्र.10 चे फेरनिविदा प्रक्रिया केल्याबाबतचे दस्तऐवज लेखापरीक्षणास दर्शविले नाहीत.

12.विभागाने महाराष्ट्र शासन,सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय,शा.नी.क्र.सीपटी/10/2006, प्र.क्र.133/इमारती-2 दि.02/11/2006 अन्वये निविदा प्रक्रिया राबविली नाही.

13.दि.09/04/2008 रोजी स्थायी समितीने विषय क्र.17 व ठराव क्र.17 अन्वये सदरील कामास निविदाप्रक्रिया राबविण्याबाबत मंजुरी दिलेली आहे.सदर कामे ही एकूण रु.50.00 लक्षपेक्षा जास्त मूल्याची असल्यामुळे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक होते विभागाने तशी मान्यता घेतलेली नाही.तसेच सन 2008 मध्ये घेतलेली मंजुरी सन 2012 मध्ये कार्यवाही करण्यात आलेली आहे.

14.कामाच्या अटी-शर्ती क्र.39 अन्वये कामगाराच्या इ.पी.एफ. व इ.एस.आय.सी. ची रक्कम अगोदरच भरून त्याच्या पावत्या देयकासोबत जोडणे बंधनकारक असून त्यानंतरच देयक अदा केले जाईल अशी तरतूद आहे.परंतु कोणत्याही ठेकेदाराने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.त्यामुळे रक्कम भरल्याची खात्री पटत नाही.लेखा विभागानेदेखील कोणतीही खात्री न करता देयके अदा केलेली आहेत.

15.कामाच्या अटी-शर्ती क्र.45 अन्वये प्रत्येक कामगाराचे दर महिन्याचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेतून अदा करणे आवश्यक असताना कोणत्याही प्रभागाचे वेतन त्याप्रमाणे अदा केलेले नाही.त्यामुळे सदर वेतन योग्य त्या कामगाराला पूर्णपणे अदा झाल्याची खात्री पटत नाही.अटी-शर्तीचा भंग करणाऱ्या संस्थेचा करारनामा व काम वाटप रद्द कण्याची तरतूद असताना विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

16.

| अ. क्र | कंत्राटदाराचे नाव व प्रभाग क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | देयकाचा महिना | देयकाची एकूण रक्कम | शेरा | आटी-शर्तीप्रमाणे वसूलपात्र रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | तथागत म. | 11338, | डिसेंबर- | 295364/ | देयकाच्या महिन्यातील | 76197/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | बचतगट-10 | 16/03/2013 | 12 | - | 4,7,10,14,17,19,24या दिनांकाचे चे दैनदिन अहवाल नाहीत. | |
| 2. | न्यू बालाजी const.-18 | 11227, 13/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | देयकाच्या महिन्यातील 5,15,16,17 या दिनांकाचे चे अहवाल नाहीत. | 39382/- |
| 3. | श्री.नाग.से.सह.संस्था -25 | 11340, 13/03/2013 | ऑक्टोंबर -12 | 441739/- | दुबार देयक प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखाऐवजी मु.ले.अ. ने दिले आहे. | --- |
| 4. | श्री.नाग.से.सह.संस्था -25 | 11341, 13/03/2013 | नोव्हेंबर-12 | 441739/- | दुबार देयक प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखाऐवजी मु.ले.अ. ने दिले आहे. | --- |
| 5. | साई वैभव const.-05 | 11219, 12/03/2013 | नोव्हेंबर-12 | 270000/- | दैनंदिन साफसफाईचे अहवाल परिपूर्ण भरलेले नाहीत. | ---- |
| 6. | सहदेव दशरथ मांडवगडे-01 | 11218, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 277840/- | दैनंदिन साफसफाईचे अहवाल परिपूर्ण भरलेले नाहीत. | ---- |
| 7. | विजय बालाजी गंगण-02 | 12217, 12/03/2013 | डिसेंबर-12 | 295364/- | देयकाच्या महिन्यातील 6,21,29 या दिनांकाचे चे अहवाल नाही. | 25584/- |
| 8. | विजय बालाजी गंगण-09 | 11216, 12/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | देयकाच्या महिन्यातील 4,9,12,17,21,24 या दिनांकाचे चे अहवाल नाहीत. | 59073/- |
| 9. | सम्यक नाग.से.सह.संस्था-36 | 11215, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | देयकाच्या महिन्यातील 9,26 या दिनांकाचे चे अहवाल सोबत नाहीत व | 187064/- |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 5,6,7,8,10 ते 24 अशा एकूण 15 अहवालावरस्वा.निरीक्षकाची स्वाक्षरी नाही. | |
| 10. | निवेदिता म.बचतगट-33 | 11228, 13/03/2013 | नोव्हेंबर-12 | 371395/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 11. | गोविंदा const.-03 | 11223, 12/03/2013 | नोव्हेंबर-12 | 262918/- | 11 ते 30 च्या अहवालावर स्वा. निरीक्षकाची स्वाक्षरी नाही. | 175279/- |
| 12. | सम्यक नाग.से.सह.संस्था-36 | 11214, 11/03/2013 | डिसेंबर-12 | 295364/- | 9 व 31 चे अहवाल नाहीत. | 19056/- |
| 13. | सम्यक नाग.से.सह.संस्था-16 | 11212, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 14. | शाम बबनराव शिनगारे-06 | 11211, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | दैनंदिन साफसफाईचे अहवाल परिपूर्ण भरलेले नाहीत. | --- |
| 15. | श्रीहरी म.बचतगट -21 | 11210, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | दैनंदिन साफसफाईचे अहवाल परिपूर्ण भरलेले नाहीत. | --- |
| 16. | शारदा म.बचतगट-42 | 11209, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 345208/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 17. | सायमा सु.बे.रो.ना.से.सह. संस्था -40 | 11208, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | 18 व 25 चे अहवाल जोडलेले नाहीत. | 19691/- |
| 18. | अफसरखान मियाखान | 11207, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | 06 ते 30 चे असे 25 दिवसाचे अहवाल जोडले | 246137/- |



DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नाहीत. | |
| 19. | बे.महाराष्ट्र ना.से.सह.संस्था-28 | 11185, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | 2 ते 29 नोव्हेंबर च्या अहवालाच्या तारखेमध्ये खाडाखोड केली आहे.नोंदी संशयास्पद वाटतात. | --- |
| 20. | जगदंबा मरिमाता सफाई कामगार ना.से.सह.संस्था-41 | 11186, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 21. | बहिरमबाबा से.ना.सह.संस्था-15 | 11187, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | दैनंदिन साफसफाईचे अहवाल परिपूर्ण भरलेले नाहीत. | --- |
| 22. | बे.क्षितीज ना.से.सह.संस्था-04 | 11188, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 23. | बे.क्षितीज ना.से.सह.संस्था-14 | 11189, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 24. | बे.क्षितीज ना.से.सह.संस्था-22 | 11191, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 25. | बे.क्षितीज ना.से.सह.संस्था-23 | 11193, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 26. | बे.क्षितीज ना.से.सह.संस्था-32 | 11194, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 27. | श्री.जगदंबा स्वयं.रो.ना.से.सह. | 11197, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 339539/- | नोव्हेंबर महिना 30 दिवसाचा असून दि.30/11/2012 रोजी काम | ---- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था-12 | | | | केलेले दर्शविले आहे. | |
| 28. | श्री.जगदंबा स्वयं.रो.ना.से.सह. संस्था-34 | 11198, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 293704/- | 2,3,4,5,6, व 11 रोजीचे अहवाल जोडलेले नाहीत. | 58741/- |
| 29. | श्री.जगदंबा स्वयं.रो.ना.से.सह. संस्था-43 | 11199, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | 01 ते 15 नोव्हेंबर चे व 21,25,27 या दिनांकाचे चे अहवाल सोबत जोडले नाहीत. | 177218/- |
| 30. | श्री.जगदंबा स्वयं.रो.ना.से.सह. संस्था-38 | 11200, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 31. | श्री नागरिक से.सह.संस्था-31 | 11201, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | 9,12,15,18,22,26,29,30 या दिनांकाचे चे अहवाल सोबत जोडलेले नाहीत. | 78764/- |
| 32. | श्री नागरिक से.सह.संस्था-13 | 11202, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 33. | श्री नागरिक से.सह.संस्था-25 | 11203, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 441739/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 34. | साई वैभव const.-07 | 11220, 12/03/2013 | नोव्हेंबर-12 | 270000/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 35. | युवक कल्याण ना.से.सह.संस्था-39 | 11221, 12/03/2012 | नोव्हेंबर-12 | 295364/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 36. | सागर ना.से.सह.संस्था-29 | 11205, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | नोव्हेंबर महिना 30 दिवसाचा असून दि.30/11/2012 रोजी काम केलेले दर्शविले आहे. | ---- |
| 37. | सागर | 11206, 11/03/201 | डिसेंबर- | 295364/- | अटी-शर्ती प्रमाणे काम | --- |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ना.से.सह.संस्था-08 | 3 | 12 | | केले नाही. | |
| 38. | सागर ना.से.सह.संस्था-08 | 11204, 11/03/2013 | नोव्हेंबर-12 | 295364/- | 29 व 30 चे अहवाल सोबत जोडलेले नाहीत. | 19691/- |
| 39. | वाल्मिकी सफाई कामगार सह.ना.संस्था- | 11196, 12/03/2012 | नोव्हेंबर-12 | 295364/- | अटी-शर्ती प्रमाणे काम केले नाही. | --- |
| 40. | विकासगंगा ना.से.सह.संस्था-19 | 11222, 12/03/2013 | नोव्हेंबर-12 | 364918/- | दैनंदिन साफसफाईच्या अहवालावर स्वास्थ्य निरीक्षक यांची स्वाक्षरी झेरॉक्स प्रतीची आहे. | --- |
| | | | | | **एकूण** = | **1181877/-** |

17.उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केलेल्या निवडक देयकांची तपासणी केली असता त्यामध्ये अनेक गंभीर अनियमितता आढळून आलेल्या आहेत.विभागाने अदा केलेल्या सर्व देयकांची तपासणी करून वसुली करून मनपाच्या खाती भरणे आवश्यक आहे.कामाच्या अटी-शर्ती नुसार जर दैनंदिन साफसफाईचा अहवाल नसेल तर त्या दिवशीचे देयके मिळणार नाहीत.परंतु विभागाने त्याचे पालन केलेले नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत स्वच्छता विभागास अर्धसमास पत्र क्र.192 दि.14/12/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही अंतिम परिच्छेद त्यामुळे .करण्यात आला.

DRAFT

DATGAGM8201 (Ref No : 192)

## *142 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये उद्यान विभागास लागणारे लोखंडी ट्री गार्ड खरेदीतील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2915280.00 /-

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेच्या भांडार विभागाने उद्यान विभागासाठी लोखंडी ट्री गार्ड खरेदी करताना निविदेची जाहिरात स्थानिक पातळीवरून प्रसिध्द होणाऱ्या वर्तमानपत्रात दिल्यामुळे निविदेचा योग्य प्रचार, प्रसार झालेला नाही.त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला नाही. निविदा स्वीकारताना प्रत्यक्ष बाजारभावाची खात्री केलेली नाही.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे भांडार विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने उद्यान विभागासाठी खरेदी केलेल्या लोखंडी ट्री गार्डच्या खरेदीमध्ये खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1.भांडार विभागाने लोखंडी ट्री गार्ड खरेदीबाबत सन 2011-12 मध्ये दि.18/07/2011 रोजी अमरावती येथून प्रसिध्द होणारे 'विदर्भ मतदार ' व 'प्रतिदिन अखबार' या वर्तमानपत्रामध्ये निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु सदरील दोन्हीही वर्तमानपत्रे हे स्थानिक पातळीवरून प्रसिध्द होणारे व कमी खपाचे असल्यामुळे निविदेचा योग्य तो प्रचार व प्रसार झालेला नसून महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस/1088/(2512)/उद्योग-6 मंत्रालय, मुंबई-32 दि.02, जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.10.8 चा भंग झालेला आहे.

2.जाहिरातीमध्ये प्रसिध्द केल्याप्रमाणे निविदा फॉर्म विक्रीचा कालावधी दि.20/07/2011 ते दि.26/07/2011 असा एकूण 07 दिवस ठेवण्यात आलेला आहे व निविदा स्वीकारण्याचा कालावधी दि.20/07/2011 ते दि.28/07/2011 असा एकूण 09 दिवस विहित करण्यात आला होता.त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेला निविदा भरण्याचा किमान तीन आठवड्याचा कालावधी देण्यात आलेला नाही.

3.उपरोक्त शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सदरील साहित्य खरेदी करताना वस्तूच्या किंमतीबाबत शासनाचा दरकरार उपलब्ध आहे किंवा नाही? याची खात्री केल्याबाबत कोणताही अभिप्राय टिप्पणीमध्ये नमूद केलेला नाही. याचाच अर्थ असा की, विभागाने शासनाच्या दरकराराची खात्री केलेली नाही.

4.उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागाने सदरील साहित्याचे निविदा धारकाने निविदेमध्ये नमूद केलेले दर व प्रत्यक्ष बाजारातील दर याबाबत खात्री केलेली नाही. याबाबत कोणताही तपशील टिप्पणीमध्ये नमूद केलेला नाही.त्यामुळे निविदा धारकाने दिलेले वस्तूचे दर बाजार दरापेक्षा कमी असल्याची खात्री पटत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत भांडार विभागास अर्धसमास पत्र क्र.129 दि.09/11/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DRAFT

## *143 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम 129 अन्वये सामान्य कराचे दर सुधारित न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेच्या कर आकारणी व निर्धारण विभागाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम 129 अन्वये सामान्य कराचे दर प्रत्येक पाच वर्षाने सुधारित करणे आवश्यक असताना तसा प्रस्ताव महानगरपालिकेसमोर ठेवलेला दिसून आलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित असताना मालमत्ता कराचे दर सुधारित न केल्यामुळे उत्पन्नात वाढ झालेली नाही.***

DRAFT

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे कर निर्धारण व आकारणी विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1.सद्य:स्थितीत मालमत्तेच्या करयोग्य मूल्य निर्धारण करण्याचे दर अतिशय अल्प असून ते फार वर्षापूर्वी निश्चित करण्यात आलेले आहेत.

2.सन 2005-06 या आर्थिक वर्षामध्ये सादर सुधारित करण्यात आलेले आहेत.त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कराचे नाव | कराचा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | सामान्य कर | 30% | कर योग्य मूल्यावर |
| 2. | वृक्षकर | 1% | कर योग्य मूल्यावर |
| 3. | अग्निकर | 2% | कर योग्य मूल्यावर |
| 4. | पाणीपट्टी कर | 10% | ज्या मालमत्तामध्ये स्वत:ची पाण्याची व्यवस्था नाही. अशा मालमत्तावर. |
| 5. | स्ट्रीटकर | 4%(निवासी)<br>8%(गैरनिवासी) | कर योग्य मूल्यावर (15000/-व त्यापेक्षा जास्त कर योग्य मूल्य असणाऱ्या मालमत्तेवर.) |

शासनाचे कर

| अ.क्र. | कराचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1. | शिक्षण कर | सरकारी नियमानुसार व दरानुसार. |
| 2. | रो.ह.यो. उपकर | सरकारी नियमानुसार व दरानुसार. |
| 3. | मोठ्या निवासी इमारतीवरील कर | राज्य शासनाचे सरकारी नियमानुसार व दरानुसार. |

अकृषक परवानगी प्राप्त खुल्या भूखंडावरील कर

| अ.क्र. | कराचे नाव | कराचा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | सामान्य कर | 12% | कर योग्य मूल्यावर. |
| 2. | वृक्षकर | 1% | कर योग्य मूल्यावर. |
| 3. | शिक्षण कर | --- | शासकीय नियमानुसार. |

3.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम-129 अन्वये दर पाच वर्षांनी कराचे दर सुधारित करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन 2010-11 या आर्थिक वर्षामध्ये हे दर सुधारित करणे आवश्यक होते.परंतु विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत कर निर्धारण व आकारणी विभागास अर्धसमास पत्र क्र.186 दि.07/12/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 186)

## *144 श्री.एम. ए. खान स्वाथ्य निरीक्षक यांच्या सेवापुस्तकातील त्रुटींबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 12**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 113000.00/-

***अमरावती शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाचे स्वाथ्य निरीक्षक श्री.एम.ए.खान यांना चुकीची कालबद्ध पदोन्नती मंजूर करण्यात आलेली आहे. नियमित वार्षिक वेतनवाढी मंजूर करण्यात आलेल्या नाहीत.सेवाप्रवेशाचेवेळी वैद्‌यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी केलेली नाही.***

अमरावती शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना श्री.एम.ए.खान स्वाथ्य निरीक्षक यांच्या सेवापुस्तकात खालील त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1.म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम -1981चे नियम-38 अन्वये जन्मतारखेची पडताळणी मूळ दस्तऐवजावरून करून ती सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली नाही.

2.म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम-1981 अन्वये सेवाप्रवेशाचेवेळी शारीरिकदृष्टया सक्षम असल्याचे वैद्‌यकीय मंडळाचे प्रमाणपत्र व जिल्हा पोलीस अधिक्षकाचे चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही व तशी नोंद सेवापुस्तकामध्ये आढळून आलेली नाही.

3. म.ना.से.(वेतन) नियम-1981 अन्वये सन 1988,1989,1990,1991,1992,1993,1994,1997 व 1998 या वर्षाच्या नियमित वार्षिक वेतनवाढी सेवापुस्तकामध्ये मंजूर करून त्यावर सक्षम प्राधिकाऱ्याने त्यवर स्वाक्षरी कलेली नाही.तसेच सन 2000,2002,2003,2004,2005,2006 या वर्षीच्या नियमित वार्षिक वेतनवाढी सेवापुस्तकात मंजूर केलेल्या नाहीत. वेतनवाढी का मंजूर केल्या नाहीत याचा बोध होत नाही. वेतनवाढी मंजूर नसताना वेतन अदा केलेले आहे.वेतनवाढी थोपविल्या असतील तर खात्री करून झालेल्या जादा शोधनाची वसूली करून महानगरपालिकेच्या खाती भरावी.

4.मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण अथवा सूटबाबत नोंद सेवापुस्तकात दिसून येत नाही.

5.चौथ्या वेतन आयोगामध्ये कालबद्ध पदोन्नती मंजूर करताना वेतनश्रेणी 1400-40-1800-50-2300 या वेतनश्रेणीऐवजी 1400-2600 ही वेतनश्रेणी अनुज्ञेय असल्याबद्दलचे आदेश अथवा शासन निर्णय लेखापरीक्षणास दर्शविलेले नाहीत.

6.पाचव्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती विहित नमुन्यात केलेली नसून वेतननिश्चिती बरोबर असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याकडून पडताळणी केलेली नाही.तसेच सन 1995 ची कालबद्ध पदोन्नतीची वेतननिश्चिती विहित नमुन्यात केलेली नसून त्याचीदेखील पडताळणी केलेली नाही.

7.दि.02/11/2003 चा मा.आयुक्त, मनपा, अमरावती यांनी निलंबित केलेला आदेश लेखापरीक्षणास दर्शविलेला नाही.

8.मा.आयुक्त,मनपा, अमरावती यांचे आदेश क्रमांक अमनपा/साप्रवि/उपा/पदोन्नती/518/06, दि.01/06/2006 अन्वये संबंधिताना स्वाथ्य निरीक्षक या पदावरून जेष्ठ स्वाथ्य निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यात आलेली

DRAFT

आहे. व दि.13/08/2007 पासून दुसरी कालबद्ध पदोन्नती मंजूर केलेली आहे. पदोन्नतीनंतर केवळ चौदा महिन्याच्या आतच दुसरी कालबद्ध दिलेली आहे. दुसरी कालबद्ध पदोन्नती अनुज्ञेय आहे का? याबाबतचे दस्तऐवज लेखापरीक्षणास दर्शविले नाहीत. चुकीची कालबद्ध पदोन्नती दिल्याची शंका आहे.खात्री करावी. चुकलेली कालबद्ध पदोन्नती सक्षम प्राधिकाऱ्याने रद्द करून झालेल्या जादा शोधनाची वसुली करून महानगरपालिकेच्या खाती भरावी. वसूलपात्र अंदाजे रु.1,13,000/-(मूळ वेतन+ग्रेड वेतन+महागाई भत्ता+घरभाडे भत्ता+वार्षिक वेतनवाढ) दि.13/08/2007 ते दि.31/01/2016 या सेवानिवृतीच्या तारखेपर्यंत झालेल्या जादा शोधनाची वसुली करणे आवश्यक आहे.वसुलीचे विवरणपत्र तयार करून सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेणे आवश्यक आहे.

9.सेवापुस्तकातील पृष्ठ क्र.23 वरील नोंदीनुसार एकूण 470 दिवस अर्जित रजा सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाच्या बदल्यात जमा करण्यात आलेली आहे.त्याबाबत उपायुक्त,मनपा,अमरावती यांचे आदेश लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेले नाहीत. सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाच्या बदल्यात अर्जित रजा रजाखाती नोंदविण्याची तरतूद म.ना.से. (रजा) नियम 1981 मध्ये असल्याचे दस्तऐवज, शासन निर्णय, परिपत्रक लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेले नाहीत.

10.म.ना.से.(रजा) नियम-1981 अन्वये दि.01/04/2004 पासून रजाखाती अर्जित व अर्धवेतनी रजांची नोंद घेण्यात आलेली नाही.तसेच रजेची प्रत्येक नोंद सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली नाही.

11.म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) 1981 अन्वये दि.31/01/2002 नंतर वेतन देयकांच्या मूळ प्रतीवरून सेवा पडताळणी केलेली नाही.

12.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39, दि. 19/03/2003 नुसार योग्य ती संगणक अर्हता प्राप्त केल्याची किंवा MS-CIT परीक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात आढळून आलेली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत स्वच्छता विभागास अर्धसमास पत्र क्र.123 दि.03/11/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 123)

DRAFT

# कलम ९ ब खालील आक्षेप

DRAFT

### *3 वार्ड क्र.32 मधील बी.एस.एन.एल.चा मोबाईल टॉवर रेल्वे स्टेशेन एरीया यांनी शिक्षण व रोजगार हमी(उपकर) न भरल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 82620.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 82620.00/-

***वार्ड क्र.32 मधील बी.एस.एन.एल.चा मोबाईल टॉवर रेल्वे स्टेशन एरीया यांनी शिक्षण व रोजगार हमी(उपकर) न भरल्यामुळे राज्य शासनाचे आर्थिक नुकसान केले आहे.***

DRAFT

1.अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करीत असताना झोन नं. 2 (मध्य झोन) येथील सन 2012-13 या आर्थीक वर्षातील सामान्य कराची वसुली करताना वार्ड क्र.32 मधील बी.एस.एन.एल. चा मोबाईल टॉवर रेल्वे स्टेशन एरीया यांनी महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी(उपकर) अधिनियम 1962 मधील तरतुदीनूसार व महाराष्ट्र शासन शासन निर्णय महसुल व वन विभाग क्र.इजीसी/1097/प्र.क्र.199/ल-5, दि.20/01/2003 अन्वये मालमत्ता क्र.969/1 यांनी रोजगार हमी उपकर व शिक्षण कर एकुण रु.82620/- भरलेला नाही. एकुण वसुलपात्र रु.82620/- आहे.

2.याप्रमाणेच महानगरपालिका हद्दीतील इतर मोबाईल टॉवरबाबत रोजगार हमी ( उपकर) व शिक्षण कर वसुलीबाबत कारवाई करून रक्क्म शासनाच्या खाती भरावी.

उपरोक्तबाबत कर आकारणी व वसुली विभागास अर्धसमास पत्र क्र.19दिनांक 28/07/2015 अन्वये अनुपालन सादर करण्यास कळविले असताना विभागाने अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 19)

### *4 वार्ड क्र.18 मधील सामान्य कराची वसुली करताना केलेल्या आर्थिक अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2740.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2740.00/-

| |
|---|
| ***वार्ड क्र.18 मधील सामान्य कराची वसुली करताना वसुली लिपिकाने दि.08/02/2013 ते दि.15/04/2013 या कालावधीमध्ये केलेली वसुलीची रक्कम महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता-1971 अन्वये तात्काळ भरणे आवश्यक असताना विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच वापरलेल्या रकमेवरचे व्याज वसूल केलेले नाही.*** |

1.अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करीत असताना झोन नं. 2 (मध्य झोन) येथील सन 2012-13 या आर्थीक वर्षातील सामान्य कराची वसुली करताना वार्ड क्र.18 चे पावतीपुस्तक क्र.7953 चे छापील पावती क्र.795293 ते 795300 या पावत्या दि.28/01/2013 रोजी आर्थीक वर्ष न संपताच रद्द करण्यात आलेल्या आहेत. मध्यावधी पावत्या रद्द करण्याचे प्रयोजन कळत नाही.

2.पावतीपुस्तक क्र.8599(वार्ड क्र.18) पावती क्र.859824 ते 859882 यावर रकमा वसुल केल्याची तारीख नमुद केलेली नाही. सदर पावत्यांची एकुण रक्कम रु.91304/- दि.8/2/2013 नंतर वसुल केलेली असावी. परंतु सदर रक्कमेचा भरणा महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 1971 अन्वये तात्काळ करणे आवश्यक असतांना वसुली लिपीकाने दि.15/04/2013 रोजी भरणा केलेली आहे. रक्क्मेचा भरणा तात्काळ करणे आवश्यक असतांना संबंधीतांनी रक्कम विहित वेळेत भरली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदरील रक्कम लेख्याबाहेर राहण्याची अनियमितता झाली आहे.तसेच संबंधीताच्या कृतीवर त्यांच्या वरिष्ठांनीदेखील लक्ष दिले नसल्याचे स्पष्ट होते.संबंधीतांनी दि.8/2/2013 ते दि.15/4/2013 या कालावधीमध्ये वसुल केलेली रक्कम बरोबर आहे किंवा नाही? तसेच सदरील वसुलीसाठी आणखी किती छापील पावतीपुस्तकांचा वापर करण्यात आला? याचा शोध घेणे आवश्यक आहे. तसेच संबंधीतावर महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 (सुधारणा 2011) अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3. सबधिताकडून वापरलेल्या रकमेचे व्याज बॅकेच्या व्याजाप्रमाणे वसूल करणे आवश्यक आहे. रू.2740/-

उपरोक्तबाबत कर आकारणी व वसुली विभागास अर्धसमास पत्र क्र.19दिनांक 28/07/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असताना विभागाने अनुपालन दर्शविले नाही . त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे .

DATGAGM8201 (Ref No : 19)

## *6 महानगरपालिका क्षेत्रातील औद्योगिक मालमत्ता धारकांनी सन 2005-06 पासून सामान्य कर न भरल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 03**



DRAFT

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 100416746.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 100416746.00/-

***महानगरपालिका क्षेत्रातील काही औद्योगिक मालमत्ता धारकांनीसन 2012-13 या आर्थीक वर्षामध्ये देय असणा-या करापैकी अंशतः कराचा भरणा केलेला दिसून येतो. सदरील औद्योगिक मालमत्ता धारकांनी त्यांचे संपुर्ण कर भरलेले नाहीत. संबंधीताकडे दि.31/03/2013 रोजी एकूण रू.100416746/- इतकी थकबाकी आहे.***

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करीत असतांना झोन नं.4 च्या सामान्य कराच्या वसुलीमध्ये खालील प्रमाणे आक्षेप आढळून आलेले आहेत.

1. म.न.पा. अमरावती ने दि.4/3/2013 रोजी काही औद्योगिकमालमत्ता धारकाकडून सामान्य कर वसूल करण्यात आलेला आहे. परन्तु सदरील मालमत्ता धारकांनी अंशतः कर भरणा केल्याचे आढळून आले आहे ,तसेच यापूर्वीचे देय कर सदरील मालमत्ता धारकाकडे थकीत असल्याचे आढळून आले आहे .

2.औद्योगिक मालमत्ताे धारकांनी सन 2005-06 पासून महाराष्ट्र प्रान्तिक महानगरपालिका अधिनियम 1949 (सुधारणा-2011) अन्वये सामान्य कराची अदायगी केलेली नाही. वसूलपात्र रक्कम खालीलप्रमाणेआहे.

| अ. क्र . | वार्ड क्र. | एकूण औद्योगिक मालमत्ता | दि.31/03/2013 अखेर थकित रक्कम रू. |
|---|---|---|---|
| 1. | 58 | 05 | 1844558/- |
| 2. | 61 | 406 | 89615725/- |
| 3. | 68 | 93 | 8956463/- |
| एकूण | ----- | ------ | 100416746/- |

3.महानगरपालिका अमरावतीकडून सदरील कराची वसुली होनेस्तव सत्वर कारवाही होणे आवश्यक आहे.

उपरोक्तबाबत कर आकारणी व वसुली विभागास अर्धसमास पत्र क्र.20दिनांक 28/07/2015 अन्वये अनुपालनास्त्व कळविले असताना विभागाने अनुपालन दर्शविले नाही . त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे .

DATGAGM8201 (Ref No : 20)

***9 रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करणे,योजनेचे मार्गदर्शन करणे,निवड झालेल्या लाभार्थीचे प्रकरण तयार करणे,जुण्या कच्च्या घराचे व जागेचे मोजमाप करणे तसेच***

***नवीन घराचा आराखडा तयार करणे इत्यादीसाठी प्रकल्प व्यवस्थापक (PMC) नेमणूक करणे बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 08**

*लेखा शीर्ष : रमाई आवास योजना शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 5970017.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5485516.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 484501.00/-

***अशा प्रकारची कामे सेवाभावी संस्थेकडून करून घेण्याचे निर्देश असतांना खाजगी इंजिनियर/आर्किटेक यांचेकडून काम करून घेण्यात आलेले आहे. निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक असतांना केवळ एका वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द केली आहे. निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस (दिनांक-31.12.2011) देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी दिनांक-01.01.2012 रोजी रविवार सुटी असल्याने दिनांक-02.01.2012 रोजी निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे. निविदेतील अटी/शर्तींची निविदाधारक पूर्तता करत नसल्याने अवैध निविदा स्विकृत करून कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. आयकर अधिनियमातील कलम 194 जे नुसार व्यवसायिक सेवा प्रदानातुन 10 % दराने आयकर कपात करणे आवश्यक असतांना 2% दराने आयकर कपात केली आहे. सदर कामासाठी रु.7000 मुद्रांकशुल्क घेणे आवश्यक असतांना रु.6900 कमी मुद्रांक शुल्क घेण्यात आलेले आहे. प्रकल्प व्यवस्थापक नेमणुकीसाठी जाहीर निविदा मागवितांना प्रति घरकुल दर मागविणे अभिप्रेत असतांना एकमुस्त शुल्क तत्वावर निविदा मागविल्या आहेत.***

DRAFT

रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करणे,योजनेचे मार्गदर्शन करणे,निवड झालेल्या लाभार्थांचे प्रकरण तयार करणे,जुण्या कच्च्या घराचे व जागेचे मोजमाप करणे तसेच नवीन घराचा आराखडा तयार करणे इत्यादीसाठी प्रकल्प व्यवस्थापक (PMC) नेमणूक करणेसाठी महानगरपालिकेने दिनांक-28.12.2011 रोजी दै.लोकपथ या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून निविदा मागविल्या होत्या. कोऱ्या निविदा प्राप्त करण्याचा कालावधी दिनांक-31.12.2011 रोजी ठेवण्यात आला होता व भरलेल्या निविदा स्विकृतीचा दिनांक-02.01.2012 ठेवण्यात आला होता. प्राप्त तीन निविदांपैकी पेव्हटेक कन्सल्टंट पुणे यांची रु.79 लक्ष दाराची न्यूनतम निविदा (एकूण 1293 घरकुल गृहीत धरून प्रति घरकुल रु.6109 दराने) स्थायी समिती ठराव क्र.223 दिनांक-03.01.2012 अन्वये स्विकृत करून संबधितास दिनांक-20.03.2012 रोजी कामाचे आदेश देण्यात आलेले आहे.सदर कामाची संचिका तपासली असता त्यात खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2 दिनांक-09

मार्च 2010 मधील मुद्दा क्र.11 नुसार अशा प्रकारची कामे सेवाभावी संस्थेकडून करून घेण्याचे निर्देश आहेत.तथापि मनपाने रजिस्टर्स इंजिनियर/आर्किटेक व अशासकीय सेवाभावी संस्थाकडून एकमुस्त शुल्क तत्वावर निविदा मागविल्या आहेत.त्यामुळे निविदा मागवितांना उपरोक्त शासन निर्देशाचे पालन झालेले नाही.

2. सदर कामाची निविदा दिनांक-28.12.2011 रोजी दै.लोकपथ या एकमेव वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही न केल्याने निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्याचे निदर्शनास आले त्यामुळे स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेस लाभ मिळालेला नाही.

3. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 202 टीप-2 नुसार निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ एकाच दिवस (दिनांक-31.12.2011) देण्यात आलेला आहे व त्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी दिनांक-01.01.2012 रोजी रविवार सुटी असल्याने दिनांक-02.01.2012 निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे. वास्तविक पाहता निविदा प्रसिध्दी पासून निविदा विक्रीस ठेवणे अपेक्षित होते. स्विकृतीसाठी पुरेसा कालावधी देण्यात आलेला नसल्याचे यावरून स्पष्ट होते हि अतिशय गंभीर बाब आहे.

4. निविदेतील अट क्र.1 नुसार निविदाधारकास अशा प्रकारचे कामे केल्याचा कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. तथापि पेव्हटेक कन्सल्टंट पुणे व इतर निविदाधारकांनी निविदे सोबत सादर केलेल्या अभिलेख्यानुसार कोणत्याही निविदाधारकास अशा प्रकारचे कामाचा अनुभव नसल्याचे निदर्शनास आले.निविदेतील अटी/शर्तीची निविदाधारक पूर्तता करत नसल्याने अवैध निविदा स्विकृत करून कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत.हि सुद्धा अतिशय गंभीर बाब आहे.

5. या कामाचे प्रकल्प व्यवस्थापक पेव्हटेक कन्सल्टंट पुणे यांना आठव्या धावते देयका पर्यंत रू. 5970017 चे प्रदान केलेले आहे. त्यांचे प्रत्येक देयकातुन 2% प्रमाणे आयकराची रक्कम कपात केलेली आहे. आयकर अधिनियमातील कलम 194 जे नुसार व्यवसायिक सेवा प्रदानातुन 10 % दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार त्यांचे प्रत्येक देयकातुन 8% कमी दराने आयकर कपात केल्याने रक्कम रू. 477601वसुल करुन आयकर (TDS) कपात "0021" आयकर या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

6. सदर कामासाठी ठेकेदाराकडून करारनाम्यापोटी रु. 100 चे मुद्रांकशुल्क घेण्यात आलेले आहेत. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 व महसुल व वन विभाग अधिसूचना दिनांक- 23.04.2006 (अनुच्छेद 63) नुसार कार्यकंत्राटासंबंधित करारनामा रु. 10 लक्ष पर्यंत रु.100 व पुढील प्रत्येक लाखास रु.100 अधिकतम रु. 5 लक्ष अशा मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामासाठी रु.7000 मुद्रांकशुल्क घेणे आवश्यक असतांना रु.6900 कमी मुद्रांक शुल्क घेण्यात आलेले आहे. ते संबंधित ठेकेदारांकडून वसुल करुन "0030 मुद्रांक व नोंदणी" या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

7. करारनाम्यातील अट क्र.11 नुसार प्रत्येक घरकुलाचे कामाचे गुणवत्ता नियंत्रणाचे प्रमाणपत्र घेणे अनिवार्य

DRAFT

आहे.तथापि एकाही घरकुलाचे गुणवत्ता नियंत्रणाचे प्रमाणपत्र संचिकेत निदर्शनास आले नाही. अशा प्रकारचे प्रमाणपत्र न घेताच प्रकल्प व्यवस्थापकास अदाई करण्यात आलेली आहे.

8. महानगरपालिकेने प्रकल्प व्यवस्थापक नेमणुकीसाठी जाहीर निविदा मागवितांना प्रति घरकुल दर मागविणे अभिप्रेत असतांना एकमुस्त शुल्क तत्वावर निविदा मागविल्या आहेत. त्यामुळे न्यूनतम प्रति घरकुल रु.6109 एवढा दर प्राप्त झाला आहे. प्रति घरकुल शुल्क तत्वावर निविदा मागविल्या असत्या तर कमी दर प्राप्त झाले असते दर कमी करण्यासाठी विभागाने वाटाघाटी करणे आवश्यक होते.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 52 दिनांक- 28.09.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 52)

## *22 कंत्राटी स्वास्थ निरिक्षक हयांचे माहे जानेवारी 2013 चे देयक रु.26040/- मंजुरी बाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : मनपा मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 26040.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 19530.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 6510.00/-

***कंत्राटी स्वास्थ् निरिक्षक हयांचे देयक मंजुरी बाबत.***

अमरावती स्वच्छता विभागाअंतर्गत वार्डातील/प्रभागातील साफसफाईचे काम करुन घेणे व नियंत्रण ठेवण्या करीता 3 कंत्राटी स्वास्थ निरिक्षक यांची नियुक्ती करण्यात आली होती.त्यांचे खालील प्रमाणक तपासणी केली असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

प्रमाणक क्र.11859 ते 118611 दि.28/3/2013 रु.26040

1. माहे जानेवारी 2013 चे संबंधीत कंत्राटी स्वास्थ निरीक्षक यांची हजेरी देयका सोबत पहावयास मिळाली नाही.

2. श्री चोरपगार,श्री गावनेर व सौ गुल्हांने यांचे वेतन काढतांना रु.210x31 दिवस 6510 -1750 व्यावसाय कर निव्वळ रक्कम रु.6335/- प्रमाणे 3 कंत्राटी स्वास्थ निरीक्षक यांचे 6510x3=19530 काढावयाचे असतांना देयक रु.26040/- चे तयार करुन केवळ तीन जणांचे वेतन अदा करावयाचे असतांना चार कंत्राटी कर्मचार्याची रक्कम काढल्याचे दिसून येते.तरी रु.6510/- चे अतिप्रदान झाल्याचे दिसून येते. तरी रु.6510 संबंधीताकडून वसुल करुन मनपा लेखाशिर्ष क्र.137 पर्यावरण



DRAFT

अस्थायी आस्थापना खाती जमा करुन पुर्तता करणे जरुरी आहे.
3.उपरोक्ती कर्मचा-यांचे वेतन रोजंदारी हजेरीपत्रकानूसार काढण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यांचे नावासमोर रक्क्म नमुद नसून जादा अदा करण्यात आलेले रु.6510/- कोणास अदा केले हे समजू शकले नाही. तरी लेखापरिक्षणात रोजंदारी हजेरीपत्रक दर्शवून खात्री पटवावी.
4.ठराव क्र.56 दि.29/8/2012 अन्वतये वेतन काढण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. परंतु अनियमित/रोजंदारी/कंत्राट पद्धतीवर/मानधनावर/हंगामी पद्धतीने नेमलेल्या कर्मचा-यांना सेवेत सामावून घेण्यासाठी स्थायी निर्देश क्र.29 दि.17/03/05 मधील मा.उच्च न्यायालय,मा.सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन न करता सदरील कार्यवाही केल्याचे स्पष्ट होत आहे.
तरी रु.6510/- अदायगी बाबत योग्य ते अनुपालन अर्धसमास पत्र क्र.42 दि 16.09. 2015 नुसार दर्शविन्यात न आल्याने परिछेद नोद्विन्यात येत आहे.

DATPDMM6101 (Ref No : 42)

## *26 वार्ड क्र.03 हमालपूरा येथील सन 2012-13 या आर्थिक वर्षातील सामान्या कराच्या वसुलीतील अनियमिततेबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 12**

*लेखा शीर्ष : मनपा निधि*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1389.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1389.00/-

***वार्ड क्र.03 हमालपूरा येथील सन 2012-13 या आर्थिक वर्षातील सामान्यल कराच्याप वसुलीतील अनियमिततेबाबत***

DRAFT

अमरावती महानगरपालिका सन 2012-13 या वित्ती य वर्षाचे लेखापरिक्षणात मालमत्ता कर व इतर कर वसुलीच्याग लेख्यां1ची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे त्रृटी निदर्शनास आल्या आहेत.
1.मालमत्ता कर नोंदवहया प्रमाणित केलेल्यास नाहीत. महाराष्ट्रा नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 8 नूसार लेखापुस्तोके,नोंदपुस्ताके, मजबुत बांधणीची,त्यातील पाने क्रमांकीत व मनपाच्या सामायिक मोहराने शिक्कामोर्तब केलेली असावीत. एकुण पानांची संख्या, पुस्त्काच्या शेवटच्या पानावर प्रत्यक्ष मोजणीनूसार लिखीत स्वरुपात अधिका-याने प्रमाणित करावी. तथापि तशी कार्यवाही झालेली नाही.
2.कर आकारणी नोंदवहीतील वर्ष कर,आकारणीबाबत घेतलेल्या नोंदी,सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेल्या नाहीत.

3.दरवर्षी कर आकारणी करीत असतांना मागील थकबाकी रक्कम नोंदवहीत आकारणीची नोंद घेण्यात आलेली नाही. सदरील नोंद संगणकावरील अभिलेख्यात असल्याचे समजते.

4.कर आकारणी व त्यानूसार केलेली वसुली यांची नोंद घेतांना नोंद घेणा-या कर्मचा-याने तसेच सदर नोंदी पडताळणी करुन वार्ड अधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे.

5.वार्ड क्र.65 बेनोडा येथे पावतीपुस्तक क्र.8056 मधील पावती क्र.805550 दि.20/4/2012 श्री दत्तात्रय श्रीपाद टोकेकर मालमत्ता क्र.5 ची रु.1389/- जमा नाहीत. तरी सदरील बाबत विचारणा केली असता नजरचुकीने भरणा करावयाचा राहीला असे संबंधीताने सांगितले. तरी रु.1389/- चा तात्पुरता अपहार झाल्याचे दिसून येते तरी त्वरीत लेखापरिक्षणास भरणा करुन दर्शवावे यावरुन वसुली अधिका-याच्या कामावर योग्य नियंत्रण नसल्याचे दिसून येते.

6. कराची सन 2012-13 ची मागणी नोंदवहीत नोंदविलेनंतर थकीत रक्कमेसह लेखासंहिता नियम 07 नूसार मागणी देयके करदात्यांना पाठविल्यांबाबत मागणी नोंदवहीत नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे वेळीच करदात्यांकडे कराची मागणी केल्याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

7.थकीत करदात्यांना आकारणी केलेली नोटीस फी,वारंट फी, तसेच दंड रकमांची नमुना क्र.51 मध्ये स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तसेच सदर रक्मांची वसुली व थकबाकींचा स्वतंत्र तपशील ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे खात्री करता आलेली नाही.

8. वार्ड क्र.26,29 ची वसुली 50 टक्केपेक्षाही कमी असल्याचे दिसून आले. तरी वसुलीची टक्केवारी वाढविणे आवश्यक आहे.

9. खालील पावतीपुस्तके लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत.

| पावतीपुस्तके क्र. | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 7837 | 8007 | 8016 | 8026 | 8389 | |
| 7838 | 8008 | 8018 | 8028 | 8393 | |
| 7839 | 8009 | 8019 | 8030 | 8397 | |
| 7840 | 8010 | 8020 | 8031 | 8766 | |
| 8001 | 8011 | 8021 | 8035 | 8767 | |
| 8003 | 8012 | 8022 | 8039 | 8781 | |
| 8004 | 8013 | 8023 | 8361 | 9086 | |
| 8005 | 8014 | 8024 | 8373 | 9087 | |
| 8006 | 8015 | 8025 | 8381 | | |

त्यामुळे पावतीपुस्तकाद्वारे जमा झालेला निधी महानगरपालिकेच्या मनपा निधीत जमा झाला असे म्हणता येणार नाही. तरी सदरील पुस्तके दर्शवावी.

10.वार्ड क्र. 30 कॉग्रेस नगर मधील मार्च 2013 ची मुळ चालान पहावयास मिळाली नाही.

11.हस्तांतरण नोंदवही प्रमाणित करण्यात आलेली नाही.

12.मोबाईल टॉवरची सन 2012-13 ची एकुण मागणी व वसुली पहावयास मिळाली नाही. परंतु सन 2014-15 पर्यंत एकुण थकबाकीचे विवरण जे मनपाने सादर केले आहे. त्यावरुन सन 2014-15 पर्यंतची एकुण थकबाकी खालील प्रमाणे आहे.

| अक्र | वार्ड क्र. | मालमत्ता क्र. | मोबाईल टॉवरचे नाव | वार्षिक मागणी | सन 2014-15 पर्यंत एकुण |
|---|---|---|---|---|---|

DRAFT

| | | | | | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 27 | 1508/A-1 | श्री रत्नाकर सु.अभ्यंकर (Reliance) | 102812 | 424631 |
| 2 | 27 | 1596/1<br>831/3A<br><br>1325/I | गोपालसिंह वि. मखर (IDEA)<br>सौ शामला र.कटके (Tata Tower VIOMTower)<br>अशोक बाळकृष्ण ठाकरे (Bharti.Tel) | 60480<br>60480<br><br>30240 | 60480<br>60480<br><br>30240 |
| 3 | 28 | 1721/88A<br><br>1721/88B | किशोर मंत्री (टाटा टेलिसर्व्हीवस प्रा.लि.)<br>किशोर मंत्री (क्यातपो इन्फ्रा स्ट्रंक्चंर्स प्रा.लि. ) | 110271<br><br>104328 | 110271<br><br>104328 |
| 4 | 30 | 467/I<br>88/I<br>754/27<br>745/26 | टाटा मोबाईल टॉवर<br>इंडस मोबाईल टॉवर<br>वोडाफोन टॉवर<br>बी.एस.एन.एल टॉवर | 49896<br>120960<br>36288<br>26006 | 49896<br>289901<br>36288<br>120439 |
| 5 | 48 | 787/1<br>918/5<br>209/2 | गुरुचरणसिंग बग्गाक (इंडस टॉवर)<br>सुलभा प्रकाश ढेपे (वोडाफोन टॉवर)<br>अनंतकुमार बरडीया(रिलायंस टॉवर) | 19353642236<br><br>60480 | 470292<br>42236<br>60480 |
| 6 | 49 | 301/1 | अशोक व्ही काळे, सविता अ.काळे (VIOMTower) | 78624 | 366912 |
| 7 | 65 | 1253/4 | सुभाष अमृतराव घाटे VIOMTower | 64480 | 128960 |

वार्ड क्र.49 व 65 बाबत टॉवरचे मालमत्ताच कर वसुली प्रकरणी मुंबई हायकोर्टाचे पत्र प्राप्त झाले असून सदर पत्र विधी अधिकारी यांचेकडे मार्गदर्शनाकरीता पाठविण्यात आलेले आहे.
तरी संबंधीत टॉवर कंपनीकडून वसुली करुन दर्शवावे उपरोक्त अर्धसमास पत्र.क्र.22.दि.28.07.2015चे अनुपालन लेखा परीक्षणात सादर करण्यात आले नाही.त्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATPDMM6101 (Ref No : 22)

## *34 नोंदवहीमध्ये पावत्या तारीखवार न लिहिल्याबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 516493.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 516493.00/-

***अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-2013 च्या लेखापरीक्षणात मालमत्ता कर वसुलीच्या रकमा नोंद वहीमध्ये नोंदविताना योग्य रित्या नोंदविल्या नाही.***

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 79 नुसार करसंकलन विभागाने संकलन पुस्तकातील (नमुना नं.50) नोंदी मूळ पावत्यांशी पडताळून पाहणे व पुस्तकांतील बेरजांची तसेच चलानावरील आकड्यांचा मेळ घालून तसे प्रमाणपत्र दिल्यानंतरच वसूल रक्कमा रोखपालाकडे जमा करावयाच्या आहेत.तथापी लेखासंहितेतील सदर तरतुदीनुसार कार्यवाही झालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 चे कलम 83 व महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971चे नियम क्र. 11 नुसार प्रत्येक पावतीची रक्कम त्याच दिवशी जमा रकमेच्या नोंदवहीमध्ये नोंदवणे आवश्यक आहे.

परंतु बाजार व परवाना विभागाने 2012-13 या वित्तीय वर्षात वसुलीसाठी वापरलेल्या पावती पुस्तक क्र. 805 व पावती पुस्तक क्र. 957 अन्वये वसूल केलेल्या रकमांच्या नोंदींमध्ये तारखांमध्ये तफावत दिसून येत आहे.

जमा रक्कम नोंदवहीमधील नोंदी खालीलप्रमाणे आढळून येत आहेत.

| अ. क्र. | जमा नोंदवही पान क्रमांक | पावती पुस्तक क्र | पावती क्र. | एकूण रक्कम | वसूल केल्याची तारीख | नोंदवहीत नोंद घेतल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 40 | 805 | 96,97 | 2,400/- | 30.11.12 | 30.11.12 |
| 2 | 40 | 957 | 40,41,42 | 7028/- | 9.1.13 | 9.1.13 |
| 3 | 41 | 805 | 98,99,100 | 29,825/- | 1.12.12 | 1.12.12 |
| 4 | 42 | 957 | 1,2,3 | 8,868/- | 3.12.12 | 3.12.12 |
| 5 | 43 | 957 | 5,6,7 | 7,875/- | 4.12.12 | 4.12.12 |
| 6 | 44 | 957 | 8 | 6,375/- | 5.12.12 | 5.12.12 |
| 7 | 45 | 957 | 9,10 | 5,952/- | 10.12.12 | 10.12.12 |
| 8 | 46 | 957 | 11 | 10,780/- | 11.12.12 | 11.12.12 |
| 9 | 47 | 957 | 12 | 3,145/- | 13.12.12 | 13.12.12 |
| 10 | 48 | 957 | 13,14 | 15,000/- | 14.12.12 | 14.12.12 |
| 11 | 49 | 957 | 15,16 | 4,156/- | 15.12.12 | 15.12.12 |
| 12 | 50 | 957 | 17,18,19 | 7,677/- | 17.12.12 | 17.12.12 |



DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 13 | 51 | 957 | 20 | 1,200/- | 19.12.12 | 19.12.12 |
| 14 | 52 | 957 | 21 | 11,984/- | 20.12.12 | 20.12.12 |
| 15 | 53 | 957 | 22 | 5,002/- | 27.12.12 | 27.12.12 |
| 16 | 54 | 957 | 23,24,25, 26,27 | 3,41,298/ | 31.12.12 | 31.12.12 |
| 17 | 56 | 957 | 28,29 | 5,449/- | 2.1.13 | 2.1.13 |
| 18 | 57 | 957 | 30 | 7,200/- | 4.1.13 | 4.1.13 |
| 19 | 58 | 957 | 31,32,33 | 7,807/- | 5.1.13 | 5.1.13 |
| 20 | 59 | 957 | 34 | 21,600/- | 7.1.13 | 7.1.13 |
| 21 | 60 | 957 | 95,36,37, 38,39 | 15,300/- | 8.1.13 | 8.1.13 |

जमा रक्कम नोंदवहीमध्ये दि. 30.11.12 नंतर माहे डिसेंबर 2012 या महिन्यात वसूल केलेल्या रकमांच्या पावत्या नोंदविणे आवश्यक होते. परंतु असे न करता दि. 9.1.2013 रोजी वसूल केलेल्या रकमांच्या पावत्यांची नोंद जमा रक्कम नोंदवहीतील पृष्ठ क्र. 40 वर घेण्यात आल्या आहेत.

त्यानंतर मात्र जमा रक्कम नोंदवहीतील पुढील पृष्ठ क्र. 41 ते 60 वर दि. 9.1.13 पूर्वी वसूल केलेल्या रकमांच्या म्हणजेच दि. 1.12.12 ते 8.1.13 या कालावधीत वसूल केलेल्या रकमांच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत. या कालावधीत वसूल केलेली एकूण रक्कम रु. 5,16,493 इतकी आहे.

जमा रक्कम नोंदवहीच्या प्रत्येक भरण्यावर महानगरपालिकेच्या संबंधित रोखपालाची दिनांकीत स्वाक्षरी आहे. दि. 9.1.13 रोजीच्या भरण्यावर देखील रोखपालाची अशीच दिनांकीत स्वाक्षरी आहे. त्यानंतर जमा केलेल्या रकमांच्या भरण्यावर सुद्धा रोखपालाची दिनांकीत स्वाक्षरी आहे.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे दि.9.1.13 पूर्वीच्या पूर्ण महिनाभराच्या पावत्या दि. 9.1.13 नंतर नोंदविल्या व भरणा केल्या जातात त्याअर्थी वसुलीच्या नोंदी नियमित व योग्यपणे होत नाही असा होतो.

याबाबतीत अर्धसमास पत्र क्र. 91, दि. 19.1.2015 अन्वये अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन अप्राप्त आहे. तयामुळे लेखा परीक्षण अहवालात आक्षेप नोंदविण्यात आला.

DATVKGM7601 (Ref No : 91)

## *36 सामान्य प्रशासन विभागाने प्रदान केलेल्या ग्रेड वेतनातील अतिप्रदान वसूल करणेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष :79 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 482908.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 482908.00/-

***अमरावती महानगरपालिकेचे लेखा परीक्षणाअंतर्गत सामान्य प्रशासन विभागातील सेवापुस्तके तपासली असता शासन निर्णय वित्त विभाग दि.31 ऑगस्ट 2009 अन्वये कर्मचाऱ्यांना चुकीचे ग्रेड वेतन दिल्यामुळे अतिप्रदान झाले असल्याचे आढळून आले.***

शासन निर्णय वित्त विभाग दि.31 ऑगस्ट 2009 अन्वये एकाकी पदावरील कर्मचाऱ्यांना देय असलेल्या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेतलेल्या वाहनचालक संवर्गातील कर्मचारी सर्वश्री

1) अब्दुल समद कुरेशी यांना सहाव्या वेतन आयोगानुसार आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभांतर्गत ग्रेड वेतन रु. 2100/- देय असताना जास्तीचे रु.2800/- ग्रेड वेतन देण्यात आले आहे. यद्वारे करण्यात आलेल्या अतिप्रदानाची वसुली परिगणित करून समान मासिक हप्त्यात करण्यात यावी.

सहाव्या वेतन आयोगानुसार दि. 19.4.2009 पासून आश्वासित प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभांतर्गत ग्रेड वेतन रु. 2550/- देय असताना जास्तीचे रु.3250/- ग्रेड वेतन देण्यात आले आहे. यद्वारे माहे मे 2010 पासून माहे सप्टेंबर 2015 पर्यंत प्रत्यक्षात करण्यात आलेल्या अतिप्रदानाची एकूण रक्कम **रु. 80,787/-** त्यांच्या वेतनातून समान मासिक हप्त्यात वसुली करण्यात यावी.

2) म.मुमताज शे. जाफर यांना सहाव्या वेतन आयोगानुसार आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभांतर्गत ग्रेड वेतन रु. 2100/- देय असताना जास्तीचे रु.2800/- ग्रेड वेतन देण्यात आले आहे.

तसेच सहाव्या वेतन आयोगानुसार दुसऱ्या आश्वासित प्रगती योजनेच्या लाभांतर्गत ग्रेड वेतन रु. 2550/- देय असताना जास्तीचे रु.3250/- ग्रेड वेतन देण्यात आले आहे. यद्वारे दि. 16.6.2010 रोजी मंजूर केलेल्या व माहे मे 2010 पासून माहे सप्टेंबर 2015 पर्यंत प्रत्यक्षात अतिप्रदानाची एकूण रक्कम **रु. 96,032/-** त्यांच्या वेतनातून समान मासिक हप्त्यात वसुली करण्यात यावी.

3) राजेंद्र पांडूरंग माहुलकर यांना सहाव्या वेतन आयोगानुसार पहिल्या आश्वासित प्रगती योजनेच्या लाभांतर्गत ग्रेड वेतन रु. 2100/- देय असताना जास्तीचे रु.2800/- ग्रेड वेतन देण्यात आले आहे.

तसेच सहाव्या वेतन आयोगानुसार दुसऱ्या आश्वासित प्रगती योजनेच्या लाभांतर्गत ग्रेड वेतन रु. 2550/- देय असताना जास्तीचे रु.3250/- ग्रेड वेतन देण्यात आले आहे. यद्वारे माहे मे 2010 पासून माहे सप्टेंबर 2015 प्रत्यक्षात करण्यात आलेल्या अतिप्रदानाची एकूण रक्कम **रु. 96,032/-** त्यांच्या वेतनातून समान मासिक हप्त्यात वसुली करण्यात यावी.

4) अरुण गुलाबराव सांबे वा.चा. यांना सहाव्या वेतन आयोगाअंतर्गत वेतन निश्चिती करतांना ते आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ घेत असल्यामुळे नियमाप्रमाणे रु. 1900/-+रु. 200/- इतके ग्रेड वेतन देय होते. मात्र त्यांना रु. 2800/- इतके ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. ही रक्कम रु. 700/-ने जास्त आहे.

तसेच श्री. सांबे यांना दि. 8/2/2008 पासून आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे. यावेळीही त्यांना नियमाप्रमाणे रु. 1900+रु.200/-+रु.450/- इतके ग्रेड वेतन देय असतांना एकूण

रु. 3250/- इतके ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. ही रक्कम दि. 8/2/2008 पासून रु. 700/- + म.भ.+घरभाडे भत्ता याप्रमाणे माहे मे 2010 पासून माहे सप्टेंबर 2015 पर्यंत प्रत्यक्षात करण्यात आलेल्या अतिप्रदानाची एकूण रक्कम **रु. 96,948/-** समान मासिक हप्त्यात त्यांच्या वेतनापासून वसूल करून महानगरपालिका खाती जमा करण्यात यावी व तसे अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

5) दामोधर पांडूरंगजी गोलाईत वा.चा. यांना सहाव्या वेतन आयोगानुसार दि.1/1/2006 रोजी वेतन निश्चिती करतांना ग्रेड वेतन रु. 2800/- मंजूर करण्यात आले आहेत. वास्तविक त्यांना दि. 1/1/2006 रोजी आश्वासित प्रगती योजना पहिला लाभ देण्यात आलेला होता. या तारखेला त्यांना 1900+200 इतकेच ग्रेड वेतन मंजूर करणे नियमाप्रमाणे अभिप्रेत होते. मात्र त्यांना एकूण रु. 2800/- ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. नियमाप्रमाणे ही रक्कम रु. 700/- अतिरिक्त आहे.

तसेच श्री. गोलाईत यांना दि. 1/8/2008 पासून आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे. यावेळीही त्यांना नियमप्रमाणे रु. 1900+रु.200/-+रु.450/- इतके ग्रेड वेतन देय असतांना एकूण रु. 3250/- इतके ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. ही रक्कम दि. 1/8/2008 पासून रु. 700/- + म.भ.+घरभाडे भत्ता याप्रमाणे माहे मे 2010 पासून माहे सप्टेंबर 2015 पर्यंत प्रत्यक्षात अदा केलेले एकूण अतिप्रदान **रु. 96,948/-** त्यांच्या वेतनातून समान मासिक हप्त्यात वसूल करून महानगरपालिका खाती जमा करण्यात यावी व तसेच अनुपालन सादर करण्यात यावे.

एकूण वसूलपात्र रक्कम रु. 4,82,908/- उपरोक्त संबंधित कर्मचाऱ्यांकडून वसूल करून महानगरपालिका खाती जमा करण्यात यावी.

6) श्री. रंगराव सदाशिक भालचक्र वा.चा. यांना दि. 1/6/2008 पासून आश्वासित वेतन प्रगती योजनेचा दुसरा लाभ देण्यात आला. मात्र शा.नि.क्र.वेतन-1109/प्र.क्र.41/सेवा-3, दि. 5/7/2010 अनुसार दुसऱ्या लाभासाठी एकूण रु. 2550/- ग्रेड वेतन देय असताना त्यांना केवळ रु.2200/- ग्रेड वेतन मंजूर करण्यात आल्याचे दिसून येते. म्हणजेच श्री. भालचक्र, वा.चा. यांना ग्रेड वेतनात दि. 1/6/2008 पासून रु. 350+म.भ.+घरभाडे भत्ता कमी देण्यात आला आहे.

श्री. भालचक्र यांना माहे मे 2010 पासून माहे सप्टेंबर 2015 पर्यंत कमी प्रदान केलेली रक्कम एकूण **रु. 45,010/-** त्यांना अदा करण्यात यावी.

तसेच कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपूर-1209/प्र.क्र.69/सेवा-9, दि. 5.5.2010 नुसार वेतननिश्चितीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

सहाव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करतांना बहुतांश अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्रुटी असण्याची शक्यता आहे. त्यामुळे वरील कर्मचाऱ्यांसोबतच इतरही संवर्गातील उदा. मेट, पंप अटेंडंट, गवंडी, बोरींग मेकॅनिक आणि इतर सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चितीबाबत पडताळणी करून अति किंवा कमी प्रदान झाले असल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

यासंदर्भात अर्धसमास पत्र क्र .51, दि. 28.09.2015 नुसार विभागास अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.



DRAFT

## *37 वर्ग 1 ते 5 मधील मुला-मुलींचे गणवेश खरेदी व वाटपातील नियमबाहय अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 10**

*लेखा शीर्ष :243 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4884359.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4601145.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 868008.00/-

***शासन निर्णय क्रमांक. 34/39 दि. 6 ऑगष्ट 2010 नुसार ई- निविदा कार्यप्रणाली वापरणे अनिवार्य असतांना ई निविदा न मागविता स्थानिक वृत्तपत्रात नियमबाहयरित्या जाहिरात दिली. पुरवठादारांना निविदा भरण्यासाठी कमीत कमी 3 आठवडयाचा कालावधी देण्यात आला नाही. शासन परिपत्रक दि. 3.9.2011 अन्वये मागणीपत्र प्राप्त झाल्यापासुन 6 आठवडयाच्या आत मालाचा पुरवठा न झाल्यास उशिरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर 0.5% प्रती आठवडा प्रमाणे दंड आकारण्यात आला नाही. वर्ग 1 ते5 मधील विदयार्थ्यांना किती कापड लागेल याबाबत नियमाचा आधार घेवून मागणी केली नाही. शाळेची पटसंख्या कमी असतांना शाळेला जादा गणवेश वाटप केले त्यामुळे लेखापरीक्षण दिनांकापर्यंत 1246 गणवेश शिल्ल्क आहेत. शिल्लक गणवेशाची रक्कम रूपये 8,68,008/- वसुलपात्र ठरते. गणवेश शैक्षणिक सत्र सुरू झाल्यावर माहे ऑक्टोबर मध्ये वाटप केले नाही. योजना वर्ग 1 ते 5 च्या विद्यार्थ्यांकरीताच असतांना वर्ग 6 व 7 च्या विद्यार्थ्यांना गणवेश नियमबाहयरीत्या वाटप करण्यात आले. त्यामुळे योजनेवर झालेला खर्च रूपये 46,01,145/- आक्षेपाधीन व रूपये 8,68,008/- वसुलपात्र ठरतो.***

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 10481 | 22.2.2013 | 42,95,223 | गणवेश कापड खरेदी 34705 मीटर, दि.महाराष्ट्रस्टेट हॅन्डलूम कार्पो. |
| 2318 | 22.6.2012 | 3,05,922 | गणवेश शिलाई, नग 9061, सांचल मार्केटींग |
| 11956 | 30.3.2013 | 2,83,214 | गणवेश पुरवठा, अलिशा मार्केटींग |
| | | 48,84,359/- | |

सन 2012-13 या वित्तीय वर्षातील शिक्षण विभागाचे लेखापरीक्षण करतांना मनपा दरवर्षी स्वनिधीतुन शाळेत शिक्षण घेत असलेल्या वर्ग 1 ते 5 चे विद्यार्थ्यांना मनपाची पटसंख्या व दर्जा उंचावण्याकरीता गणवेश पुरविण्यात येत असते. त्यानुसार सन 2012-13 मध्ये दैनिक सांध्य दैनिक इनसाईट या स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात दिल्यानुसार ड्रेस शिलाई करीता 6 निविदा प्राप्त झाल्या त्यातील सांचल मार्केटींग यांची कमीत कमी दराची निविदा मनिला व हॉफ पॅन्ट चा दर 61.20, हिन्दी मुलींचे गणवेश 52.40, व सलवार 44.33 अशी मंजुर करून त्यांना कार्यादेश दिले. तसेच टाय सिंबॉलसह

व बेल्ट करीता 4 निविदा प्राप्त झाल्या त्यातील मे अलिशा मार्केटींग यांची कमीत कमी दराची निविदा अनुक्रमे रूपये 16 व 21 मंजुर करण्यात आली. सदर नस्तीची तपासनी केली असता खालील खालील प्रमाणे अनियमितता आढळुन आल्या.

1. महानगर पालीका अमरावतीचे सन 2012-13 चे सुधारीत अंदाजपत्रक व सन 2013-14 चे मुळ अंदाजपत्रकाची तपासनी केली असता अंदाजपत्रकात लेखाशिर्ष 243 मध्ये गरीब विदयार्थ्यांना पाठयपुस्तके व गणवेश करीता रूपये 40,00,000/- ची तरतुद असतांना वर्षात वार्षिक अहवालानुसार रूपये 51,88,696/- खर्च करण्यात आला. अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्चास महानगर पालीकेच्या नंतरच्या आम सभेत सादर करून मंजुरी घेतल्याचे दिसुन आले नाही.

2. सन 2012-13 मध्ये गणवेशावर रुपये 5188696 खर्च करण्यात आला. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34 दिनांक 31.8.2009 मधिल निर्णय क्रमांक 12 जाहिरातीचे मुल्य 55 लाखापर्यंत असेल अशा जाहिराती ब वर्ग दैनिक व साप्ताहिक वृत्तपत्रात प्रशिध्द करावे. असे असतांना मनपाने नियमबाहयरीत्या “सांध्य दैनिक इनसाईट” या स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात दिली. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:मातंसं/नस्ती 2010/प्र.क्र. 34/39 दिनांक 6 ऑगष्ट 2010 अन्वये निविदा प्रक्रीयेचे महत्व लक्षात घेवुन शासनाच्या प्रत्येक विभागात निविदा प्रकियेसाठी 50 लाख व त्यापेक्षा अधिक निविदा दर असलेल्या बाबीकरीता दिनांक 1 डिसेंबर 2010 पासुन ई-निविदा कार्यप्रणाली वापरणे अनिवार्य करण्यात येत आहे. असे शासनाचे आदेश असतांना निविदा प्रक्रीया न करता किंवा ई-निविदा मागविण्यात आली नाही. हि गंभीर नियमबाहय बाब ठरते. सदर जाहिरात स्थानिक सांध्य दैनिकात दिल्यामुळे गणवेश शिलाई तसेच टाय व बेल्ट पुरविण्याचा कंत्राट स्थानिक पुरवठादारालाच देण्याचा असल्याचा हेतू यावरून दिसुन येते. शासन निर्णयानुसार विभागीय वर्तमान पत्रात किंवा ई-निविदाव्दारे जाहिरात दिली असती तर खुल्या बाजारपेठेतील स्पर्धात्मक दराचा मनपाला फायदा झाला असता त्यामुळे तो झाला नाही.

3. उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस 1088/(2512)/उदयोग-6 दिनांक 2 जानेवारी 1992 मधिल परिच्छेद 8.3(अ) नुसार निविदा प्रशिध्द झाल्यानंतर पुरवठादारांना निविदा भरण्यासाठी कमीत कमी 3 आठवडयाचा कालावधी दयावा असे शासनाचे आदेश असतांना “सांध्य दैनिक इनसाइट” या स्थानिक वर्तमान पत्रात दिनांक 22.6.2012 ला जाहिरात प्रशिध्द झाली. परंतु जाहिरातीमध्ये निविदा दिनांक 30.6.2012 ला म्हणजेच 7 दिवसात भरून कार्यालयात सादर करावी असे नमुद केले. पुरवठादाराला निविदा भरण्यास पुरेसा कालावधी न मिळाल्यामुळे तसेच स्थानिक सांध्य दैनिकात नियमबाहयरीत्या जाहिरात दिल्यामुळे जास्तीत जास्त व शहराबाहेरील पुरवठाधारकाने निविदा भरल्या नाही. त्यामुळे गणवेशाच्या शिलाईचे दर, तसेच टाय व बेल्टचे दर माफक असल्याची लेखापरीक्षणास तपासणी करता आली नाही.

4. गणवेश कापड पुरविण्याबाबत मनपाने वस्त्रोदयोग विभाग मुंबई यांना यांना पुरवठा आदेश क्र./अमनपा/ उपा/भा.वि./96/2012 दिनांक 18.6.2012 अन्वये मनिला, ब्लाउज, ओढणी व सलवार करीता

DRAFT

क्रिम कलरचा कापड तसेच कुर्ता, बॉडीफ्राक व पॅन्ट करीता मरून कलरचा एकुण 34702 मिटर कापड 30 दिवसात पुरविण्याचा कार्यादेश दिला. तसेच उपायुक्त यांनी महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ नागपूर यांना दिनांक 20.7.2012 अन्वये "शालेय विदयार्थ्यांना दयावयाच्या गणवेशाच्या कापडापैकी काही शर्टींगचे कापड प्राप्त झालेले आहे. उर्वरीत कापड तातडीने पूरवठा होने गरजेचे आहे" असे पुन्हा पत्र दिले. परंतु सदर कापड केव्हा पुरविण्यात आले याबाबतचे डिलीव्हरी चलान सादर केले नाही. तसेच भांडार विभागाचे साठा पुस्तकाची तपासनी केली असता साहित्य केव्हा प्राप्त झाले व गणवेशाची शिलाई करण्याकरीता कापड सांचल मार्केटींग यांना केव्हा दिले याची दिनांकासह नोंद नाही. परंतु मनपा शाळेचे साठा पुस्तके तपासले असता शाळांना माहे ऑक्टोबरमध्ये गणवेश शिलाई करून दिल्याचे आढळून आले. यावरून गणवेश कापड विहीत मुदतीत पुरवठा केल्याचे आढळून येत नाही.

उदयोग संचालनालय शासन परिपत्रक भांखस/हातमाग कापड/दरनिश्चिती/(29)/2011-12/बी.17003 दिनांक 3.9.2011 अन्वये मागणीपत्र प्राप्त झाल्यापासुन 6 आठवडयाच्या आत मालाचा पुरवठा न झाल्यास उशिरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर 0.5% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकाराला दिला जाईल असे आदेश असतांना सदर कापड विहीत कालावधीत पुरवठा न केल्यामुळे शासन परिपत्रकाप्रमाणे कमाल मर्यादा पूरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत 1 लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या 5% दंडाची तरतुद असतांना त्याप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ नागपूर यांनी प्रत्यक्षात कापड पुरवठा केव्हा केला याबाबतचे अभिलेख/नोंदी नस्तीला नसल्यामुळे सदर कापड उशिरा पुरविल्याबाबत चौकशी करून दंडात्मक कार्यवाही करावी.

5. नस्तीची तपासनी केली असता सांचल मार्केटींग यांना गणवेश शिलाई करण्याचे कार्यादेश क्रमांक 135 दिनांक 17-7-2012 ला दिले. परंतु सदर शिलाई केलेले गणवेश भांडार विभागाला केव्हा प्राप्त झाले याची साठा पुस्तकात नोंद नाही. तसेच गणवेश शिक्षण विभागाला दिल्याची नोंद नाही. शिक्षण विभागाचे साठा पुस्तक तपासले असता साठा पुस्तकात गणवेश प्राप्तीचा दिनांक नाही. परंतु शाळेचे साठा पुस्तक तपासने असता शाळेला गणवेश माहे ऑक्टोबर 2012 या महिन्यात पुरविल्याचा उल्लेख आहे. सदर बाब लक्षात घेता सांचल मार्केटींग यांनी जाहिरातीमध्ये नमुद व दिनांक 21.7.2012 ला केलेल्या करारनाम्यातील अटी नुसार मुदतीच्या आत (30 दिवसात) गणवेश शिलाई न झाल्यास प्रती दिवसाला रूपये 200/- दंड आकारला जाईल असे असतांना मनपाने सांचल मार्केटींग यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

तसेच अलिशा मार्केटींग यांना जाहिरातीमध्ये नमुद टाय व बेल्ट चा पुरवठा 20 दिवसात करणे आवश्यक असतांना अलिशा यांना पुरवठा आदेश दिला नाही. दिनांक 21.7.2012 ला झालेल्या करारनाम्यातील अटी नुसार टाय बेल्टचा पुरवठा मुदतीच्या आत (20 दिवसात) न झाल्यास प्रती दिवसाला रूपये 200 दंड आकारण्यात येईल परंतु अलिशा मार्केटींग यांनी टाय व बेल्ट चा पुरवठा विहीत कालावधीत केला असल्याचा कुठलाही अभिलेख नस्तीमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे टाय व बेल्ट

DRAFT

विहीत कालावधीमध्ये केला नसल्याचे दिसुन येते. याबाबत दंडात्मक कार्यवाही अपेक्षित आहे.

6. वर्ग 1 ते 5 मधील विद्‌यार्थ्यांना टिपनीमध्ये नमुद केल्याप्रमाणे खालील वर्गातील मुले मुलींना किती मिटर कापड लागेल याचा उल्लेख केला.

| अ.क्र | कापड | वर्ग | मिटर | | अ.क्र | कापड | वर्ग | मिटर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | मुलांना लागणारा शर्ट कापड | 1 | 1.10 | | 16. | मुलींचे सलवार कापड उर्दु शाळा | 1 | 1.75 |
| 2. | --"-- | 2 | 1.30 | | 17. | --"-- | 2 | 2.15 |
| 3. | --"-- | 3 | 1.40 | | 18. | --"-- | 3 | 2.30 |
| 4. | --"-- | 4 | 1.45 | | 19. | --"-- | 4 | 2.40 |
| 5. | --"-- | 5 | 1.55 | | 20. | --"-- | 5 | 2.45 |
| 6. | मुलींना लागणारा कापड | 1 | 1.20 | | 21. | मुलींचे सलवार कापड उर्दु शाळा | 1 | 1.85 |
| 7. | --"-- | 2 | 1.30 | | 22. | --"-- | 2 | 2.05 |
| 8. | --"-- | 3 | 1.40 | | 23. | --"-- | 3 | 2.20 |
| 9. | --"-- | 4 | 1.45 | | 24. | --"-- | 4 | 2.45 |
| 10. | --"-- | 5 | 1.60 | | 25. | --"-- | 5 | 2.75 |
| 11. | मुलांचे पॅन्ट करीता कापड | 1 | 0.75 | | | | | |
| 12. | --"-- | 2 | 0.95 | | | | | |
| 13. | --"-- | 3 | 0.95 | | | | | |
| 14. | --"-- | 4 | 1.20 | | | | | |
| 15. | --"-- | 5 | 1.40 | | | | | |

परंतु मुले/मुलींना लागणार कापड कोणत्या नियमाव्दारे ठरविण्यात आले याचा नियमाचा आधार घेवुन परिगणना केली नसल्यामुळे प्रती मुलांना लागणारे कापड जास्त प्रमाणात दर्शवुन जादा कापड खरेदी केल्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता वर्ग व उंची नुसार प्रत्येक मुलांना किती कापड लागेल याचा सआधार नियमानुसार अभिलेखे सादर करावे. अन्यथा याबाबत विशेष चौकशी करून प्रती विदयार्थी जादा लागलेल्या कापडाची परिगणना करून जादा कापडाचे प्रतीमिटर व शिलाई यांचे प्रमाणानुसार वसुलीची कार्यवाही करावी.

7. सन 2012-13 मध्ये शिक्षण विभागाला भांडार विभागाकडुन एकुण 10230 गणवेश प्राप्त झाले परंतु सन 2011-12 या मागील वर्षाचे शिल्लक 504 असे एकुण 10734 गणवेश प्राप्त झाले. शिक्षण विभागातील साठा नोंदवही तपासली असता नोंदवहीत गणवेश वाटप करतांना सदर गणवेश 61 शाळेला दिले परंतु गणवेश प्राप्त झाल्यावर एकुण 20 शाळेच्या समोर फक्त स्वाक्षरी करण्यात आली असुन त्याखाली शाळेचा शिक्का मारला नाही किंवा गणवेश घेणा-याचे नाव नाही. त्यामुळे 20 शाळेला प्रत्यक्षात गणवेश दिला अथवा नाही याची तपासनी करता आली नाही.

8. शाळेचे साठा पुस्तक व हजेरी रजिष्टर तपासले असता खालील शाळेची पटसंख्या कमी असतांना

शिक्षण विभागाने जादा गणवेशचे वाटप करण्यात आले. गणवेशाची आवश्यकता नसतांना शाळेला गणवेश वाटप केल्यामुळे तसेच अनेक शाळांकडे सन 2012-13 पासुन लेखापरीक्षण कालावधीपर्यंत खालील शाळेकडे व शिक्षण विभागाकडे 1246 गणवेश शिल्लक असल्याचे दिसुन येते.

| अ.क्र | शाळेचे नाव | प्राप्त गणवेश | पट संख्या | वाटप | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मनपा मराठी प्राथ. मुलाची शाळा क्र.1, भाजीबाजार | 80 | 63 | 63 | 17 |
| 2. | -"- मराठी प्राथ. कन्या शाळा क्र.1, भाजीबाजार | 90 | 75 | 75 | 15 |
| 3. | मराठी प्राथ. शाळा क्र.21, वडरपुरा | 219 | 180 | 180 | 39 |
| 4. | मराठी प्राथ. शाळा क्र.19, रुख्मीनी नगर<br>मागील शिल्लक | 45<br>28 | 45 | 53 | 20 |
| 5. | मराठी उच्च प्राथ. शाळा क्र.15, आरपीएफ कॅम्प<br>वर्ग 1ते 7 वाटप वर्ग 6-10 वर्ग 7-7 | 76 | 57 | 76 | 19 |
| 6. | मराठी प्राथ. शाळा क्र.2, बुधवारा | 67 | 66 | 66 | 01 |
| 7. | मराठी प्राथ. कन्या शाळा क्र.619, फेजपुरा | 37 | 37 | 33 | 04 |
| 8. | मराठी प्राथ. शाळा क्र.8, रामनगर | 40 | 40 | 40 | 00 |
| 9. | हिंदी प्राथ. शाळा क्र.4, अंबापेठ | 77 | 71 | 68 | 9 |
| 10. | मराठी प्राथ. शाळा क्र.16, अंबीका नगर | 38 | 35 | 35 | 3 |
| 11. | मराठी प्राथ. शाळा क्र.6, खरकाडीपुरा | 123 | 92 | 87 | 36 |
| 12. | मराठी उच्च प्राथ. कन्या शाळा क्र.7, जुना बडनेरा | 119 | 96 | 96 | 23 |
| 13. | मराठी प्राथ. शाळा क्र.22, जुना बडनेरा | 116 | 101 | 101 | 15 |
| 14. | मराठी प्राथ. शाळा क्र.23, नविन बडनेरा<br>मागील शिल्लक | 95<br>9 | 104 | 104 | 00 |
| 15. | मराठी प्राथ. शाळा क्र.20, नवाथेनगर | 60 | 43 | 38 | 22 |
| 16. | मराठी प्राथ. शाळा क्र.24, नवा बडनेरा | 83 | 82 | 82 | 01 |
| 17. | मराठी प्राथ. शाळा क्र.3, राजापेठ | 84 | 59 | 59 | 25 |
| 18. | मराठी प्राथ. कन्या शाळा क्र.8 नवा बडनेरा<br>मागील शिल्लक | 73<br>15 | 88 | 88 | 00 |
| 19. | मराठी उच्च प्राथ. शाळा क्र.14, वडाळी | 484 | 356 | 356 | 128 |
| 20 | हिन्दी प्राथ. शाळा क्र.8, बजरंग प्लॉट | 0 | 0 | 0 | 0 |
| 21 | उर्दु मुलांची प्राथ. शाळा क्र.11, नविन बडनेरा | 219 | 189 | 189 | 30 |
| 22 | उर्दु उच्च प्राथ शाळा कॅम्प | 162 | 140 | 140 | 22 |
| 23 | उर्दु उच्च प्राथ शाळा साबनपुरा | 97 | 97 | 83 | 14 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 24 | उर्दु उच्च प्राथ शाळा क्र.1 नागपूरी गेट | 0 | 0 | 0 | 0 |
| 24 | उर्दु प्राथ शाळा क्र. 4 लालसाबपूरा | 170 | 152 | 152 | 18 |
| 25 | उर्दु उच्च प्राथ शाळा क्र.3 गवळीपूरा | 0 | 0 | 0 | 0 |
| 26 | उर्दु उच्च प्राथ शाळा क्र. 9 नुरनगर | 345 | 279 | 279 | 66 |
| 27 | मराठी उच्च प्राथ शाळा बुधवारा | 188 | 130 | 130 | 58 |
| 28 | मराठी प्राथ शाळा वरूडा बडनेरा | 55 | 52 | 52 | 3 |
| 29 | पुर्व माध्य. शाळा रहाटगाव | 105 | 93 | 93 | 12 |
| 30 | मराठी उच्च प्राथ कन्या शाळा गाडगेनगर | 112 | 89 | 83 | 29 |
| 30 | मराठी उच्च प्राथ मुलांची शाळा गाडगेनगर | 68 | 68 | 46 | 22 |
| 31 | उर्दु उच्च प्राथ शाळा क्र. 10 जुना बडनेरा | 232 | 210 | 210 | 22 |
| 33 | मराठी प्राथ शाळा तपोवन | 85 | 70 | 70 | 15 |
| 34 | मराठी उच्च प्राथ शाळा अकोली | 82 | 68 | 68 | 14 |
| 35 | हिन्दी प्राथ शाळा क्र. 6 फ्रेजपूरा | 39 | 39 | 39 | 3 |
| 36 | हिन्दी प्राथ शाळा क्र.13, दस्तुरनगर<br>मागील शिल्लक | 48<br>6 | 54 | 54 | 0 |
| 37 | मराठी प्राथ शाळा क्र.11, दस्तुरनगर<br>मागील शिल्लक | 26<br>34 | 42 | 42 | 18 |
| 38 | मराठी प्राथ शाळा निंभोर | 59 | 42 | 42 | 17 |
| 39 | मराठी उच्च प्राथ शाळा जेवड | 289 | 251 | 251 | 38 |
| 40 | मराठी उच्च प्राथ शाळा शेगाव<br>मागील शिल्लक | 132<br>6 | 138 | 138 | 0 |
| 41 | हिन्दी उच्च प्राथ शाळा क्र.15, कृष्णानगर | 149 | 130 | 123 | 26 |
| 42 | हिन्दी प्राथ शाळा क्र. 3 बेलपूरा | 71 | 55 | 55 | 16 |
| 43 | उर्दु प्राथ शाळा क्र.6 फ्रेजरपूरा | 338 | 291 | 291 | 47 |
| 44 | मराठी उच्च प्राथ शाळा नवसारी | 150 | 148 | 148 | 2 |
| 49 | मराठी उच्च प्राथ शाळा क्र. 13 कॅम्प चपराशीपूरा | 0 | 0 | 0 | 0 |
| 50 | उर्दु प्राथ कन्या शाळा क्र.4 नविन बडनेरा | 156 | 155 | 151 | 5 |
| 51 | उर्दु उच्च प्राथ शाळा क्र.2 अलिमनगर | 443 | 407 | 446 | 41 |
| 52 | मराठी प्राथ शाळा क्र.7 बेलपूरा | 33 | 33 | 31 | 2 |
| 53 | हिन्दी उच्च प्राथ शाळा क्र.2 मसानगंज | 195 | 180 | 180 | 15 |
| 54 | उर्दु उच्च प्राथ शाळा क्र.7 मजफरनगर | 521 | 521 | 521 | 0 |
| 55 | मराठी प्राथ शाळा क्र. 17 विलासनगर | 372 | 317 | 309 | 63 |
| 56 | मराठी उच्च प्राथ शाळा क्र.18 प्रविणनगर | 215 | 154 | 154 | 61 |
| 57 | हिन्दी प्राथ शाळा क्र. 12 अंबीकानगर | 36 | 35 | 35 | 1 |
| 58 | उर्दु प्राथ शाळा क्र. 8 जमल कलाम नगर | 903 | 714 | 714 | 189 |

DRAFT

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **एकुण-** | | | | **1246** |

शिक्षण विभागाचे साठा पुस्तक पान क्रमांक 9 मध्ये एकुण 2012-13 मध्ये 10230 गणवेश प्राप्त झाले व सन 2011-12 चे मागील गणवेश 504 असे एकुण 10823 गणवेश असतांना सन 2012-13 मध्ये मनपाच्या शाळांना 10141 वाटप करण्यात आले व शिल्लक 593 गणवेश लेखापरीक्षण दिनांकापर्यंत शिक्षण विभागात शिल्लक आहेत. वरील प्रमाणे तपासलेल्या 61 शाळापैकी 58 शाळेच्या साठापुस्तका प्रमाणे **1246** इतके गणवेश व शिक्षण विभागाकडे शिल्लक **593** गणवेश असे एकुण **1839** इतके क्रिम कलरचा शर्ट/ब्लाउज/सलवार/ओढणी व मरून कलरचा पॅन्ट/बॉडीफ्राक गणवेश शिल्लक आहेत.

मनपाची माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रीक शाळा समिती सभा दिनांक 12.4.2013 ठराव क्र.21 नुसार सन 2013-14 या वर्षापासुन गणवेशामध्ये बदल करण्याचे सुचित केले. त्यानुसार मनपा सर्वसाधारण सभा दिनांक 18-4-2013 मनपाच्या शाळेतील शर्ट/ओढणी/सलवार करीता चौकोनी लाल रंगाचा शर्ट व पॅन्ट/बॉडीफ्राक/कुर्ता करीता नेव्ही निळया रंगाचा गणवेशा करीता मान्यता देण्यात आली. सन 2012-13 मधिल जुने **1839** गणवेश शिल्लक असल्यामुळे व सन 2013-14 मध्ये नविन गणवेश शाळांना वाटप केल्यामुळे जुन्या गणवेश विनाकारण पडुन असल्यामुळे शिल्लक 1839 चे गणवेश प्रती गणवेश रूपये **472**/- (कापड खरेदी रू.4295223+शिलाई 538507 (ड्रेस नग 10230xशिलाई प्रती ड्रेस रू.52.64प्रमाणे)=4833730/10230=472) प्रमाणे रूपये 8,68,008/- इतक्या रूपयाचे गणवेश शाळा व शिक्षण विभाग मनपा अमरावती येथे शिल्लक आहेत. त्यामुळे सदर गणवेशाची रक्कम रूपये 8,68,008/- वसुलपात्र ठरते.

9. मनपा त्यांच्या क्षेत्रातील शाळेला दरवर्षी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करीत आलेले आहे. शाळेचे शैक्षणिक सत्र प्रतीवर्ष माहे जुन महिण्यापासुन सुरू होत असते. त्यामुळे शाळेत विद्यार्थ्यांना गणवेश शाळेच्या पहिल्या दिवसापासून उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात मनपाने माहे ऑक्टोबर 2012 मध्ये गणवेश वाटप केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेच्या सुरूवातीपासून वाटप न केल्यामुळे गणवेशाचा योग्यप्रकारे उपयोग झाला नसल्याचे आढळुन येते. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचे दिसून येते.

10. वर्ग 1 ते 5 च्या मुलां-मुलींना गणवेश वाटप करण्यामागील योजनेचा उद्देश असतांना खालील शाळेतील वर्ग 6 व वर्ग 7 वर्गातील मुलांना सुध्दा गणवेश वाटप करण्यात आले. हि नियमबाहय बाब असतांना याबाबत नियमबाहय वाटप झालेले 340 गणवेश लेखापरीक्षणास अमान्य करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | गणवेश वाटप केलेले वर्ग | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्ग 6 | | वर्ग 7 | | |
| | | मुले | मुली | मुले | मुली | |
| 1. | मराठी उच्च प्राथ. शाळा क्र.15, एसआरपीएफ कॅम्प | 5 | 5 | 7 | 7 | 24 |
| 2. | उर्दु उच्च प्राथ. शाळा, कॅम्प | 13 | 13 | 21 | 21 | 68 |
| 3. | मराठी उच्च प्राथ. शाळा, बुधवारा | 14 | 27 | 29 | 29 | 99 |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4. | मराठी मुलांची उच्च प्राथ. शाळा, गाडगेनगर | 6 | 0 | 22 | 0 | 28 |
| 5. | उर्दु उच्च प्राथ. शाळा क्र. 10, जुना बडनेरा | 17 | 0 | 24 | 14 | 55 |
| 6. | उर्दु उच्च प्राथ. शाळा क्र. 2, अलीम नगर | 39 | 27 | 0 | 0 | 66 |
| | एकुण- | **94** | **72** | **103** | **71** | **340** |

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 64 दिनांक 8/10/2015 अन्वये विचारणा केली असता यावर विभागाने अनुपालन उपलब्ध केले नाही त्यामुळे सदर परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 64)

## *61 नविन परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजनेतील गंभीर अनियमिततेबाबत.*

**0**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 09**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 39149850.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 39149850.00/-

***नविन परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजना अंतर्गत नियमबाह्यपणे मेटलाईफ इंडिया इन्शुरन्स" येथे स्थायी समितीची मंजुरी नसताना रक्कमा जमा करणेबाबत.***

DRAFT

सन 2012-2013 चे लेखापरीक्षण करतांना असे निदर्शनास आले की नविन परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजना अंतर्गत कर्मचा–यांच्या वेतनातून केलेल्या कपातीच्या रक्कमा नियमबाह्यपणे " मेट लाईफइंडिया इन्शुरन्स कंपनी लि."येथे स्थायी समितीची मंजुरी नसताना सन 2007-2008, 2008-2009 व 2009-2010,या आर्थिक वर्षातील रक्कमा नियमबाह्यपणे मेट लाईफ इंडिया" येथे जमा करण्यात आल्या.सर्व साधारण सभा ठराव क्रमांक 48 दिनांक 9/01/2013 नुसार अंशदान योजनेची मेटलाईफ योजनेमधील गुंतवणूक बंद करण्यात आली व बँकेमध्ये स्वतंत्र F.D खाते उघण्याचा निर्णय घेण्यात आला. व IDBI बँकेत स्वतंत्र F.D खाते उघण्यात आले व त्या मध्ये सन 2010-2011 मधील एकून 83 लक्ष रक्कम DCPS कपातीपोटी जमा करण्यात आले.परंतु त्यापुढील सन 2011-2012 व 2012-2013 या आर्थिक वर्षामधील DCPS कपातीच्या रक्कमा महानगरपालिकेची आर्थिक परीस्थिती नाजूक असल्याने सदर खात्यात जमा करता आल्या नाहीत.

सन2007 -2008 ते 2012 -2013 व सन 2010 -2011 वगळून रक्कमांचा तपशील खालील प्रमाणे आहे

| अ.क्र. | वर्ष | वेतनामधूनकेलेलीकपात | मनपासहभाग | एकूण | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2007-08 | 876690 | 876690 | 1753380/- | मेटलाईफ पॉलीसी मध्ये जमा |
| 2 | 2008-09 | 2011894 | 2011894 | 4023788/- | मेटलाईफ पॉलीसी मध्ये जमा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 2009-10 | 2775319 | 2775319 | 5550638/- | मेटलाईफ पॉलीसी मध्ये जमा |
| 4 | 2011-12 | 4002035 | 4002035 | 8004070/- | महानगरपालिकेची आर्थिक परिस्थित नाजूक असल्याने रक्कमा खात्यात जमा नाही. |
| 5 | 2012-13 | 5757445 | 5757445 | 11514890/- | महानगरपालिकेची आर्थिक परीस्थिती नाजूक असल्याने रक्कमा खात्यात जमा नाही. |
| एकूण | | | | 3,91,49,850/- | |

यावर लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणेआहेत.

1. नविन परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजना अंतर्गत नियमबाह्यपणे"मेटलाईफ इंडिया इन्शुरन्स प्रा.लि" येथे स्थायी समितीची मंजुरी नसताना रक्कमा कोणत्या आदेशान्वे जमा करण्यात आल्या अभिलेखे लेखापरीक्षणास सादर न केल्यामुळे सत्यता पडताळून पाहता आली नाही.

2.उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या कर्मचा–यांच्या DCPS कपातीच्या रक्कमा योग्य खात्यात योग्य वेळी जमा न केल्यामुळे महानगरपालिकेवर सन 2007-2008 ते 2009-2010 व सन 2011-2012 ते2012-2013 या वर्षातील एकून रक्कम रु.3,91,49,850/- चा बोझा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येते.

3. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक 31/10/2005 अन्वये राज्य शासनाने दिनांक 1/11/2005 रोजी किंवा त्या नंतर नियुक्त होणा-या कर्मचा–यांसाठी नविन परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजना अमलात आणली आहे. महानगर पालीकेचे लेखापरीक्षण करतांना नविन परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजने अंतर्गत दिनांक 1/11/2005 नंतर मनपा कार्यालयात नियुक्त झालेले एकून 498 कर्मचारी असल्याचे अभिलेख्या वरून दिसून येते. सदर कर्मचाऱ्याचे सन 08-2007 पासून सन 2012 -2013 (सन 2010-2011 वगळून) पर्यंत नविन परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजने अंतर्गत कपातीची एकून रक्कम रु. 3,91,49,850 /- संबंधित कर्मचा–यांच्या स्वतंत्र खात्यात व्याजासह जमा करणे आवश्यक आहे.

4.महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अनियो-1007/18/सेवा-4 दिनांक 07/07/2007 " नविन परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजनाच्या " अमल बजावणी कार्यपद्धती नुसार शासन निर्णया मधील 6 (ब) या योजनेतील स्तर -1 अंतर्गत कर्मचा–यांकडून देय ठरणारे अंशदान म्हणजे मूळ वेतन अधिक महागाई वेतन (असल्यास) अधिक महागाई भत्ता या रक्कमेच्या 10 % इतकी रक्कम (रुपयाच्या अपूर्णांकात असलेली रक्कम रुपयात पुर्णांकित करून) 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा–यांच्या वेतन देयकातून प्रत्येक महिन्यात वसूल करण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत तसेच राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडून प्राप्त कर्मचा-याचे नियुक्तीवेतन लेखा क्रमांकाचे नमुना आर 1 विवरणपत्र लेखापरीक्षण कालावधी पर्यंत तयार केले नाही. हि फार गंभीर बाब आहे.

5. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अनियो-1007/18/सेवा-4 दिनांक 07/07/2007 "नविन परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजनाच्या " अमल बजावणी कार्यपद्धती मधील 6 (ड) प्रमाणे कर्मचा–यांचेअंशदान वसूल करण्याची कार्यवाही तो ज्या महिन्यात नियुक्त झालेला असेल त्याच्या पुढील महिन्याच्या वेतनातून करण्यात यावी असे स्पष्ट निर्देश आहेत. तसेच कर्मचारी निहाय वसुली दर्शविणारे स्वतंत्र विवरणपत्र नमुना आर 2 तयार करण्यात आले नाही .

6. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अनियो-1007/18/सेवा-4 दिनांक 07/07/2007 मधील सूचनांप्रमाणे वित्तीय वर्षाच्या अखेरीस राज्य अभिलेख देखभाल अभिकरणा तर्फे पाठविण्यात येणारे नमुना आर 3 तयार केले नाही.
7. म.शा. वित्त विभाग शासन निर्णय,क्रमांक अनियो/1007-18 /सेवा-4 दिनांक 07/07/2007 नुसार नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या" अंमलबजावणीची कार्यपद्धतीचे पालन करण्याबाबत मुद्दे 1 ते 29 मधील दिलेल्या सविस्तर सूचनांचे काटेकोरपणे पालन केल्याचे दिसून येत नाही
2. उपरोक्त लेखासंहितेतील नियम 161 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता सदर कामांना घेण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकाच्या शेवटी शहर अभियंता यांनी Technically Approveम्हणून स्वाक्षरी केली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-07/2006/प्र.क्र.94/ इमारती-2 दिनांक-16.11.2006 नुसार रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा प्रसिध्द करून/मागवून काम देण्यात आलेले आहे. त्यामुळे उपरोक्त शासन आदेशाचे पालन झालेले नाही.

4. सदर कामाची न्यूनतम 27.27% कमी दाराची निविदा प्राप्त होवून ती स्विकारण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 187 (ए) टीप 6 (तीन) नुसार शहर/कार्यकारी अभियंत्यांनी कमी प्राप्त दराबाबतचे (27.27% कमी) समर्थन करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज 10/1009/सी.आर. 309/ख, दि.11.2.2010 नुसार कामावरील वापरण्यात आलेल्या गौणखनिजावर शासनाने विहित केलेल्या दराने (रु.70.67 प्रती घनमीटर) रॉयल्टी सदर कामावर खर्च दर्शवुन कपातीव्दारे शासनास भरणा करावयाची आहे. तथापि खालील तपशिला प्रमाणे रु. 6504 एवढी रॉयल्टी देयकातून वसूल न केल्यामुळे ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. तरी रॉयल्टीची

रक्कम रु. 6504 संबधिताकडून वसूल करून “0853 गौणखनीज” या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | बाब | परिमाण | प्र.घ.मीटर रेतीचे परिमाण | रॉयल्टीसाठी एकूण परिमाण | रॉयल्टीचा दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Rubble filling | 16.21 | 01.00 | 16.21 | 70.67 | 6504 |
| 2 | 1:4:8 कॉंक्रीट | 28.30 | 0.45 | 12.73 | | |
| 3 | 1:2:4 | 140.20 | 0.45 | 63.099 | | |
| | एकूण | | | 92.039 | | 6504 |

6. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 व महसुल व वन विभाग अधिसूचना दिनांक- 23.04.2006 (अनुच्छेद 63) नुसार कार्यकंत्राटासंबंधित करारनामा रु. 10 लक्ष पर्यंत रु.100 व पुढील प्रत्येक लाखास रु.100 अधिकतम रु. 5 लक्ष अशा मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामासाठी रु.100 मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक होते. ते घेण्यात आलेले नाही ते संबंधित ठेकेदारांकडून वसुल करुन "0030 मुद्रांक व नोंदणी" या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

7. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक आहे. तथापि साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे अंदाजपत्रकानुसार योग्य गुणवत्तेचे साहित्य वापरल्याची खात्री पटली नाही.

8. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

9. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून किंवा सदर निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

10. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष

DRAFT

किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 168 दिनांक- 03.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 168)

## *95 मनपा हद्दीतील वार्ड क्र.37 संजय गांधी नगर नं.01 मध्ये कॉंक्रीट नाली,नालीचे बाजूचे कॉंक्रीटीकरण व विद्युत खांब/दिवे बसविणे कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 14**

*लेखा शीर्ष :दलित वस्ती सुधार योज शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3158462.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3104812.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 53650.00/-

***तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही केलेली नाही. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. निविदा उघडल्याच्या दिनांका पासून एक आठवड्यात व जास्तीत जास्त एक महिन्यात त्या निकाली काढणे आवश्यक असतांना सदर प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.रु. 50 लक्षच्या आतील विकास कामांचे चक्रीय पद्धतीने (Random) त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही. चालू दरसूचीशी तुलना करून नविदा दर मंजूर केले असतांना भाववाढ (Escalation) फरकाची अदाई ठेकेदारास करण्यात आलेली आहे. चाचणी अहवाला अभावी राखून ठेवलेली रु.20000 ची अदाई तिसऱ्या व अंतीम तसेच भाववाढ फरकाच्या अशा दोन देयकात अदा केल्याचे निदर्शनास आले.देयकातून रॉयल्टीची रक्कम कपात केलेली नाही. कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

DRAFT

प्रशासकीय मान्यता - मा. जिल्हाधिकारी अमरावती क्र.कक्ष-20 अका/नादवसु/कावि17/2010 दिनांक-

06.01.2011 रु.3495003

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2009-10

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-12.08.2011 कामाची मुदत - 210 दिवस

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 3295377 कामावर झालेला खर्च -रु. 3158462

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.तसेच मा.जिल्हाधिकारी यांच्या दिनांक-06.01.2011 च्या प्रशासकीय मान्यतेनुसार रु.17.35 लक्ष खर्चास मान्यता दिली होती तथापि स.सदस्य यांच्या विनंतीनुसार सदर काम रद्द करून नव्याने रु.32.95 लक्षचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे. लेखासंहितेतील उपरोक्त तरतुदीनुसार कार्यवाही न केल्याचे या वरून स्पष्ट होते.

2. उपरोक्त लेखासंहितेतील नियम 161 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता सदर कामांना घेण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकाच्या शेवटी शहर अभियंता यांनी Technically Approve म्हणून स्वाक्षरी केली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

3. सदर कामाची निविदा स्विकृती दिनांक-24.02.2011 होता व कार्यकारी अभियंता-2 यांनी त्यांच्या दिनांक-12.08.2011 रोजीच्या आदेशान्वये सदर कामाचे कार्यादेश दिल्याचे संचीकेवरून निदर्शनास आले. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 171(6) नुसार निविदा उघडल्याच्या दिनांका पासून एक आठवड्यात व जास्तीत जास्त एक महिन्यात त्या निकाली काढणे आवश्यक असतांना सदर प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/प्रक्र.171/08/नवि-20 दिनांक-02.03.2009 नुसार रु. 50 लक्षच्या आतील विकास कामांचे चक्रीय पद्धतीने (Random) त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही.

5. सन 2009-10 च्या जिल्हा दरसूचीनुसार सदर कामाचे अंदाजपत्रक रु.31.91 लक्ष होते व सन 2010-11 च्या जिल्हा दरसूचीनुसार अंदाजपत्रक रु.36.15 लक्ष होते म्हणजे सन 2009-10 पेक्षा 13.28% जास्त. सन 2010-

DRAFT

11 च्या दरसूचीशी तुलना करून त्या दराच्याआधारे ठेकेदारासोबत वाटाघाटी करून 6.5% जास्त दाराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. चालू दरसूचीशी तुलना करून नविदा दर मंजूर केले असतांना रु.208526 एवढ्या भाववाढ (Escalation) फरकाची अदाई ठेकेदारास करण्यात आलेली आहे.निविदेत भाववाढ फरकाबाबत (साहित्य,मजुरी व इंधन भाववाढ वगैरे) काहीही नमूद नसल्याने दिलेली भाववाढ नियमबाह्य ठरते.

6. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज 10/1009/सी.आर. 309/ख, दि.11.2.2010 नुसार कामावरील वापरण्यात आलेल्या गौणखनिजावर शासनाने विहित केलेल्या दराने (रु.70.67 प्रती घनमीटर) रॉयल्टी सदर कामावर खर्च दर्शवुन कपातीव्दारे शासनास भरणा करावयाची आहे. अथवा ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केला असल्यास भरणा केलेल्या पावत्या/चलनची खात्री विभागाने करणे आवश्यक आहे.तथापि ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.या बाबत विभागाने खात्री करावी अन्यथा खालील तपशिला प्रमाणे रु. 47924 एवढी रॉयल्टी संबधित ठेकेदाराकडून वसूल करून “0853 गौणखनीज” या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | बाब | परिमाण | प्र.घ.मीटर रेतीचे परिमाण | रॉयल्टीसाठी एकूण परिमाण | रॉयल्टीचा दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1:3:6 कॉक्रीट | 13.66 | 0.45 | 6.147 | 70.67 | 47924 |
| 2 | 1:2:4 कॉक्रीट | 249.28 | 0.45 | 112.176 | | |
| 3 | 1:4:8 | 336.60 | 1.35 | 454.41 | | |
| 4 | प्लॅस्टर | 202.04 | 0.015 | 3.03 | | |
| 5 | M-20 | 152.69 | 0.45 | 68.710 | | |
| 6 | Rubble | 33.66 | 01.00 | 33.66 | | |
| | एकूण | | | 678.133 | | 47924 |

7. सदर कामासाठी एकूण 437.87 घ.मी.खोदकाम केले आहे व खोदकामातील साहित्य त्याचठिकाणी वापरल्याबद्दल तेवढ्याच घ.मी.ची रॉयल्टी ठेकेदारास अदा करण्यात आलेली आहे.तथापि तेवढेच घ.मी. साहित्य वाहून टाकण्यापोटी रु.76.85 घ.मी.दराने रु.33650 ठेकेदारास अदा करण्यात आले आहेत. खोदकामातील साहित्य त्याचठिकाणी वापरल्यामुळे सदर अदाई अनुज्ञेय ठरत नाही.

8. चाचणी अहवाला अभावी राखून ठेवलेली रु.20000 ची अदाई तिसऱ्या व अंतीम तसेच भाववाढ फरकाच्या अशा दोन देयकात अदा केल्याचे निदर्शनास आले. सदर अदाई बाबत विभागाने खात्री करावी दुबार अदाई झाली असल्यास रु.20000 संबधित ठेकेदाराकडून वसूल करून शासन निधीत भरणा करावी.

9. दर पृथकरण व क्वारिचार्ट संचिकेत संलग्न करण्यात आलेला नाही. त्यामुळे जिल्हा दरसूचीतील दर व

DRAFT

अंदाजपत्रक/प्रत्यक्ष प्रदान दर बरोबर असल्या बाबत खात्री करता आली नाही.

10. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 176 नुसार (काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र न.नं.132 मध्ये) व नियम 177(परिपूर्ती प्रमाणपत्र न.नं.132 मध्ये) नुसार करवाई न करताच देयकाची अंतिम अदाई करण्यात आली आहे.

11. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक आहे. तथापि साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे अंदाजपत्रकानुसार योग्य गुणवत्तेचे साहित्य वापरल्याची खात्री पटली नाही.

12. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

13. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून किंवा सदर निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

14. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 175 दिनांक- 05.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 175)

## *98 वार्ड क्र.23 जय सियाराम नगर ते मेन रोडपासून नाल्यापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 11**

*लेखा शीर्ष : मुलभूत सोयी सुविधा शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 487469.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 457261.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 30208.00/-

***तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही केलेली नाही. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा प्रसिध्द करुन/मागवून काम देण्यात आलेले आहे. सक्षम प्रधिकाऱ्याच्या मंजुरीविना मुदतवाढ देण्यात आलेली आहे. विहित कालावधीचा शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही.कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना खाजगी संस्थेकडून साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला आहे. देयकातून रॉयल्टीची रक्कम कपात केलेली नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - मा. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगर परिषद प्रशासन दिनांक- 02.12.2011 रु.464953

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-07.06.2011 कामाची मुदत - 60 दिवस

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 464953 कामावर झालेला खर्च -रु. 487469

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी मुलभूत सोयी सुविधा लेखाशिर्षातर्गत उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-07/2006/प्र.क्र.94/इमारती-2 दिनांक-

DRAFT

16.11.2006 नुसार रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा प्रसिध्द करून/मागवून काम देण्यात आलेले आहे. त्यामुळे उपरोक्त शासन आदेशाचे पालन झालेले नाही.

3. सदर कामाची निविदा सूचना क्र. 35/2011 दिनांक-13.04.2011 रोजी साप्ता.वृत्तसागर या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही न केल्याने निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्याचे निदर्शनास आले त्यामुळे स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेस लाभ मिळालेला नाही.

4. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 202 टीप-2 नुसार निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रकरणी निविदा विक्री दिनांक-18.04.2011 रोजी व स्वीकृती दिनांक-19.04.2011 असा कालावधी ठेवल्याने निविदा विक्री/स्वीकृतीसाठी पुरेसा कालावधी देण्यात आलेला नाही.

5.सदर कामाची मुदत दिनांक-06.08.2011 पर्यंत होती.विभागाने दिनांक-19.03.2012 च्या टिपणी अन्वये कामात येणाऱ्या अडचणी/अडथळा मुळे मुदतवाढीसाठी संचिका सादर केली आहे. कार्यकारी अभियंता यांनी दिनांक-26.05.2012 पर्यंत मुदतवाढीची शिफारस केली आहे. तथापि मा.आयुक्त यांनी त्यास मान्यता दिलेली नाही. त्यामुळे सक्षम प्रधिकाऱ्याच्या मंजुरीविना दिलेली मुदतवाढ नियमबाह्य ठरते.

6. महाराष्ट्र शासन नगर विभाग परिपत्रक क्र.जिईएन/1098/1357/प्र क्र166/98मवी-24 दिनांक 3.11.2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. सदर कामाचे आदेश दिनांक-07.06.2011 रोजी देण्यात आले होते तथापी त्या पूर्वीच दिनांक-05.04.2011 रोजी दिनांक-31.03.2011 ते 30.05.2011 या कालावधीचा शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला आहे.कामाच्या कालावधी अगोदरचा विमा असल्यामुळे 1% विम्याची रक्कम रु. 4650 वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

7. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना प्रो.राम मेघे इं.ऑफ टेक्नो.& रिसर्च या खाजगी संस्थेकडून चाचणी अहवाल घेण्यात आलेला आहे.तसेच चाचणी अहवालात डांबराच्या ग्रेड (60/70) बाबत काहीही नमूद नाही. त्यामुळे अंदाजपत्रकानुसार योग्य गुणवत्तेचे डांबर/साहित्य वापरल्याची खात्री पटली नाही.

8. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज 10/1009/सी.आर. 309/ख, दि.11.2.2010 नुसार कामावरील वापरण्यात आलेल्या गौणखनिजावर शासनाने विहित केलेल्या दराने (रु.70.64 प्रती घन मीटर) रॉयल्टी सदर कामावर खर्च दर्शवुन कपातीव्दारे शासनास भरणा करावयाची आहे. अथवा ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केला असल्यास भरणा केलेल्या पावत्या/चलनची खात्री विभागाने करणे आवश्यक आहे.तथापि ठेकेदाराने थेट शासनखाती रॉयल्टीचा भरणा केल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत. त्यामुळे 361.80 घ.मी.ची रु.70.64 दराने रु. 25558 एवढी रॉयल्टी संबधित ठेकेदाराकडून वसूल करून "0853

गौणखनीज" या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

9. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

10. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

11. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 178 दिनांक- 05.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 178)

## *100 वार्ड क्र.66 डी.पी.रोड येथे खडीकरण करणे कामातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 11**

*लेखा शीर्ष : विकास शुल्क मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1300378.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1064069.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 236309.00/-

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिकाऱ्याचा अहवाल नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा***

DRAFT

***मागवून काम देण्यात आलेले आहे.महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 187 (ए) टीप 6 (तीन) नुसार शहर/ कार्यकारी अभियंता यांनी कमी प्राप्त दराबाबतचे (28.25% कमी) समर्थन करणे आवश्यक होते. ठेकेदाराने कार्यादेश व करारनाम्यानुसार काम केलेले नाही.खोदकामाची जादादाराने अदाई केल्याने ठेकेदारास अति प्रदान झाले आहे. शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे न आल्याने 1% पेक्षा कमी रक्कम देयकातून कपात केली आहे. देयकातून रॉयल्टी वसूल करून शासनखाती भरणा केलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - मा. आयुक्त मनपा अमरावती टिपणी दिनांक- 06.07.2010 व 28.09.2011

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2009-10

कार्यादेश - शहर अभियंता दिनांक- 11.03.2011 कामाची मुदत - 120 दिवस

अंदाजपत्रकीय रक्कम- रु.1300378 कामावर झालेला खर्च -रु. 926153

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी विकास शुल्क लेखाशिर्षांतर्गत उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-07/2006/प्र.क्र.94/इमारती-2 दिनांक-16.11.2006 नुसार रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना जाहिर निविदा मागवून काम देण्यात आलेले आहे.त्यामुळे उपरोक्त शासन निर्देशाचे पालन झालेले नाही.

3. सदर कामाची न्यूनतम 28.25% कमी दाराची निविदा प्राप्त होवून ती स्विकारण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 187 (ए) टीप 6 (तीन) नुसार शहर/कार्यकारी अभियंता यांनी कमी प्राप्त दराबाबतचे (28.25% कमी) समर्थन करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4. विभागाच्या दिनांक-05.07.2011 च्या टिपणीनुसार अंदाजपत्रकाप्रमाणे 850 मीटर रस्ता प्रस्तावित होता.तथापि प्रत्यक्ष जागेवर रस्त्याची लांबी 1480 मीटर आहे व उर्वरित काम सन्मानीय नगरसेवक यांचे पत्रानुसार त्याच ठेकेदाराकडून त्याच दराने करून घ्यावे तसेच ठेकेदारही त्याच कमी दराने काम करण्यास तयार

DRAFT

असल्याचे नमूद आहे.

उपरोक्त बाबी वरून स्पष्ठ होते कि,विभागाने मोघम स्वरूपाचे अंदाजपत्रक तयार केले आहे.सन्मानीय नगरसेवक यांचे पत्रानुसार कामाची कमी दराची निविदा असल्याने त्यातील उर्वरित रक्कमेतून त्याच रोडचे पुढील खडीकरण करावे.त्यात रस्त्याच्या लांबीचा कोठेही उल्लेख नाही.तसेच पुढील काम कमी दराने करणेस तयार असले बाबत ठेकेदाराचे पत्र संचिकेत आढळले नाही.

5. सदर कामाच्या मूळ अंदाजपत्रकात रस्त्याची लांबी 850 मीटर होती.तथापि उर्वरित कामास (210 मीटर) प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळण्यापूर्वीच ठेकेदाराने (दिनांक-03.07.2011 च्या पत्रान्वये) 1150 मीटर खोदकाम केल्याचे निदर्शनास आले.यावरून ठेकेदाराने कार्यादेश व करारनाम्यानुसार काम केले नसल्याचे स्पष्ट होते.

6. दर पृथ:करणानुसार खोदकामाचा दर रु.54.60 प्र.घ.मी.आहे. तथापि प्रत्यक्ष अदाई रु.117.92 म्हणजे रु.63.32 दराने 469.20 घ.मी.ची रु.29710 जादा अदाई ठेकेदारास झालेली आहे. ती संबधीताकडून वसूल करून मनपा निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

7. महाराष्ट्र शासन नगर विभाग परिपत्रक क्र.जिईएन/1098/1357/प्र क्र166/98मवी-24 दिनांक 3.11.2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. अथवा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1% रक्कम देयकातून कपात करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.सदर कामाची एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु.1300378 एवढी असल्यामुळे 1% प्रमाणे 13004 एवढी रक्कम कामगार विम्यापोटी कपात करणे आवश्यक होते. तथापि ती रु.9262 म्हणजे 3742 कमी कपात केली आहे. उर्वरित रक्कम संबधीताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

8. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज 10/1009/सी.आर. 309/ख, दि.11.2.2010 नुसार कामावरील वापरण्यात आलेल्या गौणखनिजावर शासनाने विहित केलेल्या दराने (रु.70.67 प्रती घनमीटर) रॉयल्टी सदर कामावर खर्च दर्शवुन कपातीव्दारे शासनास भरणा करावयाची आहे. अथवा ठेकेदाराने थेट शासन खाती रॉयल्टीचा भरणा केला असल्यास भरणा केलेल्या पावत्या/चलनची खात्री/शहानिशा विभागाने करणे आवश्यक आहे.तथापि ठेकेदाराने थेट शासन खाती रॉयल्टीचा भरणा केल्या बाबत पावत्या/चलन संचिकेत आढळल्या नाही. दर पृथ:करण करतांना दरात रॉयल्टीचा समावेश असल्याने 2871.704 घ.मी.ची रु. 202857 एवढी रॉयल्टी देयकातून वसूल न केल्यामुळे ठेकेदारास तेवढ्या रक्कमेचे जादा प्रदान झाले आहे. ते वसूल करून “0853 गौणखनीज” या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

9. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद

करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

10. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

11. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 181 दिनांक- 05.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 181)

## *101 वार्ड क्र.1 स्वावलंबीनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे कामातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 08**

*लेखा शीर्ष : रस्त्याचे डांबरीकरण मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 378725.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 374938.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3787.00/-

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिकाऱ्याचा अहवाल नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा मागवून काम देण्यात आलेले आहे. साहित्याचा चाचणी अहवाल न घेताच अंतिम अदाई करणेत आलेली आहे.शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे न आल्याने 1% पेक्षा कमी रक्कम देयकातून कपात केली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

DRAFT

प्रशासकीय मान्यता - मा. आयुक्त मनपा अमरावती टिपणी दिनांक- 21.07.2008

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2007-08

कार्यादेश - शहर अभियंता दिनांक- 18.05.2009 कामाची मुदत - 120 दिवस

अंदाजपत्रकीय रक्कम- रु.378735 कामावर झालेला खर्च -रु. 478332

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी रस्ताचे डांबरीकरण व सुधारणा कार्यक्रम 2008-09 योजनेंतर्गत उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.तसेच अंदाजपत्रकातील 15 ते 23 mm व 40 mm खडी पुरविणे/पसंविणे या बाबीचे काम करण्यात आलेले नाही.त्यामुळे वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक न बनविल्याचे स्पष्ट होते.

2. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-07/2006/प्र.क्र.94/इमारती-2 दिनांक-16.11.2006 नुसार रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना जाहिर निविदा मागवून काम देण्यात आलेले आहे.त्यामुळे उपरोक्त शासन निर्देशाचे पालन झालेले नाही.तसेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 42% जास्त दाराची न्यूनतम निविदा स्विकृत केल्याने महानगरपालिकेस रु.156660 चे जादा प्रदान करावे लागले आहे.

4. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.त्यामुळे अंदाजपत्रकानुसार योग्य गुणवत्तेचे डांबर/साहित्य वापरल्याची खात्री पटली नाही.साहित्याचा चाचणी अहवाल न घेताच अंतिम अदाई करणे हि अतिशय गंभीर व आक्षेपार्ह बाब आहे.

5. महाराष्ट्र शासन नगर विभाग परिपत्रक क्र.जिईएन/1098/1357/प्र क्र166/98मवी-24 दिनांक 3.11.2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. अथवा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1% रक्कम देयकातून कपात करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.सदर कामाची एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु.378735 एवढी असल्यामुळे 1% प्रमाणे रु.3787 एवढी रक्कम कामगार विम्यापोटी देयकातून कपात करणे आवश्यक होते. तरी सदर रक्कम संबधीताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे.

DRAFT

तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

7. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

8. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 182 दिनांक- 05.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 182)

## *102 वार्ड क्र.2 गुरुकृपा कॉलनी येथील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे कामातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 11**

*लेखा शीर्ष : मुलभूत सोयी सुविधा शासन निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
गुंतलेली रक्कम रु. 465221.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 400830.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 64391.00/-

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिकाऱ्याचा अहवाल नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा मागवून काम देण्यात आलेले आहे. निविदा दरातील खाडाखोडी स्वक्षांकित करण्यात आलेल्या नाहीत. कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना खाजगी संस्थेकडून घेण्यात आलेला आहे. देयकातून रॉयल्टीची***

***वसुली करून शासनखाती भरणा केलेली नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - मा. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगर परिषद प्रशासन दिनांक- 24.11.2011 रु.465221

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-17.06.2011 कामाची मुदत - 60 दिवस

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 465221 कामावर झालेला खर्च -रु. 465221

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी मुलभूत सोयी सुविधा लेखाशिर्षांतर्गत उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

2. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-07/2006/प्र.क्र.94/इमारती-2 दिनांक-16.11.2006 नुसार रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना जाहिर निविदा मागवून काम देण्यात आलेले आहे.त्यामुळे उपरोक्त शासन निर्देशाचे पालन झालेले नाही.

4. सदर कामाऐवजी पूर्वी (मूळ) वार्ड क्र.2 ट्रेझरी कॉलनी अर्जुननगर येथील रस्ता खडीकरण व डांबरीकरण प्रस्तावित होते.त्यानुसार निविदा प्रक्रिया/मंजुरी,कार्यादेश व कामासंबधी ठेकेदाराशी करारनामा करण्यात आलेला होता. कामाचे स्थळ/जागेत बदल झाल्याने नव्याने निविदा प्रक्रिया/मंजुरी व त्या अनुषंगाने ठेकेदाराशी करारनामा करणे आवश्यक होते.तथापि अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5. श्री. जी.एच.खंडेलवाल यांच्या निविदा दारात खाडाखोडी करण्यात आलेल्या आहेत.सदर खाडाखोडी स्वक्षांकित करण्यात आलेल्या नाहीत.

6. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना साहित्याचा चाचणी

DRAFT

अहवाल प्रो.राम मेघे इं.ऑफ टेक्नो.& रिसर्च या खाजगी संस्थेकडून घेण्यात आलेला आहे.

7. रस्त्याच्या दोन्ही बाजूला पाणी वाहून जाण्यासाठी 69.66 घ.मी.एवढे खोदकाम करून खोदकामातील साहित्य दुसरीकडे वाहून टाकनेपोटी रु.70.64 प्र.घ.मी.दराने रु.4921 एवढी रॉयल्टीचा देयकात समावेश करून प्रदान करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र.गौणखनिज-10/2001/प्र.क्र.308/ ख दिनांक-15.12.2003 नुसार उत्खननातून उपलब्ध होणाऱ्या गौनखनिजाचा त्याच ठिकाणच्या कामासाठी वापर केल्यास विहित दराने स्वमित्वधनाची/ रॉयल्टीची आकारणी करण्यात यावी असे निर्देश आहेत.त्यानुसार सदर कामाच्या उत्खननातून निघालेल्या साहित्याचा त्याच ठिकाणी वापर केलेला नसल्यामुळे महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.गौण खनिज/10/1009/ सीआर-309/ख दिनांक-11.02.2010 नुसार स्वमित्वधनाची/ रॉयल्टीची अदाई ठेकेदारास अनुज्ञेय ठरत नाही.

8. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज 10/1009/सी.आर. 309/ख, दि.11.2.2010 नुसार कामावरील वापरण्यात आलेल्या गौणखनिजावर शासनाने विहित केलेल्या दराने (रु.70.67 प्रती घनमीटर) रॉयल्टी सदर कामावर खर्च दर्शवुन कपातीव्दारे शासनास भरणा करावयाची आहे. अथवा ठेकेदाराने थेट शासन खाती रॉयल्टीचा भरणा केला असल्यास भरणा केलेल्या पावत्या/चलनची खात्री/शहानिशा विभागाने करणे आवश्यक आहे.तथापि ठेकेदाराने थेट शासन खाती रॉयल्टीचा भरणा केल्या बाबत पावत्या/चलन संचिकेत आढळल्या नाही. दर पृथ:करण करतांना दरात रॉयल्टीचा समावेश असल्याने 841.88 घ.मी.ची रु. 59470 एवढी रॉयल्टी देयकातून वसूल न केल्यामुळे ठेकेदारास तेवढ्या रक्कमेचे जादा प्रदान झाले आहे. ते वसूल करून “0853 गौणखनीज” या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

9. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

10. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

11. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 183 दिनांक- 05.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे



DRAFT

परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 183)

## *103 वार्ड क्र.59 व 60 समर्थ हायस्कूल ते शिवाजी मार्केट रस्ता व नाली बंधने कामातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 10**

*लेखा शीर्ष : सर्व.सा.रस्ते अनुदान शासन निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
गुंतलेली रक्कम रु. 1323370.00 /-

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिकाऱ्याचा अहवाल नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा मागवून काम देण्यात आलेले आहे. कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना तसा अहवाल न घेताच अंतीम अदाई करण्यात आली आहे. देयकातून रॉयल्टीची वसुली करून शासनखाती भरणा केलेली नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - मा. आयुक्त मनपा अमरावती टिपणी दिनांक-18.04.2011

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2010-11

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-25.08.2011 कामाची मुदत - 60 दिवस

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 1074718 कामावर झालेला खर्च -रु. 1323370

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी सर्व साधारण रस्ते अनुदान लेखाशिर्षांतर्गत उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली

DRAFT

नाही.

2. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-07/2006/प्र.क्र.94/इमारती-2 दिनांक-16.11.2006 नुसार रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना जाहिर निविदा मागवून काम देण्यात आलेले आहे.त्यामुळे उपरोक्त शासन निर्देशाचे पालन झालेले नाही. तसेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6% जास्त दाराची न्यूनतम निविदा स्विकृत केल्याने महानगरपालिकेस रु.51165 चे जादा प्रदान करावे लागले आहे.

4. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.त्यामुळे अंदाजपत्रकानुसार योग्य गुणवत्तेचे डांबर/साहित्य वापरल्याची खात्री पटली नाही.साहित्याचा चाचणी अहवाल न घेताच अंतिम अदाई करणे हि अतिशय गंभीर व आक्षेपार्ह बाब आहे.

5. सदर कामासाठी एकूण 116.65 घ.मी.एवढे खोदकाम करण्यात आलेले आहे खोदकामातील तेवढेच घ.मी. साहित्य वाहून टाकल्यामुळे रु.70.65 घ.मी.दराने रॉयल्टी व रु.142.80 प्र.घ.मी. दराने साहित्य वाहून टाकणेपोटी ठेकेदारास अदाई करण्यात आलेली आहे.खोदकामातील साहित्य त्याच ठिकाणी वापरल्यामुळे ते वाहून दुसरीकडे टाकण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.त्यामुळे रु.142.80 दराने केलेली अदाई अनुज्ञेय ठरत नाही.

6. सदर कामात BBM 300 मीटर तर Carpet व Seal coat 500 मीटर करण्यात आलेले आहे. BBM एवढेच इतर बाबीचे परिमाण येणे अभिप्रेत होते.

7. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज 10/1009/सी.आर. 309/ख, दि.11.2.2010 नुसार कामावरील वापरण्यात आलेल्या गौणखनिजावर शासनाने विहित केलेल्या दराने (रु.70.67 प्रती घनमीटर) रॉयल्टी सदर कामावर खर्च दर्शवुन कपातीव्दारे शासनास भरणा करावयाची आहे. अथवा ठेकेदाराने थेट शासन खाती रॉयल्टीचा भरणा केला असल्यास भरणा केलेल्या पावत्या/चलनची खात्री/शहानिशा विभागाने करणे आवश्यक आहे.तथापि ठेकेदाराने थेट शासन खाती रॉयल्टीचा भरणा केल्या बाबत पावत्या/चलन संचिकेत आढळल्या नाही. दर पृथ:करण करतांना दरात रॉयल्टीचा समावेश असल्याने रॉयल्टीची परिगणना करून तेवढी रक्कम संबधित ठेकेदाराकडून वसूल करून “0853 गौणखनीज” या शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

8. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यात न आल्याचे निदर्शनास आले.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि लेखासंहितेतील सदर तरतुदी नुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले.

DRAFT

9. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

10. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 184 दिनांक- 05.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 184)

## *105 महानगरपालिकेच्या संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहाचे भाडे वसुलीतील अनियमिततेबाबत*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 07**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 114285.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 114285.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 114285.00/-

***अमरावती शहर महानगरपालिकेच्या संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहाचे भाडे वसूल करताना बाजार व परवाना विभागाने भाडे वसुलीसाठी वापरलेल्या पावती पुस्तकांची साठा नोंदवहीमध्ये नोंद आढळून आलेली नाही. वसुलीची दैनिक नोंदवही व्यवस्थित ठेवलेली नाही. वसुलीच्या नोंदीची पुनरावृत्ती झाल्याने गोंधळ निर्माण झालेला आहे. तसेच दि.21/04/2012 ते दि.25/04/2012 या कालावधीचे संगीत कला उपासक सभेने कार्यक्रम अचानक रद्द केल्यामुळे पाच दिवसाचे भाडे रु. 90225/- व मा.महापौर यांनी दि.26/01/2013 रोजी हळदी कुंकू या खाजगी वैयक्तिक कार्यक्रमासाठी सभागृहाचा वापर केल्यामुळे रु.6015/- भाडे वसूल केलेले नाही.दशश्रीमाळी संस्थेला तारीख बदलून दिल्यामुळे रु.18045/- चे नुकसान झालेले आहे.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे बाजार व परवाना विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहाचे भाडे वसुलीमध्ये खालील आक्षेप आढळून आलेले आहेत.

1.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता-1971 चे नियम 9 (1) अन्वये पावती पुस्तक क्र.045, 267, 268, व 803 यांची नोंद साठा नोंदवहीमध्ये घेण्यात आलेली नाही. तसेच वसुलीच्या नोंदीबाबत नियम 9 चे (1) ते (8) चे अनुपालन केलेले नाही.
2.सांस्कृतिकभवनामध्ये आयोजित कार्यक्रमाची नोंद साध्या रजिस्टरमध्ये करण्यात आलेली आहे. उपरोक्त लेखासंहिता नियम 8 अन्वये प्रत्येक नोंद सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली नाही.
3.सांस्कृतिकभवन भाडे वसुली नोंदवही व विद्युत खर्च नोंदवही स्वतंत्रपणे ठेवण्यात आलेली आहे. परंतु दोन्हीची एकत्र नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे एकाच बाबींची पुनरावृत्ती झाल्याने गोंधळ निर्माण झालेला आहे. तसेच उपरोक्त लेखासंहिता नियम 8 चे अनुपालन केलेले नाही.
4.सलग दोन-तीन दिवस एकाच संस्थेचे कार्यक्रम असल्यास संबंधितांनी एकाच पावतीने रक्कम अदा केलेली असल्यास त्याची नोंद वसुली लिपिकाने नोंद्वहीमध्ये एकाच ठिकाणी न करता प्रत्येक दिवसाच्यासमोर केल्यामुळे पुनरावृत्ती झालेली आहे.
5.दि.21/04/2012 ते 25/04/2012 असे एकूण 05 दिवस अमरावती संगीत कलोपासक सभा , अमरावती या सभेने सांस्कृतिकभवनामध्ये आरक्षण केले होते.परंतु अचानक कार्यक्रम रद्द केल्याची नोंद नोंद्वहीमध्ये केलेली आहे. संबंधितांकडून कोणत्याही प्रकारची अनामत घेण्यात आलेली नव्हती. त्यामुळे सभागृहाच्या तीन शिफ्टचे मिळून प्रचलित व्यावसायिक दराप्रमाणे 6015*3*5= 90225/- रुपयाचे नुकसान झालेले आहे.त्याची वसुली करण्यात यावी.
6.दशाश्रीमाळी वनीक ज्ञातिनी संस्था, अमरावती यांनी दि.02/07/2012 रोजी कार्यक्रमासाठी दि.07/10/2012 रोजीचे सभागृहाचे आरक्षण केले होते.परंतु काही कारणास्तव दि.17/10/2012 रोजी संबंधितानी कार्यक्रमाची तारीख दि.06/01/2013 अशी घेतलेली आहे. पूर्वीच्या कार्यक्रमाची तारीख उलटून गेल्यानंतर तारीख बदलून देण्यात आलेली आहे.त्यामुळे महानगरपालिकेचे 6015*3= 18045/- चे नुकसान झालेले आहे. त्याबाबत संबंधिताची जबाबदारी निश्चित करून वसुली करावी.
7. दि.26/01/2013 रोजी मा.महापौर यांनी सभागृहाचा वापर खाजगी हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमासाठी केलेला आहे.परंतु त्याचे भाडे अदा केलेले नाही.त्याची वसुली केलेली नाही. वसूलपात्र रु. 6015/- वसूल करावेत.
उपरोक्त अनियमिततेबाबत बाजार व परवाना विभागास अर्धसमास पत्र क्र.166 दि.03/12/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 166)

## *110 सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये नगररचना विभागामध्ये व्यावसायिक इमारतीचे बांधकाम करताना निवासिक्षेत्र जादा दाखवून चुकविलेल्या विकास शुल्काबाबत आक्षेप.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 03**

DRAFT

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 369014.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 369014.00/-

***सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अमरावती शहर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने बांधकाम परवाना देताना खाली नमूद केलेल्या इमारतीचा वापर व्यावसायिक होत असताना त्यावर दुप्पट दराने विकास शूल्क आकारणी करणे आवश्यक असताना विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे नगररचना विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागाने सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये इमारतीचा बांधकाम परवाना देताना Building Byelaws And Development Control Rules For Muncipal Corporation of The City of Amarawati- 1986 अन्वये व्यावसायिक वापर होणाऱ्या इमारतीसाठी 120 रु. प्रति चौरस मीटर दराने विकास शुल्क व निवासी वापरासाठी रु.60 प्र.चौ.मी. दराने विकास शुल्क वसूल केले आहे.

1.खालील बांधकाम परवाना देण्यात आलेल्या संचिकांची तपासणी केली असता त्यामध्ये पुढीलप्रमाणे आक्षेप आढळून आलेले आहेत.

| अ.क्र. | धारकाचे नाव | बांधकाम परवाना क्र. व दिनांक | व्यावसायिक बांधकाम क्षेत्र चौ.मी. | निवासी बांधकाम क्षेत्र चौ.मी. | एकूण बांधकाम क्षेत्र चौ.मी. | वसूलपात्र विकास शूल्क रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | साईनाथ विदर्भ एन्टरप्राईजेस प्रा.लि.डायरेक्टर संजय लढ्ढा | 1049/ 07.11.2012 | 123.62 | 792.06 | 915.68 | 47524 |
| 2. | डॉ. मधुकर शामराव नाईक व डॉ.तुषार उदयभानजी पवार | 758/ 22.08.2012 | 121.25 | 671.85 | 867.47 | 40311 |
| 3. | डॉ. पार्वती प्रसाद मोरे | 787/ 28.08.2012 | 00.00 | 326.73 | 326.73 | 19604 |
| 4. | बीजी Land con. प्रा. लि. | 742/ 17.08.2012 | 1004.62 | 3167.62 | 4194.57 | 190057 |
| 5. | गेटलाईफ हेल्थकेअर डॉ. नरेंद्र वानखेडे | 834/ 06.09.2012 | 19.46 | 354.31 | 373.81 | 21259 |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6. | महिला गृह उद्योग लिज्जत पापड तर्फे श्रीमती नीला मु. बेगड | 638/ 19.07.2012 | 00.00 | 545.34 | 545.34 | 32720 |
| 7. | स्पे.मु. विनय एन्टरप्राईजेस विजयकुमार फुलाडी | 814/ 01.09.2012 | 00.00 | 292.31 | 292.31 | 17539 |
| | | | | | एकूण | 369014 |

2.उपरोक्त बांधकाम परवाना संचिकाची व बांधकाम नकाशाचे अवलोकन केले असता अनुक्रमांक 01,02,04,व 05 वरील धारकाने बांधकाम परवाना घेताना व्यावसायिक क्षेत्राचा परवाना घेऊन कमी व्यावसायिक बांधकाम दर्शविले असून जास्त निवासी बांधकाम दर्शविले आहे. त्यामुळे उपरोक्त बांधकाम विकास नियंत्रण नियमावली 1986 अमरावती व शासन निर्णयाप्रमाणे आकारण्यात येणारे दुप्पट दराचे शूल्क बुडाले असून त्यामध्ये महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच याप्रमाणे इतर परवान्याची तपासणी करावी व व्यावसायिक बांधकामाचे शूल्क वसूल करण्यात यावे.

3.अनुक्रमांक 03,06, व 07 वरील बांधकाम परवाने पूर्णपणे निवासी क्षेत्र दर्शविले असून सदरील फर्मच्या नावावरून सदरील बांधकामाचा वापर व्यावसायिक उद्देशाने होत असावा. त्याबाबत खात्री करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त अनियमिततेबाबत नगररचना विभागास अर्धसमास पत्र क्र. 116 दि.31/10/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 116)

## *124 स्थानिक संस्था कर दर फरकातील वसुलीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4820751.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 4820751.00/-

***अमरावती महानगर पालिकेअंतर्गत व्यापारी संस्थांनी शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा कमी दराने स्थानिक संस्था कर भरल्याचे लेखा परीक्षणात निदर्शनात आले आहे. काही व्यापारी संस्थाने सन 2012-2013 ची विवरण पत्र जी दाखल केली त्यांची तपासणी लेखा परीक्षणात करण्यात आली***

अमरावती महानगर पालिकेत एकूण व्यापारी संस्था 8410 असून कर निर्धारण विवरणपत्र दाखल करणारी 2579 व्यापारी आहेत.अजूनही 5831 व्यापार्यांनी कर निर्धारण विवरणपत्र दाखल केलेली नाहीत.पैकी 1770 व्यापारी केवळ 2012-13 मधील आहेत.म्हणजे अजूनही 60-70% व्यापार्यांनी काहीही हालचाल केलेली नाही.

व्यापारी संस्थानी सन 2012-2013 ची विवरण पत्र जी दाखल केली त्यांची तपासणी लेखा परीक्षणात करण्यात आली त्या वेळी काही व्यापारी संस्थांनी शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा कमी दराने स्थानिक संस्था कर भरल्याचे लेखा परीक्षणात निदर्शनात आले आहे..यामध्ये बहुतांशी व्यापारी हि मोंढा विभागातील आहेत.व आजही बहुतांशी दुकानदाराचा वाद दराबद्दल आहेच असे अभिलेख्यावरून दिसून येते.तरी ज्या व्यापारी संस्थांनी कमी दराने स्थानिक संस्था कर कमी भरला आहे अशा व्यापारी संस्थाची यादी सोबत सलग्न आहे .सदरील हि बाब विभागाने मान्य केली आहे.

DRAFT

| अ. क्र. | व्यापारी संस्थाचे नाव | एल.बी.टी नोंदणी क्र. | लागू असलेली खरेदी एल.बी.टी दरानुसार | एकूण देय्य स्थानिक संस्था कर | अदा कण्यात आलेला स्था.सं. कर | कमी भरलेला एल.बी.टी | व्याज रक्कम | भरावयाची एकूण एल.बी.टी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | राजेश ऑईल इंडस्ट्रीजअमराती | 030100130 | - | 960727 | 65040 | 895687 | 217413 | 1113100 |
| 2 | भैया इंडस्ट्रीज अमरावती | 0301100439 | 23825506 | 476510 | 29481 | 447029 | 88064 | 535693 |
| 3 | नंदकिशोर स्टील फर्निचर | 030100392 | 1821682 | 62259 | 11695 | 50564 | 11465 | 62029 |
| 4 | एवेरेस्त कंट्री लिकर | 010200320 | - | 477394 | 318265 | 159129 | 68274 | 227403 |
| 5 | भोजवानी त्रेडेर्स | 010300225 | 118223677 | 2364474 | 591118 | 1773356 | 461613 | 2234969 |
| 6 | शफ़िक़ अर्षद त्रेडेर्स | 010300005 | 46409415 | 688098 | 176396 | 511702 | 129870 | 461522 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | ओम साईबाबा कोल डेपो | 020400155 | 88067 | 3523 | 2465 | 1058 | 250 | 1308 |
| 8 | बालाजी स्टील अंड सिमेंट | 02040001 | 430447 | 12913 | 12817 | 46 | 18 | 14 |
| 9 | गुरुप्रसाद पेंट हाउस | 0240039 | 5385083 | 215404 | 215405 | 01 | 1060 | 1060 |
| 10 | शेईख शरीफ शेईख लतीफ | 010300013 | 541525 | 8123 | 7480 | 643 | 442 | 1085 |
| 11 | गणेश हार्डवेअर अंड मार्केटिंग | 010300013 | 598991 | 23960 | 24074 | 57 | - | 57 |
| 12 | आशियाना प्लायवूड | 010300076 | 1828026 | 73121 | 71713 | 1408 | 1553 | 2961 |
| | एकूण | | | | | 3840729 | 980022 | 4820751 |

संपूर्ण प्रस्तावाची तपासणी केल्यावर बरीचशी रक्कम वसूल होऊ शकते.तरी विभागाणे सविस्तर तपासणी करून अनुपालन दर्शवावे.

DATPDMM6101 (Ref No : 138)

## *130 नगररचना विभागाने बांधकाम परवाना देताना कामगार कल्याण उपकराची रक्कम वसूल न केल्याबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4795328.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 4795328.00/-

| |
|---|
| ***अमरावती शहर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने बांधकाम परवाना देताना कामगार कल्याण उपकराची वसूल केलेली नाही. सदरील रक्कम शासन निर्णयाप्रमाणे दि. 01/07/2010 पासून कामगार उपकर*** |

***लागू असून विभागाने दि.01/01/2013 पासून सदरील शासन निर्णयाची अंमलबजावणी केलेली आहे. तत्पूर्वीच्या दि.01/07/2010 ते दि.31/12/2012 पर्यंतच्या बांधकाम परवाना धारकांकडून सदर रक्कम वसूल केलेली नाही. सन 2012-13 मधील काही निवडक प्रस्तावाची तपासणी केली असता रु.47,95,328/- इतका कामगार उपकर वसुलपात्र असल्याचे दिसून येते.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे नगररचना विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना खालील आक्षेप आढळून आलेले आहेत.

1.इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती)अधिनियम 1996 आणि त्या अंतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम 1996 हे कायदे केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम क्षेत्रात कार्यरत असलेल्या बांधकाम मजुरांच्या कल्याणकारी उद्देशाने जसे की,आरोग्य,सुरक्षा आणि कल्याण इत्यादी योजना बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना पुरविण्याबाबतच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषगाने केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम 1998 अंमलात आणलेला आहे.

2.सदर उपकर अधिनियमाच्या कलम 3 व उपकर नियम 1998 च्या नियम 3 च्या अनुषंगाने शासन निर्णय उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ दिनांक 17 जुन 2010 नुसार जी इमारत व इतर बांधकामे “इमारत व बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम 1996” च्या कलम 2(1)(डी) अनुषंगाने परिभाषेत येतात व ज्याचे काम घेण्यासाठीचा करार दिनांक 01 जुलै 2010 वा तद्नंतर करण्यात येईल अशा सर्व बांधकामाच्या एकूण मुल्यावर (जमिनीची किमत वगळून) 1% उपकर दिनांक- 01.07.2010 पासून वसूल करणे आवश्यक आहे. संबधित आस्थापनेने कामगारांना किंवा त्यांच्या नातलगांना कामगारांसाठी नुकसान भरपाई अधिनियम 1923 मधील तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारची भरपाई दिलेली असेल ती रक्कम वगळून उर्वरित बांधकाम मूल्यावर 1% उपकर वसूल करावयाचा आहे. हा उपकर खाजगी तसेच शासकीय बांधकामावर देखील वसूल करण्याच्या उपरोक्त शासन निर्णयान्वये निर्देश आहेत. तसेच सदर उपकर कोणकोणत्या बांधकामासाठी/ बाबीसाठी लागू आहे याचा तपशील देखील सदर शासन निर्णयातील परिशिष्ट –1 मध्ये दिलेला आहे.

3.सदर अधिनियम व शासन निर्णयातील तरतुदीनुसार नगररचना विभागाने बांधकाम परवाना देतांना एकूण बांधकाम खर्चाच्या/मूल्याच्या (रु.10 लक्ष वरील) 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम वसूल करून शासनखाती भरणे आवश्यक आहे. अमरावती शहर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने सन 2012-13 मध्ये एकूण 1865 इतके बांधकाम परवाने दिलेले आहेत. परंतु दि.01/01/2013 पासून 1% कामगार उपकर वसूल केलेला आहे. विभागाने सन 2010-11 मध्ये 2219, सन 2011-12 मध्ये 1955, व सन 2012-13 मध्ये 1865 इतके बांधकाम परवाने दिलेले आहेत. इतर बांधकाम परवान्याचा शोध घेऊन त्याची वसुली



DRAFT

करून शासनखाती भरावी. काही निवडक प्रस्तावाची तपासणी करून त्यामध्ये कामगार उपकर वसुलीचे नमुन्यादाखल विवरणपत्र सोबत जोडलेले आहे. त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही करावी.

उपरोक्त अनियमिततेबाबत नगररचना विभागास अर्धसमास पत्र क्र.1 70 दि.03/12/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 170)

## *131 महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने शासन अधिसूचना दि. 06 ऑगस्ट,2012 नुसार बांधकाम परवाना देताना स्थानिक संस्था कराची रक्कम वसूल न केल्याबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3862233.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 3862233.00/-

***अमरावती शहर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने स्थानिक संस्था कराची(LBT) वसुली बांधकाम परवाना देताना केलेली नाही. काही निवडक प्रस्तावाची तपासणी केली असता रु.38,62,233/- अंदाजित वसुली आहे. विभागाने इतर प्रस्तावाची तपासणी करून स्थानिक संस्था कराची वसुली करून अमरावती महानगरपालिकेच्या खाती भरावी. तसेच विवरणपत्रामध्ये नमूद प्रस्तावाची छाननी करून शासन अधिसुचनेप्रमाणे वसुली करावी.***

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे नगररचना विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना काही निवडक प्रस्तावाची तपासणी केली असता विभागाने बांधकाम परवाने देताना स्थानिक संस्था कराची वसुली केलेली नाही.

1.मुंबई प्रांतिक महानगरपालिका -1949 (2012 नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम 2012 चे नियम 27 (ड) ( 4) अन्वये महानगरपालिकेच्या हद्दीत बांधकाम करण्याचे काम हाती घेणारा कोणताही बांधकाम व्यावसायिक/ कंत्राटदार , स्थानिक संस्था कर याखाली महानगरपालिकेकडे स्वत:ची नोंदणी करेल आणि त्याला , शहराच्या हद्दीत बांधकामाकरिता किंवा वापराकरिता आयात केलेल्या मालाच्या किमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा पर्याय असेल किंवा खालील मानकांनुसार स्थानिक संस्था कराचे ठोक प्रदान करण्याचा

पर्याय असेल.

अ) चौथ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम (ज्या इमारतीत उद्वाहन नसेल तेथे)रु. 100 प्रती चौरस मीटर

ब) सातव्या मजल्यापर्यंतचे बांधकाम (ज्या इमारतीत उद्वाहन असेल तेथे) रु. 150 प्रती चौ. मीटर

क) उतुंग इमारतींचे बांधकाम (सात मजल्यांपेक्षा अधिक) रु. 200 प्रती चौरस मीटर

2.जो कंत्राटदार ठोक कर प्रदानाचा पर्याय स्वीकारेल तो प्रारंभ प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केल्यावर स्थानिक संस्था कराच्या अशा देय रक्कमेपैकी 50% आगाऊ रक्कमेचे प्रदान करू शकेल. तसेच महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हाती घेणाऱ्या कोणत्याही व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा किंवा त्याच्या कंत्राट मूल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने उक्त कर प्रदान करण्याचा पर्याय असेल.

3.महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने सन 2012-13 या वित्तीय वर्षात एकूण 1865 बांधकामास परवाने दिलेले आहेत.प्रत्यक्षात उपरोक्त कोणत्याच प्रकारे स्थानिक संस्था कराची आकारणी न करता अनेक बांधकामास परवाने दिलेले आहेत.(बांधकाम परवाना नोंदवही अ.क्र 001 ते 1865) त्यापैकी पात्र बांधकामाकरिता किमान रु. 100 प्र.चौ.मी. प्रमाणे संबधित व्यावसायिक/ कंत्राटदार/व्यक्तींकडून वसूल करणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही न केल्यामुळे महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे व उपरोक्त शासन निर्देशाचे पालन झालेले नाही.

4.नमुन्यादाखल काही निवडक प्रस्तावाची तपासणी करून एकूण रु.38,62,233/- इतक्या रकमेच्या वसुलीचे विवरणपत्र-ब सोबत जोडलेले आहे.तसेच विभागाने इतर प्रस्तावाची तपासणी करून उपरोक्त शासन अधिसूचनेची अंमलबजावणी करावी. विवरणपत्रामध्ये नमूद प्रस्तावाबाबत अधिसुचनेमध्ये नमूद नियमाचा अवलंब करावा.

उपरोक्त अनियमिततेबाबत नगररचना विभागास अर्धसमास पत्र क्र.170 दि.03/12/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.



DRAFT

### *137 बाजार व परवाना विभागाने वसूल केलेल्या इमारत भाड्यावर केंद्रीय सेवाकर वसूल न केल्याबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2327788.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2327788.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 2327788.00/-

***अमरावती शहर महानगरपालिकेच्या बाजार व परवाना विभागाने केंद्रीय सेवाकर कायदा-2012 अन्वये महानगरपालिकेने भाडेतत्वाने व लीजवर देण्यात आलेल्या व्यापारी संकुलाच्या भाडे रकमेवर 12.36% दराने सेवाकर वसूल केलेला नाही. विभागाची सन 2012-13 ची थकबाकीसह एकूण मागणी रु.1,88,33,236/- इतकी होती. त्यावर 12.36% दराने रु.23,27,788/- इतकी रक्कम वसूल करून शासनखाती भरणे आवश्यक होते. विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

DRAFT

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे बाजार व परवाना विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना खालील आक्षेप आढळून आलेले आहेत.

1.बाजार व परवाना विभागाने महानगरपालिकेच्या मालकीच्या वेगवेगळ्या मालमत्ता,गाळे,व्यापारी संकुले भाडेपट्ट्याने किंवा लीजवर दिलेल्या आहेत.केंद्रीय सेवाकर कायदा-2012 अन्वये त्यावर 12.36% दराने सेवाकर वसूल करणे आवश्यक होते.विभागाने सेवाकर वसूल केलेला नाही.

2.बाजार व परवाना विभागाची सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये मालमत्तेच्या भाड्यापोटी येणारी मागील थकबाकीसह एकूण मागणी रु.1,88,33,326/- इतकी होती.त्यावर 12.36% दराने रु.23,27.788/- इतकी रक्कम वसूल करून शासनखाती भरणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत नगररचना विभागास अर्धसमास पत्र क्र.1 91 दि. 14/12/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 191)

# कलम ९ क खालील आक्षेप

DRAFT

------------------- निरंक -------------------

DRAFT

# सर्वसाधारण अनियमितता

DRAFT

# कलम ९ ड खालील आक्षेप

DRAFT

## *10 महानगरपालिकेतील कार्यरत असलेल्या अधिकारी /कर्मचारी यांच्या पदांचा आकृतिबंध मंजूर नसले बाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***कार्यरत सर्व स्थायी पदांचा आकृतीबंध शासनाकडून मंजूर करून घेतलेला नाही***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949चे कलम 45 ते 54 नुसार सर्वच कार्यरत पदांचा आकृतिबंध शासनाकडून मंजूर करून घेणे आवश्यक आहे ,सदर बाबीविषयी इकडील अर्धसमास पत्र क्र.78दिनांक 14/10/2015 नुसार माहिती मागितली असता मु.प्रा.म.न.पा.अधिनियम 1949 चे कलम 51(2)अन्वये अमरावती महानगरपालिका आस्थापनेवरील पदांच्या विवरणास स्थायी समितीच्या दिनांक 05/02/2005 च्या सभेने मान्यता दिलेले शासनाच्या मंजुरीसाठी पाठविलेले विवरण पत्र व कार्यालय अधीक्षक यांनी तयार केलेले 2014-15 चा आकृती बंध पुरविण्यात आलेला आहे परंतु सदरील विवरण पत्रास शासनाची मान्यता प्राप्त असल्याचे आढळून आले नाही

उपरोक्त अधिनियमातील तरतुदी नुसार सर्व स्थायी पदांचा आकृतिबंध सत्वर शासनाकडून मजूर करून घेणे आवश्यक आहे

DRAFT

DATVKGM7601 (Ref No : 78)

## *13 मनपा दवाखाना यशोदानगर, हरिभाऊ वाठ व मोदी दवाखाना यांच्या अभिलेख्यातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मनपा दवाखाना यशोदानगर, हरिभाऊ वाठ व मोदी दवाखाना यांच्या अभिलेख्यामध्ये औषधीच्या पावत्या सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या नाहीत. तसेच औषधीच्या साठा नोंद्वाहीमध्ये सन 2011-12 अखेर शिल्लक असलेल्या औषधीची नोंद घेतलेली नाही.***

DRAFT

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना मनपा दवाखाना यशोदानगर, हरिभाऊ वाठ व मोदी दवाखाना यांच्या अभिलेख्यामध्ये खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता-1971 चे नियम 9अन्वये पावती पुस्तके सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले नाहीत.

2.उपरोक्त लेखासंहीतेन्वये दैनिक भरणा पुस्तकांचा मासिक गोषवारा काढलेला नाही.

3.उपरोक्त लेखासंहीतेन्वये दि. 31/03/2013 अखेर शिल्लक असलेली चलान सक्षम प्राधिकाऱ्याने रद्द केलेले नाहीत.

4.औषधाच्या साठा नोंद्वाहीवर दि.01/04/2012 रोजी सन 2011-12 मधील शिल्लक औषधी साठयाची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यादिवशी एकूण दवाखान्यात एकूण औषधीसाठा किती? याची माहिती मिळत नाही.

मोदी दवाखान्यातील औषधीसाठा नोंद्वाहीबाबत खालील क्र. 5 व 6 हे आक्षेप आहेत.

5.Tab. calcium Lactate चा दि.01/04/2012 रोजी शिल्लक साठा 1000 Tab. असून दि. 09/08/2012 रोजी 3000 Tab. घेतल्या व दि.15/12/2012 रोजी 5000 Tab. घेतल्या आहेत मात्र त्याचा वापर केल्याचे दिसून येत नाही. औषधीसाठा नोंद्वाहीनुसार दि. 31/03/2013 अखेर एकूण 10000 Tab. शिल्लक आहेत. सन 2012-13 या आर्थिक वर्षात एकूण 4000 Tab. चा वापर केल्याचे साठा नोंदवहीतील पृष्ठ क्र. 12 वरून दिसून येते. औषधी शिल्लक असताना जास्तीची औषधी घेण्याचे प्रयोजन काळात नाही. सदरील औषधीची Exp. Date 09/2013 अशी असून फक्त सहा महिन्याची दिसून येते या वरून शहानिशा न करता अनावश्यक खरेदी झाल्याचे दिसून येत आहे. . 6.Mecalvit calcium Inj. चा दि.01/04/2012 रोजी शिल्लक साठा 40 vial असून दि.15/12/2012 रोजी एकूण १०० vial inj. ची मागणी केलेली आहे. परंतु त्यांचा वापर केलेला दिसून येत नाही. सदरील inj. ची Exp. Date 12/2013 असून सन 2012-13 चा वार्षिक वापर एकूण 40 vial असल्याचे दिसून येते. शिल्लक साठयाची Exp. Date जवळची असल्याने औषधी वाया गेल्याची शंका आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत आरोग्य विभागास अर्धसमास पत्र क्र. 62 दि.30/09/2015 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATGAGM8201 (Ref No : 62)

### *19 म.न.पा.अमरावतीचा अस्थापना खर्च शासनाद्वारे विहित मर्यादेपेक्षा जास्त असनेबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***शासन निर्देशानुसार ड वर्ग महानगरपालिकेची अस्थापना खर्चाची विहित मर्यादा 35 टक्केइतकी निश्चित असताना प्रत्यक्षात अस्थापना खर्चाची टक्केवारी हि टक्के इतकी होऊन जादा खर्च होण्याची अनियमितता झाली आहे***

DRAFT

स.न. 2012-13 या आर्थिक वर्षातील म.न.पा.ची अस्थापना खर्चाची टक्केवारीची पडताळणी केली असता खालील बाबी आढळून आल्या, लेखा विभागाने पुरविलेल्या माहिती नुसार,

एकूण महसुली उत्पन्न — रु.11742450110/-

अस्थापना खर्च ------------- रु.704738720/-

अस्थापना खर्चाची उत्पन्नाशी टक्केवारी ----60%

स.न.2012-13 या आर्थिक वर्षातील महानगरपालिकेच्या एकूण महसुली उत्पन्नाशी अस्थापना खर्चाची टक्केवारी परिगणना पडताळणी केली असता अस्थापना खर्चाची टक्केवारी 60 टक्के इतकी आढळून आली आहे .या संदर्भातील शासन निर्णय .महाराष्ट्र शासन न.वी./शासननिर्णय क्र.संकीर्ण 2005 /वर्गीकरण /प्र.क्र.379/05/न.वी.6 दिनांक-4 मे 2006 अन्वये अस्थापना खर्चाची मर्यादा 35 % पर्यंत घालून दिलेली आहे . उपरोक्त शासन निर्णयानुसार विहित मर्यादेपेक्षा अधिक खर्च होण्याची अनियमितता झालेली आहे ,या बाबी संदर्भाने म.न.पा.ने सत्वर उपाय योजना करणे आवश्यक आहे ,या अनुशंघाने इकडील अर्धसमास पत्र क्र.108 दि.27/10/2015 नुसार विभागास अनुपालनास्त्व कळविले होते अनुपालन अप्राप्त आहे.

DATVKGM7601 (Ref No : 108)

## *25 अमरावती महानगरपालिका लेखा परीक्षण सन 2012-13 मध्ये पाळीव स्वानांवर किंवा इतर पाळीव जनावरासाठी अनुज्ञपती शुल्क न आकारल्यामुळे झालेले महापालिकेचे नुकसानीबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***पाळीव स्वानांवर किंवा इतर पाळीव जनावरासाठी अनुज्ञपतीशुल्क न आकारल्या मुळे झालेले महापालिकेचे नुकसानीबाबत*** |

अमरावती महानगरपालिकेतील पाळीव स्वानाना/कुत्र्यांना अनुज्ञप्ती न दिल्याचे निदर्शनास येते.सदरील विभागास लेखा परिक्षण पथकाने पशुगणना संचिका 2012 ची मागणी केली असता अशी कोणतीही मागणी किंवा पाळीव प्राण्याची संख्या माहित नसल्याचे सांगितले.किंवा असा कोणताही अहवाल प्राप्त नसल्याचे सांगण्यात आले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 493 परी.क्र 4 नुसार अनुज्ञप्ती फी ठरवण्याचा ठराव महानगरपालिकेने पारित करणे आवश्यक आहे.परंतु पाळीव स्वानांची पशुगणने नुसार आकडेवारी प्रसिद्ध नसल्याचे सांगण्यात आले.सन 2012-13 पर्यत पाळीव कुत्र्याची किंवा अन्य प्राण्याची एकूण संख्या किती आहे.सन 2012-13 पर्यत फी वसूल करून अनुज्ञप्ती देणे,व लायसन देण्यासाठी जाहिरातीद्वारे प्रोसाहित करणे,व त्या प्रमाणे महानगर पालिकेचे उत्पन्न वाढविणे आवशक होते.परंतु अशी कार्यवाही न झाल्याने लेखापरीक्षण वर्ष सन 2012-13 वर्षात पाळीव कुत्रा किंवा अन्य प्राण्या द्वारे अनुज्ञप्ती ची फीस निरंक असल्याचे दिसून येते.पशुगणना अहवाल नसल्याने निश्चित मोकाट व पाळीव कुत्रे किती,निर्बीजीकरण किती केले याबाबत निश्चित माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.त्याद्वारे सन 2012 -13 मध्ये प्रत्येक महिन्यात पकडण्यात आलेली कुत्री/स्वान अंदाजे 300-400 असून अंदाजे प्रत्येक झोन मधून 2000 कुत्री/स्वान या प्रमाणे एकूण 5 झोन मधून 10000 कुत्री/स्वान पकडण्याचे जे कंत्राट दिले आहे तर हि आकडेवारी फसवी असल्याचे जाणवते .तरी पशुगणना अहवालानुसार मोकाट स्वान/कुत्री पकडण्यात आले किंवा झालेला खर्च योग्य असल्याबाबत अर्धसमास पत्र क्र.40/दि.10/09/2015 चे अनुपालन प्राप्त नाही त्यामुळे परीच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPDMM6101 (Ref No : 40)

## *27 अग्निशमन सेवा बळकटीकरणाबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : मनपा निधी मनापानिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***अग्निशमन विभागात प्रशिक्षण घेतलेली कर्मचारी संख्या कमी असून , शासन स्थायी निर्देश क्र,31 दि.22.4.2005 चे परीशिस्ट ड मधील अ.क्र.4 नुसार ना हरकत प्रमाणपत्र शुल्क व वार्षिक नुतानिकरन शुल्क,महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायत व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ भारतीय उत्फोटक कायदा,दि ग्यास सिलेंडर नियम व दि पेट्रोलियम कायदा 1934 अन्वये क्षेत्रफ्लानुसार नुसार आकारल्याचे दिसत नाही,लोक्संखेनुसार अग्निशमन केंद्रासाठी आवशक जागा किती व इतर साधन सामुग्रीसाठी,गाड्या उभ्या करण्यासाठी किती जागा पाहिजे याचा आढावा घेतला नाही.किती अग्निशमन केंद्र निर्माण केली,किती वाहने खरेदी केली या बाबत माहिती उपलब्ध झाली नाही.***

अमरावती महानगर पालीकेंतर्गत आपले अग्निशमन विभागाचे लेखापरीक्षण बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1.नगरपरिषदप्रशासन मुंबई शा.,निर्णय क्र./नप्रसे/अग्निशमन सेवा/2005/प्र,क्र,314/9 दि.22.4.2005(व स्थायी निर्देश क्र.23/दि,19./10/2004)छे परी.क्र.16 नुसार लीडिंग फायरमन,ड्रायवर कम ऑपरेटर,फायरमन यांचे नियुक्तीसाठी जे कर्मचारी येशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करतील त्यांनाच अग्निशमन विभागात नियुक्ती देता येईल,जे कर्मचारी प्रशिक्षण पूर्ण करणार नाहीत ते आपल्या मूळ पदावरच कार्यरत राहतील.

परंतु अग्निशमन विभागाचे अस्थापना वरील कर्मचाऱ्याचे लेखे तपासणी करताना 36 कार्यरत पदापैकी 06 कर्मचारी प्रशिक्षण न घेता काम करीत असल्याचे दिसून येते.सदरील बाब शासन निर्णयाचे उल्लघन करणारी आहे.

2. शासन स्थायी निर्देश क्र,31 दि.22.4.2005 चे परीशिस्ट ड मधील अ.क्र.4 नाहरकत प्रमाणपत्र शुल्क व वार्षिक नुतानिकरन शुल्क.महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायत व औद्योगिक नागरी अधिनियम 1965 भारतीय उत्फोटक कायदा,दि ग्यास सिलेंडर नियम व दि पेट्रोलियम कायदा 1934 क्षेत्रफलानुसार आकारणे आवशक आहे.त्यान्वये दि,31/3/2013अखेर म.न.पा.ने आकारणी करून लेखे परिरक्षित केले नाही.

3.शासन स्थायी निर्देश क्र,31 दि.22.4.2005 मधील परी.क्र.21 अन्वये लोकसंख्येनुसार नुसार अग्निशमन केंद्रासाठी आवशक जागा व इतर साधन सामुग्रीसाठी,गाड्या उभ्या करण्यासाठी किती जागा निवडताना खालील बाबी प्राधान्याने पाहणे आवश्यक आहे

अ)नगरपरिषद जवळ

ब)ज्या ठिकाणी वेळोवेळी सहज पाणीपुरवठा होऊ शकेल

DRAFT

क)रुग्णालयाजवळ

ड)वरील ठिकाणी जागा उपलब्ध नसल्यास अन्य सोयींची जागा शासन निर्देशानुसार निवड करणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे कारवाही म.न.पा.कडून होत नसल्याचे आढळून आले आहे.

4 शासन निर्णय नगरविकास विभाग अशस/1407/60/प्र,क्र,211 नवी.20 मुंबई दि,31/8/2009 चे परीशिस्त –क नुसार अमरावती महानगरपालिकेसाठी लोक्संखेनुसार अग्निशमन कैंद्र किती, वाहने किती,असावीत त्याचा आराखडा दिलेला आहे.

त्यानुसार महापालिकेने किती अग्निशमन कैंद्र निर्माण केली?व किती वाहने खरेदी केली? यासंबधी काय कार्यवाही केली?याबाबतची सविस्तर माहिती लेखापरीक्षणास पुरविण्यात आली नाही.त्यामुळे अर्धसमास पत्र क्र.101 दि.27/10/2015 अन्वये घेतलेला आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPDMM6101 (Ref No : 101)

DRAFT

## *28 अग्निशमन विभागातर्फे आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 नुसार फायर ऑडीट करून न घेणे बाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :अग्निशमन मनपानिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***अग्निशमन विभागातर्फे आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 नुसार फायर ऑडीट केलेले नाही.***

महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक 06/12/2008 पासून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 हा लागू करण्यात आला आहे .उपरोक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार महापालिका क्षेत्रातील शासकीय कार्यालये,हॉटेल,लॉज,रेस्टॉरंट,इमारती,शैक्षणिक इमारती.रुग्णालये,व्यावसायिक शॉपिंग कॉमल्पेक्स,,नाट्यगृहे,सिनेमागृहे,मंगल कार्यालये,औद्योगिक इमारती,गोदामे,15 मीटर पेक्षा उंच इमारती ,समिश्र वापराच्या इमारतीमध्ये अग्निशाम उपाययोजना करून सदरच्या उपाययोजना दुरुस्त कार्यक्षम असल्याबाबत प्रमाणपत्र वर्षातून दोनवेळा म्हणजे जानेवारी व जुलै महिन्यामध्ये अग्निशमन अधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे.

म.न.पा.क्षेत्रांतर्गत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवनसंरषक उपाय योजना अधिनियम 2006 अन्वये अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्याकरिता विविध आवशक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र अग्निसुरक्ष्या अभियान राबविण्याचा शासनाने क्र, अशस/1407/366प्र,क्र.211/नवी.20 मंत्रालय मुंबई

दि.31ऑगस्ट2009 रोजी शासन निर्णय घेतला आहे.सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.112 दि.29/10/2015 अन्वये म.न.पा.क्षेत्रातील एकूण इमारती,ऑडीट केलेल्या इमारती ,व संबधित माहिती मागितली असता माहिती अप्राप्त आहे तसेच उपरोक्त प्रकारचे ऑडीट म.न.पा.अमरावती मध्ये केल्या जात नसल्याचे मौखिक रित्या सांगण्यात आले तसेच सदर बाबी ची कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे.स.न.2012-13 अखेर उपरोक्त प्रमाणे प्रमाणपत्र घेतल्याचे आढळून आले नाही.याबाबत विभागाने प्रबोधन केल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे शासनाचा अधिनियामामधील उद्देश सफल झालेला नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.112 दि.29/10/2015 निर्गमित करण्यात आले असता त्याबाबत कोणताही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

DATPDMM6101 (Ref No : 112)

DRAFT

## *29 आपत्कालीन व अतिवृष्टी काक्षाकरिता किर्लोस्कर जनरेटर,होंडा पंप,खरेदीबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष :अग्निशमन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 40000.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 40000.00/-

***खरेदी/दुरुस्ती विहित मार्गाने होत नाही,अग्रिम रक्कमेचे समायोजन वेळीच होत नाही.***

अमरावती महानगरपालिकेमध्ये सन 2012-13 लेखा परीक्षणात खालील प्रमानाकाद्वारा अग्रीम घेतला असल्याचे दिसून येते.

प्रमानक क्र.7971/13/12/2012 रु.40000

प्रभारी अग्निशमन अधिकारी यांनी उपरोक्त प्रमाणका द्वारे अग्रीम घेतल्याचे दिसून येते.महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम क्र,189 नमुना क्र,147 प्रमाणे आगाऊ रकमांची लेखा ठेवण्यात यावी असे नमूद असून वर्षा अखेर अदत्त बाकी काढली पाहिजे.सदरील अग्रीमचा लेखा विभागामध्ये शोध घेतला असता सदरील अग्रीम दि.14/08/2013 रोजी समायोजन झाले असल्याचे दिसून येते.

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1.कोणताही अग्रीम,दिल्याच्या दिनांकापासून 3 महिन्या पर्यंत समायोजन करण्यात यावे.परंतु सदरील अग्रीम

सन 2013-2014 मध्ये दि.14/08/2013 ला समायोजन झाल्याचे दिसून येते.तीन महिन्यपेक्षा जास्त विलंब झाल्यास वेतन देयकातून सदरील वसुली एकमुस्त करण्यात यावी असे नियमात नमूद आहे.परंतु अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही.

2.समायोजन देयक लेखा परीक्षणात पहावयास मिळाले नाही.त्यामुळे खरेदी/दुरुस्ती विहित मार्गानेच ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आली याबाबत माहिती होऊ शकली नाही.

3..खरेदीच्या/दुरुस्तीच्या विहित कार्य पद्धतीचा अवलंब झाल्याचे दिसून आले नाही.

4.दुरुस्ती निश्चित कोणत्या तारखेस करण्यात आली हे लॉग बुकावरून समजू शकत नाही.लॉग बुकमध्ये वाहन दुरुस्ती साठी होते याची नोंद करण्यात आली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.158 दि.03/12/2015 निर्गमित करण्यात आले असता अनुपालन प्राप्त नाही त्यामुळे परीच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPDMM6101 (Ref No : 158)

## *30 इंधन खरेदी साठानोंद्वही बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 12495940.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 12495940.00/-

***वाहन कार्यशाळा विभागाने विहित नमुन्यात नोंदवही ठेवलेली नाही. नोद्व्हीतील हिशोब ,नवीन आवक,वापर शिल्लक,गोषवारा काढला नाही, साठा नोंद वहीवर नियंत्रक अधिकार्याची स्वाक्षरी नाही,लॉग बुक उपलब्ध करून दिले नाही***

DRAFT

अमरावती महानगरपालिका अंतर्गत वाहन विभागाचे लेखा परीक्षणात वाहन / कार्यशाळा विभागास इंधन खरेदीसाठी ची नोंदवही मागणी करण्यात आली असता सन 2012-13 या आर्थिक वर्षात एकूण इंधन साठा खरेदीवर रु.12495940 खर्च केल्याचे दिसून येते.सदरील नोंद्वहीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 153 अन्वये नियंत्रण अधिकाऱ्यास इंधन वापरावर होणाऱ्या खर्चाचे परिनिरीक्षण करता यावे म्हणून.न. 126 मध्ये इंधनाचा हिशोब ठेवणे आवश्यक आहे.

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 145 (2) नुसार न.न. 126 मध्ये ठेवलेली साठा नोंदवहीतील हिशोब दर महिन्याला पूर्ण करणे आवशक आहे.व राहिलेली शिल्लक नोंदी ठेवणाऱ्या अधिकाऱ्याणे पडताळून पाहिली पाहिजे.

3. विभागाने विहित नमुन्यात नोंदवही ठेवलेली नाही. सदर नोंदवही प्रमाणित नाही.सर्व पाने मनपा कार्यालयाने

सील उमटउन घेतले पाहिजे. .नोंदवहीत मागील शिल्लक,नवीन आवक,व एकूण वितरीत परिमाण यांचा दररोज व माहेवारी गोषवारा काढणे आवशक आहे.तसेच साठनोंद्वहीवर नियंत्रक अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.सदर साठ्याच्या एकूण वापरावर कोणत्यही अधिकाऱ्याचे नियंत्रण नाही.त्यामुळे इंधनाचा योग्य वापर झाल्याची व पूर्ण नोदी नोंदविल्याची खात्री होत नाही.

4.नोंदवहीत केवळ वाहन क्र./वाहनात् भरलेले इंधन त्याची किंमत खर्च तरतुद व शिल्लक या बाबीच केवळ नोंदविल्या आहेत.तारखे निहाय इंधनाची नोंद नाही.जगताप पेत्रोलियम चे देयक क्र./दिनांक नमूद नाही.

5.लॉग बुक उपलब्ध करून दिले नाहीत,त्यामुळे देयकाची तपासणी करणे शक्य होत नाही.तरी सर्व विभागाकडून लॉग बुक उपलब्ध करून देण्याबाबत लेखा परीक्षा पथकाने अर्धसमास पत्र क्र.69 / दि 08/10/2015,मा.आयुक्तांना दि.15/10/2015 रोजी अर्धशासकीय पत्र, व दि.26/11/2015 रोजी सविस्तर अर्धसमास पत्र क्र.150 देऊन देखील लॉग बुक उपलब्ध झाली नाहीत. कोणतेही अनुपालन प्राप्त नाही.त्यामुळे सदरचा आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPDMM6101 (Ref No : 150)

## *31 बाजार व परवाना विभागाने पावती पुस्तक क्र. 188 वसुलीसाठी एका वर्षानंतर वापरल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***बाजार व परवाना विभागाने वसुलीसाठी दिलेल्या पावती पुस्तकांचा वापर विहीत कालावधीत केलेला नाही.***

अमरावती महानगर पालिकेच्या बाजार व परवाना विभागातील सन 2012–13 या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करताना खालील बाब आढळून आली आहे.

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता , 1971 मधील नियम क्र . 9(7) अनुसार वसुलीच्या वापरासाठी देण्यात येणारी पावती पुस्तके त्याच वित्तीय वर्षात वापरण्यात आली पाहिजेत . काही पावत्या शिल्लक राहिल्यास त्या वर्षअखेरीस रद्दबाबत करून तसा शेरा प्राधिकृत अधिकाऱ्याने लिहिणे अभिप्रेत आहे.

परंतु बाजार व परवाना विभागाने सन 2010-11 या वित्तीय वर्षात वसुलीसाठी दि .6.12.2010 रोजी श्री. शैलेंद्र शर्मा यांना दिलेले पावती पुस्तक क्र . 188 चा वापर त्यानंतर पूर्ण एका वर्षानंतर



DRAFT

म्हणजे 2012-13 या वित्तीय वर्षात दि.4 ते 30 मार्च 2013 या कालावधीत वसुलीसाठी केला आहे. त्यामुळे उपरोक्त लेखा संहितेतील तरतुदीनुसार कार्यवाही केलेली नसल्याचे निदर्शनास आले.

सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.79, दि. 14.10.2015 नुसार विभागास अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात आला आहे.

IPRSRBM6901 (Ref No : 79)

## *32 पावती पुस्तक क्र. 805 मधील रक्कम रु. 3734 वसूल करणेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*
गुंतलेली रक्कम रु. 3734.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 3784.00/-

***अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-2013 च्या लेखापरीक्षणात मालमत्ता कर वसुली बाबतच्या लेख्यांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्या आहेत.***

DRAFT

अमरावती शहर महानगर पालिकेच्या बाजार व परवाना विभागातील सन 2012–13 या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करताना खालील बाब आढळून आली आहे.

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता , 1971 नुसार प्रत्येक वसुलीच्या रकमेची पावती रक्क म महानगरपालिका खाती जमा करणे अनिवार्य आहे.

परंतु बाजार व परवाना विभागाने 2012-13 या वित्तीय वर्षात दि . 19.4.2012 रोजी वसुलीसाठी वापरलेल्या पावती पुस्तक क्र . 805 मधील पावती क्र. 001 अन्वये वसूल केलेली रक्कम रु. 3734 जमा रकमेच्या नोंदवहीत दिसून येत नाही. ही रक्कम संबंधिताकडून एकरकमी वसूल करून महानगरपालिका खाती जमा करण्यात यावी.

सदर रकमेविषयी लेखा परीक्षणास समर्पक माहिती न मिळाल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

IPRSRBM6901 (Ref No : 81)

## *33 लेखा परीक्षणासाठी पावती पुस्तक क्र. 181 उपलब्ध करून न दिल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 227961.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 227961.00/-

***बाजार व परवाना विभागाने वसूल रक्कम रु.2,27,961 चे पावती पुस्तक उपलब्ध करून दिले नाही.***

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा 2011 मधील कलम 6 नुसार लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देण्याची स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी आहे. तथापि बाजार व परवाना विभागाने 2012-13 या वित्तीय वर्षात वसुलीसाठी वापरलेले पावती पुस्तक क्र. 181 हे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करून दिले नाही.

कार्यालयात असलेल्या जमा रकमांच्या नोंदवहीमध्ये पावती पुस्तकातील जमा रकमांच्या नोंदी घेतलेल्या आहेत. त्याच प्रमाणे पावती पुस्तक क्र.181 या पावती पुस्तकान्वये एकूण रक्कम रु.2,27,961 इतकी वसुली झाल्याचे दिसून येते. परंतु सदरील पावती पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने वरील रकमेबाबत खात्री होऊ शकलेली नाही. सदर प्रकरणी विभागाने/म.न.पा.ने पावती पुस्तक आढळून येत नसल्याने आवश्यक ती कार्यवाही केली असल्याचे आढळून आले नाही. तसेच सदर बाबीसंदर्भाने अर्धसमास पत्र क्र. 82, दि. 14.10.2015 अन्वये विभागाला अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन अप्राप्त आहे.

वसुलीच्या रकमेबाबत खात्री करण्यासाठी पावती पुस्तक लेखा परीक्षणास उपलब्ध करून न दिल्यामुळे लेखा परीक्षण अहवालात आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVKGM7601 (Ref No : 82)

## *35 जमा रक्कम नोंदवहीतील पृष्ठांवर लाल व काळ्या शाईने तिरप्या रेषा ओढल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***बाजार व परवाना विभागातील जमा रक्कम नोंदवही पृष्ठे सलगपणे वापरलेले नाहीत.***

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता , 1971 नुसार लेखालेखनासाठी वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक पृष्ठांची गणना करून त्यांचा चोखपणे उपयोग केला पाहिजे.

बाजार व परवाना विभागातील जमा रक् कम नोंदवहीतील पृष्ठांचा सलगपणे वापर न करता

काही चिकटवलेल्या स्थ्ळीम तशीच ठेवून त्या नंतरच्या पृष्ठांचा वापर करण्यात आला आहे. पृष्ठ क्र. 18, 50, 51 आणि 69 ही पृष्ठे काही अंशी अर्धवट लिहून लाल व काळ्या शाईने तिरप्या रेषा ओढून रद्द करण्यात आली आहेत . तसेच या पृष्ठांवर सक्षम प्राधिकाऱ्याने सदर पृष्ठे काही अनिवार्य कारणास्तव रद्द केल्याचे प्रमाणित केलेले नाही.

ही पृष्ठे कशामुळे रद्द करण्यात आली, या संदर्भाने अर्धसमास पत्र क्र. 92, दि. 19.10.2015 अन्वये अनुपालनास्तव कळविले अस ता अनुपालन अप्राप्त आहे . त्यामुळे लेखा परीक्षण अहवालात आक्षेप नोंदविण्यात आला.

IPRSRBM6901 (Ref No : 92)

## *39 कोर्ट केसेस बाबत अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 07**

*लेखा शीर्ष : दावे व खटले मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1340500.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1340500.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 134050.00/-

***अर्थसंकल्पीय अनुदानापेक्षा प्रत्यक्ष जादा केलेल्या खर्चास स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही. वकीलाची पॅनेलवर नियुक्त केल्याचे मनपाचे निवडपत्र, वकीलाची विधी पदवी, अनुभव प्रमाणपत्र, तसेच बार कॉन्सील ऑफ महाराष्ट्र 'सनद' जोडली नाही. विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्रमांकः जीपीएच-4398/(173)/चौदा दिनांक 30-1-1999 चे दरापेक्षा वकीलांना फीचे जादा दराने प्रदान करण्यात आले. श्री एम.जी. भांगडे यांना कोणताही आदेश नसतांना रूपये 1,50,000/- चे नियमबाहय प्रदान करण्यात आले. आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 जे नुसार नुसार देयकातुन 10% आयकराची रूपये 1,34,050/- कपात केली नाही.***

सन 2012-13 या वित्तीय वर्षातील महानगर पालीकेमार्फत पालीकेची कोर्टात बाजु मांडण्या करीता वकीलाचे पॅनल तयार करण्यात आले. सन 2012-13 मध्ये एकुण 10 वकीलांना वकील फीचे रूपये 13,40,500/- शोधन खालील प्रमाणे करण्यात आले.

| प्र.क्र./दिनांक | रक्कम | वकीलाचे नाव | केसचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|
| 391/20-4-12 | 431500 | ए.एम.जैन | 174 केसेस | 1.वकीलाचे देयकातुन आयकर कपात केला नाही. |
| 1980/20-6-12 | 150000 | एम.जी.भांगडे | W.P.No.139, रविंद्र हरवानी, उच्च् न्यायालय | वरील 1 प्रमाणे. |
| 1981/20-6-12 | 70000 | डि.एम.श्रीमाळी | 39 केसेस, औदयोगीक | वरील 1 प्रमाणे |



DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | न्यायालय | 2. वकीलाची पावती नाही. |
| 2299/21-6-12 | 138000 | जेमीनी कासट | 12 सिव्हील केसेस | वरील 1व2 प्रमाणे<br>3. लॉ डिग्री नाही. |
| 2300/21.6.12 | 50000 | नितीन सांबरे | 2 सिव्हील केसेस | वरील 1 प्रमाणे. |
| 2301/21-6-12 | 10000 | जयंत मोकादम | 1 सिव्हील केसेस | वरील 1 प्रमाणे. |
| 2302/21-6-12 | 31000 | ए.एम.जैन | 20 सिव्हील केसेस | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 3383/7-8-12 | 28000 | नईम अहमद | दिवानी कोर्ट | वरील 1 व 2 प्रमाणे<br>4.वकीलाचे बिल नाही |
| 3839/28-8-12 | 125000 | एम.के.पठान | 7केसेस | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 5813/12-10-12 | 107000 | निलेश आहुजा | 39 केसेस | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 5813/12-10-12 | 200000 | सी.एस.कप्तान | 10 केसेस | वरील 1 व 2 प्रमाणे |
| | 1340500 | | | |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. सन 2012-13 चे मुळ अंदाजपत्रकात रूपये 1200000 केली असून सुधारीत अंदाजपत्रकात रूपये 15,00,000/- तरतुद असतांना वार्षिक अहवालानुसार प्रत्यक्ष खर्च रूपये 16,61,150/- दर्शविण्यात आला. महानगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 59 नुसार वार्षिक लेखे वर्गीकृत पुस्तकांतील बेरजांवरून संकलित केले पाहिजेत. परंतु विभागाचे तरतूद रजिष्टर व रोख पुस्तकानुसार सन 2012-13 मध्ये कोर्ट केसेसवर एकुण रूपये 13,40,500/- चा खर्च केला. यावरून वार्षिक अहवालामध्ये दर्शविलेला खर्च व रोखपुस्तकामध्ये असलेला खर्च यात तफावत असल्याचे दिसून येते. त्यामुळे वार्षिक अहवाल प्रत्यक्षात केलेल्या खर्चावरून केल्याचे आढळत नाही. सदर गंभीर स्वरूपाची बाब आहे.

सन 2012-13 चे वार्षिक अहवालानुसार कोर्ट केसेसवर रूपये 16,61,150/- दर्शविण्यात आला व अंदाजपत्रकात रूपये 15,00,000/- तरतुद करण्यात आली. तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मुंबई प्रांतीय महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 101(1) नुसार स्थायी समितीच्या शिफारशीवरून अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करता येईल असे असतांना जादा खर्चास स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही त्यामुळे जादा केलेला खर्च रूपये 1,61,150/- लेखापरीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2. महानगर पालिकेने 10 वकीलाची पॅनलवर नियुक्ती केल्याचे सांगण्यात आले परंतु नस्तीस एम. जी. भांगडे, डी.एम. श्रीमाळी, नितीन सांबरे, जयंत मोकादम, एम.के. पठान, निलेश आहूजा, सी. एस. कप्तान यांना पॅनेलवर नियुक्त केल्याचे मनपाचे निवड पत्र, वकीलाची विधी पदवी, अनुभव प्रमाणपत्र, तसेच Advocate Act 1961 Section 17 (Act No.25 fo 1961) नुसार बार कॉन्सील ऑफ महाराष्ट्र व गोवा यांची प्राक्टीस करण्यासाठी ‘सनद’ आढळून आली नाही.

3. वकीलांना दयावयाची फी व कायदेविषयक खर्चाबाबत मुंबई विधी अधिकारी(सेवेच्या शर्ती) नियम 1939 चे नियम 21 ते 27 तसेच शासन निर्णय विधी व न्याय विभाग क्रमांक: जीपीएच-4398/(173)/चौदा दिनांक 30-

DRAFT

1-1999 चे दिवाणी न्यायालयामध्ये प्रकरणे हाताळण्यासाठी विवरण पत्र 'सी' (i) नुसार उच्च न्यायालयातील write Petition करीता दर 1200 प्रती दिवस अशा प्रकारचा खर्च नमुद आहे. तसेच मुळ व अपील प्रकारणासाठी विवरण पत्र 'ड' नुसार सर्व सिव्हील केसेस साठी रूपये 300 प्रमाणे फी चे दर दिले आहेत. परंतु प्र.क्र. 5813 प्रमाणे श्री. सी.एस. कप्तान यांना उच्च न्यायालयातील 10 केसेस साठी 2,00,000/- व प्र.क्र.3839 मध्ये श्री एम.के.पठान यांना 7 केसेस साठी रूपये 1,25,000/- प्रदान करण्यात आले. सदर वकीलांना नियमबाहयरित्या रकमेचे जादा प्रदान करण्यात आले. याबाबत शासनाचे किंवा मनपाचे दुरूस्ती आदेश/ठराव असल्यास तसे लेखापरीक्षणास दर्शवावे अन्यथा जादा प्रदान केलेली रक्कम वसुलात आणावी.

4. वरील प्रमाणक क्रमांक 1980 नुसार Write Petition No. 1339 of 2012 रविंद्र ठाकुरदास हरवानी व इतर यांनी दिनांक 22.3.2013 ला जोशी मार्केट मधील गाळे धारकांना हस्तांतरीत करण्याबाबत हायकोर्ट मध्ये केस दाखल करण्यात आली. परंतु विभागाचे Suit Register ची तपासनी केली असता सदर केस श्री रविंद्र ठाकुरदास हरवानी यांनी दिनांक 18.4.2013 ला केस मागे घेतली. सदर केस करिता विशेष वकील श्री एम.जी. भांगडे यांना रूपये 1,50,000/- प्रदान करण्यात आले. श्री भांगडे हे मनपाच्या वकील पॅनेल वर नसतांना श्री भांगडे यांना सदर केस देण्यामागील मुख्य उद्देश कोणता याचा समर्थनिय खुलासा केला नाही. श्री भांगडे यांची निवड कुणी केली त्यांना कार्यादेश केव्हा देण्यात आला तसेच त्यांना कोणत्या नियम/ठरावाव्दारे रूपये 1,50,000/- प्रदान केले याबाबत शासनाचे नियम तसेच मनपा/स्थायी समितीचे आदेश सादर केले नाही. वकील श्री भांगडे यांनी दिनांक 20.6.2012 ला फी ची रक्कम मिळने बाबत पत्र दिले. त्यानुसार त्यांना धनादेश क्र. 271187 दिनांक 22.3.2013 रोजी रकमेचे प्रदान करण्यात आले. नियमानुसार वकिलांना केस घेतांना अर्धी रक्कम व केसचा निकाल लागल्यानंतर पूर्ण रक्कम प्रदान करणे आवश्यक असतांना निकाल लागण्यापूर्वीच वकिलाला फीची घाईने रक्कम प्रदान करण्यामागील उद्देश समजू शकला नाही. वरील अनियमितते अभावी श्री भांगडे यांना नियमबाहयरित्या प्रदान केलेले रूपये 1,50,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

5. सन 2012-13 मध्ये 10 वकीलांना कोर्ट केसेसबाबत रूपये 13,40,500/- चे शोधन करण्यात आले. वित्त विभाग, शासन निर्णय आयकर:1007/प्र.क्र.107/कोषा-प्र-5 दिनांक 22 फेब्रुवारी 2008 अन्वये तसेच आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 जे नुसार व्यवसाय फी करीता आयकर कपातीचा दर 10 टक्के आहे. वकीलांना प्रदान केलेली रक्कम रूपये 13,40,500/- च्या 10% देयकातून कपात करणे आवश्यक असतांना आयकर कपात न केलेली रक्कम रूपये 1,34,050/- वसुलपात्र ठरते.

6. वरील प्रमाणकाची तपासनी केली असता डि.एम.श्रीमाळी, जेमीनी कासट, ए.एम.जैन, नईम अहमद, एम.के.पठान, निलेश आहुजा व सी.एस.कप्तान यांना रक्कम मिळाल्याची पोच पावती जोडलेली नाही. श्री नईम अहमद यांनी प्रदान केलेले रूपये 28000 चे बिल जोडण्यात आले नाही. जेमीनी कासट यांची वकीलीची डिग्री जोडलेली नाही. सदर बाबी लेखापरीक्षणास सादर केले नसल्यामुळे खर्च योग्य



DRAFT

असल्याची तपासनी करता आली नाही.

7. अर्धसमास पत्र क्रमांक 90 दिनांक 16-10-2015 नुसार सन 2012-13 पर्यंत थकीत असलेले दावे(केस) बाबत विचारणा केली असता सन 2001 पासुन सन 2012 पर्यंत न्यायालयीन थकित असलेल्या प्रकरणाची एकुण संख्या 277 आहे. तसेच सन 2012-13 मध्ये 135 प्रकरणे न्यायालयात दाखल झाले असून निकाली निघालेल्या प्रकरणाची संख्या 77 आहे. वर्ष अखेर न्यायालयात थकित असलेले 335 प्रकरणे आहेत. ज्यात उच्च न्यायालयात 64 प्रकरणे, दिवाणी न्यायालयात 262 व कामगार न्यायालयात 9 प्रकरणे प्रलंबित आहेत. अनेक वर्षापासुन मोठयाप्रमाणात न्यायालयीन प्रकरणे प्रलंबीत राहण्यामागील कारणे नमुद केली नाही. सदर न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्याकरीता मनपाचे लक्ष वेधण्यात येते.

अर्धसमास पत्र क्रमांक 134 दिनांक 9-10-2015 अन्वये विचारणा केली असता याबाबत अनुपालन दर्शविले नाही त्यामुळे परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 134)

## *40 सन 2012-13 अखेर नियमबाहयरित्या अग्रिमाची रक्कम रूपये 2,22,45,380/- थकित असल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 22345380.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 22345380.00/-

***महानगर पालीका अमरावती यांचेकडे सन 2012-13 अखेर अग्रिमाची रूपये 2,22,45,380/- इतकी मोठी रक्कम अधिकारी/कर्मचारी यांचेकडे पडून असल्याचे दिसून येते. मुंबई आकस्मिक खर्च नियम 1959 यातील नियम 142 नुसार अत्यंत निकडीच्या परिस्थितीत अग्रिम देणे आवश्यक असतांना वारंवार अग्रिम देण्यात येत आहे. परंतु अग्रिमाचे समायोजन केल्या जात नाही. ही गंभीर नियमबाहय बाब आहे.***

सन 2012-13 या वित्तीय वर्षातील अग्रिम नोंदवही नमुना 147 ची तपासनी केली असता अधिकारी/कर्मचारी यांना मनपाच्या विविध कामे करण्याकरीता/खर्चाकरीता अग्रिम प्रदान करण्यात येत असते. सन 2012-13 पुर्वीपासून थकित असलेल्या अग्रिमाचे विवरण प्राप्त विवरण पत्रा नुसार खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. सन 1995-96 ते 2011-12 पर्यंतची थकित अग्रिम | | 1,89,87,364 |
| 2. सन 2012-13 मध्ये देण्यात आलेली अग्रिमाची रक्कम | (+) | 80,12,445 |

| | | |
|---|---|---|
| | एकुण(1+2) | 2,69,99,809 |
| 3. सन 2012-13 मध्ये समायोजन झालेली रक्कम | | (-) 46,54,429 |
| 4. सन 2012-13 अखेर शिल्लक असलेली एकूण अग्रिम | | 2,23,45,380 |

नोंदवहीवरील अग्रिमाच्या नोंदीबाबत खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1. अर्थसंकल्पात नेमकी तरतूद करणे शक्य नसते म्हणून अशा खर्चाचे नियमन व नियंत्रण करण्यासंबंधीचे नियम आकस्मिक खर्च करतांना केले असतात. त्वरीत प्रदानासाठी लागणा-या पैशाची तरतुद आकस्मिक खर्चात केलेली असते. आकस्मिक खर्च प्रथम स्थायी आगाउ रकमातून भागवून नंतर प्राधिकृत अधिका-याने देयकाव्दारे दिलेल्या देयक नमुन्यावर देयक सादर करावे. असे लेखासंहिता 1971 चे नियम 139 मध्ये अंतर्भुत आहे. सदर खर्चाची तदतुद अंदाजपत्रकात करणे सहज शक्य असतांना ती न करता आकस्मिक खर्च निधीतुन अग्रिमाच्या व्दारे मोठया प्रमाणात देण्यात येत असतात. अत्यंत निकडीच्या परिस्थितीत अग्रिम देणे आवश्यक असतांना हेतुपरस्पर वारंवार अग्रिम देण्याची प्रथा पडत असल्याचे दिसुन येते. ही नियमबाहय बाब आहे.

2. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक: विअप्र-10.08/प्र.क्र.70/2008/विनियम दिनांक 15-5-2009 मधील अ.क्र. 18 नुसार अग्रिम जास्तीत जास्त 10,000/- प्रदान करणे आवश्यक असतांना अनेक वर्षापासुन अधिकारी/कर्मचारी यांना दहा हजार रूपयापेक्षा जादा अग्रिम देण्यात येत असते. सदर नियमबाहय प्रदान करण्यात आलेल्या अग्रिमास स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

3. सन 2012-13 पर्यंत मनपाने अग्रिमाव्दारे दिलेल्या रकमेपैकी रूपये 2,23,45,380/- इतकी रक्कमेचे समायोजन झाले नाही. सदर रक्कम मोठयाप्रमाणात मनपा निधीच्या बाहेर रहात आहे. अधिकारी/कर्मचारी यांना विविध कामाकरीता दिलेले अग्रिम वर्षोनुवर्षे पडुन राहने ही गंभीर नियमबाहय बाब आहे. एकुण अग्रिमाची रक्कम अनेक वर्षापासून लेख्याबाहेर ठेवण्याची अनियमितता झाली आहे. सदर रक्कमेचा संबंधीताकडून गैरवापर झाल्याने आजपावेतो संबंधीतांनी रकमाचे समायोजन/वसूली इ. बाबीकरीता हेतूस्पुरस्पर टाळाटाळ केली आहे. तरी याबाबत तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4. मुंबई आकस्मिक खर्च नियम 1959 यातील नियम 142(क) टिपणी (एक) नुसार पुर्वीच्या अग्रिमाचे समायोजन झाल्याशिवाय अग्रिम मंजुर करणारा प्राधिकारी याने अग्रिम मंजूर करण्यात येवू नये असे स्पष्ट निर्देश असतांना वरील अधिकारी/कर्मचा-यांना अनेकदा आधी प्रदान केलेले अग्रिमाचे समायोजन झाले नसतांना पुन्हा अग्रिमाचे नियमबाहयरित्या प्रदान केले.

5. सन 2012-13 च्या अग्रिम नोंदवही नमुना 147 मध्ये वर्षनिहाय गोषवारा काढण्यात आलेला नाही. त्यामुळे वर्ष आधीची समायोजन होणे अग्रिमाची रक्कमा, वर्षात दिलेले केलेले अग्रिम, मागील अग्रिमापैकी समायोजीत रक्कम वर्ष अखेर समायोजित न केलेले अग्रिम तसेच शिल्लक अग्रिमाची तपशिलवार माहिती इत्यादी काढली नाही. तसेच सक्षम अधिका-याने सदर नोंदी प्रमाणीत केल्या नाहीत. महानगरपालिका अमरावतीच्या निधीमध्ये कुणाकडे किती रक्कम शिल्लक आहे याची

DRAFT

पडताळणी करता येत नाही. यावरून अधिकारी/कर्मचा-याकडे असलेली अग्रिमाची थकबाकी अनेक वर्षापासुन प्रलंबीत असल्याचे आढळून येते.

6. अग्रिम प्रदान होवून त्याचे सत्वर समायोजन/वसूली न झाल्यास सदरच्या अग्रिम घेणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्या बरोबरीने तितकेच अग्रिम मंजूर करणारे पदाधिकारी/अधिकारी जबाबदार समजण्यात येतील. अग्रिमाचा कालावधी व रक्कम पाहता अनेक वर्षापासून संबंधीतांनी कामाची मागणी/खर्च तपशिल इत्यादी महत्वपूर्ण बाबी महानगरपालीकेकडे सादर केले नाही किंवा ज्या प्रयोजनाकरीता अग्रिम रकमा प्राप्त करून घेतल्या तितक्या मुल्यांची सेवा/कामे त्यांनी केलेली नसल्याने अग्रिम रकमा शिल्लक असल्याचे दिसून येते. यावरून मनपाचे पदाधिकारी/अधिकारी यांच्यात अग्रिम वसवुलीबाबत उदाशिन कारणीभूत आहे. थकित अग्रिमाची विहीत दराने व्याजाची आकारणी करून रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

DATSSKM6702 (Ref No : 137)

## ***42 शासकिय कामानिमित्य करावा लागलेल्या प्रवासाकरीता घेतलेल्या प्रवास अग्रिमाचे समायोजन न केल्यामुळे झालेल्या नियमबाहय अनियमिततेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 338000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 338000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 243000.00/-

***मुंबई आकस्मिक खर्च नियम 1959 यातील नियम 142(क) नुसार अग्रिम काढल्याच्या दिनांकापासुन 3 महिण्याच्या आत त्याचे समायोजन केले नाही. कर्मचा-या विरूद्ध कोणत्याही पुर्वीच्या अग्रिमाची शिल्लक बाकी नाही असे प्रमाणपत्र दिले नाही. संपुर्ण प्रवास खर्च( तिकीट खर्च) अधिक अनुज्ञेय दैनिक भत्याच्या 80 टक्के या मर्यादेपेक्षा जादा प्रदान केला. दौ-याचा प्रवास पुर्ण झाल्यापासून तीन महिण्याचे आत प्रवास भत्ते देयक दाखले केले नसतांना अग्रिमाची रक्कम मासीक वेतनातून वजाती केली नाही. त्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांचेकडे लेखापरीक्षण कालावधीपर्यंत थकित असलेली अग्रिमाची रक्कम रूपये 2,43,000/- व्याजासह तात्काळ वसुलीची कार्यवाही करावी.***

अग्रिम नोंदवही नमुना 108 ची तपासनी केली असता सन 2012-13 अखेर मनपाच्या विविध विभागातील अधिकारी व कर्मचा-यांना मनपाच्या कामाकरीता प्रवास केला त्याकरीता अग्रिमाचे शोधन करण्यात आले. परंतु वर्षअखेरपर्यंत तसेच लेखापरीक्षण कालावधीपर्यंत खालील अग्रिमाचे समायोजन



DRAFT

झालेले नाही.

| प्र.क्र./दिनांक | रक्कम | अधिकारी/कर्मचा-याचे नाव /पदनाम | अग्रिम घेण्याचे कारण | अग्रिमाचे समायोजन केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| 4130/20-9-2011 | 5000 | डी.पी.मेश्राम/शहर अभियंता | मुंबईला जाणेकरीता प्रवास अग्रिम | 4-6-2015 |
| 8934/1.3.2012 | 22000 | --"-- | दिल्लीला जाणेकरीता प्रवास अग्रिम | --"-- |
| 547/25-4-2012 | 50000 | श्रीमती वंदना कंगाले/ महापौर | मुंबईला जाणेकरीता प्रवास अग्रिम | ले.प. दिनांकापर्यंत समायोजन केले नाही. |
| 1179/16-5-2012 | 20000 | चेतन पवार/सभापती स्थायी समिती | --"-- | ले.प. दिनांकापर्यंत समायोजन केले नाही. |
| 1975/15-6-2012 | 30000 | सुनिल पकडे/ LBT | नाशिकला जाणेकरीता प्रवास अग्रिम | 24-9-2013 |
| 2732/12-7-2012 | 9000 | के.एस. ताजी/ प्र.मु.ले.अधिकारी | मुंबईला जाणेकरीता प्रवास अग्रिम | ले.प. दिनांकापर्यंत समायोजन केले नाही. |
| 3307/31-7-2012 | 3000 | आर.एम.पवार/ उप.अभियंता | मुंबईला जाणेकरीता प्रवास अग्रिम | ले.प. दिनांकापर्यंत समायोजन केले नाही. |
| 3514/14-8-2012 | 10000 | डी.पी.मेश्राम/ शहर अभियंता | मुंबईला जाणेकरीता प्रवास अग्रिम | 4-6-2015 |
| 4890/15-9-2012 | 6000 | शेखर सोनकांबळे/ क.लिपीक | मुंबईला जाणेकरीता प्रवास अग्रिम | ले.प. दिनांकापर्यंत समायोजन केले नाही. |
| 4089/5-9-2012 | 10000 | विनायक झामरकर/ क.लिपीक | मुंबईला जाणेकरीता प्रवास अग्रिम | 21-9-2013 |
| 4988/18-9-2012 | 6000 | विनायक झामरकर/ क.लिपीक | मुंबईला जाणेकरीता प्रवास अग्रिम | 21-9-2013 |
| 6606/5-11-2012 | 2000 | विनायक झामरकर/ क.लिपीक | मुंबईला जाणेकरीता प्रवास अग्रिम | 21-9-2013 |
| 8014/13-12-2012 | 10000 | विनायक झामरकर/ क.लिपीक | नागपूरला जाणेकरीता प्रवास अग्रिम | ले.प. दिनांकापर्यंत समायोजन केले नाही. |
| 8777/7-1-2013 | 10000 | विनायक झामरकर/ क.लिपीक | मुंबईला जाणेकरीता प्रवास अग्रिम | 21-9-2013 |
| 8778/7.1.2013 | 25000 | आर.एम.पवार/ उप.अभियंता | दिल्लीला जाणेकरीता प्रवास अग्रिम | ले.प. दिनांकापर्यंत समायोजन केले नाही. |
| 10075/5-2-2013 | 20000 | चेतन पवार/सभापती स्थायी समिती | मुंबईला जाणेकरीता प्रवास अग्रिम | ले.प. दिनांकापर्यंत समायोजन केले नाही. |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11817/26-3-2013 | 100000 | जि.के.कुत्तरमारे/ जागा निरीक्षक | दिल्ली कार्यालयीन कामाकरीता जाणे प्रवास अग्रिम | ले.प. दिनांकापर्यंत समायोजन केले नाही. |
| | 338000 | | | |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. मुंबई आकस्मिक खर्च नियम 1959 यातील नियम 142(क) तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978 भाग पहिला, उपविभाग एक ते पाच मधिल सुधारना तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक: विअप्र-10.08/प्र.क्र.70/2008/विनियम दिनांक 15-5-2009 मधील अ.क्र. 18 नुसार अग्रिम काढल्याच्या दिनांकापासुन 3 महिण्याच्या आत त्याचे समायोजन करण्यात आले पाहिजे. परंतु वरील अग्रिम नोंदवही नमुना 108 ची तपासनी केली असता वरील अधिकारी/कर्मचारी यांनी विहित कालावधीत अग्रिमाचे समायोजन केले नाही. हि गंभीर नियमबाहय अनियमितता आहे.

2. वरील अनेक अधिकारी/कर्मचारी यांचेकडे प्रवासाकरीता घेतलेल्या अग्रिमाचे समायोजन झाले नसतांना त्यांना पुन्हा अग्रिम प्रदान केले. मुंबई आकस्मिक खर्च नियम 1959 यातील नियम 142(क) टिपणी (एक) नुसार मंजुरी देणा-या प्राधिका-याने अग्रिम देतांना आदेशात खालील प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे. i) प्रमाणित करण्यात येते की श्री ... यांचे विरूद्ध कोणत्याही पुर्वीच्या अग्रिमाची शिल्लक बाकी नाही. ii) प्रमाणित करनेत येते की पुर्वी मंजुर झालेल्या अग्रिमाचे संबंधात या अधिकाराचे दौ-याचे प्रवास भत्याचे देयक दाखल झालेले आहे आणि ते तपासणीसाठी या कार्यालयात आहे. वरील दोन प्रमाणपत्रापैकी एक दिल्याशिवाय अग्रिम मंजुर करणारा प्राधिकारी याने अग्रिम मंजूर करण्यात येवू नये असे स्पष्ट निर्देश असतांना वरील अधिकारी/कर्मचा-यांना अनेकदा आधी प्रदान केलेले अग्रिमाचे समायोजन झाले नसतांना पुन्हा अग्रिमाचे नियमबाहयरित्या प्रदान केले.

3. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक: विअप्र-10.08/प्र.क्र.70/2008/विनियम दिनांक 15-5-2009 मधील अ.क्र. 18 मध्ये नमुद केल्याप्रमाणे संपुर्ण प्रवास खर्च(तिकीट खर्च) अधिक अनुज्ञेय दैनिक भत्याच्या 80 टक्के या मर्यादेत अग्रिम मंजुर करावा. असे असतांना वरील सर्वच अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे वेतनश्रेणीनुसार त्यांना अुनज्ञेय असलेला महागाई भत्ता व प्रवासाकरीता लागणा-या टिकीट खर्चापेक्षा जादा अग्रिम मंजुर करण्यात येत असल्याचे दिसुन येते. सदर बाब नियमाविरद्ध आहे.

4. मुंबई आकस्मिक खर्च नियम 1959 यातील नियम 142(क) टिपणी(सहा) नुसार ज्या शासकिय कर्मचा-यांना दौ-यासाठी अग्रिम दिले आहे त्या दौ-याचा प्रवास पुर्ण झाल्यापासून तीन महिण्याचे आत प्रवास भत्ते देयक दाखले केले नाही तर अशा प्रकरणात घेतलेल्या अग्रिमाची रक्कम मासीक वेतनातून वजाती दाखवून त्याचा हिशेब पूर्ण करणेत यावा. असे असतांना सन 2012-13 किंवा त्यापूर्वी पासुन लेखापरीक्षण कालावधीपर्यंत म्हणजेच माहे नोव्हेबर 2015 पर्यंत अग्रिमाची वसुली केली नाही. करीता थकित असलेली अग्रिमाची रक्कम रूपये 2,43,000/- संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेकडून व्याजासह वसुलीची कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

DRAFT

## *44 मनपाच्या पदाधिकारी/अधिकारी/कर्मचा-यांना भ्रमणध्वनी सेवा पुरविल्यामुळे झालेल्या नियमबाहय अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष :84 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 894819.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 894819.00/-

***भ्रमणध्वणी वापरण्याबाबत शासनाची मंजुरी घेण्यात आलेली नाही. पदाधिकारी/ अधिकारी/ कर्मचारी यांना ठरविलेली कॉल मर्यादा कोणत्या शासकिय आदेशानुसार ठरविण्यात आली याची माहिती उपलब्ध नाही. सदर खर्चास मनपाने मंजुरी दिल्याचा ठराव उपलब्ध नाही. भ्रमणध्वणीचा वापर मनपाच्या कामाकरीताच केला याबाबतची नोंदवही ठेवण्यात आली नाही.***

DRAFT

मनपा आयुक्त यांचे पत्र क्रमांक अमनपा/साप्रवि/काअ./आयु. 2807/09 दिनांक 16/11/2009 अन्वये अमरावती मनपालीकेत कार्यरत अधिकारी/कर्मचारी तसेच सन्मा. पदाधिकारी यांना भ्रमणध्वनी सुविधा पुरविण्याबाबतचे पत्रक काढले. त्यानुसार महानगर पालीकेने एकुण 110 अधिकारी/कर्मचारी तसेच सन्मा. पदाधिकारी यांना सन 2012-13 या वित्तीय वर्षात तरतुद नोंदवही नुसार रूपये 8,94,819/- भ्रमणध्वनी सुविधा पुरविण्यावर खर्च करण्यात आला. यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. मुंबई प्रातीय महानगर पालीका अधिनियम 1949 चे नियम 458 नुसार सदर बाबीवर मनपाला खर्च करता येत नाही. सदर खर्च करण्यापुर्वी शासनाची पुर्व मंजुरी घेणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पुर्व मंजुरी घेतली नाही तसेच कार्योत्तर मंजुरी घेण्यात आली नाही. त्यामुळे केलेला खर्च रूपये 894819/- लेखापरीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2. मनपा आयुक्त यांचे पत्र क्रमांक अमनपा/साप्रवि/काअ./आयु. 2807/09 दिनांक 16/11/2009 नुसार खालील वेतनश्रेणी/पदाधिकारी यांना कालमर्यादा विहीत केली आहे.

| अ.क्र. | वेतनश्रेणी | कालमर्यादा |
|---|---|---|
| 1. | महापौर, उपमहापौर, स्था.स.सभापती, पक्षनेता, विरोधी पक्षनेता | रू.199 चे प्लॅन प्रमाणे इंटरनेट सुविधासह तसेच कॉल्सची मर्यादा नाही. |
| 2. | मनपातील इतर सर्व पदाधिकारी | रू. 525 चे प्लॅनची कॉल मर्यादा |
| 3. | वेतनश्रेणी 8000 वरील अधिकारी | रू.199 चे प्लॅन प्रमाणे इंटरनेट सुविधासह |

| | | |
|---|---|---|
| | | तसेच कॉल्सची मर्यादा नाही. |
| 4. | वेतनश्रेणी 6500 ते 8000 मधील अधिकारी | रू. 525 चे प्लॅनची कॉल मर्यादा |
| 5. | मनपातील सर्व विभागप्रमुख | रू. 525 चे प्लॅनची कॉल मर्यादा |
| 6. | मनपातील वेतनश्रेणी 6500 चे खालील कर्मचारी | रू. 325 चे प्लॅनची कॉल मर्यादा |

आयुक्ताचे पत्रानुसार वरील पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी यांना इंटरनेट सुविधा व रूपये 525/325 चे प्लॅनची कॉल मर्यादा ठरविण्यात आली. परंतु सदर मर्यादा कोणत्या शासकिय आदेशानुसार ठरविण्यात आली याची माहिती उपलब्ध नाही. तसेच सदर खर्चास मनपाच्या स्थायी समितीचा मंजुर ठराव उपलब्ध नसल्यामुळे पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी यांना भ्रमणध्वनीवर केलेला खर्च रूपये 8,94,819/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3. मनपाच्या विविध विभागात 43 दुरध्वनी असतांना मनपाचे पदाधिकारी/अधिकारी यांना तसेच वाहन चालक, कनिष्ट लिपिक व इतर कर्मचा-यांना सुध्दा 110 भ्रमणध्वनी पुरवण्यात आले. पुरविलेले भ्रमणध्वनी कुणाला कशाकरीता देणे गरजेचे आहे याबाबतचा पदनिहाय उल्लेख करून मंजुरी प्रदान करण्यात आलेली नाही. पुरविण्यात आलेल्या भ्रमणध्वनी कुणाला व कशाकरीता करण्यात येत होता याची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर खर्च पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी यांनी भ्रमणध्वणी खाजगी कामाकरीता वापरण्यात आला असल्याचे आढळून येते. भ्रमणध्वनीचा मनपाला कोणता उपयोग होत नसतांना मनपाला विनाकारण आर्थिक नुकसान सहन करावे लागले.

सदर सिम कार्डचा उपयोग मनपाच्या विकासाकरीता होत असल्याची तपासनी करता आली नसल्यामुळे सदर खर्च रूपये 8,94,819/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 45)

## *45 चहापान खर्चावर झालेल्या नियमबाहय खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 07**

*लेखा शीर्ष :80 मनपानिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 165488.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 165488.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 34576.00/-

***मनपाने मा. उपायुक्त् व मा. आयुक्त यांचे कक्षात निवीदा छाननी समिती सभा व मासीक चहापान याकरीता खर्च करण्यात आला. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 चे नियम 31(अ) (एक) नुसार शासकिय प्रयोजनासाठी बोलावलेल्या बैठकिंच्या वेळी उपस्थित संख्या 15 पेक्षा कमी होती. उपायुक्त व आयुक्त यांच्या कक्षात प्रतीमाह चहापानावर खर्च करण्यात येत असतो परंतु अतिथी कोण व किती याची नोंदवही नसल्यामुळे चहापानावर केलेला खर्च रूपये 1,654,88/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.***

DRAFT

सामान्य प्रशासन विभागाचे आकस्मीक खर्चाचे लेखापरीक्षण करीत असतांना मनपाने मा. उपायुक्त् व मा. आयुक्त यांचे कक्षात निवीदा छानणी समिती सभा व मासीक चहापान याकरीता खर्च करण्यात आला. सन 2012-13 मध्ये सामान्य प्रशासन विभागाचे तरतुद नोंदवही नुसार सन 2012-13 मध्ये रूपये 1,65,488/- चा खर्च दर्शविण्यात आला.

| प्र.क्र./दिनाक | रक्कम | तपशिल | चहा नग/ दर | कॉफी नग/ दर | नास्ता नग/दर | पाणी नग/दर | मिटींग मध्ये उपस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1278/17-5-2012 | 2370 | उपायुक्त(सा.) यांचे कक्षात निविदा छाननी सभा तथा अतिथी खर्च माहे एप्रिल12 | 255/8 | 21/15 | - | - | 12 |
| 2393/27-6-2012 | 2965 | --"–महिना नमुद नाही | प्रमाणकासोबत बिल नाही. | | | | |
| 2394/27-6-2012 | 2980 | --"-- | 185/12 | 4/14 | ताक 32/22 | - | उपस्थिती नमुद नाही |
| 2896/21-7-2012 | 3047 | --"– जुन 12 | 234/12 | 16/14 | - | 1/15 | 13 |
| 3080/25/7/2012 | 2423 | --"-- जुलै 12 | 296/8 | 5/11 | - | - | 53 |
| 3081/25-7-2012 | 5072 | सभापती, स्था.स. कडे अतिथी चहा माहे मे 12 | 964/4 | 176/5 | - | 28/12 | उपस्थिती नमुद नाही |
| 3324/1-8-2012 | 2872 | महालेखाकार यांचा चहापान खर्च दिनांक 29-5- ते 29-6-12 | 239/8 | 80/12 | - | - | - |
| 3294/31-7-2012 | 2804 | --"– कालावधी नमुद नाही. | 76/8 | 30/12 | 90/12 | 63/12 | - |
| 5558/8-12-2012 | 3324 | उपायुक्त(सा.) यांचे कक्षात निविदा छाननी सभा तथा अतिथी खर्च माहे सप्टे.12 | 267/12 | 4/12 | - | 4/15 | 62 |
| 7711/4-12-2012 | 2688 | --"– माहे ऑक्टो.12 | 214/12 | 6/15 | - | 2/15 | 38 |
| 8322/21-12-2012 | 1782 | --"– माहे नोव्हे.12 | 141/12 | 6/15 | - | - | 25 |
| 9880/21-1-2012 | 2520 | --"– माहे डिसें.12 | 206/12 | 2/15 | - | 1/18 | 4 |
| 8117/15-12- | 28900 | दिनांक 7-10-12 रोजी | 700/4 | - | 40/15 | - | उपस्थिती |

DRAFT

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2012 | | LBT कार्यशाळेत सर्व व्यापा-याची सभेत जेवनाचा खर्च | | | जेवन 510/50 | | नमुद नाही |
| 8982/10-1-2013 | 1100 | उ.झोन सभापती यांचे माहे नोव्हे.12 चे अतिथी खर्च | 20/10 | - | 50/18 | - | उपस्थिती नमुद नाही |
| | | | 3797 | 350 | | | 263 |

वित्तीय वर्षातील खालील निवडक प्रमाणकाची तपासनी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1. वरील निवडक प्रमाणकामध्ये उपायुक्त(सा), उ.झोन सभापती यांचे कक्षात निविदा छानननी सभा तथा अतिथी खर्च यावर खर्च करण्यात आला. परंतु सभेचे हजेरी नोंदवही तपासली असता वरील महिण्यात सभेला 263 सभासद असतांना सदर कालावधीत चहा व कॉफी एकुण 3022 पदाधिकारी, कर्मचारी व अधिकारी इत्यादींना चहापान करण्यात आले. उपस्थिती कमी असता जादा चहा व कॉफीचे बिल दर्शविल्यामुळे केलेला खर्च लेखापरीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 चे नियम 31-ए(1)(एक) कार्यालय प्रमुखाने शासकिय प्रयोजनासाठी बोलावलेल्या बैठकिंच्या वेळी आयोजित केलेल्या बैठकिला उपस्थित राहणा-या व्यक्तीची संख्या आठ पेक्षा कमी नसावी व त्यापैकी कमीतकमी दोन व्यक्ती केंद्र/राज्य शासनाचे प्रतिनिधी असावेत किंवा बिनसरकारी असावेत अन्यथा सदर संख्या 15 पेक्षा कमी नसावी असे असतांना सभेची नोंदवही तपासली असता सभेस बिनसरकारी किंवा केंद्र/राज्य शासनाचे प्रतिनिधी असल्याचे आढळून आले नाही. तसेच सभेला उपस्थिती कमी असल्याचे दिसुन आले. परंतू चहापानाचे बिलावर जादा संख्या लावण्यात आली.

3. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 चे नियम 31(अ)(एक) तसेच शासन निर्णय क्रमांक विआप्र.-10.08/प्र.क्र.70/2008 दिनांक 15-5-2009 अन्वये बैठकी 3 तासापेक्षा अधिक कालावधी चालणारी असावी असे असतांना कोणत्याही बैठकीचा कालावधी नमुद नसल्यामुळे सर्व बैठकी 3 तासापेक्षा जादा चालल्याची लेखापरीक्षणास आढळून आले नाही.

4. प्रमाणक क्र. 3324 व 3294 ची तपासनी केली असता महालेखाकार यांना दिनांक 29-5- ते 29-6-2012 या कालावधीत चहा 315 नग, काफी 110 नग, नास्ता 90 प्लेट व पाणी 63 बॉटल खरेदीवर रूपये 5676/- रूपये खर्च नोंदविण्यात आला. सदर बाबीवर खर्च करणे याबाबत शासनाचे कोणतेही आदेश/नियम नसतांना केलेला खर्च रूपये 5676/- वसुलपात्र ठरतो.

5 प्रमाणक 8117 ची तपासनी केली असता दिनांक 7-10-2012 ला LBT कार्यशाळेत सर्व व्यापा-याची सभा घेण्यात आली. सभेला किती सभासद होती याची हजेरी नोंदवही दप्तरी ठेवण्यात आली नसल्यामुळे प्रत्यक्षात सभेला (चहा700 व कॉफी40) 740 व्यापारी व इतर उपस्थित असल्याचे आढळून आले नाही. तसेच 510 व्यक्तीना जेवणाचा खर्च केल्याचे दिसुन येते. सदर खर्च कोणत्या नियमानुसार केला याबाबतचे कोणताही अभिलेख लेखापरीक्षणास सादर केला नसल्यामुळे नियमबाहयरित्या केलेला खर्च रूपये 28,900/- लेखापरीक्षणास वसुल पात्र ठरतो.

DRAFT

5. वरील प्रमाणकाव्यतीरिक्त मा. आयुक्त, उपायुक्त् व सभापती यांचे कक्षात अतिथी चहापान खर्च या बाबीवर प्रतीमाह मोठया प्रमाणात खर्च करण्यात येत असतो. परंतु मनपामध्ये आलेले अतिथी कोणते व कोणत्या शासकिय कामानिमित्य मनपाला भेट दिली याबाबतची उपस्थिती नोंदवही दप्तरी उपलब्ध नसल्यामुळे चहापानावर केलेला खर्च नियमबाहय ठरतो.

6. सन 2012-13 या वित्तीय वर्षात तरतुद नोंदवही नुसार चहापानावर रूपये 1,65,488/- खर्च केल्याचे दिसुन आले. प्रमाणकाची तपासनी केली असता अनेक बिलात चहा कॉफीवरील दरात तफावत आढळून येते. जसे चहा 8-12 कॉफी 11-15 प्रती नग असे वेगवेगळे दर नमुद आहे. उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांकस-1088/(2512)/उदयोग-6 दिनांक 2-1-1992 व दिनांक 16-7-1993 नुसार एका विशिष्ट बाबीची वार्षिक खरेदी रूपये 50000 किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशावेळी वर्तमानपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करून निविदा मागविणे बंधनकारक आहे. परंतू चहापानावर वित्तीय वर्षात रूपये 50,000/- पेक्षा जादा खर्च होत असल्याने निविदा न मागविता चहापानाचा पुरवठा करण्यात येत असतो त्यामुळे चहा कॉफी व नास्त्याच्या किंमतीत कमी जास्तपणा आढळून येतो. निविदा न मागविल्यामुळे खुल्या बाजारपेठेचा स्पर्धात्मक दराचा मनपाला नफा झालेला नाही.

7. वित्तीय वर्षात अतिथी चहापान यावर खर्च करण्यात आला. मुंबई प्रांतीक महानगर पालिका अधिनियम 1949 चे कलम 461 व 462 अन्वये राज्य शासनाकडून कायम करण्यात आल्याचे राजपत्रात प्रशिद्ध करण्यात येत नाही तोपर्यंत सदर खर्च कायदेशीर असल्याचे मानन्यात येणार नसल्याने कलेला खर्च रूपये 1,65,488/- लेखापरीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 53 दिनांक 28/09/2015 व्दारे विचारणा केली असता कोणतेही अनुपालन करण्यात आले नाही. त्यामुळे सन 2012-13 मध्ये केलेला खर्च रूपये 1,65,488/- आक्षेपाधीन ठेण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 53)

## *46 शाळा इमारत भाडयाबाबत झालेल्या नियमबाहय अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष :239 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1440000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 75000.00/-

***मनपाच्या 7 शाळा भाडयाने खाजगी इमारतीमध्ये असुन भाडयाचे प्रदान करण्यात येत असते. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. आरएनटी-1084/890/का-1 दिनांक 23 एप्रिल 1984 नुसार मनपाकडे शासकिय जागा उपलब्ध नसल्याबददल बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे कडून पत्र घेण्यात आले नाही. तसेच महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम1965 चे नियम 147 अ प्रमाणे कार्यकारी अभियंता यांचेकडून त्या***

***भागात शासकिय इमारत नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त केले नाही. प्रगती विदयालय गाडगेनगर शाळेला 1984 पासून रुपये 2580 रुपये प्रती माह प्रमाणे भाडयाने दिले परंतू तेव्हापासून मनपाने शाळेकडून भाडेवाढ केली नाही. तसेच मनपाच्या शाळेत विर शैव महिला विकास व शिक्षण संस्थेला सन 2003-04 शाळेच्या 3 खोल्या दरमहा 3670/- प्रमाणे भाडयाने देण्यात आल्या. परंतू सदर संस्थेकडून भाडेवाढ करण्यात आली नाही. सदर दोन्ही शाळेकडून भाडेवाढ करण्यात यावी.***

सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे शाळा इमारत भाडेची नस्ती तपासली असता वर्षात अंदाज पत्रकात तरतूद 15 लक्ष असून खर्च 1440000 केलेला आहे. मनपाच्या खालील शाळा भाडयाने खाजगी इमारतीमध्ये असुन मनपाला भाडयाचे प्रदान करण्यात येत असते. तसेच मनपाच्या शाळेच्या इमारतमध्ये खाजगी शाळा व संस्थेला भाडयाने देण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नाव | घरमालकाचे नाव | भाडे रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | मनपा मराठी शाळा क्र. 20, नवासे नगर | भैयालाल बेहरे, नवाथे प्लॉट | 6640 |
| 2. | मनपा उर्दु प्राथ. शाळा क्र. 3, गवलीपूरा | सैय्यद हसन | 14645 |
| 3. | ---“”--- शाळा क्र. 4, नालसाहेबपूरा | अध्यक्ष, मस्जिद पंच कमेटी | 1118 |
| 4. | ---“”--- शाळा क्र.3 अन्सार नगर | इमामोध्दीन कमरोध्दीन | 2200 |
| 5. | ---“”--- शाळा क्र.11, रजानगर | जैनोददीन अ. रज्जाक | 500 |
| 6. | ---“”--- शाळा क्र.7, मुजरपूरा लालखडी | शेख इस्माईल गुलामनबी | 560 |
| 7 | ---“”--- शाळा, साबनपूरा हस्तांतरीत शाळा | अध्यक्ष जामा मस्जिद कमेटी | 2185 |
| 1. | प्रगती विदयालय, गाडगेनगर | मनपा शिक्षण विभाग | 2580 |
| 2. | विरशैव महिला विकास व शिक्षण संस्था, जवाहर गेट | मनपा शिक्षण विभाग | 3670 |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. वरील प्रमाणे मनपाच्या शाळा खाजगी इमारतीमध्ये भरण्यात येत असतात. शाळा खाजगी इमारतीमध्ये भाडयाने घेण्यापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. आरएनटी-1084/890/का-1 दिनांक 23 एप्रिल 1984 नुसार मनपाकडे शासकिय जागा उपलब्ध नसल्याबददल बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे कडून पत्र घेणे आवश्यक आहे. बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता यांनी शक्यतो महसूल अधिकारी/जिल्हाधिकारी यांचे कडून माहिती प्राप्त करावी असे आदेश असतांना त्या प्रकारे कार्यवाही केलेली नाही.

2. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम1965 चे नियम 147 अ प्रमाणे कार्यकारी अभियंता यांचेकडून

DRAFT

त्या भागात शासकिय इमारत नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करावे. त्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात यावी परंतु नस्तीला कार्यकारी अभियंता यांचे शासकिय इमारत नसल्याचे प्रमाणपत्र नसल्यामुळे प्रदान केलेले भाडे योग्य असल्याचे स्पष्ट होत नाही.

3. प्रगती विदयालय गाडगेनगर येथिल जिल्हा परिषद अमरावतीच्या शाळेत 1984 पासून भाडयाने रुपये 2580 रुपये प्रती माह प्रमाणे 4 वर्ग खोल्या भाडयाने घेतली आहे. अमरावतीच्या हददीतील जिल्हा परिषदेच्या शाळा शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मुंबई अधिसुचना क्र.एम.एस.बी./06/143/प्र.शि-2 दिनांक29.3.2007 अन्वये अमरावती महानगरपालिका च्या क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या 16 प्राथमिक शाळा अमरावती महानगरपालिकेला दिनांक 1.1.2010 पासून हस्तांतरीत करण्यात आल्या. कार्यकारी अभियंता जि.प. अमरावती यांनी 1993-94 मध्ये इमारतीची माफक भाडे प्रमाणपत्रानुसार 4 खोल्याचे प्रमाणित भाडे रुपये 2580/- दरमहा ठरविण्यात आले. तेव्हापासून सदर शाळेचे भाडे दरात वाढ करण्यात आली नाही. मनपाच्या खाजगी जागेत असलेल्या मनपाच्या शाळेचे भाडे दर 3 वर्षाने वाढत असतांना वरील शाळेचे सन 1993-94 पासून भाडे वाढ झाली नाही. त्यामुळे मनपाला आर्थिक नुकसान झाले आहे. तरी गाडगेनगर येथील इमारतीचे प्रचलित भाडेदराविषयी तहशिलदार अमरावती व तालूका निरीक्षक भुमी अभिलेख अमरावती मार्फत चौकशी करुन बांधकाम क्षेत्राकरीता दरमहा प्रति चौ.फुट प्रमाणे दर मागविणे व सिटी इंजिनियर/कार्यकारी अभियंता यांनी सदर खोल्याचे भाडेदर निश्चित करुन प्रगती विदयालय यांचे कडून सन 1993-94 पासून नविन दराने भाडेवाढ वसूल करण्याची कार्यवाही करण्याकडे मनपाचे लक्ष वेधण्यात येत आहे.

4. महानगर पालिकेची हिंदी शाळा क्रमांक 1 जवाहर गेट येथिल शाळेत विर शैव महिला विकास व शिक्षण संस्थेला सन 2003-04 पासून कला शिक्षण प्रशिक्षण वर्ग अभ्यासक्रम चालविण्याकरीता शाळेच्या 3 खोल्या दरमहा 3670/- प्रमाणे भाडयाने देण्यात आल्या. परंतू सन 2004 पासून मनपाने विरशैव या संस्थेकडून भाडे वाढ करण्यात आली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. करीता जवाहर गेट येथिल प्रचलित भाडेदराविषयी कार्यकारी अभियंता यांनी सदर खोल्याचे भाडेदर निश्चित करुन विरशैव या सामाजिक संस्थेकडून सन 2003-04 पासून नविन दराने भाडेवाढ वसूल करण्याची कार्यवाही करण्याकडे मनपाचे लक्ष वेधण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 139 दिनांक 10/11/2011 अन्वये विचारणा केली असता अनुपालन केले नसल्यामुळे सदर परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 139)

## *47 गुंतवणूक नोंदवही बाबत अभिप्राय.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 02**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मुंबई प्रांतीय महानगर पालिका अधिनियम 1959 चे कलम 92 अन्वये महानगर पालिका निधीत जमा असलेल्या ज्या शिलकी पैशाचा विनियोग गुंतवणुक करणे आवश्यक असतांना लेखा संहिता 1971 चे नियम 147 नुसार नमुना 142 मध्ये सन 2012-13 मध्ये गुंतवणुक केली नाही.***

सन 201-13 चे लेखापरीक्षण केले असता वित्तीय वर्षातील गुंतवणुक नोंदवही उपलब्ध करण्याकरीता अर्धसमास पत्र क्रमांक 89 दिनांक 19/10/2015 अन्वये नोंदवही उपलब्ध करण्याकरीता विचारणा केली असता नोंदवही सादर केली. परंतु गुंतवणूक नोंदवहीमध्ये सन 2010-11 पर्यंत नोंदी घेण्यात आल्या परंतू त्यानंतर नोंदी घेण्यात आल्या नाही. यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. मुंबई प्रांतीय महानगर पालिका अधिनियम 1959 चे कलम 92 अन्वये महानगर पालिका निधीत जमा असलेल्या ज्या शिलकी पैशाचा विनियोग अधिनियमाच्या प्रयोजनासाठी ताबडतोब किंवा लवकर करता येणे शक्य नसेल तो पैसा बँकेमध्ये किंवा इतरत्र गुंतवता येईल. सदर गुंतवणुक स्थायी समितीच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या वतीने अशा सर्व गुंतवणुकी आयुक्त बँकेत गुंतवणुक करेल. परंतू सन 2012-13 महानगर पालिकेने बँकेत किंवा कोणत्याही शासनाच्या उपक्रमामध्ये गुंतवणुक केलेली नाही. लेखासंहिता 1971 चे नियम 147 नुसार नमुना 142 मध्ये मध्ये गुंतवणुक नोंदवही ठेवून प्रतीवर्षी गुंतवणुक करने आवश्यक असतांना गुंतवणुक केली नाही. त्यामुळे महानगर पालिकेच्या निधीत जमा असलेल्या शिल्लक रकमेवरील प्राप्त होणा-या व्याजापासून महानगरपालिकेला मुकावे लागले.

2. महानगर पालिकेच्या विविध योजनाच्या बँक पासबुक ची तपासनी केली असता वर्षात शासनाकडुन किंवा अन्यत्र प्राप्त झालेले अनुदान व इतर लाखो रूपये रक्कमेचा मनपाने उपयोग/ वापर केला नसल्यामुळे सदर रक्कम बँकेच्या बचत खात्यात जमा आहे. सदर जमा असलेली रक्कम जर मुदती ठेवीमध्ये गुंतवलेली असती तर मनपाला बँकेच्या व्याजापासुन मिळणा-या उत्पन्नात वाढ झाली असती. बँकेत किंवा इतर शासकिय उपक्रमात रक्कम गुंतवणुक न करण्यामागील समर्थनिय अनुपालन सादर केले नाही.

अर्धसमास पत्र क्रमांक 89 दिनांक 19/10/2015 अन्वये अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन दर्शविले नाही त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात आला आहे.

DATSSKM6702 (Ref No : 89)

DRAFT

## *48 मनपाने ठेवी नोंदवही न ठेवल्यामुळे कंत्राटदाराला प्रदान केलेल्या अनामत रक्कमाची तपासनी न करता आल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***लेखासंहिता 1971 चे नियम 190 नुसार ठेव नोंदवही नमुना 147 मध्ये ठेवण्यात आलेली नाही. किंवा नॅशनल म्युनीसीपल अकाउंट मॅन्युअल(NMAM) चे नियम 5.1 चे नुसार ठेवी नोंदवही नमुना GEN-18 प्रमाणे ठेवण्यात आली नाही. त्यामुळे 3 वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या शिल्लकी प्रत्येक वर्षअखेर महानगर पालीकेकडे व्यपगत केल्याचे तपासता आले नाही.***

DRAFT

लेखासंहिता 1971 चे नियम 190 नुसार ठेकेदाराकडुन व पुरवठाधारकाकडून प्राप्त होणा-या सुरक्षा अनामत रक्कमाची नोंद ठेवीच्या स्वरूपात ठेव नोंदवही नमुना 147 मध्ये घेवून नोंदवही अदयावत ठेवणे आवश्यक असतांना अमरावती मनपाने ठेवनोंदवही ठेवण्यात आलेली नाही. वार्षिक अहवालानुसार सन 2012-13 मध्ये ठेवीदाराच्या ठेवी पासून रूपये 1,67,21,460/- मनपाला उत्पन्न प्राप्त् झाले तसेच रूपये वित्तीय वर्षात रूपये 3,75,680/- ठेवी परत करण्यात आल्या. यावर खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. लेखासंहिता 1971 चे नियम 190(1) नुसार ठेकेदाराकडुन व पुरवठाधारकाकडून प्राप्त होणा-या सुरक्षा अनामत रक्कमाची नोंद ठेवीच्या स्वरूपात ठेव नोंदवही नमुना 147 मध्ये घेवून नोंदवही अदयावत ठेवणे आवश्यक असतांना अमरावती मनपाने ठेवनोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये किती रक्कम ठेवीमध्ये जमा झाली व त्यापैकी मागणीदारास किती रक्कम प्रदान केली याची तपासनी करता आली नाही.

2. लेखासंहिता 1971 चे नियम 190(3) नुसार 3 वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिल्लकी प्रत्येक वर्षअखेर महानगर पालीकेकडे व्यपगत होतील. व्यपगत झालेली रक्कम “संकीर्ण- इतर बाबी- व्यपगत ठेवी” शिर्षाखाली जमाखाती स्थानांतरीत करण्यात आल्या पाहिजेत परंतु अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही.

3. लेखासंहितेचे नियम 190(2) नुसार वर्षअखेर प्रत्येक ठेवीची अदत्त शिल्लक पुढील वर्षाच्या पुस्तकात अग्रेषित केली जावी वर्षभरात मिळालेल्या ठेवी, प्रत्येक व्यवहार जसजसा होत जाईल त्याप्रमाणे अशा पुस्तकात नोंदी नोंदल्या जातील. वर्षभरात मिळालेल्या व परत केलेल्या ठेवीच्या

एकुण रकमा वर्गीकृत गोषवा-यातील ठेवी या शीर्षकाखालील एकूण जमा व खर्च यांच्याबरोबर जुळल्या असल्या पाहिजेत परंतू ठेवी नोंदवही ठेवली नसल्यामुळे सदर बाबीची लेखापरीक्षणास तपासनी करता आली नाही.

4. नॅशनल म्युनीसीपल अकाउंट मॅन्युअल(NMAM) चे नियम 5.1 चे नुसार ठेवी नोंदवही नमुना GEN-18 प्रमाणे ठेवण्यात आली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 89 दिनांक 19/10/2015 विचारणा करण्यात आली असता त्याबाबात अनुपालन प्राप्त झाले नाही त्यामुळे सदर परिच्छेद अंती करण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 89)

DRAFT

## *49 मतमोजनी करीता अधिकारी/कर्मचारी यांच्या भोजन, नास्ता, चहा पाणी यावर केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत.*

**निवडणूक विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 158830.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 158830.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 19186.00/-

***उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय दिनांक 2.1.1992 व दिनांक 16.7.1993 नुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवुन निविदा मागविण्यात आल्या नाही. क्षितीज कॅटरर्स यांनी भेसळ प्रतिबंधक नियम 1962 चे लायसन्स नोंदणीच्या दाखल्याचे नुतणीकरण केले नाही. आयकर विवरण पत्र व आयकर PAN क्रमांक असल्याचा दाखला जोडला नाही. आयकर अधिनियम कलम 194 सी नुसार आयकर कपातीचा दर 2% रूपये 3272/- कपात केला नाही. वित्त विभाग शासन परिपत्रक दिनांक 20 जानेवारी 2006 अन्वये सेवाकर 10% सेवा कर रूपये 15,914/- वसुल करण्यात आला नाही.***

प्र.क्र. 728 दिनांक 4/5/2012 रक्कम रूपये 1,58,830/-

सन 2012-13 मध्ये निवडणूक मतमोजनी शासकिय तंत्र निकेतन येथे दिनांक 16 व 17/2/2012 ला चहा नास्ता व भोजन व्यवस्था करण्याकरीता 1) क्षितीज कॅटरर्स 2) माधवी कॅटरर्स व 3) अंकित कॅटरर्स यांचेकडून दरपत्रक घेण्यात आले . त्यापैकी क्षितीज कॅटरर्स यांची कमी दराची निविदा असल्या मुळे त्यांना दिनांक 16/2/2012 ला 600 व दिनांक 17/2/2012 ला 1200 अधिकारी

व कर्मचा-यांना भोजन नास्ता व चहा पुरविण्याचे कार्यादेश देण्यात आले . यावर खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

1. उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक भांखस 1088/(2512)/ उदयोग-6 दिनांक 2.1.1992 व दिनांक 16.7.1993 अन्वये रूपये 50,000 पेक्षा जास्त रकमेच्या व्यवहाराकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देवुन निविदा मागविणे बंधनकारक आहे . परंतू मनपाने जेवन , नास्ता व चहापाणी यावर रूपये 1,58,830/- खर्च करण्यात आला . सदर बाबीची जाहिरात वर्तमानपत्रात दिली असती तर खुल्या बाजारपेठेतील स्पर्धात्मक दराचा मनपाला नफा झाला असता. निवडणूक कार्यक्रम 2 महिणे आधीपासून नियोजित असतांना वर्तमान पत्रातून जाहिरात न दिल्यामूळे जवळच्या कॅटरर्सकडून दरपत्रक मागवून जादा किंमती वाढवून कंत्राटदाराला नफा करण्याचा हेतू दिसून येते.

2. क्षितीज कॅटरर्स यांनी अन्न, भेसळ प्रतिबंधक नियम 1962 चे लायसन्स नोंदणीच्या दाखल्याचे नुतणीकरण केले नाही. तसेच सन 2010-11 व 2011-12 चे आयकर विवरणपत्र भरल्याचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही . त्यामुळे क्षितीज कॅटरर्स हे व्यावसायीक कॅटरर्स नसल्याचे दिसून येते.

3. क्षितीज कॅटरर्स, माधवी कॅटरर्स व अंकित कॅटरर्स यांचे दरपत्रक तपासले असता माधवी कॅटरर्स व अंकित कॅटरर्स हे व्यावसायीक कॅटरर्स असल्याचे "महाराष्ट्र अन्न भेसळ प्रतिबंधक नियम 1962 अंतर्गत नमुना "ब" अनुज्ञप्ती नमुना नियम 5(3) नुसार प्रमाणपत्र साद र केले नाही . तसेच त्यांनी आयकर विवरण पत्र व आयकर PAN क्रमांक असल्याचा दाखला जोडला नाही . त्याचप्रमाणे वरील तिन्ही कॅटरर्सचे लेटरपॅड एकाच वेळी एकाच संगणकावरून तयार केल्याचे त्यांच्या लेटरपॅडवरील फॉन्ट वरून दिसून येते यावरून माधवी व अंकित कॅटरर्स हे व्यावसायी क कॅटरर्स नसतांना दुय्यम लेटरपॅड तयार करून एकाच व्यक्तीला लाभ पोहोचण्याच्या दृष्टीने तयार केल्याचे आढळून आले . वरील दोन्ही कॅटरर्स प्रत्यक्षात उपलब्ध असल्याबाबतचा शासकिय पुरावा सादर करावा.

3. शासन निर्णय क्रमांक : आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र-5 दिनांक 22 फेब्रुवारी 2008 नुसार आयकर अधिनियम कलम 194 सी नुसार आयकर कपातीचा दर 2% व त्यावर 3% उपकर असे एकुण रूपये 3272/- कपात करणे आवश्यक असतांना देयकातुन आयकर कपात केला नाही.

4. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक शासाउ10.06/प्र.क्र.1/06/सा.उ. दिनांक 20 जानेवारी 2006 अन्वये केंद्र सरकारच्या कर विषयक अधिनियमाव्दारे विविध सेवावर कर आकारणी करण्यात येते . त्याअनुषंगाने सदर अधिनियमातील तरतुदीनुसार विशिष्ट सेवाबाबत सेवाकर सेवा देणा-या संस्थाकडुन आग्रह धरणे आवश्य क आहे. यासंदर्भात राज्य शासकिय विभाग मंडळे यांनी अशा प्रकारच्या सेवा घेतांना किंवा करार करतांना कार्यवाही करणे बंधनकारक आहे . सेवाकर पात्र असलेल्या एकुण 81 सेवामधील अ.क्र. 52. Outdoor Caterer Services ला सेवाकर 10% व सेवाकराच्या 2% दराने शैक्षणिक उपकर असा एकुण 10.02% सेवा कर वसुल करणे आवश्यक असतांना देयकातुन सेवाकर

DRAFT

वसुल केला नाही. सन 2012-13 मध्ये प्रदान केलेली एकुण रक्कम रूपये 1,58,830/- च्या 10.02 टक्के रूपये 15,914/- सेवा कर वसुलीची कार्यवाही करावी.

5. मनपाची मतनोंदणी दिनांक 17/2/2012 ला असतांना दिनांक 16/2/2012 ला 600 व दिनांक 17/2/2012 ला 1200 अधिकारी/कर्मचा-यांना भोजनाचे कंत्राट मे. क्षितीज कॅटरर्स यांना देण्यात आले. मतमोजनी करीता अनुक्रमे 600 व 1200 अधिकारी/कर्मचा-यांची उपस्थित राहणार असल्याचे कोणत्या आधारे संख्या निश्चित करण्यात आली . याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 141 दिनाक 23/11/2015 ला प्रत्यक्षात किती अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते याबाबत विचारणा केली असता अनुपालन केले नाही . यावरून अंदाजे जास्तीचा आकडा दर्शवून कॅटरर्सला लाभ पोहोचविण्याचा हेतू दिसून येतो.

6. क्षितीज कॅटरर्सचे बिल क्र.523 व 524 ची तपासनी केली असता बिलावर VAT/CST/BST क्रमांक नमुद नाही. तसेच रेव्हेन्यू टिकीट लावलेला नाही . महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर कायदा 2005 नुसार बिलातून कराची कपात केली नाही.

वरील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र मांक 141 दिनांक 23/11/2015 अन्वये अनुपालन सादर करण्याबाबत विचारणा केली असता अनुपालन सादर केले नाही . त्यामुळे परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 141)

## *50 निवडणूक काळात भाडे तत्वावर आणलेल्या सामानावर केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत.*

**निवडणूक विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 70800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 33000.00/-

***उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय 16.7.1993 अन्वये वर्तमानपत्रात जाहिरात देवुन निविदा मागविण्यात आली नाही. एकाच ठिकाणी दोनदा वेगवेगळया प्रमाणकाव्दारे जनरेटर खर्च दर्शविल्यामुळे झालेल्या जादा खर्च रूपये 19000 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. झोन क्र. 6 मध्ये मंडप डेकोरेशन करण्यात आले. परंतू मंडप डेकोरेशन 12 दिवस टाकण्यामागील कोणती आवश्यकता होती याचा उल्लेख केलेला नाही.***

DRAFT

प्र. 2211 दिनांक 20.6.2012 रूपये 70800

सन 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये महानगर पालीक अमरावती येथिल निवडणूकीकरीता झोन क्रमांक 3 यांनी जनरेटर, साउंड सर्विस, खुर्ची, चटाई, फोकस, मंडप डेकोरेशन इत्यादी अन्सारी ट्रॅकसाउंड ॲडव्हरटाईजींग यांचे कडून भाडयाने घेण्यात आली.

1. उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक भांखस 1088/(2512)/ उदयोग-6 दिनांक 2.1.1992 व दिनांक 16.7.1993 अन्वये रूपये 50,000 पेक्षा जास्त रकमेच्या व्यवहारा करीता वर्तमानपत्रात जाहिरात देवुन निविदा मागविणे बंधनकारक आहे. असतांना निविदा न मागविता सदर साहित्य अन्सारी ट्रॅकसाउंड ॲडव्हरटाईजींग यांच्याकडून भाडयाने घेण्यात आले . त्यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा मनपा ला झाला नाही. त्यामुळे सदर साहित्य माफक दराने मनपाला प्राप्त झाल्याबाबतची तपासनी लेखापरीक्षणास करता आली नाही.

2. बिल क्र. 480 नुसार जनरेटर 19 दिवस प्रती दिवस 1000 प्रमाणे 19000 प्रदान करण्यात आले. परंतु 19 दिवस जनरेटर कशाकरीता वापरण्यात आले . याची दिनांका सह नोंद नाही . प्रमाणक क्र. 2618 दिनांक 6/7/2012 नुसार उपअभियंता (विदयुत) प्रकाश विभागामार्फत झोन क्रमांक 1 ते 8 करीता मे. चौधरी लाईट हाउस ॲन्ड जनरेटर यांचेकडून D.G.Set 7.5 KVA जनरेटर दिनांक 31/1/2012 ते 1/2/2012 तसेच दिनांक 15.2.2012 ते 17.2.2012 या कालावधीकरीता प्रती दिवस 3000 प्रमाणे 15000 चे पुरवठा करण्यात आले असतांना पुन्हा झोन क्र .6 ने जनरेटर भाडयाने घेतले. प्रमाणक क्रमांक 2618 व 2211 नुसार जनरेटरचा वापर कुठे केव्हा करण्यात याचा उल्लेख नाही. त्यामुळे जनरेटरवर दर्शविलेला खर्च रूपये 19,000/- लेखापरीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3. बिल क्र. 481 व 482 मध्ये दिनांक, 30.1.2012 ते 7.2.2012, 9.2.2012, 12.2.2012 व 15.2.2012 असे एकुण 12 दिवस झोन क्र. 6 मध्ये मंडप डेकोरेशन करण्यात आले . परंतू मंडप डेकोरेशन 12 दिवस टाकण्यामागील कोणती आवश्यकता होती याचा उल्लेख केलेला नाही . परंतु दिनांक 30.1.2012 ते 7.2.2012 टाकलेला मंडपचा आकार किती याचा उल्लेख नसल्यामुळे प्रदान केलेले रूपये 14000 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र. 142 दिनांक 23/11/2015 नुसार अनुपालन उपलब्ध करण्याबाबत कळविले असता अनुपालन सादर केले नाही त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 142)

## *52 अग्निशमन विभागातील मान्सून पूर्व तयारीकरिता घेतलेल्या अग्रीमाबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : अग्निशमन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 30000.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 30000.00/-

***अग्निशमन विभागात विहित कालावधीत अग्रीम रकमेचे समायोजन करण्यात येत नाही,अग्रीमावर नियत्रण अधिकार्याचे नियंत्रण नाही.***

अमरावती महानगर पालिकेमध्ये सन 2012-2013 छे लेखा परीक्षणात खालील प्रमानकाद्वारे अग्रीम घेतला असल्याचे दिसून येते.

प्रमानक क्र.3781 दि.24/08/2012 रु.30000

प्रभारी अग्निशमन अधिकारी,यांनी उपरोक्त प्रमानाकाद्वारे अग्रीम घेतला असून महाराष्ट्र नगरपालिकांनी लेखासंहिता 1971 चे नियम 189 नमुना क्र.147 प्रमाणे अगाऊ रकमाची लेखा नोंदवही ठेवण्यात यावी असे नमूद असून वर्षा अखेर अदत्त बाकी काढली पाहिजे.सदरील अग्ग्रीमाचा लेखा विभागामध्ये शोध घेतला असता सदरील अग्रीम दि.14/08/2013 ला समायोजन झाला असल्याचे दिसून आले.

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1.कोणताही अग्रीम,दिल्याच्या दिनांकापासून 3 महिन्या पर्यंत समायोजन करण्यात यावे.परंतु सदरील अग्रीम सन 2013-2014 मध्ये दि.14/08/2013 ला समायोजन झाल्याचे दिसून येते.तीन महिन्यपेक्षा जास्त विलंब झाल्यास वेतन देयकातून सदरील वसुली एकमुस्त करण्यात यावी असे नमूद आहे.परंतु अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही.

2.समायोजन देयक लेखा परीक्षणात पहावयास मिळाले नाही.त्यामुळे खरेदी विहित मार्गानेच ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आली याबाबत माहिती होऊ शकली नाही.

3.विभागाचे साठ नोंदवहीत सुटेभाग खरेदी साहित्याची नोंद पहावयास मिळाली नाही.

4.अग्रीमावर नियंत्रक अधिकारायाचे नियंत्रण नसल्याचे दिसून येते.

लेखा परीक्षणात अर्धसमास पत्राबाबत अनुपालन करण्यात आले नाही.म्हणून सदरील आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPDMM6101 (Ref No : 156)

## *53 श्री. नरेंद्र श्रीरामजी वानखडे, महिला व बालविकास अधिकारी यांच्या सेवापुस्तक व वेतननिश्चितीबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 व अन्य नियमान्वये श्री. नरेंद्र श्रीरामजी वानखडे, महिला व बालविकास अधिकारी यांचे मूळ सेवापुस्तक तपासले असता त्रुटी आढळून आल्या.***

अमरावती शहर महानगर पालिका सन 2012–13 या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण अंतर्गत श्री. नरेंद्र श्रीरामजी वानखडे, महिला व बालविकास अधिकारी यांचे मूळ सेवापुस्तक तपासले असता पुढीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

1) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 11(1)(2) नुसार वैद्यकीय तपासणी केल्याची नोंद नाही
2) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 अन्वये चारित्र्य पडताळणी केलेली नाही.
3) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 38 अन्वये जन्मतारीख प्रमाणित केलेली नाही.
4) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा नियम) अन्वये 1/7/2010 पासून जमा व खर्च झालेल्या अर्जित व इतर रजेच्या नोंदी घेतलेल्या नाहीत.
5) शा.नि., सामाजिक न्याय विभाग, दि. 16.5.2007 अनुसार कर्मचारी मागासवर्गीय असल्यामुळे त्याच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात आली नाही.
6) 6व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करता दि.22/2/2008 रोजी करण्याऐवजी दि.1/7/2008 रोजी करण्यात आली आहे.
7) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 36 नुसार नियुक्तीपासून वार्षिक सेवापडताळणी केलेली नाही.
8) कर्मचारी मागास प्रवर्गातील आहे. परंतु तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही.
9) सन 2010, 2011, 2012 चे नियमित वेतनवाढीच्या आदेशाच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.
10) हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली नाही.
11) संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही.
12) महाराष्ट्र निवृत्तीवेतन नियम 1982 मधील नियम क्र. 115 अनुसार नामनिर्देशन पत्रे जोडलेली नाहीत.
13) स्वग्राम घोषित केल्याची नोंद घेतलेली नाही.
14) अर्जित व इतर रजा उपभोगलेल्या असल्यास सदर रजेच्या आदेशाच्या नोंदी घेतलेल्या नाहीत.

सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.144, दि. 23.11.2015 नुसार विभागास अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

IPRSRBM6901 (Ref No : 144)

DRAFT

## *54 श्री. ज्ञानेंद्र प्रल्हादराव मेश्राम,कार्यकारी अभियंता यांच्या सेवापुस्तकातील नोंदींतील त्रुटींबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

***महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 व अन्य नियमान्वये श्री. ज्ञानेंद्र प्रल्हादराव मेश्राम,कार्यकारी अभियंता यांच्या मूळ सेवापुस्तकातील नोंदींमध्ये खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.***

अमरावती शहर महानगर पालिका सन 2012–13 या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण अंतर्गत श्री. ज्ञानेंद्र प्रल्हादराव मेश्राम,कार्यकारी अभियंता यांचे मूळ सेवापुस्तक तपासले असता पुढीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

1) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 11(1)(2) नुसार वैद्यकीय तपासणी केल्याची नोंद नाही

2) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 अन्वये चारित्र्य पडताळणी केलेली नाही.

3) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 38 अन्वये जन्मतारीख प्रमाणित केलेली नाही.

4) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा नियम) अन्वये 1/1/2009 पासून जमा व खर्च झालेल्या अर्जित व इतर रजेच्या नोंदी घेतलेल्या नाहीत.

5) शा.नि., सामाजिक न्याय विभाग, दि. 16.5.2007 अनुसार जात प्रवर्गात अशी नोंद केलेली आहे .
.नाही येत आढळुन पुस्तकात सेवा मुळ नोंद तशी असल्यास प्रवर्गातील मागासवर्ग कर्मचारी

6) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 36 नुसार नियुक्तीपासून वार्षिक सेवा पडताळणी केलेली नाही.

7) कर्मचारी मागास प्रवर्गातील आहे. परंतु तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही.

8) हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली नाही.

9) संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही.

10) महाराष्ट्र निवृत्तीवेतन नियम 1982 मधील नियम क्र. 115 अनुसार नामनिर्देशन पत्रे जोडलेली नाहीत.

11) स्वग्राम घोषित केल्याची नोंद घेतलेली नाही.

सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.146, दि. 23.11.2015 नुसार विभागास अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

IPRSRBM6901 (Ref No : 148)

DRAFT

## *55 जनसंपर्क विभागातील कामातील त्रुटींबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 9945.00/-

| ***जनसंपर्क विभागाच्या कामामध्ये आढळून आलेल्या त्रुटी खालीलप्रमाणे आहेत.*** |
| --- |

जनसंपर्क विभागाचे लेखापरीक्षण करीत असतांना खालील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

1)जाहीरात रोटेशन रजिस्टर ठेवलेले आहे. परंतु त्यात फक्त 8 फेब्रुवारी 2013 पर्यंतच नोंदी घेतलेल्या आहेत. त्यापुढील नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे आर्थिक तरतुदीपेक्षा जास्त खर्च झाला असण्याची शक्यता आहे.

2)महाराष्ट्र जाहिरात वितरण धोरण 2001 नियम 6 अन्वये समान तत्वावरील वाटप धोरणाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. कारण काही वृत्तपत्रांनाच उदा. पांचजन्य, जनमाध्यम, अमरावती मंडळ, महाविदर्भ, प्रतिदिन अखबार, लोकपथ आदींना जास्तीचे कॉलम सेंटीमीटरच्या जाहिराती देण्यात आल्याचे अभिलेख्यावरुन दिसते.

3)केबल नेटवर्कच्या संदर्भात देयके पारित करतांना सारासार विचार न करता ती अदा केल्याचे दिसून येते. शहरातील मे. सिटी चॅनल आणि मे. राज केबल नेटवर्क या दोन केबलधारकांमार्फत जनतेला कर भरण्याविषयी सूचनावजा जाहिरात दिल्या गेली आहे. परंतु सारख्याच कालावधीसाठी मे.राज केबल नेटवर्कला रु6600/- तर मे.सिटी चॅनलला रु16545/- एवढी रक्कम दिल्या गेली आहे. दोन्ही केबलधारकांची कनेक्शन संख्या जवळपास सारखीच असल्याने मे. सिटी चॅनलला जास्त रक्कम दिली गेली असल्याचे लक्षात येते, त्यामुळे जास्त अदा केलेली रक्कम रु. 9945/- आक्षेपाधीन ठरते.

4) मे.उषा फोटो सटुडीओ यांनी अमरावती महानगरपालिकेच्या कार्यक्रमासाठी छायाचित्रे काढणे व व्हीडीओ शुटींग केले आहे. यासंदर्भात महानगरपालिकेने दरपत्रके मागवून कार्यवाही करणे अपेक्षित होते. ज्यामुळे महानगरपालिकेला स्पर्धात्मक दरांचा फायदा झाला असता. परंतु असे न झाल्याने संबंधिताने सादर केलेल्या मागणी देयकाप्रमाणे रक्कम अदा करावी लागल्याचे दिसते, ज्यामुळे महानगरपालिकेला स्पर्धात्मक दराचा फायदा झालेला नाही.

यासंदर्भात अर्धसमास पत्र क्र. 149, दि. 24/11/2015 अन्वये अनुपालन सादर करण्यास कळविले असता



DRAFT

अनुपालन समाधानकारक नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आला.

IPRSRBM6901 (Ref No : 149)

## *56 श्री. योगेश नरेंद्रराव पिठे , सांख्यिकी अधिकारी अधिकारी यांच्या सेवापुस्तक व वेतननिश्चितीबाबत*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 व अन्य नियमान्वये श्री. योगेश पिठे यांच्या मूळ सेवापुस्तकात त्रुटी आढळून आल्या आहेत.***

अमरावती शहर महानगर पालिका सन 2012–13 या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण अंतर्गत श्री. योगेश नरेंद्रराव पिठे, सांख्यिकी अधिकारी यांचे मूळ सेवापुस्तक तपासले असता पुढीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

1) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 11(1)(2) नुसार वैद्यकीय तपासणी केल्याची नोंद नाही

2) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 अन्वये चारित्र्य पडताळणी केलेली नाही.

3) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 38 अन्वये जन्मतारीख प्रमाणित केलेली नाही.

4) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा नियम) अन्वये 31/12/2009 पासून जमा व खर्च झालेल्या अर्जित व इतर रजेच्या नोंदी घेतलेल्या नाहीत.

5) शा.नि., सामाजिक न्याय विभाग, दि. 16.5.2007 अनुसार जात प्रवर्गात कुणबी अशी नोंद केलेली आहे,परंतु मूळ सेवा पुस्तकात नोंद नाही .

6) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 36 नुसार नियुक्तीपासून वार्षिक सेवा पडताळणी केलेली नाही.

7) कर्मचारी मागास प्रवर्गातील आहे. परंतु तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही.

8) सन 2010, 2011, 2012 चे नियमित वेतनवाढीच्या आदेशाच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

9) हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली नाही.

10) संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही.

11) महाराष्ट्र निवृत्तीवेतन नियम 1982 मधील नियम क्र. 115 अनुसार नामनिर्देशन पत्रे जोडलेली



DRAFT

नाहीत.

12) स्वग्राम घोषित केल्याची नोंद घेतलेली नाही.

सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.146, दि. 23.11.2015 नुसार विभागास अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

IPRSRBM6901 (Ref No : 146)

## *57 जाहिरात कर वसुलीच्या रकमा वेळेवर वसूल न झाल्याबाबत व रकमा थकीत असल्याबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 1107454.00/-

***जाहिरात कर वसुलीपोटी वसूल करण्यात येणारी रक्कम रु. 1107454 वेळेवर वसूल न झाल्याने व रकमा थकीत असल्याचे आढळून आले.***

महानगरपालिका अमरावती सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणत बाजार व परवाना विभागातील खालील तपशिलाप्रमाणे जाहिरात कर वसूल न केल्याचे निदर्शनास आले.

| अ.क्र. | थकबाकीदार जाहिरातदाराचे नाव | सन 2012-13 पर्यंत थकबाकीची एकूण रक्कम |
|---|---|---|
| 1 | मे. संदीप पब्लिसिटी | रु.28,200/- |
| 2 | मे.एस.एस. Advs. | रु. 43,226/- |
| 3 | मे. शिवम Advs. | रु. 10,17,638/- |
| 4 | मे. सलीम Advs. | रु. 18,390/- |
| | **एकूण थकबाकी** | रु.11,07,454/- |

उपरोक्तप्रमाणे थकीत असलेल्या रकमेची वसुली संबंधित विभागाने केलेली नसल्याने सदर रकमेचे महानगरपालिकेला प्रत्यक्ष नुकसान झालेले आहे. सदर रक्कम नियमाप्रमाणे विहीत वेळेत वसूल झाली असती तर ती महानगरपालिकेला विविध विकास कामांसाठी खर्च आली असती.

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नुसार सर्व रकमा वित्तीय वर्षाच्या सुरुवातीला एकदाच वसूल करणे आवश्यक आहे. तसेच थकीत रकमेवर व्याजाची आकारणी करून महानगरपालिकेचे नुकसान होणार नाही. सदर रक्कम वसुलीसाठी संबंधित व्यावसायिकांवर योग्य ती दंडात्मक कार्यवाही करून थकीत रकमा वसूल करणे आवश्यक आहे.



DRAFT

सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्र. 120, दि. 3.11.2015 नुसार विभागास अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

IPRSRBM6901 (Ref No : 120)

## 58 इतवारा बाजार मधील ओटेधारकांकडून भाडे वसूल न केल्याबद्दल

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 506250.00/-

***महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या इतवारा बाजारात एकूण 1164 ओटेधारकांपैकी अर्ध्या व्यावसायिकांनी अनियमितपणे भाडे दिल्यामुळे महानगरपालिकेला आर्थिक नुकसान झालेले आहे.***

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या बाजारातील भाडेपट्ट्यावर दिलेल्या मालमत्तांचे भाडे वसूल करणे संबंधित विभागाचे काम आहे.

महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या इतवारा बाजारात एकूण 1164 ओटे भाडेपट्ट्याने दिलेले आहेत. सन 2012-13 या वित्तीय वर्षापर्यंत या सर्व एकूण 1164 व्यावसायिकांकडून कुठल्याही करारनाम्याशिवाय रु. 450 ते रु.2700 दरम्यान वार्षिक भाडे वसूल केले जाते. या भाड्याच्या रकमेत सामान्य कर 30 टक्के, अग्नी कर 2 टक्के, पाणीपट्टी कर 10 टक्के, वृक्ष कर 1 टक्के, शिक्षण कर 8 टक्के, बेरोजगार कर 2 टक्के, या दराने एकूण वसुली केली जाते.

यानुसार सन 2012-13 या वित्तीय वर्षासाठी बाजार व परवाना विभागाच्या अभिलेख्यानुसार 75 ओटेधारकांनी साधारणत: सन 1991 पासूनचे भाडे पूर्णत: थकविलेले आहे. या 75 ओटेधारकांचे सरासरी वार्षिक भाडे रु 450/- गृहीत धरल्यास त्याची एकूण थकबाकी रु. 450X75=33750 वार्षिक याप्रमाणे सन 1991 पासून सन 2012-13 पर्यंत रु. 506250 इतकी होते. परंतु भाडे वसुलीबाबत संबंधित विभागाने नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही केल्याचे अभिलेख्यावरून दिसून येत नाही.

उर्वरित 1069 ओटेधारकांपैकी काही व्यावसायिक नियमित भाडे भरत नसल्याचे अभिलेख्यावरून दिसून येते. यापैकी साधारणत: अर्धे ओटाधारक व्यावसायिक अनियमितपणे भाडे देत आहेत. ही थकीत रक्कम एका वित्तीय वर्षासाठी किमान रु. 450X500 ओटेधारक याप्रमाणे रु. 225000 इतकी होते.म.न.पा.च्या संबधित विभागाचे भाडेपट्टी वसुलीकडे दुर्लक्ष्य असल्याचे दिसून येत आहे,संबधित ओटे धारकाकडून पूर्वलक्षी प्रभावाने भाडे आकारून वसुली करून अनुपालन दर्शवावे.

सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्र. 145, दि. 23.11.2015 नुसार विभागास अनुपालनास्तव कळविले



DRAFT

असता अनुपालन दर्शविले नाही. त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

IPRSRBM6901 (Ref No : 145)

## *59 अंबा माल व प्रवासी संघटना शहर बस सेवेतील अनियमितता*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***अमरावती महानगर पालिकेत अंबा माल व प्रवासी संस्थेने दुसर्यांदा 3 मार्गावर 07 बसेस घेण्याचे मान्य केले होते परंतु अशी खरेदी अभिलेखे लेखा परीक्षणात पहावयास मिळाली नाहीत. परिवहन कार्यालयासाठी स्वतंत्र जागा नसून अभिकर्ता मनपा चे जागेसाठी भाडे अदा करीत नसल्याचे दिसून आले. बसेस वरील व आतील जाहिराती साठी जाहिरात कर अभिकर्ता भरेल असे करारनाम्यात नमूद आहे परतू जाहिरातीचे उत्पन्न बाबत कोणताच उल्लेख करारनाम्यात दिसून आला नाही. बस मार्गाचे एकूण थाबे किती, एकूण कि.मी. किती व त्या प्रमाणात रॉयल्टी किती अशी अभिलेखे लेखा परीक्षणात पहावयास मिळाली नाहीत.***

अमरावती महानगरपालिकेने सन 2012-13 या आर्थिक वर्षात महसुली जमा अंतर्गत परिवहन सेवा उत्पन्न ,रॉयल्टी स्वरुपात रु. 2488660/- जमा झाल्याचे दिसून येते.

अमरावती शहराची दिवसेंदिवस वाढत असलेली लोकसंख्या ग्रामीण भागातून रोजगार तसेच दैनदिन कामाकरिता शहरात येणाऱ्यांची संख्या तसेच परिवहन महामंडळातर्फे अनेक वर्षापासुन शहरातील तुरळक मार्गावर सुरु असलेली बससेवा मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असल्याने परिवहन महामंडळाने बंद करणाच्या घेतलेल्या निर्णयाने शहरातील ऑटोरिक्षा यांची वाढलेली संख्या त्यामुळे उद्भवलेली वाहतूक समस्या प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयी,अडचणी, प्रवास सुरक्षा हया सर्व बाबी लक्षात घेऊन शहरातील नागरिकांना स्वस्त व सुरक्षित प्रवास उपलब्ध करून देण्याची जबाबदारी हि महानगरपालिकेची असल्याने महानगरपालिकेतर्फे अमरावती शहरात शर बस वाहतूक उपक्रम BOO(Built Operate & Own)तत्वावर राबविण्याच्या धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असल्याचे दिसून येते.

महानगरपालिका अमरावती शहरबस वाहतूक उपक्रम हा मे.अंबा माल व प्रवासी सह.संस्था मर्या.अमरावती र .क्र. 111 या अभिकर्त्यामार्फत शासनाच्या टप्पा वाहतूक परवान्याप्रमाणे एकूण 33 शहर बसेस (42 सीटर क्षमता) द्वारे राबविण्यात येते.

DRAFT

1-प्रस्तावित मार्गाची संख्या – एकूण 17 मार्ग.

2-17 मार्गाकरिता बसेस संख्या – 33 बसेस.

3-17 मार्गाचे दरदिवशी होणारे एकूण किमी- 7718.05

4- रॉयल्टी दर - रु.1.10 पैसे/प्रती किमी.

5-मनापास प्रतिमाह मिळणारी रॉयल्टी – रु.263186/- 30 दिवसासाठी.

6-शासनास कर रूपाने होणारी प्राप्त रक्कम-अंदाजे 3 लाख प्रती माह.

याव्यतिरिक्त शहरबस उपक्रम राबविण्यान्या करीता अभिकर्त्याने

वाहन चालक एकूण- 92

अभिकर्त्याचे वाहक एकूण- 117

कार्यालयीन कामाकरिता कर्मचारी-15

वाहनाचे तिकीट तपासणी कर्मचारी -10 व

वाहनदुरुस्ती देखभाल कर्मचारी एकूण - 08 असे कर्मचारी कार्यरत आहेत. शहरबस वाहतूक उपक्रम चालविण्याकरिता दि.16/06/2011 रोजी सादर केलेला प्रतीलेख व उपक्रमाच्या अटी व शर्ती नुसार प्रत्येकी रु.500000/- प्रमाणे एकूण. रु. 3000000/-(रु.तीस लाख) च्या जमा बँक ग्यारंटी आहेत. सदरील उपक्रमाची मुदत 24/02/2016 पर्यंत एकूण 05 वर्षासाठी निश्चित करण्यात आली आहे.

<u>सदरील उपक्रमाबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.</u>

<u>1.</u> सदरील अभिकर्त्याने सुरुवातीस 28 बसेस 08 मार्गासाठी चालविण्याचे मान्य केले होते परंतू नंतर 03 मार्गासाठी 07 बसेस नवीन कंपनी उदा. टाटा मेक –LP 709EX ,अशोक लेयलंड ,स्वराज्य माझदा या कंपनीने घेण्याचे मान्य केले होते.(करारनाम्यातील अट क्र. 2 नुसार)परंतु अशी खरेदी झाल्या बाबत लेखा परीक्षणात अभिलेखे दिसून आले नाही.

2.करारनाम्यात परिवहनाच्या कार्यालयासाठी जागा मनपाची वापरात असून अभिकर्ता त्या बाबत कोणतेही कार्यालयाचे भाडे महानगरपालिकेस अदा करीत नसल्याचे दिसून आले.

3.बसेस वरील बाहेरील किवा आतील जाहिराती विषयी जाहिराती वरील कर अभिकर्ता भरेल परंतु जाहिरातीपासूनचे उत्पन्नाबाबत करारनाम्यात कोणताच उल्लेख दिसून आला नाही.(करारनाम्यातील अट क्र.09 )तरी जाहिरातीपासुंनचे उत्त्पनाबाबत महानगर पालिकेने कारवाही करणे आवशक आहे त्यामुळे



DRAFT

महानगरपालिकेच्या उत्पन्नापासून नुकसान होत असल्याचे दिसून येते. याबाबत लेखा परीक्षणात अनुपालन सादर करण्यात आले नाही.त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

4.अमरावती महानगरपालिकेने संस्थेस 17 मार्ग ठरउन दिलेले आहेत तथापि त्या मार्गावर किती थाबे आहेत या बाबत माहिती उपलब्ध नाही.किवा त्याचा तपशील लेखापरीक्षणात उपलब्ध केला नाही.त्या मुळे मार्गानुसार एकूण अंतर त्याप्रमाणे बसच्या एकूण फेऱ्या त्यानुसार येणारी रॉयलटी ची रक्कम व थांबे व प्रत्यक्ष भरणा/वसुली इ. बाबींची खात्री करता आली नाही.
याबाबत लेखा परीक्षणात अनुपालन दर्शविण्यात आले नाही.त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPDMM6101 (Ref No : 84)

## *60 टायरट्युब खरेदी मधील अनियमितता*

**टायर टूब खरेदी**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 345710.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 174401.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 171309.00/-

***अमरावती महापालिकेने टायर ट्यूब खरेदी हि नियमबाह्य पद्धतीने केली आहे.वर्षभरात किती टायर ट्यूब लागतील त्याचा अंदाज घेऊन त्या प्रमाणे खरेदी करणे किंवा अधिकृत पुरवठा दाराकडून टायर ट्यूब चे दर निश्चित करून खरेदी करणे योग्य झाले असते परंतु कोणतीच पद्धत वापरण्यात आली नाही.इतिहास पुस्तिकेमध्ये नोंद दिसून येते परंतु लॉग बुकला कोणत्या दिवशी गाडी वर्कशॉप ला होती हे दिसून येत नाही.देयकाचे मागील बाजूस विहित नमुन्यातील प्रमाणपत्र नमूद नाही.त्यामुळे विहित कंपनी चा माल मिळाला किंवा अन्य हे समजू शकत नाही.टायर ट्यूब खरेदीचे डिलिवरी चालन किंवा गेट पास लेखा परीक्षणात पहावयास मिळाले नाही.***

अमरावती महानगर पालीकेच्या वाहन कार्यशाळा विभागाचे सन 2012-2013 चे लेखापरीक्षणात टायरट्युब खरेदीची संचिका महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 अन्वये अर्धसमास मागणी पत्र क्र. 66/ दि.08/10/2015 अन्वये मागणी केली असता कोणतेही अनुपालन लेखा परीक्षणात सादर करण्यात आले नाही. टायरट्युब खरेदीवर सन 2012-2013 मध्ये रु.345710/-खर्च केला असून खालील देयकाची तपासणी करण्यात आली.

1) प्रमानक क्र.6376 / ते 6377 / दि 31/10/2012 रु.84629/-

DRAFT

2) प्रमानक क्र.6372 / ते 6375 / दि 31/10/2012 रु.59900/-

3) प्रमानक क्र. 11009 / दि 07/03/2013 रु 8400/-

4) प्रमानक क्र. 11532 दि 20/03/2013 रु 18380/-

एकूण .रु.171309/-

<u>यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.</u>

1.सदरील खरेदी वेगवेगळ्या पुरवठादाराकडून करण्यात आली.सदर बाबतीत किती वाहनांना सन 2012-2013 मध्ये टायरट्यूबची आवश्यकता आहे.यांचा अंदाज घेऊन एकत्र मागणी तयार करून अधिकृत कंपनीचे पुरवठादाराकडून दरपत्रके मागवून खरेदी करणे योग्य झाले असते. तसेच संबंधित पुरवठादाराशी दरकरार करून आवश्यकतेनुसार खरेदी करणे योग्य झाले असते. परंतु सदरील विहित कार्यपद्धतीचे उल्लंघन करण्यात आले असल्याचे दिसून येते. त्यामुळे खरेदी करताना स्पर्धा निर्माण झाल्याचे दिसत नाही.

2.वाहनाचे इतिहास पुस्तिकेमध्ये नोंद दिसून येते परंतु लॉगबुक मध्ये कोणत्या दिवशी वाहनास टायरट्यूब बसविण्यात आली अशी कोणतीही नोंद वाहन कार्यशाळेत असल्याबाबत लॉगबुक मध्ये दिसून येत नाही. सकाळी 10:00 ते 18:00 वाहन चालू असल्याचे बरेच प्रकरणात दिसून आले आहे. तरी टायरट्यूब केव्हा बदलण्यात आली हे स्पष्ट होत नाही.

3.देयकाचे मागील बाजूस साठा नोंदवहीत नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र नोंदविलेले नाही. तसेच पान क्र नमूद नाही.

4.टायर ट्यूब चे दिलेवारी चालन व गेट पास लेखा परीक्षणात दर्शविण्यात आले नाही. सदरील बाबतीत अनुपालन दर्शविण्यात आले नाही, त्यामुळे परीच्छेद कायम करण्यात येत आहे..

DATPDMM6101 (Ref No : 66)

DRAFT

## *63 भविष्य निर्वाह निधी योजनेतील अनियमितते बाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***भविष्य निर्वाह निधी योजनेचे मिनी कॅशबुक व भविष्य निर्वाह निधी नमुना 98 खातेवहीमध्ये नोंदी न*** |

***घेणे,सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित न करणे इत्यादी.***

सन 2012-2013चे भविष्य निर्वाह निधी योजने अंतर्गत लेख्यांची तपासणी केली असता खालील अनियमितता निदर्शनास आल्या.

अ) <u>मिनी कॅशबुक</u> -- भविष्य निर्वाह निधी मिनी कॅशबुक दिनांक 2/4/2005 ते 31/3/2013 मध्ये खालील तक्त्यात दर्शविलेल्या पानावर खालील प्रमाणे नोंदी घेतल्याचे दिसून आले.

| पान क्र.164 | पान क्र.171 | पान क्र.173 |
|---|---|---|
| दिनांक 23/4/2012 | दिनांक 6/8/2012 | दिनांक 9/9/2012 |
| दिनांक 25/4/2012 | दिनांक 2/8/2012 | दिनांक 10/9/2012 |
| दिनांक 20/4/2012 | दिनांक 8/8/2012 | दिनांक 17/9/2012 |
| दिनांक 21/4/2012 | दिनांक 8/8/2012 | दिनांक 17/9/2012 |
| दिनांक 25/4/2012 | दिनांक 8/8/2012 | दिनांक 17/9/2012 |

उपरोक्त नोंदी मागे पुढे घेतलेल्या आहेत यावरून सदरील नोंदी नियमित पणे घेतलेल्या नाहीत,तसेच अतिशय महत्वपूर्ण अभिलेख निष्काळजीपणे नोंदविले जात आहेत व त्यावर नियंत्रण अधिकार्याचे कोणतेही नियंत्रण आढळून येत नाही हे दिसून येत आहे .

1) महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 32 (2) नुसार रोकड वहीतील प्रत्येक खर्चाची नोंद प्राधिकृत अधिकाऱ्याने स्वाक्षांकित केलेली नाही.

2) महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 51 (1) (3) (4) नुसार सर्वसाधारण रोखीवहीचे लेखे रोजच्या रोज बंद करून समतोलीत केले पाहीजे आणि त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्याने स्वाक्षरी केली पाहीजेतसेच प्रत्येक महिन्याच्या अखेर रोखवहीतील जमा व खर्चाच्या रकमा पासबुकातील रकमांबरोबर ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 32 (4) व 51 (1) मधील तरतुदीनुसार संबंधित अधिकारी यांनी स्वाक्षरीनिशी रोकडवहीत प्रतिदिन व्यवहार समाप्त करणे बंधन कारक असतांना त्यानुसार उचित कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते.

4) नियम 62(2) मधील तरतुदीनुसार प्राधिकृत अधिकाऱ्याने महिन्यातुन किमान एकदा तरी रोकडवहीची प्रत्यक्ष पडताळणी करून त्यानुरूप अभिप्राय / निष्कर्ष रोकडवहीत नोंदविणे आवश्यक आहे.तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.

5) नियम 53 नुसार स्थानांतरण व समायोजनांची कार्यपध्दती करण्यात येत नाही.

ब) भविष्य निर्वाह निधी नमुना 98 खातेवही मध्ये श्री.संदीप मुकुंदराव वडूरकर न.-1 ते अशोक नामदेवराव ढोक न.-01232 असे एकून 100 कर्मच्या-याच्या नावांच्या खातेवहीतील नोंदी पूर्ण घेतलेल्या नाहीत. गोषवारे काढलेले नाहीत. लेखा परीक्षण कालावधी पर्यंत लेखे अपूर्ण असणे हि फार गंभीर बाब आहे. सदर बाबीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येते.

उपरोक्त अ व ब मधील उणिवांची पूर्तता करून अनुपालन दर्शवावे व भविष्यात सदरील अनियमिततांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणी अर्ध समास पत्र क्र 34 दिनांक 08/09/2015 अन्वये अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन अप्राप्त आहे.

DRAFT

त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATMPDF6701 (Ref No : 34)

## *64 स्थानांतरण व समायोजन नोंदीची नोंदवही न ठेवणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***स्थानांतरण व समायोजन नोंदीची नोंदवही न ठेवणे तसेच स्थानांतरण व समायोजन नोंदी करण्याची कार्यपद्धती महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 53 मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

DRAFT

सन 2012-13 या वित्तिय वर्षातील महानगरपालीकेतील लेखा विभागाचे लेखापरीक्षण करतांना माहे मार्च 2013 मध्ये खालील तक्त्यात दर्शविलेल्या रक्कमांचे एका खात्यामधून दुसऱ्या खात्यामध्ये स्थानांतरण केल्याचे सामान्य रोख पुस्तकावरून दिसून येते. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अनु .क्र. | दिनांक | धनादेश क्र . | रक्कम | बँकेचे नाव | ज्या फंडा मधून रक्कम स्थानांतरण करण्यात आली त्याचे नाव | ज्या फंडा मध्ये रक्कम स्थानांतरण करण्यात आली त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 02/03/2013 | 208994 | 1,00,00,000 | एक्सिस बँक | मनपा | UIDSSMT |
| 2 | 02/03/2013 | 297182 | 50,00,000 | एक्सिस बँक | मनपा | UIDSSMT |
| 3 | 14/03/2013 | 209038 | 1,00,00,000 | एक्सिस बँक | मनपा | UIDSSMT |
| 4 | 21/03/2013 | 322228 | 54,43,380 | एक्सिस बँक | मनपा | विकास शुल्का मध्ये स्थानांतरण |
| 5 | 30/03/2013 | 216561 | 3,43,93,001 | बँक ऑफ महाराष्ट्र | मनपा | 13 वे वित्त आयोग |
| 6 | 30/03/13 | -- | 80,00,000 | एक्सिस बँक | 13 वे वित्त आयोग | मनपा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 30/03/2013 | -- | 1,00,00,000 | एक्सिस बॅंक | 13 वे वित्त आयोग | मनपा |
| 8 | 30/03/2013 | - | 1,00,00,000 | एक्सिस बॅंक | म.न.पा | UIDSSMT |

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. उपरोक्त तपशिलात दर्शविलेल्या एका खात्यामधून दुसऱ्या खात्यामध्ये स्थानांतरण केलेल्या रक्कमांची स्थानांतरण नोंदवही महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 53 (5) नुसार नमुना क्रमांक 25 मध्ये विहित नमुन्यात ठेवलेली नाही. ही फार गंभीर बाब आहे. याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात असून महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 53 (5) नुसार नमुना क्रमांक 25 मध्ये विहित नमुन्यात स्थानांतरण व समायोजन रक्कमांची नोंदवही ठेवून तसेच ती अद्ययावत् करून अनुपालन दर्शवावे.

2. स्थानांतरण व समायोजने महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 52 मध्ये नमूद प्रमाणे कार्यवाही करून तसे अनुपालन दर्शवावे.

3.स्थानांतरण व समायोजन नोंदी करण्याची कार्यपद्धती महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 53 मध्ये दिलेल्या सूचनां प्रमाणे कार्यवाही करून तसे अनुपालन दर्शवावे.

सदर अनियमितते बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 34 दिनांक 08/09/2015 व अर्धसमास पत्र क्रमांक 115 दिनांक 31/10/2015 अन्वेय विचारणा केली असता उत्तर प्राप्त झाले नाही. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त न झाल्यामुळे सदर परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

तरी उपरोक्त अनियमितता बाबत अनुपालन दर्शवावे.

DATMPDF6701 (Ref No : 115)

## *66 संगणक विभागात जंगम मालमत्तेची नोंदवही न ठेवणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष :85 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सन 2012-2013 चे संगणक विभागात जंगम मालमत्तेची नोंदवही ठेवलेली नाही.***

सन 2012-13 या वित्तिय वर्षातील महानगरपालीकेचे लेखापरीक्षण करतांना संगणक विभागात जंगम मालमत्तेची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता मधील नियम क्रमांक 144 (1) नुसार महानगरपालिकेतील मालकीचे इंजिने ,यंत्रे इत्यादी स्वरूपाच्या जंगम मालमत्तेची सूची नमुना क्रमांक 114 प्रमाणे असलेल्या जंगम मालमत्तेच्या पुस्तकात, प्राधिकृत अधिकाऱ्याच्या आद्याक्षरीनिशी नमूद केली पाहिजे. जेव्हा मालमत्ता विक्रीने अथवा अन्य मार्गाने अंतिमतः निकालात काढली जाते , तेव्हा अशा विल्हेवाटीचा तपशील , स्तंभ क्रमांक 9 ते 14 मध्ये पूर्वोल्लेखित अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीनिशी नमूद केला पाहिजे. महानगरपालिकेच्या मालकीच्या जंगम मालमत्तेचा



DRAFT

पुस्तकांत संपूर्ण आलेख नमूद असणे ही त्या अधिकाऱ्याची जबाबदारी राहील.
2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता मधील नियम क्रमांक144 (2) नुसार जंगम मालमत्तेचे पुस्तक हे अभिलेख म्हणून उद्देशित आहे व ते प्राधिकृत अधिकाऱ्याच्या व्यक्तिगत पर्यवेक्षणाखाली ठेवले पाहिजे. निरनिराळ्या वर्णनाच्या वस्तू सरसकट एकत्र न दाख विता, प्रत्येक प्रकारच्या मालमत्तेसाठी जरुरी प्रमाणे निराळी पाने वाटून देण्यात यावीत व प्रत्येक संचाच्या मध्ये पुरेशी रिकामी जागा सोडावी , म्हणजे नंतरच्या व्यवहारांची नोंद घेणे श्यक्य होईल. जेव्हा नवे पुस्तक उघडण्यात येईल तेव्हा सध्याचा साठा, काळजीपूर्वक पडताळणी करून स्पष्टपणे दाखविण्यात यावा ( "आरंभीची शिल्लक दिनांक....... . ")म्हणजे पुढील खरेदीपासून स्पष्टपणे विभिन्न दाखविणे शक्य होईल.

अशा प्रकारे महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहितामध्ये जंगम मालमत्तेचे पुस्तक ठेवण्या बाबत तरतूद असतांना जंगम मालमत्तेचे पुस्तक ठेवण्यात आले नाही या बाबत अर्ध समास पत्र क्र.71 दिनांक 08/10 /2015 मधील मुद्या क्र.03 नुसार विचारणा केली असता उत्तर प्राप्त झाले नाही. तरी नियम क्रमांक144 (1) व (2)नुसार जंगम मालमत्तेची नोंदवही ठेवून व दिनांक 31/03/2013 अखेर पर्यंत अध्यावत करून शिल्लक साठयासह अनुपालन दर्शवावे.

DATMPDF6701 (Ref No : 71)

## *68 सन 2003 ते 2010 या कालावधीतील निकामी संगणक निर्लेखित न करणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :85 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सन 2012 -2013 चे संगणक विभागाचे लेखा परीक्षण करतांना सन 2003 ते 2010 या कालावधीतील निकामी संगणक निर्लेखित करण्यात आलेले नाही.***

सन 2012-13 या वित्तिय वर्षातील महानगरपालीकेचे संगणक विभागातील लेखापरीक्षण करतांना नस्तीचे अवलोकन केले असता खालील अनियमितता निदर्शनास आल्यात.
महानगरपालिकेतील संगणक विभागाचे2012-2013 चे लेखापरीक्षण करतांना संगणक नस्तीचे अवलोकनकेले असता सन 2012-13 मध्ये खाली दर्शविल्या प्रमाणे विभागवार संगणक निकामी असल्याचे दिसून आले.

| अ.क्र. | विभागाचे नाव | निकामी संगणकाची संख्या |
|---|---|---|
| 1 | लेखा विभाग | 2 नग |
| 2 | नगर रचना विभाग | 1 नग |
| 3 | जन्म /मृत्यू विभाग | 1 नग |
| 4 | शहर बांधकाम विभाग | 2 नग |
| 5 | संगणक विभाग | 6 नग |
| 6 | सामान्य प्रशासन विभाग | 2 नग |
| 7 | महापौर ऑफिस | 1 नग |



DRAFT

| | | |
|---|---|---|
| 8 | नगर सचिव विभाग | 3 नग |
| 9 | जुना कर विभाग | 2 नग |
| 10 | सांखिकी विभाग | 1 नग |
| 11 | कर विभाग | 1 नग |
| 12 | पशु संवर्धन विभाग | 1 नग |
| 13 | प्रकाश विभाग | 1 नग |
| | एकूण | 24 नग |

संगणक विभागाकडून संगणक खरेदी करून इतर विभागात एकून 166 नग संगणक पुरविण्यात आले असून त्या पैकी उपरोक्त विभाग निहाय एकून 24 नगसंगणक निकामी असल्याचे नस्ती वरून दिसून येते. संगणक निर्लेखनाबाबत कार्यवाहीची नस्ती लेखा परीक्षणास सादर केली नाही व संगणक निर्लेखनाची कार्यवाही केलेली नसल्याचे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी सांगितले. अर्ध समास पत्र क्र. 71 दिनांक 08/10/2015 मधील मुद्दा क्र.5 नुसार विचारणा केली असता निर्लेखनाच्या कार्यवाहीबाबत्त उत्तर प्राप्त झाले नाही.
महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 मधील नियम क्र. 144 मध्ये नमूद जंगम मालमत्तेची सूची नमुनाक्रमांक 114 प्रमाणे असलेल्या जंगम मालमत्तेच्या पुस्तकात , प्राधिकृत अधिकाऱ्याच्या आद्याक्षरीनिशी नमूदकेली पाहिजे.जेव्हा मालमत्ता विक्रीने अथवा अन्य मार्गाने अंतिमतः निकालात काढली जाते , तेव्हा अशा विल्हेवाटीचा तपशील ,स्तंभ क्रमांक 9 ते 14 मध्ये पूर्वोल्लेखित अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीनिशी नमूद केला पाहिजे.महानगरपालिकेच्या मालकीच्या जंगम मालमत्तेचा पुस्तकांत संपूर्ण आलेख नमूद असणे ही त्या अधिकाऱ्याची जबाबदारी राहील. असे नियमात नमूद असतांना नियमा प्रमाणे कार्यवाही का करण्यात आली नाही या बाबत लेखा परीक्षणा दरम्यान कळू शकले नाही.
तरी निकामी संगणकाची निर्लेखनाची कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह अनुपालन सादर करावे.

DATMPDF6701 (Ref No : 71)

## *71 संगणक साठा नोंदवहीतील नोंदी अपूर्ण असणे बाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष :85 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 580702.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 580702.00/-

***सन 2012 -2013 चे संगणक विभागाचे लेखा परीक्षण करतांना साठा नोंदवहीची (माल पुस्तकाची) तपसणी केली असता साठा नोंदवहीत माल प्राप्त झाल्याचे डिलीवरी चालान दिनांक नमूद नाही तसेच साहित्य वाटप केले असता वस्तू देणाऱ्या / घेणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सहया नाहीत व साठा नोंदवहीत गोषवारा काढल्याचे दिसून येत नाही.***

सन 2012-13 या वित्तिय वर्षातील महानगर पालीकेचे संगणक विभागातील लेखापरीक्षण करतांना अर्ध



DRAFT

समास पत्र क्र. 71 दिनांक 08/10/2015 मधील मुद्दा क्र. 4 नुसार साठा नोंदवहीची तपासणी करतांना आढळून आलेल्या अनियमितते बाबत विचारणा केली असता उत्तर प्राप्त झाले नाही. साठा नोंदवहीची तपासणी करतांना आढळून आलेल्या अनियमितता खालील प्रमाणे निदर्शनास आल्यात.

1. नमुना क्र. 116 साठा नोंदवहीची (माल पुस्तकाची) तपसणी केली असता साठा नोंदवहीत नगर रचना विभागाकरिता 5 नग प्रिंटर खरेदी करण्यात आलेल्या प्रिंटरची पान क्र. 54 वर नोंद घेतली असून नोंदवहीत माल प्राप्त झाल्याचे डिलीवरी चालान दिनांक नमूद नाही नगर रचना विभागात संगणक साहित्य वाटप केलेले नाही परंतु 1 नग प्रिंटर दिनांक 3/11/2012 ला गट नेता मा. श्री अजय गोंडाणे यांना वाटप केले आहे व 1 नग विरुद्ध पार्टी लिडर यांना दिनांक 5/10/2012 ला वाटप केल्याचे दिसून येते व 3 नग प्रिंटरचा वाटप लेखापरीक्षण कालावधी पर्यंत दर्शविलेला नाही. करिता नगर रचना विभागाकरिता खरेदी केलेल्या 5 नग प्रिंटरची रक्कम रु.25,000 /-आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2. नमुना क्र. 116 साठा पुस्तक पान क्र.8 व 9 दिनांक 01/01/2013 ला 15 नग संगणक प्राप्त झाल्याची नोंद आहे. डिलीवरी चालान दिनांक नमूद नाही. तसेच लेखापरीक्षण कालावधी पर्यंत साहित्य वाटप केलेले नाही या वरून साहित्याची गरज नसतांना साहित्य खरेदी केल्याचे दिसून येते. तरी शिल्लक साहित्याची रक्कम 5,55,702 /- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे

3. प्रमाणक क्र.3885 दिनांक- 30/08/2012 नुसार रक्कम रु.9570/- चे 1 Dell Led monitor खरेदी करून मा.आयुक्त यांचे घरी पुरविण्यात आल्याचे नस्ती वरून दिसून येते. परंतु सदर monitor ची नोंद साठा पुस्तकात घेतलेली नाही.या वरून सदर monitorखरेदी करून मा.आयुक्तयांचे घरी पुरविण्यात आल्याची खात्री पटत नाही.तरी या बाबत योग्य अनुपालन दर्शवावे.

4. प्रमाणक क्र.4866 दिनांक 15/09/2012 नुसार रक्कम रु.49,900/- चे 1संगणक ,प्रिंटर,इत्यादी साहित्य खरेदी करून मा.आयुक्त यांचे घरी पुरविण्यात आल्याचे नस्ती वरून दिसून येते. परंतु सदर साहित्याची ची नोंद साठा पुस्तकात घेतलेली नाही.या वरून सदर सदर साहित्य खरेदी करून मा.आयुक्त यांचे घरी पुरविण्यात आल्याची खात्री पटत नाही.तरी या बाबत योग्य अनुपालन दर्शवावे.

5. महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता,1971 नियम क्र.145 मध्ये सूचित केल्या प्रमाणे नमुना क्र. 116 मध्ये ठेवले असून नोंदवहीत वस्तू देणाऱ्या /घेणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सह्या नाहीत.

6. नमुना क्र. 116 मध्ये ठेवलेल्या साठा नोंदवहीतील पूर्ण रकाने भरलेले नाहीत व नोंदवहीत गोषवारा काढल्याचे दिसून येत नाही.

तरी उपरोक्त अनियमितते बाबत, नोंदवही अपूर्ण ठेवणे बाबत,तसेच शिल्लक साहित्याची रक्कम रु.5,80,702 /- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे तरी या बाबत योग्य अनुपालन दर्शवावे.

DATMPDF6701 (Ref No : 71)

## *72 सामान्य रोखपुस्तकामधील दिनांक 31/03/2013 अखेरची शिल्लक व बँकखात्यामधील दिनांक 31/03/2013 अखेरची शिल्लक यांचा ताळमेळ न करणेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*



DRAFT

***महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) नुसार सन 1985 पासून सामान्य रोखपुस्तकामधील दिनांक 31/03/2013 अखेरची शिल्लक व बँकखात्यामधील शिल्लक यांचा ताळमेळ घेतलेला नाही.***

म.न.पा.अमरावतीचे सन 2012 -2013 चे लेखापरीक्षण करित असतांना असे निदर्शनास आले की, सन 1985 पासून सामान्य रोखपुस्तकामधील दिनांक 31/03/2013 अखेरची शिल्लक व बँकखात्यामधील शिल्लक यांचा ताळमेळ केलेला नाही. तसेच रोख पुस्तकातील रक्कमा प्रमाणित केलेल्या नाहीत व मासिक गोषवारे काढलेले नाहीत. यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहे.

1. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) नुसार सामान्य रोखपुस्तकामधील दिनांक 31/03/2013 अखेर दर्शविलेल्या रकमेचा अधिकोष खात्यातील प्रत्यक्षात शिल्लक रकमेशी ताळमेळ केलेला नाही. तसेच सन 1985 पासून सामान्य रोखपुस्तकामधील व अधिकोष खात्यातील प्रत्यक्षात शिल्लक रकमेशी ताळमेळ करीत नसल्याचे विभागाकडून कळले तरी सन 1985 पासून वर्षाअखेर शिल्लक रक्कमांचा ताळमेळ न घेणे हि फार गंभीर बाब आहे. याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येते.

सामान्य रोखपुस्तकामधील दिनांक 31/03/2013 अखेरच्या व अधिकोष खात्यातील दिनांक 31/03/2013 अखेरच्या शिलकेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| सामान्य रोखपुस्तकामधील दिनांक 31/03/2013 अखेरची शिल्लक 66,30,58,522/- | अधिकोष खात्यातील दिनांक 31/03/2013 च्या शिल्लक रक्कमा. **748534240/-** |

| **अ. क्र.** | **बँकेचे नाव/योजनेचा तपशील** | **रक्कम** |
|---|---|---|
| 01 | युनियन बँक,उर्जा संवर्धन प्रकल्प व तंत्रज्ञान | 2057546/- |
| 02 | युनियन बँक, शासन अनुदान | 750052/- |
| 03 | युनियन बँक,आमदार निधी | 6622502/- |
| 04 | युनियन बँक .पी.डी.एस.एच.आय, | 10242/- |
| 05 | आय डी बी आय बँक. 12वे वेतन आयोग | 284609/- |
| 06 | आय डी बी आय बँक, I D S M T. | 5646/- |
| 07 | आय डी बी आय बँक,रस्ते अनुदान | 40515982/- |
| 08 | आय डी बी आय बँक,दलित वस्ती सुधार | 5577277/- |
| 09 | आय डी बी आय बँक, B R G F | 4334744/- |
| 10 | आय डी बी आय बँक अंबानाला, | 14705934/- |

DRAFT

| | | |
|---|---|---|
| 11 | आय डी बी आय बँक निधी खासदार, | 359631/- |
| 12 | आय डी बी आय बँक अडसूळ आनंदराव खासदार, | 572268/- |
| 13 | आय डी बी आय बँक निधी नाल्यासफाई स्वीपर, | 289253/- |
| 14 | आय डी बी आय बँक,नारोत्थ्यान प्रकल्प. | 79394519/- |
| 15 | आय डी बी आय बँक त्रिवेणी योजना | 9958627/- |
| 16 | आय डी बी आय बँक विदर्भ मंडळ वैधानिक | 2721692/- |
| 17 | आय डी बी आय बँक अग्निशमन, | 7881126/- |
| 18 | आय डी बी आय बँक जिल्हा समिती नियोजन | 6253306/- |
| 19 | दैना बँक योजना घरकुल बौद्ध नव, | 83191553/- |
| 20 | दैना बँक योजना जयंती सुवर्ण जाती अनुसुचित | 1261857/- |
| 21 | दैना बँक नझुल दुरुस्ती रस्ते | 2026698/- |
| 22 | सेन्ट्रल बँक, सुवर्ण जयंती योजना | 91423955/- |
| 23 | सेन्ट्रल बँक.सुविधा मुलभूत, | 6707676/- |
| 24 | बँक ऑफ महाराष्ट्र 13, वे वित्त आयोग. | 3705160/- |
| 25 | इंडियन बँक योजना आधार , | 3893511/- |
| 26 | इंडियन बँक विकास अंबादेवी , | 22047335/- |
| 27 | इंडियन बँक जनगणना निहाय जाती, | 667189/- |
| 28 | इंडियन बँक अग्नि सुरक्षा निधि | 4387618/- |
| 29 | अक्सीस बँक मार्गदर्शन परीक्षा स्पर्धा | 70200/- |
| 30 | अक्सीस बँक SIG,प्रणाली . | 7250509/- |
| 31 | अक्सीस बँकफंड सिंकींग, | 1040947/- |
| 32 | अक्सीस बँक TMSSDIU, | 46861941/- |
| 33 | अक्सीस बँक शुल्क विकास, | 16727137/- |

DRAFT

| | | |
|---|---|---|
| 34 | अक्सीस बँक स्वराज्य स्थानिक, संस्था | 85154943/- |
| 35 | सेन्ट्रल बँक स्वराज्य स्थानिक , संस्था | 4207229/- |
| 36 | बँक ऑफ महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था | 4838646/- |
| 37 | बँक ऑफ इंडिया स्थानिक स्वराज्य संस्था | 5456562/- |
| 38 | पंजाब नॉशनल बँक स्थानिक स्वराज्य संस्था | 5591926/- |
| 39 | आयसीआयसीआय बँक स्थानिक स्वराज्य संस्था | 941210/- |
| 40 | आंध्र बँक,दलित वस्ती सुधार पा. पू. | 20967/- |
| 41 | अक्सीस बँक फंड मनपा, | 48286959/- |
| 42 | आय डी बी आय बँक,वृक्ष प्राधिकरण. | 7858499/- |
| 43 | आय डी बी आय बँक,भुयारी गटार अधिभार. | 59128701/- |
| 44 | आय डी बी आय बँक फंड मनपा, | 33549828/- |
| 45 | स्टेट बँक ऑफ इंडिया,विकास शुल्क | 13933368/- |
| 46 | स्टेट बँक ऑफ इंडिया,विकास शुल्क म्हाडा. | 6007160/- |
| | एकूण दि. 31/03/2013 | **748534240/-** |

सामान्य रोखपुस्तकामधील दिनांक 31/03/2013 अखेरची शिल्लक. 66,30,58,522/-
अधिकोष खात्यातील दिनांक 31/03/2013 च्या शिल्लक रक्कमा. 74,85,34,240/-
फरक रु. 8,54,75,718/-

सदर फरका बाबत महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) नुसार सामान्य रोखपुस्तक व अधिकोष खात्यातील दिनांक 31/03/2013 च्या शिल्लक रक्कमे बाबत ताळमेळ घेतलेला नाही हि फार गंभीर बाब आहे, तरी ताळमेळ घेवून अनुपालन दर्शवावे.

2. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 32(2) नुसार सर्व रोकड वा धनादेशाद्वारे जमा व वसुलीच्या प्रतिदिन नोंदलेल्या रक्कमा जबाबदार अधिकाऱ्याने स्वाक्षांकित केल्या पाहिजे असे असतांना रोकड वहीतील प्रत्येक खर्चाची नोंद प्राधिकृत अधिकाऱ्याने स्वाक्षांकित केलेली नाही.

3. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 51 (1) (3) नुसार सर्वसाधारण रोखीवहीचे लेखे रोजच्या रोज बंद करून समतोलीत केले पाहीजे आणि त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्याने स्वाक्षरी केली पाहीजे तसेच प्रत्येक महिन्याच्या अखेर रोखवहीतील जमा व खर्चाच्या रकमांचा पासबुकातील रकमांबरोबर ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

4. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 32 (4) मधील तरतुदीनुसार संबंधित अधिकारी यांनी स्वाक्षरीनिशी



DRAFT

रोकडवहीत प्रतिदिन व्यवहार समाप्त करणे बंधन कारक असतांना त्यानुसार उचित कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते.

5. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 62(2) मधील तरतुदीनुसार प्राधिकृत अधिकाऱ्याने महिन्यातुन किमान एकदा तरी रोकडवहीची प्रत्यक्ष पडताळणी करून त्यानुरूप अभिप्राय / निष्कर्ष रोकडवहीत नोंदविणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.

6. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 40 प्रमाणे प्रत्येक महिना अखेर रोकडवहीत नोंदविलेली जमा व संवितरणे यांची बेरीज करून जमा व खर्चाच्या मासिक वर्गीकृत गोषवाऱ्याबरोबर मेळ घातला पाहिजे.असे असतांना त्या प्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.उपरोक्त बाबीवरून संबधित विभागाचे प्रमुख व त्या विभागाचे नियंत्रण अधिकारी यांचे सदरील बाबीवर नियंत्रण नसल्याचे स्पष्ट होत आहे.

उपरोक्त उणिवांची पूर्तता करून अनुपालन दर्शवावे व भविष्यात सदरील अनियमिततांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणी अर्ध समास पत्र क्र 151 दिनांक 26/11/2015 अन्वये अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन अप्राप्त आहे. त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATMPDF6701 (Ref No : 151)

## *73 सन 2012-2013 मधील माहे मार्च 13 मध्ये आढळून आलेल्या रद्द धनादेशा बाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सन 2012-2013 मधील माहे मार्च 13 मध्ये आढळून आलेल्या रद्द धनादेशा बाबत.***

सन 2012-2013 चे लेखा परीक्षण करतांना माहे मार्च 2013 मध्ये आढळून आलेल्या रद्द धनादेशांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ .क्र. | बँकेचे नाव | धनादेश क्र . | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अक्सीस बँक | 209092 | 25/03/2013 | 37165/- | महात्मा फुले विकास महामंडळ अमरावती यांचे नावे काढलेला धनादेश . |
| 2 | अक्सीस बँक | 209096 | 25/03/2013 | 500/- | बँक ऑफ महाराष्ट्र राजापेठ यांचे नावे काढलेला धनादेश. |
| 3 | अक्सीस | 209081 | 25/03/2013 | 700/- | न्यायाधिश दिवाणी व फौजदारी |



DRAFT

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | बँक | | | | न्यायालय धारणी यांचे नावे काढलेला धनादेश. |
| 4 | अक्सीस बँक | 209336 | 30/03/2013 | 2000/- | आय डी बी आय बँक यांचे नावे काढलेला धनादेश. |
| एकूण | | | | 40365/- | |

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. उपरोक्त धनादेश रद्द करण्यात आले असून नियमा प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. सदर धनादेश रद्द करून त्या बदली सन 2013 -2014 या वर्षात नव्याने धनादेश काढण्यात आले परंतु सन 2012 -2013 मधील रक्कम कमी करण्यात आली नाही त्यामुळे सन 2012 -2013 या वर्षातील रक्कम रु. 40365 /- ने खर्च जादा दर्शविण्यात आला. यावरून महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 40 प्रमाणे प्रत्येक महिना अखेर रोकडवहीत नोंदविलेली जमा व संवितरणे यांची बेरीज करून जमा व खर्चाच्या मासिक वर्गीकृत गोषवाऱ्याबरोबर मेळ घातला पाहिजे. असे असतांना त्या प्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.

2. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 62(2) मधील तरतुदीनुसार प्राधिकृत अधिकाऱ्याने महिन्यातुन किमान एकदा तरी रोकडवहीची प्रत्यक्ष पडताळणी करून त्यानुरूप अभिप्राय / निष्कर्ष रोकडवहीत नोंदविणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.

3. महाराष्ट्र नगरपालीका लेखासंहिता 1971 चे नियम 47 मध्ये नमूद असल्याप्रमाणे धनादेश रद्द करून धनादेश्याचा स्थळ प्रतीवर धनादेश रद्द करण्याची कारणे लाल शाईने नमूद करणे आवश्यक आहे. तरी त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.

4. महाराष्ट्र नगरपालीका लेखासंहिता 1971 चे नियम 48 प्रमाणे नवा धनादेश काढला असेल तर त्याचा क्रमांक व दिनांक रोकडवहीत मूळ नोंदी समोर उधृत केला पाहिजे व मूळ धनादेश रद्द केला पाहिजे अशी नियमात तरतूद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.

5. महाराष्ट्र नगरपालीका लेखासंहिता 1971 चे नियम 50 प्रमाणे रोकडवही बंद केल्यानंतर धनादेश रद्द केला तर धनादेशाची रक्कम रोकडवहीत व प्रदानांच्या वर्गीकृत पुस्तकात नमुना क्रमांक (24) तत्सम खर्च शीर्षकाखाली लाल शाईने उणे नोंद करून समायोजित करण्यात आली पाहिजे असे असतांना नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.

सदर प्रकरणी अर्ध समास पत्र क्र 151 दिनांक 26/11/2015 मधील मुद्दा क्रमांक 9 अन्वये अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन अप्राप्त आहे. त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

उपरोक्त उणिवांची पूर्तता करून अनुपालन दर्शवावे.

DATMPDF6701 (Ref No : 151)

## *74 महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता,1971 चे नियमा प्रमाणे विहित नोंदवह्या न ठेवणे बाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता,1971 चे नियमा प्रमाणे विहित नोंदवह्या लेखा विभागाने ठेवलेल्या नाहीत.***

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता,1971 चे नियमा प्रमाणे विहित नोंदवह्या लेखा विभागाने ठेवलेल्या नाहीत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नोंदवही | नमुना क्र. | अ.क्र. | नोंदवही | नमुना क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कर्ज दायीत्वे नोंदवही | 8 | 12 | स्थायी अग्रिम लेखा | 108 |
| 2 | विश्वस्त निधी | 9 | 13 | माल पुस्तक | 116 |
| 3 | संकीर्ण जमा रक्कमांची दुय्यम नोंदवही | 15 | 14 | ठेवीसह गुंतवणूक नोंदवही | 142 |
| 4 | अदत्त रकमेची नोंदवही | 23 | 15 | कर्जाची नोंदवही | 143 |
| 5 | जमा व प्रदाने यांचे वर्गीकृत पुस्तकनोंदवही | 24 | 16 | कर्जनिवारण निधीची नोंदवही | 144 |
| 6 | रक्कमा स्थानांतरण नोंदवही | 25 | 17 | कर्जनिवारण निधीची रोजकिर्द | 145 |
| 7 | वेतन राखीव निधी | 73 | 18 | ऋणपत्र नोंदवही | 146 |
| 8 | वेतन श्रेणीची नोंदवही | 92 | 19 | आगाऊ रकमा ठेवी नोंदवही | 147 |
| 9 | अनुपस्थिती विवरण पत्रक | 94 | 20 | रोकड रकमे व्यतिरिक्त अनामत ठेव नोंदवही | 148 |
| 10 | प्रवास भत्ता नोंदवही | 96 व 97 | 21 | अनुदान नोंदवही | 149 |
| 11 | कोषागारावरील निवृत्तीवेतन प्रदान आदेश नोंदवही | 104 | 22 | कायम हंगामी आस्थापनेचे लेखापरीक्षण नोंदवही | 150 |
| | | | 23 | आकस्मिक लेखापरीक्षण पुस्तक | 152 |

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

उपरोक्त तपशिलात दर्शविलेल्या नोंदवह्या महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियमा प्रमाणे लेखाविभागात ठेवणे आवश्यक असतांना लेखाविभागात त्याप्रमाणे उचित कार्यवाही करून विहित नमुन्यात नोंदवह्या ठेवलेल्या नाहीत. तरी महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियमा प्रमाणे उपरोक्त तपशिलात दर्शविलेल्या अनुक्रमांक 1 ते 23 विषयांच्या विहित नमुन्यात नोंदवह्या ठेवून तसेच अध्यावत करून अनुपालन दर्शवावे.

सदर प्रकरणी अर्ध समास पत्र क्र 48 दिनांक 2 2/09/2015 व पत्र क्र. 57 दिनांक 30/09/2015 अन्वये अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन अप्राप्त आहे. त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATMPDF6701 (Ref No : 57)

## *75 सामान्य रोखपुस्तकातील जमा बाजू व रोखपालचे रोखपुस्तकातील जमा बाजूच्या रकमेतील फरका बाबत तसेच रोखपालचे रोखपुस्तकातील इतर व्यवहारा बाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 07**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सामान्य रोखपुस्तकातील जमा बाजू व रोखपालचे रोखपुस्तकातील जमा बाजूच्या रकमेतील फरका बाबत तसेच महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 39 नुसार रोखपालचे रोखपुस्तकामध्ये जमा व खर्च या दोन्ही बाजूचे व्यवहार न नोंदविता फक्त जमा बाजूचे व्यवहार नोंदविणे बाबत.***

DRAFT

म.न.पा अमरावतीचे सन 2012-2013 चे लेखापरीक्षण करित असतांना असे निदर्शनास आले की, सामान्य रोखपुस्तकातील जमा बाजू व रोखपालचे रोखपुस्तकातील जमा बाजूच्या रकमेतील फरका बाबत तसेच रोखपालचे रोखपुस्तकामध्ये फक्त जमा बाजूचे व्यवहार नोंदविल्याचे निदर्शनास आले यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. सामान्य रोखपुस्तक नियम 32(1) नमुना 11 मध्ये ठेवले असून रोखपुस्तकात पान क्र.123 वर दिनांक 30/03/2013 ला चलानाची रकम रु.16,95,20,352/- दर्शविली आहे व रोखपालची रोकडवही नियम 32(2) नमुना 18 मध्ये ठेवली असून दिनांक 30/03/2013 ला चलानाची रकमरु. 16,90,11,475/- दर्शविली आहे. तरी दोन्ही रोखपुस्तकातील दिनांक 30/03/2013 अखेर चलानाच्या रकमेत एकसुत्रता दिसून येत नाही.व रकमेत रु.5,08,875 /- चा फरक दिसून येतो. तरी फरका बाबत ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

2. सामान्य रोखपुस्तक पान क्र.148 वर चलान क्र.79 दिनांक 01/03/2013 ला रक्कम रु.2500 /- ची नोंद घेण्यात आली व रोखपाल यांचेकडील रोकडवहीत पान क्र.93 वर चलान क्र.79 दिनांक 01/03/2013 ला रक्कम रु.2400 /- ची नोंद घेतल्याने रकमेत रु.100/- चा फरक दिसून येतो. यावरून एकाच चलानाच्या रकमेत

एकसुत्रता दिसून येत नाही.

उपरोक्त अनुक्रमांक 1 व 2 मधील अनुक्रमे रु.5,08,875/- व रु.100/-ची तफावत आहे. तरी दिनांक 30/03/2013 अखेर शिल्लक योग्य असल्याबाबत तसेच रक्कमेच्या फरका बाबत महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 51 (3) प्रमाणे ताळमेळ घेवून अनुपालन दर्शवावे.

3. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 39 (1) नुसार रोखपालाने नमुना क्रमांक 18 नुसार निर्देशित केल्याप्रमाणे रोकड पुस्तक / वही ठेवली पाहिजे. ह्या पुस्तकाच्या / वहीच्या जमेच्या (डाव्या ) बाजूस संकलन कर्मचाऱ्यानी सादर केलेल्या प्रत्येक चलानाद्वारे स्वीकारलेली रक्कम अथवा स्वतः रोखपालाने दिलेल्या जमा पावत्यांची रक्कम दाखविली / नोंदली पाहिजे. रोकडवहीच्या खर्चाच्या (उजव्या ) बाजूस सर्व प्रदाने व कोषागारात वा बँकेत भरणा केलेल्या रक्कमा नोंदविल्या पाहिजेत. प्रत्येक दिवस अखेर रोकडवहीच्या दोन्ही बाजूच्या बेरजा घेऊन येणारी शिल्लक अक्षरी व अंकी लिहिली पाहिजे. तसेच ती सर्व प्रमाणके,चलाने आणि प्रदाने जमा पावत्यांबरोबर तपासली पाहिजेत. कोषागार तिजोरीत, कोषागार व बँकेतील शिल्लक मिळविल्यावर उरणारी शिल्लक, सर्वसाधारण रोकडवहीत दाखविलेल्या शिलकीशी जुळविली पाहिजे. असे असतांना रोखपालचे रोखपुस्तकामध्ये जमा व खर्च या दोन्ही बाजूचे व्यवहार न नोंदविता फक्त जमा बाजूचे व्यवहार नोंदविण्यात आले यावरून नियमाप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले. तरी या बाबत अनुपालन दर्शवावे.

4. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) नुसार रोखपालचे रोखपुस्तकामधील दिनांक 31/03/2013 अखेर दर्शविलेल्या रकमेचा अधिकोष खात्यातील प्रत्यक्षात शिल्लक रकमेशी ताळमेळ केलेला नाही. तरी नियमा प्रमाणे ताळमेळ घेऊन अनुपालन दर्शवावे.

5. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 32 (4) व 51 (1) मधील तरतुदीनुसार संबंधित अधिकारी यांनी स्वाक्षरीनिशी रोकडवहीत प्रतिदिन व्यवहार समाप्त करणे बंधन कारक असतांना त्यानुसार उचित कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते.

6. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 62(2) मधील तरतुदीनुसार प्राधिकृत अधिकाऱ्याने महिन्यातुन किमान एकदा तरी रोकडवहीची प्रत्यक्ष पडताळणी करून त्यानुरूप अभिप्राय / निष्कर्ष रोकडवहीत नोंदविणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.

7. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 40 प्रमाणे प्रत्येक महिना अखेर रोकडवहीत नोंदविलेली जमा व संविततरणे यांची बेरीज करून जमा व खर्चाच्या मासिक वर्गीकृत गोषवाऱ्याबरोबर मेळ घातला पाहिजे. असे असतांना त्या प्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.

उपरोक्त उणिवांची पूर्तता करून अनुपालन दर्शवावे व भविष्यात सदरील अनियमिततांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणी अर्ध समास पत्र क्र 151 दिनांक 26/11/2015 अन्वये मुद्दा क्रमांक 4 व 5 नुसार अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन अप्राप्त आहे. त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATMPDF6701 (Ref No : 151)

## *76 सामान्य रोखपुस्तकाच्या तपासणी अनुषंगाने आढळून आलेल्या इतर अनियमितता बाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 10**



DRAFT

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***रोजगार हमीकर, शिक्षण उपकर व मोठ्या इमारती वरील कर या रक्कमांचा शासनाकडे उशिरा भरणा करणे तसेच सामान्य रोखपुस्तकाच्या तपासणी अनुषंगाने आढळून आलेल्या इतर अनियमितता बाबत.***

म.न.पा.अमरावतीचे सन 2012-2013 चे लेखापरीक्षण करित असतांना सामान्य रोखपुस्तकाची तसेच बँक पासबुक व इतर अभिलेख्याची तपासणी करीत असतांना आढळून आलेल्या अनियमित्तता खालील प्रमाणे आहेत

1. सन 2012 -2013 मधील माहे मार्च 2013 चे लेखापरीक्षण करतांना रोजगार हमीकर , शिक्षण उपकर व मोठ्या इमारती वरील कर या रक्कमांचा शासनाकडे भरणा केल्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अनु .क्र . | बाब | वसुलीचा महिना | रक्कम | बँकेत भरणा केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1. | रोजगार हमीकर | मार्च / 2013 | 17,12,883/- | 26/04/2013 |
| 2. | शिक्षण उपकर | मार्च / 2013 | 1,02,24,641/- | 26/04/2013 |
| 3. | मोठ्या इमारतीवरील कर | मार्च / 2013 | 3,32,025 /- | 26/04/2013 |

उपरोक्त तपशिलात दर्शविल्या प्रमाणे माहे मार्च मधील वसुलीच्या रक्कमांचा माहे एप्रिल मध्ये एक महिना उशिरा शासन खाती भरणा केल्याचे निदर्शनास आले. महाराष्ट्र शासन , महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक -ईडीसी - 1097 /प्र.क्र.205 ल - 5 दिनांक 3 एप्रिल,1998 नुसार रोजगार हमी कर , शिक्षण उपकर, मोठ्या इमारती वरील कर, या कराच्या रकमा ज्या आठवड्यात वसूल केल्या जातात अशा रकमांचा शासकीय कोषागारात पुढील आठवडा संपण्याच्या आत भरणा करणे बंधन कारक असतांना उक्त नियमांचे काटेकोर पणे पालन न करता सन 2012 -2013 या आर्थिक वर्षात वर्षात वसूल केलेल्या रोजगार हमी कर , शिक्षण उपकर, मोठ्या इमारती वरील कर या कराच्या रकमांचा भरणा एक /दोन महिने उशिरा भरणा केल्याचे निदर्शनास आले

2. आधार योजना शासकीय अनुदान रकम रु. 3,00,000 /- रोख पुस्तकात दिनांक 05/03/2013 ला जमा दिसून येते परंतु आधार योजनाचे बँक खाते क्र. 952043452 मध्ये जमा आढळून येत नाही. तसेच 13 वा वित्त आयोग शासकीय अनुदान रकम रु. 4,36,94,519 /- रोख पुस्तकात दिनांक 30/03/2013 मध्ये जमा दिसून येते परंतु 13 वा वित्त आयोग बँक खाते क्र. 60063433276 मध्ये जमा आढळून येत नाही. सदर रक्कमा रोख पुस्तकात जमा असतांना बँक खात्यात जमा का केल्या नाहीत सदर रकमेच्या व्यवहाराबाबत अनुपालन दर्शवावे.

3. महाराष्ट्र नगरपालीका लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 9 धनादेश पुस्तकाचे साठा पुस्तक ठेवण्यात आले नाही.

4. शासनाकडून प्राप्त अनुदानाचे आदेश लेखापरीक्षणा दरम्यान न दर्शविल्यामुळे शासनाकडून प्राप्त अनुदानाची रक्कम योग्य असल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

5. सामान्य रोखपुस्तकात जमा बाजूला दैनंदिन एकून जमा रकमेच्या बेरजा घेतलेल्या नाहीत. तरी महाराष्ट्र

DRAFT

नगरपालीका लेखासंहिता 1971 चे नियम 51(1) प्रमाणे सामान्य रोखपुस्तकात जमा बाजूला दैनंदिन एकून जमा रकमेच्या बेरजा घेवून अनुपालन दर्शवावे.

6. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 32(2) नुसार सर्व रोकड वा धनादेशाद्वारे प्रत्येक जमा व वसुलीच्या तसेच प्रत्येक खर्चाची नोंद प्रतिदिन नोंदलेल्या रक्कमा जबाबदार अधिकाऱ्याने स्वाक्षांकित केल्या पाहिजे असे असतांना रोकड वहीतील प्रत्येक जमा व खर्चाची नोंद प्राधिकृत अधिकाऱ्याने स्वाक्षांकित केलेली नाही.

7. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 51 (1) (3) (4) नुसार सर्वसाधारण रोखीवहीचे लेखे रोजच्या रोज बंद करून समतोलीत केले पाहीजे आणि त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्याने स्वाक्षरी केली पाहीजे तसेच प्रत्येक महिन्याच्या अखेर रोखवहीतील जमा व खर्चाच्या रकमा पासबुकातील रकमांबरोबर ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

8. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 32 (4) व 51 (1) मधील तरतुदीनुसार संबंधित अधिकारी यांनी स्वाक्षरीनिशी रोकडवहीत प्रतिदिन व्यवहार समाप्त करणे बंधन कारक असतांना त्यानुसार उचित कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते.

9. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 62(2) मधील तरतुदीनुसार प्राधिकृत अधिकाऱ्याने महिन्यातुन किमान एकदा तरी रोकडवहीची प्रत्यक्ष पडताळणी करून त्यानुरूप अभिप्राय / निष्कर्ष रोकडवहीत नोंदविणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.

10. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 1971 चे नियम 40 प्रमाणे प्रत्येक महिना अखेर रोकडवहीत नोंदविलेली जमा व संविततरणे यांची बेरीज करून जमा व खर्चाच्या मासिक वर्गीकृत गोषवाऱ्या बरोबर मेळ घातला पाहिजे. असे असतांना त्या प्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.

उपरोक्त उणिवांची पूर्तता करून अनुपालन दर्शवावे व भविष्यात सदरील अनियमिततांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणी अर्ध समास पत्र क्र 151 दिनांक 26/11/2015 अन्वये अनुपालनास्तव कळविले असता अनुपालन अप्राप्त आहे. त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATMPDF6701 (Ref No : 151)

## *91 वार्ड क्र.77 झिरी बडनेरा येथील नाली,रस्ता व संरक्षण भिंत बांधणे कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 08**

*लेखा शीर्ष : दलित वस्ती सुधार योज शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1845885.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1845885.00/-

***तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्ती सोबत जोडण्यात आलेली नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही***

DRAFT

***केलेली नाही. तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत. रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा प्रसिध्द करून/ मागवून काम देण्यात आलेले आहे. कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना M-15 व्यतिरिक्त इतर साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10 (फ) नुसार ठेकेदाराकडून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता – संचिकेत अनुपलब्ध

तांत्रिक मान्यता - संचिकेत अनुपलब्ध दर सूची- सन- 2009-10

कार्यादेश - कार्यकारी अभियंता दिनांक-12.07.2011 कामाची मुदत -180 दिवस

अंदाजपत्रकीय रक्कम- रु. 2061844 कामावर झालेला खर्च -रु. 1845885

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत उपरोक्त विकास कामाची संचिका तपासली असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असुन त्या आधारे कामाच्या बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असतांना तशी अहवालाची प्रत नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

2. सदर कामांचे एकूण 06 अंदाजपत्रके तयार करून त्या 06 कामांची एकत्रित निविदा मागविण्यात आली आहे.सदर अंदाजपत्रकांना उपरोक्त लेखासंहितेतील नियम 161 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता सदर कामांना घेण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकाच्या शेवटी शहर अभियंता यांनी Technically Approve म्हणून स्वाक्षरी केली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र. 135 नुसार सदर अनुदानातून केलेल्या कामांचे तांत्रिक मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाहीत.तसेच प्रशासकीय मान्यतेचे आदेश संचिकेत निदर्शनास आले नाही.

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-07/2006/प्र.क्र.94/ इमारती-2 दिनांक-16.11.2006 नुसार रु. 15 लक्ष पर्यंतची कामे विनानिविदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे आवश्यक असतांना निविदा प्रसिध्द करून/मागवून काम देण्यात आलेले आहे. त्यामुळे उपरोक्त शासन आदेशाचे पालन झालेले नाही.

DRAFT

4. सदर कामाची निविदा क्र.09/11 दिनांक-06.02.2011 रोजी (दुसऱ्यांदा) साप्ताहिक पांचजन्य या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही न केल्याने स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेस लाभ मिळालेला नाही.

5. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक आहे. तथापि M-15 व्यतिरिक्त इतर साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे अंदाजपत्रकानुसार योग्य गुणवत्तेचे साहित्य वापरल्याची खात्री पटली नाही.

6. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. कामाची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवितांना मोजमाप पुस्तिकेतील रकाना क्रमांक 1 मध्ये मापे नोंदविल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा तथापि सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर न केल्याने उपरोक्त बाबींची खात्री करता आली नाही.

7. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा वेगवगळ्या निधीतून किंवा सदर निधीतून केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

8. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 169 दिनांक- 03.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते विभागाने दिलेले अभिप्राय/अनुपालन विचारात घेऊन परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATVKGM7601 (Ref No : 169)

DRAFT

## *92 एकूण सांडपाण्याच्या किमान 20% सांडपाण्याचे पुनर्रचर्क्रिकरण व पुनर्रवापर न करणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 03**

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकेने सन 2012-2013 या वित्तीय वर्षात सांडपाण्याच्या पुनर्रचर्क्रिकरण व पुनर्रवापर कोणतेही प्रकल्प हाती घेतलेले नाही. महापालिकेने प्रायोगिक तत्वावर एखादा तरी प्रकल्प हाती घेणे आवश्यक होते जेणे करून महापालिकेच्या सार्वजनिक उद्याने, शौचालये अथवा मनपाच्या वतीने केल्या जाणाऱ्या मोठ्या बांधकामासाठी सदर सांडपाण्याचा पुनर्वापर करता आला असता. तसेच मनपाने शहरात मोठ्या रहिवाशी/ औद्योगिक/व्यावसायिक प्रकल्पांमध्ये सांडपाण्याचे पुनर्रचर्क्रिकरण व पुनर्रवापर अनिवार्य करण्यासाठी कोणतेही ठोस पावले उचललेली नाहीत.***

DRAFT

केंद्र शासनाने नागरी क्षेत्रात सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचे पुनर्रचर्क्रिकरण व पुनर्रवापर करण्याकरिता एकूण सांडपाण्याच्या किमान 20% सांडपाणी हे पुनर्रवापरासाठी उपलब्ध करण्यात यावे असे मानक विहित केले आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोथ्यान अभियान राज्यात सुरु करतांना राज्य शासनाने सांडपाण्याच्या पुनर्चक्रिकरण व पुनर्वापरासंबधी सदर मानक स्वीकृत केले आहे. सदर मानकाप्रमाणे शहरातील एकूण सांडपाण्याच्या किमान 20% सांडपाणी पुनर्वापरात आणण्याकामी सुनियोजित करावयाची कार्यपद्धती शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.संकीर्ण-2010/1015/ प्र.क्र. 121/नवि-20 दिनांक-15.10.2010 नुसार खालील प्रमाणे विहित करण्यात आली आहे.

1. शहरातील एकूण सांडपाण्यापैकी 20% सांडपाण्याचे पुनर्चक्रिकरण व पुनर्वापर होईल हे सर्व नागरी स्वराज्य संस्थांनी स्वतःच्या प्रयत्नातून व नागरिकांना या कामी प्रवृत्त करून सुनिश्चित करावे.

2. नागरी भागात सांडपाण्याच्या पुनर्वापरास चालना देण्यासाठी प्रथम सांडपाण्यावरील प्रक्रियेद्वारे पुनर्वापरासाठी उपलब्ध होणारे पाणी कोणत्या कामासाठी वापरले जाऊ शकेल याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. ज्यार्थी सांडपाण्याच्या पुनर्वापराची शक्याशक्यता त्या त्या शहरामधील स्थानिक परिस्थितीवर अवलंबून आहे, त्यार्थी सांडपाण्याच्या पुनर्चक्रिकरणातून पुनर्वापरासाठी उपलब्ध होणारे पाणी हे खालीलपैकी कोणकोणत्या प्रयोजनासाठी वापरात येऊ शकेल या बाबतीत नागरी स्थानिक संस्थांनी पूर्वाभ्यास करण्याची कार्यवाही करावी.

अ. कृषी प्रयोजनार्थ पुनर्वापर उदा.उद्याने, शेती इत्यादी.

ब. वाणिज्यिक प्रयोजनार्थ पुनर्वापर उदा. पिण्याचे पाणी सोडून इतर कामासाठी वापर उदा.वाहने

धुणाऱ्या कार्यशाळा,वीट भट्ट्या,मोठी बांधकामे इत्यादी.

क. औद्योगिक प्रयोजनार्थ पुनर्वापर उदा. कारखाने, विद्युत प्रकल्प इत्यादी.

वरील प्रमाणे अभ्यास करून नागरी स्थानिक संस्थांनी शहरात सांडपाण्याचे पुनर्वापर कोणत्या प्रयोजनार्थ करणे व्यवहार्य व शक्य होईल हे सुनिश्चित करावे व त्यानुषंगाने सांडपाण्याचे पुनर्चक्रिकरण व पुनर्वापराचा सविस्तर प्रकल्प अहवाल तज्ञ सल्लागारांच्या मदतीने करून घ्यावा.

3. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून किमान 20% सांडपाण्याचे पुनर्चक्रिकरण व पुनर्वापरासाठी वर नमूद केल्यानुसार प्रयत्न होत असतांना त्या सोबतच शहरात मोठ्या रहिवाशी/औद्योगिक/व्यावसायिक प्रकल्पांमध्ये सांडपाण्याचे पुनर्चक्रिकरण व पुनर्वापर अनिवार्य करावे.

महानगरपालिकेने सन 2012-2013 या वित्तीय वर्षात सांडपाण्याच्या पुनर्रचर्क्रिकरण व पुनर्रवापर कोणतेही प्रकल्प हाती घेतलेले नाही. महापालिकेने प्रायोगिक तत्वावर एखादा तरी प्रकल्प हाती घेणे आवश्यक होते जेणे करून महापालिकेच्या सार्वजनिक उद्याने, शौचालये अथवा मनपाच्या वतीने केल्या जाणाऱ्या मोठ्या बांधकामासाठी सदर सांडपाण्याचा पुनर्वापर करता आला असता. तसेच मनपाने शहरात मोठ्या रहिवाशी/ औद्योगिक/व्यावसायिक प्रकल्पांमध्ये सांडपाण्याचे पुनर्रचर्क्रिकरण व पुनर्रवापर अनिवार्य करण्यासाठी कोणतेही ठोस पावले उचललेली नाहीत. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णया नुसार 20% सांडपाण्याचे पुनर्चक्रिकरण व पुनर्वापरासाठी महापालिकेचा सदर विभाग उदासीन असल्याचे दिसून येते.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमासपत्र क्र. 155 दिनांक- 03.12.2015 अन्वये विभागास त्यांचे अभिप्राय कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते तथापी विभागाने अभिप्राय/अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

DATSNGM6901 (Ref No : 155)

## *93 महानगरपालिका हद्दीतील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (Structural Audit) न करणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 06**

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकेच्या सन 2012-2013 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 265 अ नुसार कारवाई होत नसल्याचे व सदर तरतुदीकडे गांभीर्याने बघितले जात नसल्याचे निदर्शनास आले.त्यामुळे भविष्यात शहरातील धोकादायक इमारतींना अपघात होऊन मोठ्याप्रमाणावर जीवित/वित्तीय हानी होऊन त्याचे दायित्व महानगरपालिकेवर येवू शकते. त्यासाठी***

DRAFT

***उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे.***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 265 अ नुसार

1. महानगरपालिकेने समाप्ती प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून किंवा उपरोक्त अधिनियमातील कलम 263 अन्वये इमारतीच्या भोगवटा करण्यास परवानगी दिल्याच्या दिनांका पासून किंवा तिच्या बांधकाम क्षेत्राच्या किमान 50% इतक्या क्षेत्राचा प्रत्यक्ष भोगवटा केल्याच्या दिनांकापासून यापैकी जो आधीचा असेल त्या दिनांकापासून तीस वर्षाचा कालावधी समाप्त झाला असेल अशा इमारतींच्या मालक किंवा भोगवटदाराकडून इमातर मानवी वस्तीसाठी योग्य आहे अशा आशयाचे बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून तपासनी करून बांधकाम अभियंत्याने दिलेले बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र मा.आयुक्तांकडे सादर करील.

2. बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र उपरोक्त विनिर्दिष्ट केलेला तीस वर्षाचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून,आणि त्यानंतर प्रत्येक दहा वर्षाचा कालावधी किंवा त्या इमारतीची स्थिती आणि मालकाने किंवा भोगवटदराने केलेल्या दोषनिवारक दुरुस्त्या लक्षात घेवून मा.आयुक्त निर्धारित करील असा कमी कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत सदर करणे बंधनकारक आहे.

3. मा.आयुक्तांस कारणे लेखी नमूद केल्यानंतर,कोणत्याही वेळी,कोणत्याही इमारतीची बांधकाम अभियंत्याकडून तपासणी करवून घेण्याचे निदेश देता येतील असे निदेश दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र सादर करण्याचे निदेश इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटदाराला देता येतील.

4. बांधकाम अभियंता,जर इमारतीचे बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी कोणत्याही दोषनिवारक दुरुस्त्यांच्या शिफारशी करील तर,मा.आयुक्तांचे समाधान होईपर्यंत इमारतीच्या मालकाकडून किंवा भोगवटदाराकडून अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात येतील.

5. बांधकाम अभियंत्याच्या अहवालाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, जो मालक किंवा भोगवटदार बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी दोषनिवारक दुरुस्त्या करण्यास कसूर करील अशा कोणत्याही मालकास किंवा भोगवटदारास उपरोक्त अधिनियमाच्या कलम 398 अ मध्ये तरतूद केलेल्या दंडासह शिक्षा करण्यात येईल.

6. मा.अयुक्तास,मालकाला किंवा भोगवटदाराला लेखी नोटीस दिल्यानंतर नोटीसमध्ये विनिर्दीष्टीत केलेल्या कालावधीत इमारतीची बांधकाम विषयक सुस्थिती प्राप्त करण्यासाठी दोषानिवारक दुरुस्त्या करण्यास त्याला फर्मावता येईल जर मालक किंवा भोगवटदार उक्त कालावधीच्या आत,दुरुस्त्या करण्यास कसूर करील मा.आयुक्तास त्या दोषानिवारक दुरुस्त्या करता येतील व अशा दुरुस्त्यांवर केलेला खर्च,त्याची मागणी केल्यानंतर तीस दिवसांच्या आत भरणा न केल्यास मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे मालकाकडून/भोगवटदाराकडून वसूल करण्यात येईल.

